संपूर्ण । वदनीं वक्ता श्रीजनार्दन । यथार्थें पूर्ण अर्थवी ॥ ९८ ॥ पावा नाना मधुर ध्वनीं गाजे । परी तो वाजवित्याचेनि वाजे । तेवीं एका जनार्दनीं साजे । ग्रंथार्थवोजें कविकर्ता ॥ ७९९ ॥ इति श्रीमद्भागवते महापुराणे एकादशस्कंधे निमिजायंतसंवादे एकाकारटीकायां द्वितीयोऽध्यायः ॥ २ ॥

इति श्रीमद्भागवत महापुराणांतील एकादशस्कंधाचा परमहंस संहितेमधला श्रीधर-एकनाथविरचित टीकांनुसार विष्णुशर्मकृत सान्वयार्थ—भावार्थासह नारद-वसुदेवसंवाद नांवाचा द्वितीय अध्याय समाप्त झाला.

अध्याय तिसरा.

श्रीगणेशाय नमः ॥ ओं नमो जी श्रीगुरुराया । म्हणोनि सद्भावें लागें पायां । तंव मीपण गेलें वायां । घेऊनियां तूंपणा ॥ १ ॥ नवल पायांचें कठिणपण । वज्रें न तुटे लिंगदेह जाण । त्याचेंही केलें चूर्ण । अवलीळा चरण लागतां ॥ २ ॥ पायीं लागतांचि बळी । तो त्वां घातला पाताळीं । पायीं लवणासुरा रवंदळी । अतुबळी निर्दाळितां ॥ ३ ॥ पाय अतिशयेंसीं तिख । काळियासी लागतां देख । त्याचें शोषोनियां विख । केला निर्विख निःशेष ॥ ४ ॥ पाय अतिशय दारुण । शकटासी लागतां जाण । त्याचें तुटलें गुणबंधन । गमनागमन खुंटलें ॥ ५ ॥ पायांचा धाक सकळां । पायें उद्धरिली अहिल्या शिळा । पाय नृगें देखतां डोळां । थित्या मुकला संसारा ॥ ६ ॥ आवडीं पाय चिंतिती दास ।

आणि त्याचा यथार्थ समग्र अर्थ प्रकट करणारा माझा गुरु श्रीजनार्दन आहे. ९८ पांवा नानाप्रकारच्या मधुर ध्वनींनी वाजतो, पण त्याचें सर्व श्रेय वाजविणाराकडे असतें, त्याप्रमाणें काव्यकर्ता जरी हा एकनाथ आहे तरी ग्रंथार्थाच्या मिषानें त्याचें कर्तृत्व जनार्दनस्वामींनाच शोभतें. ७९९.

'हे सद्गुरुराया ! तुला नमस्कार असो.' असें म्हणून जो तुझ्या पायां पडावें तों 'तूंपणा घेऊन मीपणा' व्यर्थ जातो. १ सद्गुरु चरणांचा कठिणपणा विलक्षण आहे. जें सूक्ष्म शरीर वज्रानेंहि तुटत नाहीं, त्याचेंहि तूं आपल्या चरणस्पर्शानें सहज लीलेनें चूर्ण करितोस. २ बळीला तुझा पाय लागतांच त्याला तूं पाताळांत घातलेंस. अति बलिष्ठ अशा लवणासुराचाहि तूं नुस्त्या पायानें संहार केलास. ३ तुझे पाय अतिशय तीक्ष्ण आहेत. ते कालिया सर्पाला लागतांच त्याचें सर्व विष शोधून घेऊन तूं त्याला पूर्णपणें विषरहित केलेंस. ४ शकट या नांवाचा कंसाचा एक अनुचर होता. त्यानें श्रीकृष्णाला मारण्यासाठीं शकट म्ह० गाडीचें रूप घेतलें होतें. परंतु त्याला श्रीकृष्णाचा चरणस्पर्श होतांच त्याचें सर्व भवबंधन तुटलें व जन्म-मरणांतून सुटून तो मुक्त झाला. ५ (भागवत स्कंध १०. अ. १२ यांत ही कथा आहे.) मोठ्या समर्थांनाहि तुझ्या पायांचा धाक आहे. रामावतारीं गौतमाच्या शापानें शिळा होऊन पडलेल्या अहिल्येला तुझा पाय लागतांच तिचा उद्धार झाला. नृगनांवाच्या राजानें एकदां पुष्कळ गोप्रदानें दिलीं. त्यांतील एका ब्राह्मणास दान केलेलीं गाय चुकून राजाच्या गायींच्या कळपांत शिरली. राजाला ही गोष्ट कळली नव्हती, त्यामुळें त्यानें ती गाय दुसऱ्या एका ब्राह्मणाला दान दिली. तेव्हां पहिल्यानें दान घेणाऱ्या ब्राह्मणानें क्रोधानें त्या राजाला 'तूं सरडा होशील' असा शाप दिला. तो राजा सरडा होऊन पडला असतां श्रीकृष्णाच्या चरणस्पर्शानें मुक्त झाला. (ही कथा महाभारत अनु० अ० ७० यांत आहे.) ६ जे तुझे भक्त मोठ्या प्रेमानें तुझ्या पायांचें चिंतन करितात, त्यांच्या जन्म-मरणांचा नाश

त्यांच्या मनुष्यधर्मा होय नाश । पायें यमलोक पाडिला वोस । पायें जीवास जीवनाश ॥ ७ ॥ पायवणी शिरीं धरिलें शिवें । तो जगातें घेतु उठिला जीवें । त्यासी राख लाविली जीवेंभावें । शेखीं नागवा भंवे श्मशानीं ॥ ८ ॥ ऐसें पायांचें करणें । शिवासी उरों नेदी शिवपणें । या जीवांसी कैंचें जीवें जिणें । मानितें मानणें उरों नेदी ॥ ९ ॥ ऐसा जाणोनियां भावो । एका एकपणीं ठेला ठावो । तेथेंही पायांचा नवलावो । केला एकपणा वावो वंदनमात्रें ॥ १० ॥ तेथें कवणें कवणासी वानणें । कवणें कवणासी विनविणें । कवणें कवणासी देणें घेणें । मीतूंचें जिणें जीवें गेलें ॥ ११ ॥ तेव्हां देव आणि भक्तू । जाहलासी मा तूंचि तूं । तेथें मीपणाची मातू । कोणें कोणांतू मिरवावी ॥ १२ ॥ ऐशिया पदीं वाऊनि तत्त्वतां । करवितोसी ग्रंथकथा । तेव्हां माझेनि नांवें कवि कर्ता । तूंचि वस्तुतां सद्गुरुराया ॥ १३ ॥ माझें नामरूप आघवें एक । तेंही जनार्दनू झाला देख । ऐसें एकपणाचें कौतुक । आत्यंतिक श्रीजनार्दना ॥ १४ ॥ तेणें कौतुकेंचि आतां । माझेनि नांवें कविकर्ता । होऊनि स्वयें रचीं ग्रंथा । यथार्थता निजबोधें ॥ १५ ॥ तेथें द्वितीयाध्यायाचे अंतीं । दुस्तर माया उत्तम भक्तीं । निरसोनिया भजनस्थितीं । भगवत्प्राप्ती पावले ॥ १६ ॥ कैशी दुस्तर हरीची माया । पुसावया सादरता झाली राया । अत्यादरें करोनियां । म्हणे मुनिवर्या अवधारीं ॥ १७ ॥

राजो०—परस्य विष्णोरीशस्य मायिनामपि मोहिनीम् । मायां वेदितुमिच्छामो भगवन्तो ब्रुवन्तु नः ॥ १ ॥

होतो. तुझ्या पायांनीं यमपुरी ओसाड करून टाकिली. कारण तुझे पाय जीवाचें जीवपणच नाहींसें करितात. ७ तुझ्या चरणांचें तीर्थ म्ह० भागीरथी शंकरानें मस्तकावर धारण करितांच तो सृष्टीचा प्राण घ्यावयास उठला. पण तुझ्या पायांनीं मोठ्या प्रेमानें त्याला राख फासली. तेव्हां तो दिगंबर होऊन स्मशानांत हिंडूं लागला. ८ असा तुझ्या चरणांचा प्रताप आहे. तो शंकराचें शिवत्व जर राहूं देत नाहीं, तर मग जीवांचें जीवत्व कसें राहूं देईल ? मानणें व मानणारे हे दोन्ही उरत नाहींत, ९ असा भाव जाणून एकनाथ एकत्वानें राहिला आहे. पण तेथेंहि तुझ्या पायांनीं चमत्कार केला. त्या पायांना वंदन करितांच त्याचें एकत्वहि नाहींसें झालें. १० तेव्हां कोणीं कोणाची स्तुति करावी ! आणि कोणीं कोणाला विनवावें ! कोण कोणाला देणार व घेणार ! कारण 'मी तूं' यांचें जिणें जीवासह निघून गेले, ११ तेव्हां मग देव आणि भक्त दोन्ही तूंच झालास. तेथें 'मीपणाचा' डौल कोणीं कोणापुढें मिरवावयाचा ! १२ अशा पदाला पोंचवून तूं ही ग्रंथकथा माझ्या नांवानें करवीत आहेस, पण हे सद्गुरुराया ! वास्तविक तूंच कवी व कर्ता आहेस ! १३ माझें नांव व रूप सर्व एक जनार्दन झालें आहे. असें श्रीजनार्दनस्वामींच्या ऐक्याचें कौतुक मोठें विलक्षण आहे. १४ त्या कौतुकानेंच ते स्वतः कवी व ग्रंथकर्ता होऊन आतां आपल्या लीलेनें यथार्थ आत्मज्ञानानें युक्त असा ग्रंथ माझ्या नांवें रचीत आहेत. १५ दुसऱ्या अध्यायाच्या शेवटीं उत्तम भक्तांनीं दुस्तर मायेचें उलंघन करून भजनाच्या योगानें भगवत्प्राप्ति करून घेतली, १६ असें वर्णिलें. 'ती हरीची माया दुस्तर कशी !' हें विचारण्यासाठीं परीक्षितीराजा फार उत्सुक झाला व मोठ्या आदरानें म्हणाला कीं, हे मुनिवर्या ! ऐक. १७.

—दुसऱ्या अध्यायांत (श्लोक ४८) 'हें सर्व जगत् विष्णूची माया आहे, असें पहाणारा' इत्यादि म्हटलें आहे. यास्तव राजा आतां त्या मायेविषयींच प्रश्न करीत आहे—

राजा उवाच—राजा म्हणाला, भगवन्तः—अहो पूज्य मुनींहो, परस्य विष्णोः ईशस्य—सर्व श्रेष्ठ, व्यापक ईश्वराच्या, मायिनां अपि मोहिनीं मायां—मायाव्यांनाहि मोह पाडणाऱ्या मायेला, वेदितुं इच्छामः— आम्ही जाणण्याची इच्छा करितों, नः ब्रुवन्तु—आम्हांला सांगा. [मोटमोठ्या मायाव्यांनाहि मोह पाडणाऱ्या परमात्म्याच्या मायेला जाणण्याची मला इच्छा आहे, यास्तव आपण मला ती सांगा.] १.

तृतीयाध्यायीं निरूपण । राजा करील चारी प्रश्न । माया आणि तिचें तरण । ब्रह्म तें कोण कर्म तें कैसें ॥ १८ ॥ तेथें प्रथम मायेचा प्रश्न । रायें पुशिला आपण । तेचि अर्थीचें निरूपण । मायेचें लक्षण राजा बोले ॥ १९ ॥ सुरांमाजीं श्रेष्ठ हृषीकेशी । ब्रह्मादि शिवू वंदिती ज्यासी । त्या श्रीविष्णूची माया कैसी । जे मायिकांसी व्यामोही ॥ २० ॥ कैशी मायिकां माया मोही येथें । ब्रह्मा शिवू मानिती चित्तें । आम्ही पूर्ण मायेचे नियंते । शेखीं माया तयांतें निजमोहें मोही ॥ २१ ॥ ब्रह्मा मोहिला शिवाचे लग्नीं । वीर्य द्रवे पार्वती देखोनी । महादेवो महाज्ञानी । देखतांच मोहिनी निजवीर्य द्रवलें ॥ २२ ॥ जे सज्ञाना छळी लवलाह्या । जीतें श्रुति म्हणती अजया । ते हरीची दुर्धर माया । विवंचूनियां मज सांग ॥ २३ ॥ म्हणाल दुर्धर मायेची बाधकता । ते बाधूं न शके अनन्य भक्तां । तुवांही भजावें भगवंता । मिथ्या मायेची कथा कां पुसशी ॥ २४ ॥ तेचि अर्थीचें निरूपण । राजा साक्षेपेंसी आपण । मुनींचें ऐकावया गुह्य ज्ञान । विदग्ध प्रश्न आदरें पुसतु ॥ २५ ॥

नानुतृप्ये जुषन्युष्मद्वचो हरिकथामृतम् । संसारतापनिस्तप्तो मर्त्यस्तत्तापभेषजम् ॥ २ ॥

सेवितां तुमचें वचनामृत । पुरे न ह्मणे माझें चित्त । आस्वादितां शब्दीं शब्दार्थ । श्रवण क्षुधार्थ अधिक जाहले ॥ २६ ॥ अद्भुत कथा अतिसुरस । श्रवणीं श्रवणा अधिक सोस । रसना ह्मणे हा अतिगोड रस । डोळ्यां उल्हास हें अपूर्व रूप ॥२७॥ घ्राण ह्मणे हा निजगंधू । सुमनीं सुमना अति-सुगंधू । वाचा ह्मणे हा शब्दू । परमानंदू अनुवादे ॥ २८ ॥ नवल निरूपणाचा मावा । भुजस्फुरण ये

या तृतीय अध्यायामध्यें राजानें माया, तिचें उल्लंघन, ब्रह्म व कर्म यांविषयीं चार प्रश्न केले आहेत. त्यानें प्रथम मायेविषयीं प्रश्न केला. १८-१९ सर्व देवांमध्यें हृषीकेश श्रेष्ठ आहे. ब्रह्मदेवादि देव व शंकरहि त्याला वंदन करितात. त्याची मायाव्यांनाहि मोह पाडणारी माया कशी आहे, २० ती मोठमोठ्या मायाव्यांनाहि मोह कशी पाडते म्हणून विचाराल, तर सांगतों. ब्रह्मा, शिव इत्यादि मोठमोठेहि 'आम्ही मायेचे नियंते आहों' असें आपल्या मनांत समजतात. पण ती त्यांनाहि मोहित करिते. २१ ब्रह्मा, महादेव इत्यादि महाज्ञानी सुद्धां मायावश होऊन पार्वती, मोहिनी, इत्यादि स्त्रियांना पहातांच कसे गडबडले तें पुराणांतरीं प्रसिद्ध आहेच. २२ यास्तव जी माया ज्ञानी पुरुषांनासुद्धां हां हां म्हणतां ठकविते, जिला श्रुति अजा म्हणते, ती हरीची माया दुर्धर आहे. आपण मला तिचें विवेचन करून सांगा. २३ तुम्ही म्हणाल कीं मायेची बाधकता जरी दुर्धर आहे तरी ती अनन्य भक्तांना कांहीं करूं शकत नाहीं. यास्तव तूंहि भगवंताचें भजन कर, मिथ्यामायेची वार्ता कशाला विचारितोस ! २४ या प्रश्नाचें उत्तर राजा पुढील श्लोकामध्यें देणार आहे. मुनींचें गुह्यज्ञान ऐकण्यासाठीं तो चतुर राजा आदरानें हे प्रश्न करीत आहे. २५.

—अरेपण, राजा, वर सांगितलेल्या लक्षणांनीं युक्त असा भागवत बनून तूं कृतार्थ हो. अनेक प्रश्न विचारण्यांत काय अर्थ आहे ! असें ते मुनि म्हणतील म्हणून राजा म्हणतो—

संसारतापनिस्तप्तः मर्त्यः अहं—संसारतापांनीं अत्यंत संतप्त झालेला मी मानव, तत्तापभेषजम्—त्या तापाचें औषध असें, हरिकथामृतं—हरिकथामृत, युष्मत् वचः—तुमचें वचन, जुषन्—सेवन करणारा, न अनुतृप्ये— तृप्त होत नाहीं. [संसारसंतापांनीं संतप्त झालेला हा मानव—जनकराजा त्या तापाची शांति करणारें जणुंकाय औषधच असें हरिकथामृतरूप तुमचें वचन ऐकत असतांना तृप्त होत नाहीं, त्यामुळें असें प्रश्न करीत आहे.] २.

पण, अहो महाराज, तुमचें हें वचनामृत सेवन करीत असतांना माझें चित्त 'पुरें' असें म्हणत नाहीं. कान शब्दांतील शब्दार्थाचा स्वाद घेत असतांना अधिकच क्षुधार्त झाले आहेत. २६ आपली अतिसुरस अद्भुत कथा ऐकण्याविषयीं कानांचा सोस फारच वाढला आहे. रसना म्हणते हा फार गोड रस आहे. डोळ्यांना हें अपूर्व रूप आहे असें वाटतें. २७ घ्राण म्हणतें हा स्वाभाविक गंध आहे. पुष्पादिकांतील गंध यापासूनच उत्पन्न होतो. वाचा म्हणते हा शब्द परमानंदाचाच अनुवाद करितो. २८ आपल्या निरूपणांतील मोहिनी विचित्र आहे. हात याला

द्यावया खेवा । आलिंगन जीवींच्या जीवा । निजसद्भावा होतसे ॥ २९ ॥ तुमच्या कथा सुनिश्चितीं । दिव्यौषधी भवरोग छेदिती । त्रिविध तापांची निवृत्ती । जड मूढ प्राकृतीं ऐकतां भावें ॥ ३० ॥ राजा परमार्थसाकांक्ष । देखोनि सार्थक कथेचें लक्ष । हरीधाकुटा अंतरिक्ष । निरुपणीं दक्ष बोलता झाला ॥३१॥

अंत. उ.—एभिर्भूतानि भूतात्मा महाभूतैर्महाभुज । ससर्जोच्चावचान्याद्यः स्वमात्रात्मप्रसिद्धये ॥ ३ ॥

अंतरिक्ष ह्मणे राया । तुवां पुशिली हरीची माया । तो प्रश्नचि गेला वायां । बोलणें न ये आया बोलकियाचे ॥ ३२ ॥ वंध्यापुत्राचा जन्मकाल । रायें आणविला तत्काल । राशि नक्षत्र जाति कुल । सांगों जातां विकल योग्यता होय ॥ ३३ ॥ मृगजळाची पव्हे बरवी । गंधर्वनगरीं घालावी । वारा वळूनि सूत्रस्वभावीं । वाती लावावी खद्योततेजें ॥ ३४ ॥ निजच्छायेचें शिर फोडा । आकाशाची त्वचा काढा । शिंपीं आंधारू खरवडा । बागुलाचा रांडवडा निजशस्त्रें कीजे ॥ ३५ ॥ वांझेचे सुने पुत्र झाला । तेथ भीष्मस्त्रियें पान्हा आला । तेणें पयःपानें तो मातला । घरभंगु केला दिगंबराचा ॥ ३६ ॥ जातीं लहान दळावा वारा । अश्वशृंगें आकाश चिरा । नपुंसकाचीं नातोंडें घरा । सूर्योदयीं अंधारा लपों आलीं ॥ ३७ ॥ गुंजेचे निजतेजें दिवीं । हनुमंतलग्नीं लावावी । या सोहाळियालागीं

आलिंगिण्यास तयार होतात व जीव सद्भावानें स्वरूपांत तन्मय होतो. २९ खरोखर तुमच्या कथा या दिव्य औषधी आहेत. त्या संसाररोगाचा उच्छेद करितात. जड, मूढ, व प्राकृत लोकसुद्धां जर त्या कथा श्रद्धेनें ऐकतील तर त्यांच्याहि त्रिविध तापांची निवृत्ति होईल. ३० राजा परमार्थाचा अत्यंत लोभी आहे व त्याच्या प्रश्नांचीं उत्तरें दिल्यास आपल्या कथनाचें सार्थक होईल, असें जाणून निरूपणामध्यें दक्ष असलेला हरीचा धाकटा भाऊ अंतरिक्ष असें बोलला. ३१.

——मायेचें स्वरूपतः निरूपण संभवत नसल्यामुळें सृष्टयादि कार्यांच्या द्वारा तिचें निरूपण करण्यासाठीं अंतरिक्ष या नांवाचा ऋषभपुत्र म्हणाला——

महाभुज—हे महापराक्रमी राजा, **आद्यः भूतात्मा**—तो आद्यपुरुष ज्या शक्तीनें भूतांचा आत्मा होत्साता, **एभिः महाभूतैः**—उत्पन्न केलेल्या या महाभूतांनीं, **उच्चावचानि भूतानि**—हीं सर्व उच्च-नीच भूतें, **स्वमात्रात्मप्रसिद्धये**—जीवाच्या अत्यंत सिद्धीसाठीं, **ससर्ज**—उत्पन्न करिता झाला, ती भगवानाची माया होय. [ज्या शक्तीनें भूतांचा आत्मा होऊन उत्पन्न केलेल्या या आकाशादि पंचमहाभूतांनीं उच्च-नीच भौतिक शरीरें उत्पन्न करिता झाला ती भगवानाची माया होय, असा सोळाव्या श्लोकांतील ' एषा माया भगवतः ' या चरणाशीं पुढील सर्व श्लोकांचा संबंध आहे. त्यानीं तीं प्राणिशरीरें कशासाठीं उत्पन्न केलीं ? ' स्वमात्रात्मप्रसिद्धये ' जो स्वतःची उपासना करितो तो स्वमाता, त्या आत्म्याच्या म्ह० जीवाच्या अत्यंत सिद्धीसाठीं त्यानें प्राणिशरीरें उत्पन्न केलीं किंवा स्वांशभूत जे जीव, त्यांच्या मात्राप्रसिद्धीसाठीं म्ह० विषयभोगासाठीं व आत्मप्रसिद्धीसाठीं म्हणजे मोक्षासाठीं त्यानें भूतांना उत्पन्न केलें. कारण वेदस्तुतीमध्यें पूर्वीं तसें सांगितलें आहे.] ३.

अंतरिक्ष म्हणतो हे राजा, तूं हरीची माया विचारलीस, पण तुझा तो प्रश्न फुकट गेला. कारण ही माया मोठ्या वक्त्याच्याहि भाषणाच्या आटोक्यांत येत नाहीं. ३२ वंध्यापुत्राचा जन्मकाल आणवून त्यावरून त्याची रास, नक्षत्र, कुल, जाति हें सर्व वर्तवूं लागल्यास त्या ज्योतिषाची योग्यता जशी फुकट जाते तसाच या राजानें हा प्रसंग आणिला आहे. ३३ गंधर्वनगरामध्यें-आकाशांत भासणाऱ्या नगराकार आकृतींत जशी मृगजलाची सुंदर पाणपोयी घालावी, वाऱ्याचें सूत काढून त्याची वात करून ती काजव्याच्या ज्योतिवर लावावी, ३४ आपल्या छायेचें शीर तोडावें, आकाशाची त्वचा काढावी, शिंपीनें अंधाराला खरवडून काढावें, बागुलबुवाला आपल्या हातांतील शस्त्रानें मारून त्याच्या स्त्रियांना विधवा करावें, तसाच हा मायेविषयीं प्रश्न आहे. ३५ वांझेच्या सुनेला पुत्र झाला, त्याला पाहून भीष्माच्या स्त्रीला पान्हा आला, तिचें दूध पिऊन तो मत्त झाला आणि त्यानें संन्याशाच्या घराचा भंग केला. ३६ वाऱ्याला जात्यांत घालून बारीक दळावें, घोड्याच्या शिंगानें आकाशाला भोसकावें, नपुंसकाच्या नातवंडानीं सूर्योदय झाल्यावर सूर्याच्या घरांतील अंधारांत लपावयास यावें, ३७ हनुमानाच्या लग्नांत गुंजेच्या दिव्यांनीं घरभर प्रकाश

विकावी । वोसगांवी निजच्छाया ।। ३८ ।। आकाशाचीं सुमनें । सुवासें कीं वासहीनें । हें विवंचिती जें देखणें । ते मायेचें सांगणें सांगोत सुखें ।। ३९ ।। एवं मायेचें जें बोलणें । तें सांगतांचि लाजिरवाणें । नुपजत्याचें श्राद्ध करणें । तैशी सांगणें महामाया ।। ४० ।। माया म्हणावी येणें भावें । जे मी कदा विद्यमान नव्हे । यालागीं अविद्या येणें नांवें । वेदानुभवें गर्जती शास्त्रें ।। ४१ ।। भ्रमु तो मायेचें निजमूळ । भ्रांति हेंचि फूल सोज्वळ । भुली तें इचें साजुक फळ । विषय रसाळ सदा फळित ।।४२।। हे नसतेनि रूपें रूपा आली । सत्यासत्यें गरोदर जाहली । तेथ असत्याचीं पिलीं । स्वयें व्याली असंख्य ।। ४३ ।। वासनाविषयगुणीं । गुंफिली मिरवे वेणी । मीपणाच्या तरुणपणीं । मदनमोहिनी चमके ।। ४४ ।। मृगजळींच्या मुक्ताफळीं । मस्तकीं बाणली जाळी । गगनाच्या चांपेकळीं । मिरवे वेल्हाळी अतिसौंदर्यें ।। ४५ ।। रज्जुसर्पमाथ्याचा मणी । काढूनि लेइली ते लेणीं । शुक्तिकारजतपैंजणीं । चाले रुणझुणी खळखळत ।। ४६ ।। शशविषाणपादुका । लेऊनि ते चाले देखा । तिसी तो अहंकारु सखा । अतिनेटका ज्येष्ठपुत्र ।। ४७ ।। कुळविस्तारालागीं पाहीं । ममता व्याली ठायीं ठायीं । मोहो उपजवूनि देहीं । घरजांवयी त्या केला ।। ४८ ।। अहंममतायोगें । जग विस्तारलें अंगें । स्थूळ सबळ प्रयोगें । ममता निजांगें वाढवी ।। ४९ ।। संकल्पविकल्पांची कांकणें । बाणोनि मन दिधलें आंदणे । घालोनि त्रिगुणाचें ठाणें । माया पूर्णपणें थोरावे ।। ५० ।। ऐशी मिथ्या मूळमाया । वाढली दिसे राया । ते कैसेनि ये आया । सांगावया अनिरूप्य ।। ५१ ।। संत ह्मणों तरी ते नासे । असंत ह्मणों तरी आभासे । आधीं असे पाठीं नासे । ऐसीही नसे निजांगें ।। ५२ ।। जैसें मृगजळाचें ज्ञान दिसे तरी तें मिथ्या पूर्ण । तैसें आभासे भवभान । ते माया जाण नृपनाथा ।। ५३ ।। श्रुतीशास्त्रां मायामाग । पुसतां आरोगिती मूग । मायेसी साचाचें अंग । पाहतां

पाडावा, त्या सोहाळ्यासाठीं ओसाड गांवांत आपली छाया विकावी, ३८ किंवा आकाशपुष्पें सुवासिक आहेत किंवा गंधरहित आहेत याचा विचार करावा इत्यादि गोष्टी जे ज्ञाते पुरुष करूं शकतात, ते मायेचें वर्णन खुशाल करीत. ३९ याप्रमाणें मायेविषयीं बोलणें वक्त्याला लाजिरवाणें आहे. ते जन्मास न आलेल्या पुरुषाचें श्राद्ध करण्यासारखें आहे. ४० माया म्हणजे जी केव्हांहि विद्यमान नाहीं ती. म्हणूनच शास्त्रें वेदानुभवानें तिला अविद्या म्हणतात. ४१ भ्रम हेंच मायेचें मूळ, भ्रांति हेंच तिचें उज्ज्वल फूल व भूल हेंच तिचें स्वादिष्ट फल. ती विषयरूप रसाळ फळें नेहमीं प्रसवते. ४२ ही माया नसत्या रूपानें रूपाला आली, सत्य आणि असत्य यांनीं गरोदर झाली, व स्वतः असत्याचीं असंख्य पिलें व्याली. ४३ विषयगुणांनीं गुंफलेली वासनावेणी ती मिरविते व मीपणाच्या तरुणपणीं तीं मदनमोहिनी चमकूं लागते. ४४ मृगजळांत झालेल्या मुक्ताफळांची–मोत्यांची जाळी मस्तकावर धारण करून आकाशांत झालेल्या चांफ्याच्या कळ्यांनीं ती सुंदरी अतिशय सौंदर्यानें मिरवते. ४५ रज्जु सर्पाच्या मस्तकांतील मणी काढून त्याचे अलंकार लेवून शिंपीवर भासलेल्या रुप्याचे पैंजण घालून छुम छुम अवाज करीत, ४६ सशाच्या शिंगाच्या पादुका पायांत घालून ती चालते. तिला अहंकार हा अतिशय प्रिय व फार सुंदर ज्येष्ठ पुत्र झाला. ४७ कुलविस्तारासाठीं ती ठिकठिकाणीं ममतेला व्याली. मोहाला आपल्याच ठिकाणीं उपजवून तिनें त्याला घरजांवई केलें.४३ अहंता आणि ममता यांच्यायोगानें जगत् स्वतःच विस्तार पावलें. ममतेनें त्याला आपल्या सबळ प्रयोगानें स्वतः वाढविलें. ४९ संकल्पविकल्पांचीं कंकणें बांधून मन त्या ममतेला आंदण दिले आणि त्रिगुणांचें ठाणें बसवून माया पूर्णपणें वृद्धि पावली. ५० हे राया, अशी ही मिथ्या मूळमाया वाढलेली दिसते. ती अनिरूप्य आहे. तेव्हां तिचें वर्णन कसें करितां येईल ! ५१ ती सत् म्ह० खरी आहे असें म्हणावें तर नाहींशी होते. असत् म्ह० मिथ्या म्हणावी तर भासते, आधीं असते व मागून नाहींशी होते, असेंहि तिचें निश्चित स्वरूप नाहीं. ५२ मृगजळाचें ज्ञान जरी झालें तरी तें मृगजल पूर्णपणें मिथ्याच. त्याच न्यायानें हें संसाराचें भान होतें, पण ती माया आहे असें तूं जाण. ५३ मायेमध्यें सत्वाचा नुस्ता लेश तरी असेल म्हणून म्हणावें तर तोहि नीटसा दिसत नाहीं. ५४ मृग-

चांग दिसेना ॥ ५४ ॥ मृगजळाची महानदी । कोणे गिरिवरें उद्बोधी । हें सांगावया नाकळे बुद्धी । तेवीं मायासिद्धी अनिर्वाच्य ॥ ५५ ॥ आरसा काय प्रतिबिंब असे । जो पाहे तोचि आभासे । तेवीं आपुलेनि संकल्पवशें । माया उल्हासे नसतीची ॥ ५६ ॥ रज्जुसर्प जीत धरिला । त्याचें कौतुक पाहों चला । ऐसे बोलती जे बोला । ते मायेचा सोहळा सांगोत सुखें ॥ ५७ ॥ उडवों जातां आपुली छाया । सर्वथा न उडवे ज्याची तया । तेवीं तरतां दुस्तर माया । जाण राया निश्चितीं ॥ ५८ ॥ अग्निसंकल्पू सूर्या नसे । शेखीं सूर्यकांतींही न दिसे । तळीं धरिलेनि कापुसें । अग्नि प्रकाशे तद्योगें ॥५९॥ तेवीं शुद्ध ब्रह्मीं संकल्पु नाहीं । शेखीं न दिसे केवळ देहीं । माझारीं वासनेच्या ठायीं । देहाभिमानानें पाहीं संसारु भासे ॥ ६० ॥ जागृतीं देहाचा विसरु पडे । सवेंचि स्वप्नदेह दुजें जोडे । तेणें मिथ्या प्रपंच वाढे । स्वप्नीं स्वप्न कुडें कदा न मने ॥ ६१ ॥ सुषुप्तीसी देहाचा असंभवो । तेथ नाहीं भवभावो । जन्ममरण तेंही वावो । संसारसंभवो देहाभिमानें ॥ ६२ ॥ तेवी आत्मत्वाचा विसरू । तेणें मी देह हा अहंकारू । तेणें अहंकारें संसारू । अतिदुस्तरू थोरावे ॥ ६३ ॥ जेवीं मृगजळीं मिथ्या मासे । तेवीं ब्रह्मीं प्रपंचु नसे । तो निरसावया कैसें । साधनपिसें पिशाचा ॥ ६४ ॥ दोनीच अक्षरें माया । जंव गेलों सांगावया । तंव श्लोकार्थ ठेला राया । वाढला वायां ग्रंथु सैरा ॥ ६५ ॥ माया पाहों जातां हर्षें । सज्ञानही जालें पिसे । नांवरुपांचिये भडसें । कल्पनावशें माया वाढे ॥ ६६ ॥ मायेचें मुख्य लक्षण । राया तुज मी सांगेन खूण । आपली कल्पना संपूर्ण । ते माया जाण नृपवर्या ॥ ६७ ॥ निजहृदयींची निजआशा । तेचि माया गा मुख्य क्षितीशा । जो सर्वथा नित्य निराशा । तो पूज्य जगदीशा पूर्णत्वें ॥ ६८ ॥ आतां कांहींएक तुझ्या प्रश्नीं । माया सांगों उपलक्षणीं । सर्गस्थित्यंतकारिणी । त्रिविधगुणीं

जळाची महानदी कोणत्या पर्वतांतून उगम पावली हें बुद्धि सांगूं शकत नाहीं. तशीच मायेची सिद्धि अनिर्वाच्य आहे. ५५ आरसा स्वतः कांहीं प्रतिबिंब थोडाच आहे ! पण पहाणाराला त्यांत स्वतःचेंच प्रतिबिंब दिसतें. तशीच नसलेली माया आपल्या संकल्पानें विकास पावते. ५६ 'अहो, आम्हीं रज्जु-सर्पाला जिवंत धरलें आहे, त्याची गंमत पहावयास चला' असें जे बिचारे म्हणतात ते मायेचा सोहाळा खुशाल सांगोत. ५७ आपल्या छायेला उडवूं लागलें असतां ती ज्याची त्याला कधींच उडवून लावितां येत नाहीं, त्याचप्रमाणें या दुस्तर मायेचेंहि कोणालाच उलंघन करितां येत नाहीं. ५८ आपण अग्नीला उत्पन्न करावें, असा सूर्य कांहीं संकल्प करीत नाहीं. सूर्यकांतांतहि अग्नि दिसत नाहीं, पण खालीं कापूस धरला असतां अग्नि व्यक्त होतो. ५९ तसेंच शुद्ध ब्रह्ममध्यें संकल्प नाहीं, शेवटीं केवल देहामध्येंहि तो नाहीं. पण त्यांतील वासनेमध्यें देहाभिमानानें संसार भासतो. ६० जागृतींतील देहाचा विसर पडतो. लगेच दुसरा स्वप्नदेह मिळतो, त्यामुळें मिथ्या प्रपंच वाढतो. स्वप्नांत स्वप्न खोटें आहे, असें स्वप्नद्रष्टा केव्हांहि मानीत नाहीं. ६१ सुषुप्तींत तर देहाचा असंभवच आहे. त्या अवस्थेंत संसाराचें नांवहि नाहीं. जन्म आणि मरण हेंहि खोटेंच आहे. देहाभिमानानें संसार संभवतो. ६२ आत्मत्वाचा विसर पडला म्हणजे 'मी देह' हा अहंकार उद्भवतो व त्यामुळें दुस्तर संसार वृद्धि पावतो. ६३ मृगजलांत जसे मिथ्या मासे असतात, तसाच ब्रह्ममध्यें हा प्रपंच आहे. तेव्हां त्या प्रपंचाचें निरसन करण्यासाठीं पिशाचाप्रमाणें असलेल्या या जीवाला साधनाचें वेड कसें लागणार ! ६४ हे राजा, मायेचीं दोनच अक्षरें, पण तीं जेव्हां सांगावयास लागलों तेव्हां हा श्लोकाचा अर्थ तसाच राहिला व ग्रंथ भलतीकडेच वाढत गेला. ६५ मायेला पाहूं लागलें असतां सज्ञानहि वेडे झाले. नाम-रूपांच्या भरानें कल्पनावशात माया वाढते. ६६ हे राजा, मी तुला मायेचें मुख्य लक्षण ओळखण्याची खूण सांगतों. आपली सर्व कल्पना ही मायाच आहे, असें तूं समज. ६७ आपल्या मनांतील जी आशा तीच मुख्य माया आणि जो सर्वप्रकारें सदा निरिच्छ असतो तोच जगदीशाला पूर्णपणें पूज्य होतो. ६८ आतां ज्याअर्थीं तूं प्रश्नच केला आहेस, त्याअर्थीं उपलक्षणांनीं मी तुला सांगतों. उत्पत्ति, स्थिति व संहार करणारी ही माया तीन गुणांनीं विभाग पावते. ६९ ज्याप्रमाणें सूर्याला

विभागे ॥ ६९ ॥ जेवीं सूर्यासी संकल्पु नसे । तरी नसतां त्याच्या ठायीं दिसे । जेव्हां कां निजकिरणवशें । अग्नि प्रकाशे सूर्यकांतीं ॥ ७० ॥ तेवीं शुद्धस्वरूपीं पाहीं । संकल्पमात्र कांहीं नाहीं । नसताचि दिसे ते ठायीं । ते जाण विदेही मूळमाया ॥ ७१ ॥ स्वरूप निर्विकल्प पूर्ण । तेथ मी ह्मणावया ह्मणतें कोण । ऐसेंही ठायीं स्फुरे मीपण । ते मुख्यत्वें जाण मूळमाया ॥ ७२ ॥ तया मीपणाच्या पोटीं । म्हणे मजचि म्यां पहावें दिठीं । मजसीं म्यां सांगाव्या गोठी । अत्यादरें भेटी माझी मज होआवी ॥ ७३ ॥ मज माझी अतिप्रीती । माझी मज होआवी रती । माझ्याचि म्यां घेऊनि युक्तीं । मज माझी प्राप्ती मद्बोधें ॥ ७४ ॥ ह्मणे मज मियां आलिंगावें । मज मियां संभोगावें । मज मियां संयोगावें । नियोगावें स्वामिसेवकत्वें सर्वदा ॥ ७५ ॥ ऐकें आजानुबाहो नृपनाथा । ऐसें आठवलें भगवंता । तो आठवो जाला स्रजिता । महाभूतां भौतिकां ॥ ७६ ॥ चारी वर्ण चारी खाणी । चारी युगें चारी वाणी । चारी पुरुषार्थ चहूं लक्षणीं । मुक्तीची मांडणी मांडली चतुर्धा ॥ ७७ ॥ उभारूनि तिन्ही गुण । आठवो रची त्रिभुवन । तेणें मांडूनि त्रिपुटीविंदान । कर्मही संपूर्ण त्रिधा केलें ॥ ७८ ॥ एवं एकपणीं बहुपण । रूपा आणी मुळींची आठवण । परी बहुपणीं एकपण । अखंडत्वें पूर्ण तें कदा न भंगे ॥ ७९ ॥ जीं जीं कुंभार भांडीं करी । आकाश सहजेंचि त्यांभीतरीं । तेवीं महाभूते भौतिकाकारीं । समन्वयें हरी सर्वदा सर्वां ॥ ८० ॥ राया जाण येचि अर्थीं । बोलिलें उपनिषदांप्रती । 'एकाकी न रमते' या श्रुती । द्वैताची स्फूर्ती भगवंतीं स्फुरली ॥ ८१ ॥ किंबहुना एकपणें समस्तें । रूपा आलीं महाभूतें । तीचि हरीची माया येथें । जाण निश्चितें नृपनाथा ॥ ८२ ॥ भूतभौतिक स्फुरे जे स्फूर्ती । ते प्रकाशूं न शके माया स्वशक्ती ।

संकल्प नसतो, पण तो नसतांनाहि त्याच्या ठिकाणीं दिसतो. कारण त्याच्या किरणांमुळें सूर्यकांत-मण्यांतून अग्नि प्रकट होतो. ७० त्याप्रमाणें शुद्धस्वरूपामध्यें संकल्प म्हणून कांहीं नाहीं, पण तो नसतांनाहि प्रतीतीला येतो, हीच मूळ माया होय. ७१ आत्मरूप सर्वथा निर्विकल्प आहे. त्यांत 'मी' असें म्हणावयास दुसरें आहे कोण ! पण अशाहि ठिकाणीं मींपण स्फुरतें. मूळ माया मुख्यत्वेंकरून हीच आहे. ७२ त्या मीपणामुळें मींच आपल्याला आपल्या दृष्टीनें पहावें, मींच माझ्याशीं गोष्टी सांगाव्या, मोठ्या आदरानें माझीच मला भेट व्हावी, ७३ माझी मजवर फार प्रीति आहे, माझी माझ्या ठिकाणींच अत्यंत रति असावी, माझ्याच युक्तीनें मीं माझें ग्रहण करून माझ्याच बोधानें माझी मला प्राप्ति व्हावी, ७४ मीं मलाच आलिंगावें, मीं मलाच भोगावें, मींच माझ्याशीं संयुक्त व्हावें. स्वामी आणि सेवक या नात्यानें मींच मला सर्वदा कार्यांत योजावें, ७५ असें भगवंताला आठवलें ती आठवणच सृष्टिकर्ती झाला. महाभूतें, सर्व भौतिक शरीरें, ७६ चार वर्ण, जरायुजादि चार जाति, चार युगें, परा, पश्यन्ति, मध्यमा व वैखरी या चार वाणी; धर्म, अर्थ, काम व मोक्ष हे चार पुरुषार्थ; सलोकता, समीपता, सरूपता व सायुज्यता या चार मुक्ति; अशी चार प्रकारें ७७ तीन गुणांची उभारणी करून ती आठवणच त्रिभुवन रचिते. त्यानें त्रिपुटींची रचना करून कर्मांचेहि विहित, निषिद्ध व अकर्म असे तीन भाग केले. ७८ याप्रमाणें ती मूळची आठवण एकत्वामध्यें अनेकत्वाला व्यक्त करिते. तरीपण त्या अनेकत्वांतील एकत्व अखंड असतें. त्याचा केव्हांहि भंग होत नाहीं. ७९ कुंभार जें जें भांडें करितो, त्यांत आकाश सहजच असतें, त्याप्रमाणें महाभूतें व भौतिक शरीरें या सर्वांमध्यें हरि अखंड एकरूप असतो. ८० यासाठींच हे राजा, उपनिषदांमध्यें 'म्हणून ब्रह्म एकाकी रममाण होत नाहीं. त्याच्या ठिकाणीं द्वैताची स्फूर्ति झाली' असें सांगितलें आहे; (बृहदारण्यकभाष्यार्थ अ. १ ब्रा. ४ पृ. १४४ पहा.) ८१ किंबहुना एकत्वानें समस्त महाभूतें स्वरूपाला प्राप्त झालीं. हीच हरीची माया आहे, असें तूं निश्चयानें जाण. ८२ पण मायेपासून जीं भूतभौतीक कार्यें

मायाप्रकाशकू चिन्मूर्ती । अखंडत्वें भूताकृतीं प्रवेशला भासे ॥ ८३ ॥ मुख्य मायेचें निज-लक्षण । प्रकाशीं परमात्मा चिद्घन । तोचि भूतीं भूतात्मा आपण । प्रवेशलेपण नसोनि दावी ॥ ८४ ॥

एवं सृष्टानि भूतानि प्रविष्टः पञ्चधातुभिः । एकधा दशधाऽऽत्मानं विभजन् जुषते गुणान् ॥ ४ ॥

ऐशीं स्रजिलीं भूतें महाभूतें । जीं जडमूढ अचेतें । त्यांसी वर्तावया व्यापारार्थें । विभागी आपणातें तत्प्रवेशीं ॥ ८५ ॥ पंचधा पंचमहाभूतें । तें कार्यक्षम व्हावया येथें । पंचधा विभागें श्रीअनंतें । प्रवेशिजे तें ऐक राया ॥ ८६ ॥ गंधरूपें पैं पृथ्वीतें । प्रवेशोनि श्रीअनंतें । पूर्ण क्षमा आणोनि तीतें । चराचरभूतें वाहवी स्वयें ॥ ८७ ॥ पृथ्वीं प्रवेशला भगवंतु । यालागीं ते आवरण जळांतु । उरलीसे न विरतु । जाण निश्चितु मिथिलेशा ॥ ८८ ॥ धरा धरी धराधर । यालागीं विरवूं न शके समुद्र । धराधरें पृथ्वी सधर । भूतभार तेणें वाहे ॥ ८९ ॥ स्वादरूपें उदकातें । प्रवेशोनि श्रीअनंतें । द्रवत्वें राहोनियां तेथें । जीवनें भूतें जीववी सदा ॥ ९० ॥ जीवनीं प्रवेशे जगज्जीवन । याकारणें आवरण तेंचि जाण । न शोषितां उरे जीवन । हें लाघव पूर्ण हरीचें ॥ ९१ ॥ तेजाचे ठायीं होऊनि रूप । प्रवेशला हरि सद्रूप । यालागीं नयनीं तेज अमूप । जठरीं देदीप्य जठराग्नी जाहला ॥ ९२ ॥ रूपयोगें लवलाहीं । हरि प्रवेशे तेजाच्या ठायीं । तें आवरण वायूमाजीं पाहीं । न मावळे कांहीं यालागीं राया ॥ ९३ ॥

झालीं, त्यांना माया चैतन्यप्रकाशयुक्त करूं शकत नाहीं. म्हणून मायेचा प्रकाशक जो चिन्मूर्ति परमात्मा तो भूताकृतींत अखंडत्वानें प्रवेश केलेला भासतो. ८३ चिद्घन परमात्मा जिला प्रकाशित करितो ती माया, हें मायेचें मुख्य लक्षण आहे. तोच स्वतः भूतांतील भूतात्मा आहे. वस्तुतः तो भूतांत प्रविष्ट झालेला नसूनहि मी यांत प्रविष्ट झालों आहें असें दाखवितो. ८४.

एवं—याप्रमाणें, पंचधातुभिः—पंचमहाभूतांनीं, **सृष्टानि भूतानि**—उत्पन्न केलेल्या भूतांत, प्रविष्टः—प्रविष्ट झालेला तो चिदात्मा, एकधा—मनानें, दशधा—ज्ञान-कर्मेंद्रियरूपानें, आत्मानं विभजन्—आपला विभाग करीत होत्साता, गुणान्—त्या त्या विषयांचा, जुषते—भोग घेववितो. [याप्रमाणें जीवांवर उपकार करण्यासाठीं आकाशादि पंचमहाभूतांनीं उत्पन्न केलेल्या भौतिक शरीरांत अंतर्यामीरूपानें प्रविष्ट झालेला तो परमात्मा आपला मन या रूपानें एकधा आणि पांच ज्ञानेंद्रियें व पांच कर्मेंद्रियें या रूपानें दशधा विभाग करून आकाशादि भूतांच्या शब्दादि विषयांचें जीवांकडून सेवन करवितो. किंवा त्या प्रविष्ट झालेल्या आत्म्याला शब्दादि विषयांचा विभाग करून देणारा तो संतुष्ट होतो, असा याचा भावार्थ.] ४.

याप्रकारें भूतें व महाभूतें उत्पन्न केलीं. तीं जडमूढ व चेतनारहित असल्यामुळें त्यांच्या सुखदुःखादि अनुभवासाठीं तोच उत्पादक परमात्मा त्यांत प्रवेश करून आपलाच विभाग करिता झाला. ८५ पांच महाभूतें व त्यापासून उत्पन्न झालेले पांच भौतिक देह आपआपलीं कार्यें करण्यास समर्थ व्हावीं, म्हणून त्यांत पांच प्रकारांनीं विभाग करून श्रीअनंत कसा प्रवेश करितो, तें ऐक. ८६ गंधरूपानें पृथ्वीमध्यें प्रवेश करून व तिच्या ठिकाणीं पूर्ण क्षमा आणून तिनें आपल्या पाठीवर चराचर भूतें वहावीं असें केलें. ८७ भगवान् पृथ्वीमध्यें प्रविष्ट झाला म्हणूनच पृथ्वी जलांत इतका दीर्घकाल तशीच राहिली आहे, विरून गेली नाहीं. ८८ पृथ्वीला अनंतानें धारण केलें आहे, त्यामुळें समुद्र तिला विरवूं शकत नाहीं. अनंतामुळें पृथ्वी दृढ झाली आहे व त्यामुळेंच ती या सर्व भूतांचा भार आपल्या पाठीवर वहाते. ८९ भगवान् रसरूपानें उदकांत प्रवेश करून व द्रवरूपानें त्यांत राहून त्या जीवनसंज्ञक जलानें सर्व भूतांना सर्वदा जिववितो. ९० त्या जीवनांत जगज्जीवन प्रवेश करीत असल्यामुळेंच तेंच त्यांचें आवरण आहे, असें तूं समज. त्यामुळेंच जलतत्त्व सर्वथा सुकून जात नाहीं, तर जगाच्या आरंभापासून अंतापर्यंत तसेंच रहातें. खरोखर हें हरीचें माहात्म्य आहे. ९१ सद्रूप हरि तेजामध्यें रूप होऊन प्राण्यांच्या नेत्रांत विपुल तेज व उदरांत प्रदीप्त जठराग्नि झाला. ९२ हरि रूपाच्या योगानें तेजामध्यें प्रवेश करितो, तेंच वायूंतील तेजाचें आवरण आहे. त्यामुळें तेज कधीं मावळत नाहीं. ९३ भगवान् वायूमध्यें स्पर्शगुणानें प्रवेश करितो. म्हणून

वायूमाजीं स्पर्शयोगें । प्रवेशु कीजे श्रीरंगें । यालागीं प्राणयोगें । वर्तती अंगें अनेक जीव ॥ ९४ ॥ वायूच्या ठायीं हृषीकेश । स्पर्शरूपें करी प्रवेश । यालागीं वायूचा ग्रास । सर्वथा आकाश करूं न शके ॥ ९५ ॥ शब्दगुणें हृषीकेश । आकाशीं करी प्रवेश । यालागीं भूतांसी अवकाश । साव-काश वर्तावया ॥९६॥ शब्दगुणें गगनीं । प्रवेशला चक्रपाणी । यालागीं तें निजकारणीं । लीन होऊनी जाऊं न शके ॥ ९७ ॥ महाभूतीं निरंतर । स्वाभाविक नित्य वैर । येरांतें ग्रासावया येर । अति तत्पर सर्वदा ॥ ९८ ॥ जळ विरवूं पाहे पृथ्वीतें । तेज शोषूं पाहे जळातें । वायु ग्रासूं धांवे तेजातें । आकाश वायूतें गिळूं पाहे ॥ ९९ ॥ तेथ प्रवेशोनि श्रीधर । त्यांतें करूनियां निर्वैर । तेचि येरामाजीं येर । उल्हासें थोर नांदवी ॥ १०० ॥ एवं पंचभूतां साकारता । आकारली भूताकारता । तेथें जीवरूपें वर्त-विता । जाहला पैं तत्वतां प्रकृतियोगें ॥ १ ॥ त्यासी ब्रह्मांडीं ' पुरुष ' हें नांव । पिंडीं त्यातें म्हणती ' जीव ' । हा मायेचा निजस्वभाव । प्रतिबिंबला देव जीवशीवरूपें ॥ २ ॥ शिवीं जे योगमाया विख्याती । जीवीं तीतें अविद्या म्हणती । हेचि मायेची मुख्यत्वें भ्रांती । स्वप्नस्थिती संसारू ॥ ३ ॥ ज्यातें म्हणती दीर्घ स्वप्न । तो हा मायावी संसार संपूर्ण । निद्रेमाजीं दिसे जें भान । तें जीवाचें स्वप्न अविद्यायोगें ॥ ४ ॥ येथ जागा जाल्या मिथ्या स्वप्न । बोधु जाहलिया मिथ्या भवभान । हें अवघें मायेचें विंदान । राया तूं जाण निश्चित ॥ ५ ॥ आतां जीवाची विषयावस्था । विषयरसीं विषयभोक्ता । एकधा दशधा विभागता । आईक नृपनाथा सांगेन ॥ ६ ॥ एकधा भागें अंतःकरण । स्वयें झाला जनार्दन । मन बुद्धि चित्त अहंस्फुरण । चतुर्धा जाण विभागें ॥ ७ ॥ जीव आपुल्या परिपूर्णता । अहं म्हणे निजात्म-सत्ता । तेथ मायेची अतिलाघवता । देहात्मता दृढ केली ॥ ८ ॥ अहंकारु वाढविता देहात्मता । विसरे

अनेक जीव प्राणबलानें सशरीर वावरतात. ९४ याप्रमाणें हृषीकेशानें वायूमध्यें स्पर्शगुणानें प्रवेश केल्यामुळें आकाश वायूचा सर्वथा ग्रास करूं शकत नाहीं. ९५ हृषीकेश आकाशांत शब्दगुणानें प्रवेश करितो, म्हणून सर्व भूतांना यथेष्ट संचार करावयास अवकाश मिळतो. ९६ भगवान् शब्दगुणानें त्यांत प्रविष्ट झाल्यामुळें आकाश आपल्या कारणांत लीन होऊन जात नाहीं. ९७ या महाभूतांचें सतत स्वाभाविक वैर आहे. त्यांतील एक भूत दुसऱ्या भूतास खावयास सर्वदा तत्पर असतें. ९८ जल पृथ्वीला विरवूं पहातें. तेज जळाला सुकविण्यास तत्पर असतें. वायु अग्नीला विझवावयास धांवतो, आकाश वायूला गिळून टाकण्याच्या विचारांत असतें, ९९ पण श्रीधर त्यांत प्रवेश करून त्यांना परस्पर निर्वैर करितो आणि त्यांना परस्परांमध्यें मोठ्या उल्हासानें नांदवितो. १०० याप्रमाणें पंचभूतांना शरीररूपानें साकारता आणिली आणि त्यांत जीवरूपानें प्रवेश करून तो भगवानच प्रकृति-वशात् त्यांना वर्तविता झाला. १ त्याला ब्रह्मांडामध्यें पुरुष व शरीरांत जीव हें नांव आहे, हा मायेचा निजस्वभाव आहे. देवच जीव-शिवरूपानें तिच्यामध्यें प्रतिबिंबित झाला. २ तिला शिवामध्यें योगमाया व जीवामध्यें अविद्या म्हणतात. मुख्यत्वानें मायेची भ्रांति हीच आहे, त्यामुळें संसार स्वप्नासारखा मिथ्या आहे. ३ त्याला दीर्घस्वप्न म्हणतात. तोच हा संपूर्ण मिथ्या संसार आहे. झोंपेमध्यें जें भान होतें तें अविद्येमुळें जीवाचें स्वप्न आहे, ४ या स्वप्नांत तें खरें असतें, पण जागें होतांच तें मिथ्या स्वप्न होतें. त्याच न्यायानें आत्मसाक्षात्कार होतांच त्यापूर्वीं सत्य असलेला संसार मिथ्या होतो. राजा, हें सर्व मायेचें कार्य आहे, असें तूं निश्चयानें जाण. ५ आतां मी तुला जीवाची विषयावस्था सांगतो. तो आपलाच एकधा व दशधा विभाग करून विषयभोक्ता कसा होतो, तें मी तुला सांगतों. ६ स्वतः जनार्दनच एकधा भागानें अंतःकरण झाला, त्या अंतःकरणाचे मन, बुद्धि, चित्त व अहंकार असे चार भाग आहेत. ७ जीव आपली परिपूर्णता व स्वाभाविक सत्ता, यांना उद्देशून ' अहं ' असें म्हणतो. पण ही माया आपल्या चातुर्यानें त्या अहंकारामध्येंच देहात्मता दृढ करती झाली, ८ आणि ' देहच मी ' हा अहंकार तिनें वाढविला असतां जीव आपली चिद्रूपता

आपुली चिद्रूपता । तो विसरू वाढवी विषयचिंता । तेंचि चित्त तत्त्वतां महाराजा ॥ ९ ॥ देहअहंता अतिचपळ । तीतेंच म्हणती मन चंचळ । नाना संकल्पविकल्पजाळ । वाढवी प्रबळ भय शोक दुःख ॥ ११० ॥ देहअहंतेचें शाहाणपण । तिये नांव गा बुद्धि जाण । ते बुद्धीनें निश्चय केला पूर्ण । आम्हां जन्ममरण अनिवार ॥ ११ ॥ एवं देहाभिमानाचे माथां । चित्तचतुष्टय अवस्था । मुख्य संसाराचा कर्ता । जाण तत्त्वतां देहाभिमानु ॥ १२ ॥ अहंकार धरी सोहंपण । तैं चित्तीं प्रगटे चैतन्यघन । तेव्हां मनही होय उन्मन । बुद्धीचा निश्चयो पूर्ण परब्रह्मीं ॥ १४ ॥ समूळ मावळल्या अभिमान । कैंची बुद्धि कैंचें मन । बुडे चित्ताचें चित्तपण । ब्रह्म परिपूर्ण कोंदाटे ॥ १४ ॥ एकधा विभाग अंतःकरण । त्याची उणखूण निजलक्षण । राया सांगीतलें संपूर्ण । आतां दशधा लक्षण तें ऐक ॥ १५ ॥ दशधा इंद्रियें अचेतन । तयांतें चेतविता नारायण । दशधारूपें प्रवेशोन । इंद्रियवर्तन वर्तवी ॥ १६ ॥ दृष्टीमाजीं झाला देखणें । दृश्य प्रकाशी दृश्यपणें । ऐसेनि प्रकाशपणें । दृश्याभरणें दाखवी ॥ १७ ॥ श्रवणीं झाला तो ऐकणें । शब्द प्रकाशी शब्दलक्षणें । मग अर्थावबोधकपणें । शब्दविंदानें ऐकवी ॥ १८ ॥ रसीं रसस्वादु नारायण । रसने तोचि रसस्वादन । यापरी नानारससेवन । करवी जनार्दन जनांमाजीं ॥ १९ ॥ सुमनीं श्रीहरि सुगंध । घ्राणीं तोचि जाणे गंधावबोध । यापरी सुमनमकरंद । भोगवी गोविंद निजांगयोगें ॥ १२० ॥ शीत उष्ण मृदु कठिण । स्पर्श प्रकाशिता नारायण । त्वचेमाजीं तोचि स्पर्शन । यापरी जगजीवन भोगवी स्पर्श ॥ २१ ॥ वाचेचा वाचकु कमळापती । तोचि प्रकाशी शब्दपंक्ती । नाना शब्दार्थव्युत्पत्ती । वदवी निश्चितीं वाचाळपणें ॥ २२ ॥ करांच्या ठायीं देती घेती । अकर्तेनि कर्तव्यशक्ती । चरणा आचरणें निगुती । गमनस्थिती गोविंदें ॥ २३ ॥ उपस्थसुखाची सुखप्राप्ती । तेणें

विसरतो, तो विसरच विषयचिंता वाढवितो. हे महाराजा, खरोखर विषयचिंतन हेंच चित्त आहे. ९ देहाहंकार फार चपळ आहे. त्यालाच चंचल मन म्हणतात. तें अनेक संकल्पविकल्पांचें जाळें पसरितें. त्याच्या योगानें असह्य भय, संताप व दुःख वाढवितें. ११० देहाभिमानाचें जें शहाणपण तीच बुद्धि होय. त्या बुद्धीनें आमचें जन्म-मरण अनिवार्य आहे असा पूर्ण निश्चय केला. ११ याप्रमाणें देहाभिमानाच्या मस्तकावर अंतःकरणचतुष्टयाचा आरोप होतो. म्हणून हे राजा, देहाभिमानच संसाराचा मुख्य कर्ता आहे, असें तूं जाण. १२ पण अहंकार देहाभिमान सोडून ‘सोहं’ असा आत्माभिमान धरिला असतां चित्तांत चैतन्यघन परमात्मा प्रकट होतो. त्या वेळीं मनहि आपलें संकल्पविकल्पात्मक शरीर सोडतें. पूर्णपरब्रह्माविषयीं बुद्धीचा निश्चय होतो. १३ कारण देहाभिमान समूळ मावळल्या-वर कोठची बुद्धि व कोठचें मन ! चित्ताचें चित्तपणहि नाहींसें होतें. मग पूर्ण परब्रह्म सर्वत्र प्रतीत होतें. १४ राजा, याप्रमाणें मीं तुला आत्म्याचा एकधा विभाग जें अंतःकरण त्याचें लक्षण सांगितलें. त्यावरून त्याचा तुला प्रत्यय येईल. आतां त्याच्या दशधा विभागाचें लक्षण ऐक. १५ दहा इंद्रियें हाच दशधा विभाग आहे. पण तो अचेतन—जड आहे. नारायणच दहा शक्तींच्या रूपानें त्यांत प्रवेश करून त्यांना सचेतन करितो व प्रत्येक इंद्रियाकडून आपलें कार्य करवितो. १६ तो नेत्रामध्यें दर्शनशक्ति म्ह० रूप पाहाण्याची शक्ति सर्व दृश्याला दृढत्वानें प्रकाशित करितो. याप्रमाणें प्रकाशानें तो दृश्याचें सौंदर्य दाखवितो. १७ कानामध्यें तो ऐकण्याची शक्ति होऊन शब्दरूपानें शब्दाला प्रकाशित करितो आणि अर्थज्ञानाच्या रूपानें शब्दसमूहाला ऐकवितो. १८ नारायण जिव्हेमध्यें रसग्रहणशक्ति होऊन रसनेच्या द्वारां तोच रसाचा आस्वाद घेतो आणि याप्रमाणें जनार्दन जीवाकडून अनेक रसांचें सेवन करवितो. १९ तोच नाकांतील गंधग्रहणशक्ति होऊन पुष्पांतील सुगंध जाणतो. अशाप्रकारें तो गोविंद आपल्या स्वरूपानें जीवाकडून पुष्पांतील सुगंध भोगवितो. १२० शीत, उष्ण, मृदु, कठिण इत्यादि स्पर्शांना प्रकट करणाराहि नारायणच आहे. तोच सर्व प्राणिशरीरांतील त्वचेमध्यें स्पर्शग्रहणशक्तीरूपानें राहून जीवाकडून स्पर्श भोगवितो. २१ वागिंद्रियाकडून शब्दोच्चार करविणाराहि हा कमलापतिच आहे. तोच शब्दसमूहाला प्रकट करितो. त्यांतील मूळ शब्द व प्रत्यय यांचा स्पष्ट उच्चारहि खरोखर तोच जीवाकडून वाचाळपणें करवितो. २२ हातांतील देणें व घेणें या कर्तव्यशक्तीहि त्या अकर्त्याच्याच आहेत. पायांचा संचार व स्थिति म्हणजे थांबणें ही शक्तीहि गोविंदाचीच आहे. २३

सुखें सुखावे श्रीपती । स्त्रीपुरुषमैथुनव्युत्पत्ती । प्रकाशी अतिप्रीतीं पुरुषोत्तमु ॥ २४ ॥ गुदाचे ठायीं जे कां क्षरण । तेंही अक्षरें होय जाण । यापरी निजात्मा परिपूर्ण । दशधा आपण विभागला देहीं ॥ २५ ॥ यापरी गा देहयोगें । विलासे विषयसंभोगें । भोग्य भोक्ता उभय भागें । प्रकाशूनि अंगें स्वयें भोगी ॥ २६ ॥ जेवीं साळईच्या रुखा । साळईची बीज देखा । साळईचि शाखोपशाखा । न विकारतां असका वृक्ष होये ॥ २७ ॥ जेवीं कां ऊंसु बीजीं पडे । तो बाहेर ऊंसपणेंचि वाढे । जरी भिन्न भिन्न कांडें चढे । तरी मागें पुढें रस एकू ॥ २८ ॥ तेवीं विषय आणि करणें । प्रकाशूनि एकपणें । मग विषयरस सेवणें । जीवपणें स्वयें सेवी ॥ २९ ॥

गुणैर्गुणान् स भुञ्जान आत्मप्रद्योतितैः प्रभुः । मन्यमान इदं सृष्टमात्मानमिह सज्जते ॥ ५ ॥

इंद्रियां आणि विषयांसी । सहजें अंतर्यामी प्रकाशी । जीव सेवूनि त्या विषयांसी । पावे आसक्तीसी अहंभावें ॥ १३० ॥ म्हणे हे विषय कैसे गोड । माझ्या देहाचें पुरे कोड । तंव इंद्रियांची खवळे चाड । विषय वाड भोगावया ॥ ३१ ॥ इंद्रियां विषयांचे आसक्ती । देहाभिमानें वाढे वृत्ती । मावळोनि मुळींची स्फूर्ती । मोहममतास्थिती दृढ वाढे ॥ ३२ ॥ मग मी म्हणे देहातें । देहसंबंधीतें आप्तें । विषयांचिये लोलुपते । उसंतु चित्तें असेना ॥ ३३ ॥ प्रकृतिस्वभावें कर्म जालें । तें तें म्हणे म्यां केलें । देहअहंतेचेनि नाथिलें । काबिरें चढलें अनिवार ॥ ३४ ॥ देहअहंता अतिउद्भट । तेथें मोहममता अति दुर्घट । तेणें जन्ममरणांची वाट । घडघडाट प्रवाहे ॥ ३५ ॥

उपस्थाच्या द्वारां होणाऱ्या सुखाची प्राप्ति या नारायणामुळेंच होते. त्या सुखानेंच तो सुखी होतो. स्त्री-पुरुषसंयोगापासून होणारे सुखभाव हा पुरुषोत्तमच मोठ्या प्रीतीनें प्रकट करितो. २४ पायूंतील मलत्यागसामर्थ्यहि हें अक्षरब्रह्मच आहे, असें तूं समज. याप्रमाणें हा परिपूर्ण परमात्मा प्रत्येक प्राणिशरीरांत दहाप्रकारें विभागिला आहे. २५ राजा, वर वर्णन केल्याप्रमाणें हा परमात्माच देहसंबंधानें विषयानुभव घेतो. भोक्ता व भोग्य अशा दोन प्रकारच्या विभागानें प्रकट होऊन तो स्वतःच शरीरद्वारां सर्व भोग भोगितो. २६ ज्याप्रमाणें साळईच्या वृक्षाचें साळईच बीज आहे व साळईच त्याच्या शाखा व उपशाखा आहेत. पण तो जेव्हां विकार न पावतां बीजावस्थेंत असतो तेव्हांहि तो सर्व वृक्षरूप असतोच २७ किंवा ज्याप्रमाणें ऊंसाचें वाढें जमिनींत लावलें जातें व त्यापासून पुढें तें ऊंस या रूपानेंच वाढत जातें, त्याचीं निरनिराळीं कांडीं जरी वरवर चढूं लागतात तरी त्यांत मागें व पुढें सर्वत्र एक रसच असतो, २८ त्याप्रमाणें विषय आणि इंद्रियें या दोहोंनाहि एकत्वानें प्रकट करून हा परमात्माच मग जीवत्वानें स्वतः विषयरसाचें सेवन करितो. १२९.

सः प्रभुः—तो जीव, आत्मप्रद्योतितैः गुणैः—अंतर्यामीनें प्रकाशित केलेल्या इंद्रियांनीं, गुणान्—विषयांना, भुंजानः—भोगणारा, इदं सृष्टं—उत्पन्न केलेल्या या शरीराला, आत्मानं मन्यमानः—आत्माच समजणारा, इह—या शरीरादिकांत, सज्जते—आसक्त होतो. [आणि तो शरीरांत प्रवेश करून विषयभोग घेणारा जीव अंतर्यामीनें प्रकाशित केलेल्या इंद्रियांनीं विषयाचा भोग घेणारा असा होत्साता या उत्पन्न केलेल्या शरीरादिकांना आत्माच समजून त्यांत आसक्त होतो.] ५.

अंतर्यामी इंद्रियें व विषय यांना स्वभावतःच प्रकाशित करितो. जीव त्या विषयांचें सेवन करून अहंभावानें आसक्त होतो आणि म्हणतो कीं, १३० हे विषय किती गोड आहेत ! हे माझ्या देहाचें कोड पुरवितात. पण या मिथ्या भावनेमुळें इंद्रियांची विषयभोगाविषयींची प्रीति क्षुब्ध होते. ३२ इंद्रियें विषयासक्त झालीं असतां देहाभिमान अतिशय वाढतो. त्यामुळें मूळची आत्मस्फूर्ति पार मावळून जाते. मीच परमात्मा आहें, हें स्वरूपभान तो विसरतो आणि मोह व ममता अतिशय वाढते. ३१ नंतर तो देहाला मी असें म्हणतो. देहसंबंधीं भार्या-पुत्रांना आप्त मानितो आणि विषयांच्या लोभामुळें त्याच्या चित्ताचें समाधान नाहींसें होतें. ३३ प्रकृतीच्या स्वभावानें जें जें कर्म होतें तें मींच केलें असें हा म्हणतो. पण या मिथ्या देहाभिमानानें त्याच्या चित्तांत अनिवार क्षोभ उद्भवतो. ३४ देहाहंकार अतिशय भयंकर आहे. त्यामुळें होणारा मोह व ममता हीं तर फारच अनिवार्य आहेत. त्यामुळें जन्म-मरणांचा प्रवाह अविच्छिन्न वहात राहतो. १३५.

कर्माणि कर्मभिः कुर्वन् सनिमित्तानि देहभृत् । तत्तत्कर्मफलं गृह्णन् भ्रमतीह सुखेतरम् ॥ ६ ॥

मनीं धरोनि विषयकाम । कर्मेंद्रियीं करितां कर्म । तेथें निपजती धर्माधर्म । बाधक परम पुरुषार्थे ॥ ३६ ॥ कल्पिला फळभोग घडे । त्यासारिखें देह धरणें पडे । देहें देहाचीं खाणी उघडे । मरण वाढे तैसेंची ॥ ३७ ॥ फळाशा कर्म अतिदारुण । अमरां आणी अमित मरण । अजन्म्या अंगीं जन्म पूर्ण । पुनःपुनः जाण आदळती ॥ ३८ ॥ एवं स्वर्ग आणि संसारा । जन्ममरणांच्या येरजारा । नाना योनि अपारा । निजकर्मद्वारा स्वयें भोगी ॥ ३९ ॥ डोळे बांधोनि जुंपिला घाणा । तेलियाचा ढोरू जाणा । करकरीतु परिभ्रमणा । अविश्रम जाणा भोंवतसे ॥ १४० ॥ तेवीं बांधोनि ज्ञानाचे डोळे । भोगूं जातां निजकर्मफळें । तंव जन्ममरणांचे सोहळे । भोगी आगळे अनिवार ॥ ४१ ॥ उदोअस्तांचेनि प्रमाणें । जैसें सूर्यासी पडे भंवणें । तैशीं हीं जन्ममरणें । अतिदारुणें स्वयें सोशी ॥ ४२ ॥ शिणाशिणों जंव जन्म कंठी । सवेंच मरण ये त्यापाठीं । जैसीं जावळफळें एक देठीं । तैशा जन्ममरणकोटी भोगी स्वयें ॥ ४३ ॥

इत्थं कर्मगतीर्गच्छन् बह्वभद्रवहाः पुमान् । आभूतसंप्लवात्सर्गप्रलयावश्नुवेऽवशः ॥ ७ ॥

होता पूर्णत्वें जो स्वतंत्र । तो झाला कर्मपरतंत्र । नानाकर्मगतिपात्र । दुःखसुख क्षेत्र सदा वाहे ॥ ४४ ॥ मानोनि विषयांचें सुख । देखतदेखतां घेतलें विख । त्याचें अगणित असुख । जन्मकोटी

देहभृत्–हा देहधारण करणारा, कर्मभिः–कर्मेंद्रियांनीं, सनिमित्तानि कर्माणि–वासनायुक्त कर्में, कुर्वन्–करीत व, सुखेतरं तत्तत्कर्मफलं–सुख-दुःखरूप तें तें कर्मफल, गृह्णन्–भोगीत, इह–या संसारांत, भ्रमति–भ्रमण करितो. [कर्मेंद्रियांनीं वासनासह कर्में करणारा व पूर्व पुण्य-पापकर्मांचें सुख-दुःखरूप फल भोगणारा असा हा देहधारी जीव या संसारांत भ्रमण करीत रहातो व त्यांतून मुक्त होत नाहीं.] ६.

मनांत विषयवासना धरून कर्मेंद्रियांनीं कर्में केलीं असतां तेथें धर्म व अधर्म उत्पन्न होतात, तेच परम पुरुषार्थाला प्रतिबंध करणारे आहेत. ३६ ज्या फलभोगाचा संकल्प करावा त्यासारखा देह धारण करावा लागतो. एका देहानें अनेक देहांच्या जन्माचीं व मरणाचीं अनेक निमित्तें उत्पन्न केलीं जातात. ३७ फलाच्या इच्छेनें केलेलें कर्म फार भयंकर आहे. तें अमरांनाहि मरण देतें व जन्मरहित आत्म्यालाहि पुनः पुनः जन्म घ्यावयास लावितें. ३८ याप्रमाणें स्वर्ग आणि संसार यांत जन्म-मरणांच्या येरझारा सुरू होतात. आपल्या कर्मांमुळें हा स्वतः अनेक अपार योनी भोगतो. ३९ तेल्याच्या घाण्याला डोळे बांधून जुंपलेला बैल त्या घाण्याभोंवतीं एकसारखा फिरत रहातो. १४० त्याप्रमाणें ज्ञानाचे डोळे बांधून स्वकर्मांचीं फळें भोगूं लागलें असतां जीवाला जन्म-मरणाचें असंख्य अनिवार्य सोहाळे भोगावे लागतात. ४१ उदय व अस्त यांच्या योगानें सूर्याला जसें पृथ्वीच्या भोंवतीं नित्य फिरावें लागतें, (असें दिसतें) त्याप्रमाणें हा जीवहि अति भयंकर जन्म-मरणांची परंपरा स्वतः सोसतो. ४२ हा अनेक प्रकारचे शीण करून आपल्या जन्माचा एकेक दिवस जो कंठीत आहे, तोंच मरणहि तितकेंच त्याच्या जवळ जवळ येत जातें. जुळीं फळें जशीं एकाच डेखाला लागलेलीं असतात, तशीं एकाच देहाला चिकटून राहिलेलीं जन्म-मरणें हा स्वतः भोगितो. १४३.

—तो कितीवेळ भ्रमण करितो तो काळ सांगतात—

इत्थं–याप्रमाणें, बहु अभद्रवहाः कर्मगतीः गच्छन्–अनेक अभद्रें वाहणाऱ्या कर्मगतींना प्राप्त होणारा, पुमान्–पुरुष, अवशः सन्–पराधीन होत्साता, आभूतसंप्लवात्–प्रलयापर्यंत, सर्ग-प्रलयौ–जन्ममरणांचा, अश्नुते–अनुभव घेतो. [याप्रमाणें अनेक अकल्याणांचा अनुभव देणाऱ्या कर्मफलांस प्राप्त होणारा पुरुष कर्मपराधीन होऊन प्रलयापर्यंत जन्म मरणपरंपरेंत भ्रमण करीत रहातो.] ७.

जो पूर्वीं पूर्णत्वानें स्वतंत्र होता, तोच कर्मपरतंत्र आणि अनेक कर्मगतींना पात्र होऊन सुख व दुःख हीं फळें देणाऱ्या क्षेत्रांत सदा राबत रहातो. ४४ विषयांचें सुख मानून तो विषयभोगरूप विषच जाणुनबुजून प्राशन करितो.

दुःख सोशितां न सरे ॥ ४५ ॥ दुःखावरी दुःखाचें आवर्त । मोहशोकांचे गर्ते पडत । अतियातनेमाजीं बुडत । सदा उकडत काळाग्नीं ॥४६॥ ऐसे सोशितां दुःखशोक । पुढें अवचिता एकाएक । महाप्रळयाचा भडका देख । निकट सन्मुख संगीं वाजे ॥ ४७ ॥ तेथें मागें न वचे काढिला पावो । पुढें निघावया नाहीं वावो । निजकर्में बांधिला पहावो । प्रळयाचा घावो मस्तकीं वाजे ॥ ४८ ॥ उत्पत्तिस्थितिप्रकरण । तुज सांगितलें संपूर्ण । आतां प्रळयाचें लक्षण । सावधान अवधारीं ॥ ४९ ॥

धातूपप्लव आसन्ने व्यक्तं द्रव्यगुणात्मकम् । अनादिनिधनः कालो ह्यव्यक्तायापकर्षति ॥ ८ ॥

सूर्योदयेंसीं दिवसस्थिती । लोटल्या अवश्य पावे राती । तेवीं झालिया उत्पत्तिस्थिती । प्रळयाची प्राप्ती अवश्य पावे ॥ १५० ॥ एवं पावल्या प्रळयवेळू । खवळे अनादिनिधन काळू । तो महाभूतेंसीं भूगोळू- । नाशार्थं प्रबळू प्रताप मांडी ॥ ५१ ॥ तेथ जें जें स्थूळाकारें व्यक्त । तें तें करूं लागे अव्यक्त । जेवीं पेरिलें पिकोनि शेत । स्वयें वाळत उष्ण काळीं ॥ ५२ ॥ तृणादि नाना बीजें क्षितीं । स्वभावें वार्षिये विरूढती । ते [तीं] चि शारदिये नानाव्यक्ती । सफळितें होती सुपुष्ट ॥ ५३ ॥ ते [तीं] चि ग्रीष्माच्या अंतीं । फळमूळ मोडोनि व्यक्ती । बीजें लीन होती क्षितीं । तैशी काळगती संसारा ॥ ५४ ॥ जेवीं वसंताचे ऐलीकडी । वृक्षांसी होय पानझडी । तेवीं ब्रह्मादिकांची परवडी । काळ झोडी निजसत्ता ॥ ५५ ॥ जेवीं कां वाळलिया शेत । कृषीवळु मळूं लागे समस्त । तेवीं व्यक्ताचें अव्यक्त । काळ त्वरित करूं लागे ॥ ५६ ॥ तेच अव्यक्त करिती स्थिती । राया सांगेन तुजप्रती । काळाची क्षोभक शक्ती । प्रळयाचे प्राप्तीपूर्वी पावे ॥ ५७ ॥

त्यापासून उत्पन्न होणारें दुःख कोट्यवधि जन्मीं जरी सोसलें तरी सरत नाहीं. ४५ दुःखावर दुःखें कोसळून त्यांच्या भोवऱ्यांत सांपडून तो मोह व शोक यांच्या गर्तेत पडतो व अत्यंत यातनेमध्यें बुडतो आणि काळाग्नीमध्यें सर्वदा उकळत असतो. ४६ याप्रमाणें दुःख-शोक सोशीत असतां पुढें अकस्मात् महाप्रलयाचा भडका उठतो. त्यांतून त्याच्यापुढें भयंकर आवाज निघूं लागतो. ४७ तेथें मागें पाऊल घेतां येत नाहीं व पुढें पाऊल टाकण्यासहि अवकाश नसतो. आपल्या कर्मांनीं तो बांधला जातो व प्रलयाचा घाव त्याच्या मस्तकावर बसतो. ४८ याप्रमाणें उत्पत्ति-स्थितींचें प्रकरण तुला संपूर्ण सांगितलें. आतां प्रलयाचें लक्षण सावधान चित्तानें ऐक. १४९.

——याप्रमाणें मायामयी सृष्टि सांगून आतां लयाचें वर्णन सांगण्यास आरंभ करितो——

अनादिनिधनः कालः– अनादि अनंत काल, धातूपप्लवे आसन्ने–महाभूतांच्या प्रलयाचें निमित्त समीप आलें असतां, द्रव्यगुणात्मकम् व्यक्तं–स्थूल सूक्ष्म कार्याला, अव्यक्ताय हि–अव्यक्त करण्यासाठींच, अपकर्षति–आकर्षण करितो. [आदि-अंतरहित काल पंचमहाभूतांच्या नाशाचें निमित्त प्राप्त झालें असतां द्रव्य म्ह० स्थूल व गुण म्ह० सूक्ष्म एतद्रूप कार्याला कारणांत लीन करण्यासाठीं आकर्षण करितो.] ८.

सूर्योदय होऊन दिवस संपला म्हणजे रात्र जशी अवश्य येते, तशीच उत्पत्ति व स्थिति झाल्यावर प्रलयाची प्राप्ति अवश्य होते. १५० याप्रमाणें प्रलयकाळ समीप आला म्हणजे आदिअंतरहित काळ खवळतो. तो महाभूतांचा भोक्ता त्यांच्या नाशासाठीं मोठा प्रबळ प्रताप आरंभितो. ५१ सृष्टीमध्यें जें जें कांहीं स्थूल आकाराचें दृश्यजात असतें तें तें सर्व तो अव्यक्त करूं लागतो. ज्याप्रमाणें पेरलेलें शेत पिकलें म्हणजे तें आपणच उन्हाळ्यांत वाळत जातें, ५२ गवत वगैरे अनेक प्रकारचीं बीजें स्वभावतःच पावसाळ्यांत पृथ्वीवर उगवतात, आणि तींच शरदृतूंत नाना प्रकारच्या फलपुष्पांनीं युक्त व अत्यंत पुष्ट होतात, ५३ पण ग्रीष्म ऋतूच्या शेवटीं त्यांच्या झाडांचा व फळांचा मूळचा आकार नाहींसा होऊन तीं पुनः पृथ्वीमध्यें लीन होतात. तशीच संसाराची कालगति आहे. ५४ ज्याप्रमाणें वसंतऋतूच्या पूर्वीं झाडांचीं पानें गळूं लागतात, त्याचप्रमाणें ब्रह्मादिकांचाहि प्रकार आहे. काळ त्यांनाहि आपल्या सत्तेनें झोडून काढतो. ५५ ज्याप्रमाणें शेतकरी वाळलेल्या सर्व शेताची मळणी करूं लागतो, त्याप्रमाणेंच काळ व्यक्त जगताला सत्वर अव्यक्त करूं लागतो. ५६ हे राजा, तीच व्यक्तसृष्टीला अव्यक्त करण्याची स्थिति मी तुला सांगेन. काळाची क्षोभ करणारी शक्ति प्रलयाच्या पूर्वीं प्रकट होते. १५७.

शतवर्षा ह्यनावृष्टिर्भविष्यत्युल्बणा भुवि। तत्कालोपचितोष्णार्को लोकांस्त्रीन्प्रतपिष्यति ॥९॥

काळाक्षोभाचिये दृष्टी। शतवर्षें अनावृष्टी। तेणें अत्युल्बणें आटे सृष्टी। पृथ्वीच्या पोटीं कांहीं नुरे ॥ ५८ ॥ प्राणिमात्र निमाले देख। वनें वाळूनि जाहली राख। बिंदुमात्र न मिळे उदक। यापरी लोक आटिले काळें ॥ ५९ ॥ तंव द्वादशादित्य मेळा। मंडळीं झाला एकवेळा। तेथींच्या किरणीं प्रबळा। त्रैलोक्या सकळा संतप्त केलें ॥ १६० ॥ येती उष्णाचिया आह्या। होती पर्वतांच्या लाह्या। तेणें धरातळ लवलाह्या। भस्म झालें राया महाउष्णें ॥ ६१ ॥

पातालतलमारभ्य संकर्षणमुखानलः। दहन्नूर्ध्वशिखो विष्वग्वर्धते वायुनेरितः ॥ १० ॥

उष्णें तापलें पृथ्वीतळ। पोळलें शेषफणामंडळ। तैं सहस्रमुखें विषानळ। अग्निकल्लोळ वमिता झाला ॥ ६२ ॥ पाताळतळींहूनि देखा। ऊर्ध्वमुख अग्निशिखा। जाळीतचि तिहीं लोकां। उठिला भडका अनिवार ॥ ६३ ॥ क्षोभें दिधला फुकारा। सहस्रमुखें सुटला वारा। तो साह्य झाला त्या वैश्वानरा। जाळीत दिगंतरा वाढला वणवा ॥ ६४ ॥

सांवर्तको मेघगणो वर्षति स्म शतं समाः। धाराभिर्हस्तिहस्ताभिर्लीयते सलिले विराट् ॥ ११ ॥

——नाशाचे हेतु सांगतात——

भुवि-पृथ्वीवर, **शतवर्षा हि उल्बणा अनावृष्टिः**—शंभर वर्षें भयंकर अनावृष्टि, **भविष्यति**—होईल, **तत्कालोपचितोष्णार्कः**——त्या काळीं अतिशय वृद्धि पावलेला व त्यामुळेंच अतिशय उष्ण असा हा सूर्य, **त्रीन् लोकान्**—त्रैलोक्याला, **प्रतपिष्यति**—संतप्त करील. [भूलोकीं शंभर वर्षें पाऊस पडणार नाहीं. त्यामुळें सूर्याची उष्णता अतिशय वाढेल व तो त्रैलोक्याला जाळील.] ९.

काळाची दृष्टि क्षुब्ध होतांच शंभर वर्षें अनावृष्टि होते. त्यामुळेंच सर्व सृष्टीचा भयंकर नाश होतो. पृथ्वीवर काडीहि उरत नाहीं. ५८ सर्व प्राणिमात्र मरण पावतात. वनें वाळून त्यांची राख होते. थेंबभरहि पाणी मिळेनासें होतें. याप्रमाणें काळ सर्व लोकांला आटवितो. ५९ त्या वेळीं बारा आदित्यांचा समुदाय एकाच वेळीं नभोमंडळांत प्रकाशूं लागतो. त्यांच्या प्रखर किरणांनीं सगळें त्रिभुवन संतप्त होतें. १६० उष्णतेच्या ज्वाळा भडकूं लागतात. त्यामुळें पर्वत लाह्यांसारखें तडातड फुटतात. हे राजा, त्या भयंकर उष्णतेनें ही सर्व पृथ्वी भस्म होते. १६१.

संकर्षणमुखानलः—शेषाच्या सहस्र मुखांपासून उत्पन्न झालेला अग्नि, **पातालतलं आरभ्य**—पाताळाच्या तळापासून आरंभ करून, **ऊर्ध्वशिखः**—ज्याच्या ज्वाला वर पसरल्या आहेत असा होऊन, **दहन्**—सर्वांना जाळीत, **वायुना ईरितः**—वायूकडून प्रेरित होत्साता, **विष्वक् वर्धते**-सर्वतः वाढतो. [शेषाच्या मुखांपासून निघालेला अग्नि आपल्या उर्ध्वज्वालांनीं पाताळतळापासून आरंभ करून सर्वांना जाळीत सुटतो आणि वायूच्या साह्यानें तो सर्वत्र पसरतो.] १०.

त्या महाउष्णतेनें सर्व पृथ्वी तापून जाते, त्यामुळें सर्व शेषाचें फणामंडळ पोळतें. तें आपल्या हजारों मुखांनीं विषाग्नीच्या ज्वाळांचा भडकाच ओकूं लागतें. ६२ पाताळांतून ऊर्ध्वमुख अग्निज्वाळा तिन्ही लोकांना जाळूं लागतात. त्यामुळें अनिवार भडका उठतो. ६३ शेष अशा क्षोभामुळें आपल्या सहस्रमुखानें सुस्कारे टाकूं लागतो. त्यामुळें भयंकर वारा सुटतो. तो अग्नीला साह्य होतो आणि सर्व दिगंतराला जाळीत वणव्याच भडकलेला दिसतो. १६४.

सांवर्तकः मेघगणः—प्रलय करणारा मेघसमूह, **हस्तिहस्ताभिः धाराभिः**—हत्तीच्या सोंडेसारख्या धारांनीं, **शतं समाः वर्षति स्म**—शंभर वर्षें वृष्टि करितो. **विराट्**—त्यामुळें स्थूल सृष्टि हेंच ज्याचें शरीर आहे असा विराट्, **सलिले**—पाण्यांत, **लीयते**—लीन होतो. [त्यानंतर प्रलयकर्ता मेघसमूह हत्तीच्या सोंडेएवढाल्या धारांनीं, बिंदूनें नव्हे, शंभर वर्षें वृष्टि करितो व त्यामुळें सर्वत्र पाणीच पाणी झालें असतां स्थूल सृष्टि त्यांत लीन होते.] ११.

स्वर्ग आणि पाताळतळा । कवळूनि उठिल्या अग्निज्वाळा । तंव प्रळयकर्त्या मेघमाळा । क्षोभल्या त्या काळा अतिदुर्धरा ॥ ६५ ॥ ह्मणाल तेथ मोठमोठे । वर्षों लागले थेंबुटे । तैसें नव्हे गा कडकडाटें । एकी धार सुटे अनिवार ॥ ६६ ॥ इतर पर्जन्याच्या धारा । त्या तैशा नव्हती नृपवरा । ऐक प्रमाणाच्या निर्धारा । तो समयो महावीरा अतिदुस्तर ॥ ६७ ॥ जैसी कां मदगजाची सोंड । तैशा धारा अतिप्रचंड । शत वर्षेंवरी अखंड । पर्जन्य वितंड पैं वर्षे ॥ ६८ ॥ विजू निजतेजें नभ जाळी । तेणें कडकडाटे आरोळी । काळाची बैसे दांतखिळी । ऐसा प्रळयकाळीं मेघ खवळे ॥ ६९ ॥ उलथलें तेणें जल सैंघ । जेथोनि वर्षत होते मेघ । त्यांतेंही विरवूनि सांग । जळमय चांग त्रैलोक्य झालें ॥ १७० ॥ अनिवार वर्षतां वेग । जेथें मेघांचेंही विरे अंग । या नांव सांवर्तक मेघ । अतिअमोघ वर्षावो ॥ ७१ ॥ तीर्थ क्षेत्र पवित्रोदक । सरिता समुद्र झाले एक । हारपले चंद्रसूर्यादिक । तिनी लोक बुडाले ॥ ७२ ॥ ऐशिया एकार्णवाचे ठायीं । विराट विराला गा पाहीं । साकार उरे ऐसें कांहीं । उरलें नाहीं नृपनाथा ॥ ७३ ॥

ततो विराजमुत्सृज्य वैराजः पुरुषो नृप । अव्यक्तं विशते सूक्ष्मं निरिन्धन इवानलः ॥ १२ ॥

स्वर्ग आणि पाताळतळ यांना कवटाळून अग्नीच्या ज्वाळा भडकल्या, म्हणजे त्या अति दुर्धर प्रसंगीं प्रलय करणाऱ्या मेघांच्या पंक्ति क्षुब्ध होतात. ६५ आतां तुम्ही म्हणाल कीं मेघ मोठमोठ्या थेंबांनीं वृष्टि करूं लागत असतील, तर तसें नव्हें बरें. हे राजा, ते प्रलयमेघ भयंकर गर्जना करून एकधारेनें अनिवार्य वृष्टि करीत सुटतात. ६६ इतर सामान्य पर्जन्याच्या धारा जशा असतात तशा त्या नसतात. तर मग त्यांचें प्रमाण काय असतें, म्हणून म्हणशील तर सांगतों. हे महावीरा, तो प्रसंग फार भयंकर आहे. ६७ जशी मदोन्मत्त हत्तीची सोंड असते तशा धारांनीं ते वृष्टि करितात आणि ती शंभर वर्षेंपर्यंत एकसारखी अखंड चालते. ६८ विजा आपल्या तेजानें आकाशाला जाळतात, त्यामुळें भयंकर कडकडाट होऊं लागतात. ते ऐकून काळाचीहि दांतखिळी बसते. प्रलयकाळीं मेघ इतके खवळतात कीं, ६९ त्यामुळें मोठमोठे सर्व जलाशय एकरूप होतात, फार काय, पण जेथून मेघ वर्षाव करीत असतात तेथपर्यंत पाण्याचे पूर वाढून त्या वृष्टि करणाऱ्या मेघांनाहि बुडवून वर जातात, त्यामुळें सर्व त्रैलोक्य जलमय होतें. १७० अनिवार्य वेगानें वर्षाव करीत असतां ज्यांत मेघांचेंहि अंग लोपून जातें, त्यालाच सांवर्तक मेघ म्हणतात. ७१ तीर्थें, क्षेत्रें, पवित्र उदकें, नद्या, समुद्र इत्यादि सर्व एक होतात. त्या जलपूरांत चंद्र–सूर्यादिक व तिन्ही लोक बुडून जातात. ७२ अशा एकरूप समुद्रांत विराटाचा देहहि विरघळतो. सारांश हे राजा ! त्या वेळीं आकारयुक्त असें कांहीं एक उरत नाहीं. १७३.

ततः–त्यानंतर, नृप–हे राजा ! वैराजः पुरुषः–विराट पुरुष, विराजं उत्सृज्य–आपल्या स्थूल सृष्टिरूप स्थूल देहाला सोडून, निरिन्धनः अनलः इव–काष्ठरहित अग्नीप्रमाणें, सूक्ष्मं अव्यक्तं–सूक्ष्म अव्यक्तांत, विशते–प्रवेश करितो. [स्थूल सृष्टि, या उपाधीचा लय झाल्यामुळें तिच्यावर ‘ मी ’ असा अभिमान ठेवणारा विराट पुरुष आपल्या स्थूल सृष्टिरूप शरीराचा त्याग करून काष्ठरहित अग्नीप्रमाणें आपल्या सूक्ष्मकारणांत प्रवेश करितो. ‘ अहोपण, प्रलयकालीं हिरण्यगर्भासह सर्व ब्रह्मोपासक परमपदांत लीन होतात, इत्यादि अर्थाची ‘ ब्रह्मणा सह ते सर्वे ’ इत्यादि स्मृति व अधिकारी जीव अधिकार संपेपर्यंत आपल्या अधिकारावर अवस्थित होतात, इत्यादि अर्थाचा ‘ यावत् अधिकार ’ न्याय, ब्र. सू. भा. ३.३.३२ पृ. ३७० यांवरून वैराजसंज्ञक हिरण्यगर्भाचा, तो परम भागवत असल्यामुळें मोक्षच होणें युक्त आहे, इतर जीवांप्रमाणें त्यानें केवल कारणांत प्रवेश करणें युक्त नाहीं ’ असें म्हणाल तर तें खरें आहे. पण अश्वमेधादि पुण्यकर्मांनीं सत्यलोकीं गेलेल्याहि अभक्तांची पुनरावृत्ति श्रुत आहे. त्यामुळें हिरण्यगर्भालाहि अभक्तत्व असल्यास त्याचाहि प्रकृतींतच लय होईल व पुनरुत्पत्तिहि होईल, असें मोक्षाचें दुर्लभत्व सुचविण्यासाठीं येथें हें सांगितलें आहे. त्यामुळें पूर्वोक्त श्रुति व न्याय यांच्याशीं विरोध येत नाहीं. किंवा ब्रह्म कोणत्याहि प्रमाणाचा विषय होत नसल्यामुळें तेंच येथील अव्यक्त आहे. हिरण्यगर्भाचा त्यांत प्रवेश होत असल्यामुळें हा मोक्षच सांगितला आहे असें समजावें.] १२.

प्रळयकाळीं अतिगहिंसू । अगाध उसळे जळोल्हासू । स्थूळाचा करितां नाशू । विरे निःशेषु विराटु ॥ ७४ ॥ वैराटाचा वैराज पुरुषू । तो अव्यक्तीं करी प्रवेशू । जेवीं इंधननाशें हुताशू । करी रहिवासू निजकारणीं ॥ ७५ ॥ जे ब्रह्मलोकनिवासी होती । त्यांसी महाप्रळयाचे अंतीं । ब्रह्म्यासवें सर्वांसी क्रमें मुक्ती । ऐसें श्रुतीचें दृढ वाक्य ॥ ७६ ॥ 'वैराजपुरुष' नाम वदंती । हिरण्यगर्भातें म्हणती । त्यासी प्रळयीं प्रवेशु अव्यक्तीं । तैं इतरांची गती श्रुतिवाक्यें कैसी ॥ ७७ ॥ विदेहें पुशिली मायेची स्थिती । ते मायेची ऐशी दुर्धर शक्ती । जे न करिती भगवद्भक्ती । त्यां ब्रह्मयासवें मुक्ती घडों नेदी ॥ ७८ ॥ जालिया ब्रह्मसदनप्राप्ती । न करितां भगवद्भक्ती । अतिशयें दुर्लभ मुक्ती । ते भक्तींपाशीं मुक्ती दासी जैसी ॥ ७९ ॥ न करितां भगवद्भजन । ब्रह्मयासीही मुक्ति नव्हे जाण । मा इतरांचा ज्ञानाभिमान । पुसे कोण परमार्थीं ॥ १८० ॥ ज्यासी जेथ पदाभिमान । त्यासी तेंचि दृढ बंधन । या लागीं दुर्लभपण । मोक्षासी जाण तिहीं लोकीं ॥ ८१ ॥ सांडोनियां पदाभिमान । अंगें सदाशिवु आपण । नित्य वसवी महास्मशान । भगवद्भजनीं निजनिष्ठा ॥ ८२ ॥ यालागीं ज्यांसी ब्रह्मलोकपदप्राप्ती । तेथेंही जे करिती भगवद्भक्ती । त्यांसीच प्रळयाच्या अंतीं । परममुक्ती नृपवर्या ॥ ८३ ॥ ब्रह्मलोकीं ज्यां नाहीं हरिभक्ती । तेहि पावती पुनरावृत्ती । ऐशी मायेची दुर्धर शक्ती । न करितां भक्ति मुक्ति कैंची ॥ ८४ ॥ येची अर्थीं ब्रह्मयाचें वचन । दों श्लोकीं बोलिला आपण । ज्ञानाभिमानियां पतन । भक्तां भवबंधन कदा न बाधी ॥ ८५ ॥

प्रलयकालीं जलमय झालेल्या सृष्टींत जगाचा भयंकर कल्लोळ उसळतो. त्यामुळें सर्व स्थूल पदार्थांचा नाश होतो. स्थूलसृष्टी हें विराट पुरुषाचें शरीरहि त्यांत निःशेष विरघळून जातें. ७४ त्यानंतर त्या विराट शरीराचा अभिमान वैराजपुरुष काष्ठाचें भस्म केल्यावर अग्नि जसा आपल्या कारणरूप सामान्य तेजांत लीन होतो, त्याप्रमाणें अव्यक्तांत लीन होतो. ७५ जे ब्रह्मलोकांमध्यें रहाणारे असतात त्यांना महाप्रलयाच्या शेवटीं ब्रह्मदेवासह क्रममुक्ति मिळते, असें श्रुतीचें निश्चित वाक्य आहे. ७६ वैराजपुरुषाला हिरण्यगर्भ म्हणतात, तो प्रलयसमयीं जर अव्यक्तामध्यें लीन होऊं लागला तर 'ब्रह्मदेवासह सर्व ब्रह्मलोकनिवासी क्रममुक्तीला प्राप्त होतात,' असें सांगणाऱ्या श्रुतीची व्यवस्था कशी लागते? ७७ असें कोणी विचारील म्हणून अंतरिक्ष सांगतो. विदेहानें मायेची स्थिति विचारिली; पण त्या मायेची अशी दुर्धरशक्ति आहे कीं, जे भगवद्भक्ति करीत नाहींत, त्यांना ती हिरण्यगर्भासह मुक्त होऊं देत नाहीं. ७८ ब्रह्मलोकाची प्राप्ति जरी झाली तरी भगवद्भक्ति न केल्यास मुक्ति अतिशय दुर्लभ होते. कारण भक्तीपाशीं मुक्ति दासीसारखी रहाते. ७९ अहो, भगवद्भजन न केल्यास स्वतः हिरण्यगर्भालाहि जर मुक्ति मिळत नाहीं, तर मग परमार्थामध्यें इतरांच्या ज्ञानाभिमानाला कोण विचारतो? १८० ज्याला ज्या पदाचा अभिमान असतो, त्याला तेंच दृढबंधन होतें. म्हणून तिन्ही लोकीं मोक्षाला दुर्लभत्व आहे. ८१ साक्षात् शंकरहि आपल्या कैलासपदाचा अभिमान सोडून व भगवद्भजनांत पूर्ण निष्ठा ठेवून काशीक्षेत्रांतील महाश्मशानांत वास करितो. ८२ म्हणून ब्रह्मलोकाची प्राप्ति झाल्यावर तेथेंहि जे ब्रह्मचिंतनरूप भगवद्भक्ति करितात त्यांनाच प्रलयाच्या अंतीं परम मुक्ति मिळते ८३ आणि ब्रह्मलोकीं जे हरिभक्ति करीत नाहींत ते पुनः जन्म घेतात. मायेची अशी दुर्धर शक्ति आहे. भक्ति न केल्यास मुक्ति कोठची? ८४ याच अर्थाचें ब्रह्मदेवाचें एक वचन आहे. अंतरिक्ष पुढील दोन श्लोकांत त्याचाच अनुवाद करीत आहे. ज्ञानभिमान्यांचें पतन होतें आणि भक्तांना भवबंधन कधींहि बाधा करीत नाहीं, असा त्या वचनांचा थोडक्यांत सारांश आहे. १८५.

ब्रह्मादिकृत गर्भस्तुति श्लोकौ

॥ येऽन्येऽरविंदाक्ष विमुक्तमानिनस्त्वय्यस्तभावादविशुद्धबुद्धयः।
आरुह्य कृच्छ्रेण परं पदं ततः पतन्त्यधोऽनादृतयुष्मदङ्घ्रयः ॥ १ ॥
तथा न ते माधव तावकाः क्वचिद्भ्रश्यन्ति मार्गात्त्वयि बद्धसौहृदाः।
त्वयाभिगुप्ता विचरन्ति निर्भया विनायकानीकपमूर्धसु प्रभो ॥ २ ॥

न करितां भगवद्भक्ती। सज्ञानाही नातुडे मुक्ती। तेंचि अर्थींच्या दृष्टांतीं। ब्रह्मयाची उक्ती दाविली येथें ॥ ८६ ॥ जन्मांमाजीं ब्राह्मणपण। तेंही वेदशास्त्रसंपन्न। न करितां भगवद्भजन। अचुक पतन तयांसी ॥ ८७ ॥ भक्तां सर्वभूतीं भगवद्भावो। तेथ विघ्नांसीं नाहीं ठावो। तयां अपावचि होय उपावो। भावार्थी देवो सदा साह्य ॥ ८८ ॥ भक्तीवीण मुक्तीचा सोस। करितां प्रयत्न पडे वोस। असो हे वैराजपुरुष। करी प्रवेशू अव्यक्तीं ॥ ८९ ॥ अव्यक्तीं वैराजाचा प्रवेशू। होतांचि महाभूतां विलासू। हों लागे भूतां ऱ्हासू। तो अनुप्रवेशू। ऐक राया ॥ १९० ॥

वायुना हृतगंधा भूः सलिलत्वाय कल्पते। सलिलं तद्धृतरसं ज्योतिष्ट्वायोपकल्पते ॥ १३ ॥
हृतरूपं तु तमसा वायौ ज्योतिः प्रलीयते। हृतस्पर्शोऽवकाशेन वायुर्नभसि लीयते ॥
कालात्मना हृतगुणं नभ आत्मनि लीयते ॥ १४ ॥

हे अरविंदाक्ष—हे कमलनयन, ये अन्ये—जे दुसरे, विमुक्तमानिनः—आपल्याला मुक्त मानणारे, त्वयि अस्तभावात् अविशुद्धबुद्धयः—तुझ्याविषयींची भक्ति अस्त पावल्यामुळें सर्वथा अशुद्धबुद्धि, अनादृतयुष्मदङ्घ्रयः—व त्यामुळेंच ज्यांनीं तुझ्या चरणांचा अनादर केला आहे, असे ते, कृच्छ्रेण परं पदं आरुह्य—मोठ्या संकटानें परम पदावर आरूढ होऊन, ततः अधः पतन्ति—तेथून खालीं पडतात. १. हे माधव—पण हे माधवा, त्वयि बद्धसौहृदाः तावकाः—तुझ्या ठिकाणीं ज्यांनीं निरतिशय प्रीति दृढ ठेविली आहे, असे तुझे भक्त, तथा—त्या अभक्तांप्रमाणें, मार्गात् क्वचित् न भ्रश्यन्ति—मार्गापासून केव्हांहि भ्रंश पावत नाहींत. प्रभो—हे प्रभो, त्वया अभिगुप्ताः—तुझ्याकडून सर्व प्रकारें रक्षण केले गेलेले ते भक्त, विनायकानीकपमूर्धसु—विघ्न करणाऱ्या विनायकाच्या सेनापतीच्या मस्तकावर, निर्भयाः—निर्भय होत्साते, विचरन्ति—संचार करितात. २.

भगवद्भक्ति केल्यावांचून ज्ञानालाहि मुक्ति लाभत नाहीं, याच अर्थी ब्रह्मदेवाचें वचन दृष्टान्त म्हणून सांगितलें आहे. ८६ जन्मामध्यें ब्राह्मणजन्म व तोहि वेदशास्त्रसंपन्न जरी असला तरी भगवद्भजन न केल्यास त्याला नियमानें पतन प्राप्त होतें. ८७ भक्तांचा सर्वभूतांमध्यें भगवद्भाव असतो. त्यामुळें त्यांच्या ठिकाणीं विघ्नांना अवकाशच मिळत नाहीं. त्यांचा जो अपाय तोच उपाय होतो. कारण भक्ताला देव सदा साह्य करतो. ८८ भक्तीवांचून मुक्तीचा सोस धरल्यास तो व्यर्थ प्रयत्न होतो. असो, हा विराटपुरुष अव्यक्तांत प्रवेश करितो. ८९ त्यांत त्याचा प्रवेश होतांच महाभूतांचा विलास सुरू होतो. भूतांचा भास होतो. त्यांचा प्रकार मी तुला सांगतों, तो ऐक. १९०.

—याप्रमाणें विराटदेहाचा लय सांगून महत्तत्त्वापासून पृथ्वीपर्यंत त्याच्या कारणांचा उत्पत्तीच्या उलटक्रमानें लय सांगतात—

वायुना हृतगंधा भूः—वायूनें जिच्यांतील वासाचें हरण केलें आहे अशी पृथ्वी, सलिलत्वाय—जलभावाला प्राप्त होते. तत् हृतरसं सलिलं—ज्यांतील रस हरण केला आहे असें जल, ज्योतिष्ट्वाय—तेजोभावाला, उपकल्पते—प्राप्त होतें. तु—आणि, तमसा हृतरूपं ज्योतिः—तमानें ज्याचें रूप हरण केलें आहे अशी ज्योति, वायौ—वायूमध्यें, प्रलीयते—लीन होते. अवकाशेन हृतस्पर्शः वायुः—अवकाशानें ज्याच्या स्पर्शाचें हरण केलें आहे, असा वायु, नभसि—आकाशांत, लीयते—लीन होतो. कालात्मना हृतगुणं—कालानें ज्याच्या गुणाचें हरण केलें आहे, असें, नभः—आकाश, आत्मनि—आत्म्यामध्यें, लीयते—लीन होतें. [वायु गंध व रस यांचें हरण करितो, हें प्रसिद्धच आहे. प्रलयवायूनें पृथ्वींतील गंधाचें हरण केलें असतां तिच्यांतील विशेष नष्ट झाल्यामुळें ती जलांत लीन होते. त्याचप्रमाणें जलांतील रसाचें हरण केलें असतां तें तेजांत लीन होतें. तम रूपाला झांकून टाकतें हें प्रसिद्ध आहे. प्रलयकालच्या तमानें रूपाचा नाश केला असतां तेज वायूंत लीन होतें. वायूचें कारण असें जें आकाश त्यानें वायूच्या स्पर्शाचें हरण केलें असतां तो आकाशांत लीन होतो. शब्दाचा कालानेंच नाश होतो, हें प्रसिद्ध आहे. कालरूपी आत्म्यानें म्ह० ईश्वरानें ज्याच्या गुणाचें हरण केलें आहे असें आकाश तामस अहंकारांतच लीन होतें.] १३-१४.

इंद्रियाणि मनो बुद्धिः सह वैकारिकैर्नृप । प्रविशन्ति ह्यहंकारं स्वगुणैरहमात्मनि ॥ १५ ॥

प्रळयवायूचा क्षोभक क्रोधू । तेणें पृथ्वीचा हरिला गंधू । तंव तेही विरोनियां प्रसिध्दु । एकरूप जळ जालें ॥ ९१ ॥ क्षोभला वायू असमसाहस । तो हरी जळाचा रस । तेव्हां जळाचा होय ऱ्हास । प्रळयमहातेजीं ॥ ९२ ॥ त्या तेजाचा निजसंभ्रम । वायुबळें ग्रासीत तम । तेव्हां प्रळयवायु परम । भरोनि व्योम कोंदाटे ॥ ९३ ॥ त्या प्रळयवायूचा स्पर्श । चपळतेसी सर्व ग्रास । करूनि ठाके अवकाश । तेव्हां वायूतें आकाश निःशेष ग्रासी ॥ ९४ ॥

आकाशाचा जो शब्दगुण । तो प्रळयकाळू गिळी संपूर्ण । तंव क्षोभला तामसाभिमान । तो करी प्राशन गगनाचें ॥ ९५ ॥ दश इंद्रियांचा गोंधळा । राजसाभिमानी रिघाला । चित्तचतुष्टयाचा मेळा । तोही प्रवेशला सात्विकाभिमानीं ॥ ९६ ॥ इंद्रियअधिष्ठात्रीं दैवतें । तींही मिळोनियां समस्तें । प्रवेशलीं सात्विकातें । जाण निश्चितें नृपनाथा ॥ ९७ ॥ ते तिनी अहंकार त्रिगुणेंसीं । प्रवेशती महत्तत्वासीं । महत्तत्व मिळे मायेसी । जेवीं कन्या संततीसीं माहेरा ये ॥ ९८ ॥ जेवीं कुकडीचीं पिलीं । कुकडी पाखांतळीं घाली । मग ते स्वयें दिसे एकली । तेवीं माया उरली कल्पांतीं ॥ ९९ ॥ एवं उत्पत्तिस्थितिप्रळयांतें । त्रिविध भागें दाविली येथें । ते गुणमयी माया निश्चितें । मिथ्याभूतें आभासे ॥२००॥ जेवीं लेंकुरें खेळतां खेळासी । दिवसा म्हणती जाहली निशी । तेवींचि पूर्णस्वरूपाशीं । देखती मायेसी त्रिविध कल्पना ॥ १ ॥

नृप—हे राजा, इन्द्रियाणि बुद्धिः वैकारिकैः सह मनः अहंकारं—इंद्रियें व बुद्धि राजस अहंकारांत व देवांसह मन सात्त्विक अहंकारांत, प्रविशन्ति—प्रवेश करितात. अहं स्वगुणैः आत्मनि हि—आणि अशा या त्रिविध गुणांसह म्ह० आपल्या कार्यासह अहंकार महान् आत्म्यामध्यें लीन होतो. [इंद्रियें व बुद्धि राजस अहंकारांत व मन वैकारिक देवांसह सात्त्विक अहंकारांत लीन होतें, याप्रमाणें आपल्या त्रिविध कार्यासह अहंकार महत्तत्त्वामध्यें लीन होतो आणि शेवटीं तो महान् आत्माहि प्रकृतीमध्यें लीन होतो, असें समजावें.]१५.

प्रलयवायूचा क्षोभ करणारा जो क्रोध त्यानें पृथ्वीचा गंध हरण केला असतां ती विरघळून जाऊन एकरूप जल होतें. ९१ त्यानंतर तो भयंकर क्षुब्ध झालेला वायु जळांतील रसाचें हरण करितो.त्यामुळें जलाचा प्रलयकालच्या महातेजांत लय होतो. ९२ त्या तेजाच्या क्षोभाला तम म्ह० अंधकार वायुबळानें ग्रासून टाकतो. त्याबरोबर आकाश प्रलयवायूनें दाट भरून जातें. ९३ त्याच्या स्पर्शाला व चपलतेला अवकाश ग्रासून सोडतो. त्यामुळें वायूचाहि आकाशांत निःशेष लय होतो. ९४ आकाशाच्या शब्दगुणाला प्रलयकाल सबंध गिळून टाकतो. इतक्यांत तामस अभिमान क्षुब्ध होतो. तो आकाशाला ग्रासतो. ९५ दहा इंद्रियांचा गोंधळ राजस अभिमानांत शिरतो. चित्तचतुष्टयाचा मेळा सात्त्विक अभिमानांत प्रवेश करितो. ९६ इंद्रियांच्या ज्या अधिष्ठातृ-देवता त्याहि सर्व मिळून सात्त्विक अहंकारांत लीन होतात, असें तूं निश्चयानें जाण. ९७ हे तिन्ही अहंकार त्रिगुणांसह महत्तत्त्वांत प्रवेश करितात. ज्याप्रमाणें कन्या बाळंतपणास माहेरीं येते त्याप्रमाणें महत्तत्त्व मायेला मिळतें. ९८ ज्याप्रमाणें कोंबडी आपल्या पिलांना पंखाखालीं लपवून ठेवते आणि मग ती स्वतः एकटीच दिसते त्याप्रमाणें कल्पांतीं माया एकटीच उरते. ९९ याप्रमाणें उत्पत्ति, स्थिति आणि प्रलय यांसाठीं तीन भागांनीं माया दाखविली. खरोखर ती त्रिगुणात्मिका माया मिथ्यारूपानें भासते. २०० ज्याप्रमाणें मुलें खेळ खेळत असतां दिवसाला रात्र झाली असें म्हणतात, त्याचप्रमाणें पूर्ण स्वरूपामध्यें अज्ञलोक मायेची त्रिविध कल्पना करितात. २०१.

एषा माया भगवतः सर्गस्थित्यन्तकारिणी। त्रिवर्णा वर्णितास्माभिः किं भूयः श्रोतुमिच्छसि ॥ १६ ॥

उत्तम मध्यम अधम जन। तिन्ही अवस्था त्रिभुवन। त्रिविध कर्में तीन गुण। हे जाण विंदान मायेचें ॥ २ ॥ ध्येय ध्याता आणि ध्यान। पूज्य पूजक पूजन। ज्ञेय ज्ञाता आणि ज्ञान। हेही त्रिपुटी पूर्ण मायेची ॥ ३ ॥ दृश्य द्रष्टा आणि दर्शन। कर्म कर्ता क्रियाचरण। भोग्य भोक्ता भोजन। हे त्रिपुटी जाण मायेची ॥ ४ ॥ शब्द श्रोता आणि श्रवण। घ्रेय घ्राता आणि घ्राण। रस रसना रसस्वादन। हे त्रिपुटी जाण मायेची ॥ ५ ॥ कर क्रिया आणि कर्ता। चरण चाल चालता। बोल बोलणें बोलता। हे त्रिविधावस्था मायेची ॥ ६ ॥ अहं सोहं जडमूढता। साधक साधन साध्यता। देवी देवो परिवार-देवता। हेही त्रिविधता मायेची ॥ ७ ॥ देह देही देहाभिमान। भव भय भवबंधन। मुक्त मुमुक्षु अज्ञान। हेंही विंदान मायेचें ॥ ८ ॥ सुख दुःख जडत्व पूर्ण। आधी समाधी व्युत्थान। उत्पत्ति स्थिति निधन। इहीं लक्षणीं संपूर्ण माया विलसे ॥ ९ ॥ नभीं नीळिमा पूर्ण भासे। शोधीं नीळिमेचा लेशही नसे। तेवीं स्वरूपीं माया आभासे। मिथ्यावेशें मायिक ॥ २१० ॥ जेवीं प्रत्यक्ष दिसे मृग-जळ। परी ते निदाघ केवळ। तेवीं स्वरूपीं माया प्रबळ। मुळीं निर्मूळ आभासे ॥ ११ ॥ हे मिथ्या माया कल्पनावशें। प्रबळ बळें भासली दिसे। नासूं जातां नाशिजे ऐसें। सत्यत्वें नसे निजांगें ॥ १२ ॥ नांवरूपाचिया भडसें। ब्रह्मादिक केले पिसे। मिथ्या त्रिपुटीविन्यासें। ज्या बांधिलें दिसे त्रैलोक्य ॥ १३ ॥ जेवीं दीपासवें दिसे छाया। नाशितां नातुडे नाशावया। तेवीं स्वरूपीं मिथ्या माया। अतिदुर्जया देवांसी ॥ १४ ॥ जेवीं देहासवें मिथ्या छाया। तेवीं ब्रह्मीं मिथ्या माया। कल्पनायोगें वाढली वायां। यालागीं ' अजया ' वेदशास्त्रें म्हणती ॥ १५ ॥ राया कल्पना वाढे जे ठायीं। तेंचि मायेचें दृढ मूल पाहीं। जो निर्विकल्प निजदेहीं। त्यासी माया नाहीं तिहीं

भगवतः–भगवानाची, सर्गस्थित्यन्तकारिणी–उत्पत्ति, स्थिति व नाश करणारी, त्रिवर्णा–त्रिगुणात्मिका, एषा माया–ही माया, अस्माभिः–आमच्याकडून वर्णन केली गेली. भूयः किं श्रोतुं इच्छसि–आणखी तूं काय ऐकण्याची इच्छा करितोस ! [हे राजन्, भगवानाची त्रिगुणात्मिका जगदुत्पत्ति-स्थिति-लय करणारी ही माया मीं तुला सांगितली. पण मायेचें वर्णन ऐकून भयभीत झालेल्या राजाला तिच्या निवृत्तीचा उपाय ऐकण्याची आकांक्षा व्हावी म्हणून अंतरिक्ष ' तूं आणखी काय ऐकण्याची इच्छा करितोस ' असें विचारूं लागला.] १६.

उत्तम, मध्यम, अधम असे तीन प्रकारचे लोक; जागृति, स्वप्न व सुषुप्ति या तीन अवस्था; भूलोक, स्वर्गलोक व पाताळलोक हें त्रिभुवन; संचित, क्रियमाण व प्रारब्ध असें त्रिविध कर्म; सत्त्व, रज आणि तम हे तीन गुण; २ ध्येय, ध्याता, ध्यान; पूज्य, पूजक, पूजन; ज्ञेय, ज्ञाता, ज्ञान इत्यादि हें सर्व मायेचें कार्य आहे. ३ अहं, सोहं, जडमूढता, साधक, साधन, साध्यता; देवी, देव, परिवारदेवता; ७ देह, देही, देहाभिमान इत्यादि सुख, दुःख, जडत्व वगैरे या सर्व लक्षणांनीं माया विकास पावते. ८–९ आकाशांत सर्व ठिकाणीं नीलत्वाचा भास होतो. पण प्रमाणानें विचार करूं लागलें असतां तेथें त्याचा लेशहि नसतो. त्याचप्रमाणें आत्मस्वरूपामध्यें मायेचा आभास होतो; पण ती मिथ्या आहे. २१० मृगजल प्रत्यक्ष दिसतें. पण तें रखरखीत उन्ह असतें. तशीच स्वरूपांत प्रबळ माया दिसते. पण ती वस्तुतः निर्मूल असते. ११ ही मिथ्या माया कल्पनावशात् अतिशय बलाढ्य आहे, असा भास होतो. म्हणून तिचा नाश करावयास जों जावें तों तिच्यामध्यें सत्यत्वानें कांहींच नसतें. १२ तिनें नाम-रूपाच्या भपक्यानें ब्रह्मादिकांना वेड लाविलें आहे. मिथ्या त्रिपुटीच्या रचनेनें तिनें त्रैलोक्य उभारिलें आहे, असें दिसतें. १३ जशी दीपाबरोबर सावली दिसावी, पण तिचा नाश करूं म्हटलें तर ती हातीं लागत नाहीं तशीच ही स्वरूपीं मिथ्या माया आहे. ती देवांना अतिशय दुर्जय आहे. १४ जशी देहाची छाया, तशीच ब्रह्मांतील मिथ्या माया. ती कल्पनेनें वृथा वाढली आहे. म्हणूनच वेदशास्त्रें तिला अजया–अजिंक्य म्हणतात. १५ हे राजा, जेथें कल्पना वाढते तेथेंच मायेचें दृढमूळ आहे, असें तूं समज. जो स्वतःच्या देहाविषयींहि निर्विकल्प–आस्थाशून्य असतो, त्याला या त्रिभुवनांत माया कोठेंच

लाकीं ॥ १६ ॥ कल्पिती कल्पना जे राया । तेचि जाण मुख्य माया । आणीक रूपकें सांगावया । नातुडे मायानिरूपणीं ॥ १७ ॥ तेचि त्रिविध मुख्यलक्षणीं । माया सांगीतली विवंचोनी । आतां कोण्या अर्थांचे श्रवणीं । अत्यादरू मनी वर्ते राया ॥ १८ ॥ माया दुस्तर दारुण । ऐकूनि ऋत्विज ब्राह्मण । थरारले सभाजन । राजाही पूर्ण विस्मित जाहला ॥ १९ ॥ नवल मायेचें रूपक । नाशूं न शकतीच ज्ञाते लोक । जिया गोंविले ब्रह्मादिक । इतरांचा देख पाडु कोण ॥ २२० ॥ माया आक्रमूनि शिवासी । तोही आणिला जीवत्वासी । ते माया तरावया दीनांसी । उपावो यासी पुसों पां ॥ २१ ॥ सुखोपायें दीन जन । दुस्तर माया तरती पूर्ण । तदर्थीं राजा आपण । अत्यादरें प्रश्न श्रद्धेनें पुसे ॥ २२ ॥

राजोवाच-यथैतामैश्वरीं मायां दुस्तरामकृतात्मभिः । तरन्त्यञ्जः स्थूलधियो महर्ष इदमुच्यताम् ॥ १७ ॥

अतिदुस्तर हरीची माया । आइकोनि हांसें आलें राया । लटकीच परी देहाभिमानियां । बांधावया दृढ जाहली ॥ २३ ॥ माया दुस्तर शास्त्रप्रसिद्धी । तेथ भाळेभोळे स्थूळबुद्धी । सुखें तरती कोणें विधी । तो सांग त्रिशुद्धी उपावो ॥ २४ ॥ ज्यासी वश्य नाहीं निजमन । आणि भवाब्धि तरावया भाव पूर्ण । ऐसे भोळे भाविक जन । त्यांसी मायातरण सुगम सांगा ॥ २५ ॥ मागां कवी बोलिला संकलितीं 'तन्माययाऽतो बुध आभजे'ति । गुरु ब्रह्म अभेदस्थिती । करितां भक्ती माया तरिजे ॥ २६ ॥ तें

दिसत नाहीं. १६ जी कल्पना करिते तीच मुख्य माया आहे, असें तूं जाण. मायेचें निरूपण करतांना याहून अधिक रूपकें व दृष्टान्त सांगावयास नकोत. १७ हे जनका, याप्रमाणें मीं तुला मायेचें त्रिविधत्व मुख्य लक्षणांनीं वर्णन करून सांगितलें. आतां आणखी तुला काय ऐकण्याची इच्छा आहे! १८ मायेचें हें भयंकर वर्णन ऐकून यज्ञांतील ऋत्विग् व इतर सभाजन भयभीत झाले. राजालाहि अतिशय विस्मय वाटला. १९ "मायेचें लक्षण अतिशय आश्चर्यकारक आहे. ज्ञाते लोकहि तिचें निवारण करूं शकत नाहींत. अहो, जिनें ब्रह्मादिकांनाहि आपल्या जाळ्यांत गोंविलें, तेथें इतरांचा काय पाड! २२० तिनें शिवावरहि आपल्या कल्पनेचा अम्मल बसवून त्याला जीवत्व आणिलें. तेव्हां अशा त्या प्रबल मायेचें सामान्यजनांना कोणत्या उपायानें उलंघन करितां येईल तें आपण यांस विचारावें" २१ असा विचार करून जनक राजा मोठ्या आदरानें व श्रद्धेनें मायेच्या उलंघनाचा सर्व जनांस सुलभ असा उपाय विचारूं लागला. २२२.

—याप्रमाणें अंतरिक्षाकडून अनुकंपा केला गेलेला राजा मायेच्या निवृत्तीचा उपायच विचारूं लागला—

राजा उवाच—राजा म्हणाला,—महर्षे—हे महर्षे, अकृतात्मभिः—ज्यानें आपल्या अंतःकरणाला जिंकिलें नाहीं अशा लोकांना, दुस्तरां—तरून जाण्यास अत्यंत कठिण असलेल्या, एतां ऐश्वरीं मायां—या ईश्वराच्या मायेला, स्थूलधियः—स्थूल शरीरलाच 'मी' असें मानणारे प्राकृत लोक, यथा अञ्जः तरन्ति—ज्याप्रकारें अनायासानें तरून जातील, इदं उच्यताम्—असा उपाय मला सांगा. [पूर्वी दुसऱ्या अध्यायांत 'तन्माययातो बुध आभजेत् तम्' या वचनानें भक्तीच मायेंतून तारून नेणारी आहे. तथापि केवल भक्ति हाच एक तिच्या तरणाचा उपाय आहे कीं, आणखीहि एखादा उपाय आहे ? हें जाणण्यासाठीं येथें जनकानें पुनः प्रश्न केला आहे. 'स्थूल शरीरच मी' अशी ज्यांची दृढभावना असते ते ईश्वराच्या या दुस्तर मायेला अनायासानें कसे तरून जातात, तें मला सांगा.] १७.

हरीची माया अशी अति दुस्तर आहे. हें ऐकून राजाला हंसूं आलें. अहो, ती लटकीच असूनहि देहाभिमानी पुरुषांना दृढ बद्ध करावयास तयार झाली. २३ माया अतिशय दुस्तर आहे अशी शास्त्रप्रसिद्धि आहे. पण स्थूलबुद्धि भाळेभोळे लोकहि अनायासानें तिचें उलंघन करूं शकतील असा उपाय मला सांगा. २४ त्यांचें मन तर त्यांच्या स्वाधीन नाहीं, पण भवसागर तरून जाण्याची तीव्र इच्छा. अशा भोळ्या भावीकजनांसाठीं मायातरणाचा सुगम उपाय सांगा. २५ पूर्वीं कविमहर्षीनें (अ. २ श्लोक ३७ पृ. ९३) 'तन्मायया०' इत्यादि श्लोकार्धांत गुरु व ब्रह्म यांची अभेदानें भक्ति केली असतां मायेचें उलंघन करितां येतें असें थोडक्यांत सांगितलें आहे. २६ यास्तव

भक्तीचें स्पष्ट लक्षण । विशद होआवया श्रवण । पुढतीं मायेचें तरण । पुसावया कारण मुख्यत्वें हेंची ॥ २७ ॥ तो मायातरणोपायविधी । सुगम सांगावया त्रिशुद्धी । अंतरिक्षाधाकुटा सुबुद्धी । प्रबुद्ध प्रज्ञानिधी बोलता झाला ॥ २८ ॥

प्र०उ०--कर्माण्यारभमाणानां दुःखहत्यै सुखाय च । पश्येत्पाकविपर्यासं मिथुनीचारिणां नृणाम् ॥१८॥

मुख्य मायेचें तरण । प्रबुद्धचि जाणे पूर्ण । प्रबुद्ध न जाहलिया आपण । मायेचें विंदान तरते तरती ॥ २९ ॥ मनीं विषयाचा छंदु । तो केवळ महाबाधू । विषयत्यागी तो प्रबुध्दु । तोचि विशदू भावो आइका ॥ २३० ॥ विषयीं लोभलें अत्यंत मन । तेथ नव्हतां वैराग्यज्ञान । कदा नव्हे मायेचें तरण । वैराग्यार्थ जाण विषय निंदी ॥ ३१ ॥ केवळ नश्वर विषय देख । तेंचि मानिती परम सुख । तें सुखचि दुःखदायक । स्त्रीकामें मुख्य माया बाधे ॥ ३२ ॥ वेंचूनि धनाचिया गांठी । सुखार्थी स्त्री बैसविली पाटीं । तेचि भोगवी दुःखें कोटी । जगीं माया लाठी स्त्रीकामें ॥ ३३ ॥ स्त्रीकामें प्रपंचु सबळ । स्त्रीकामें दुःख प्रबळ । स्त्रीकामें मायेसी बळ । स्त्रीकामें सकळ मोहिलें जग ॥ ३४ ॥ आवडीं स्त्री बैसवितां पाटीं । त्या प्रपंचाच्या वाढवी कोटी । महामोहाच्या पाडूनि गांठी । दुःखसागरीं लोटी स्त्रीकामु ॥ ३५ ॥ जे नवमास वाहे उदरांत । ते माता करूनि अनाप्त । स्त्रियेसी मानिती अतिआप्त । ऐशी माया समर्थ स्त्रीकामें ॥ ३६ ॥ जे तोंडींचें पोटींचें खावबित । जे सदा सोशी नरकमूत । ते मातेहूनि स्त्री आप्त । जाहली जगांत मायामोहें ॥ ३७ ॥ स्त्रिया मेळवितां असंख्य मिळती । परी माता

त्या भक्तीचें लक्षण स्पष्टपणें श्रवण करण्यासाठीं मी हें आपणांस विचारीत आहे. कवीनें जें पूर्वीं सांगितलें होतें तेंच माझ्या या प्रश्नाचें मुख्य कारण आहे. २७ राजाचा हा प्रश्न ऐकून अंतरिक्षाचा अतिशय बुद्धिमान् कनिष्ठ भ्राता प्रबुद्ध मायातरणाचा सुलभ उपाय त्याला सांगूं लागला. २२८.

— भक्तीवांचून मायातरणाचा दुसरा उपाय नाहीं, अशा आशयानें प्रबुद्ध साधनासह भक्तीचेंच निरूपण करितो. त्यांतील प्रथम चार श्लोकांनीं वैराग्याच्या द्वारां गुरूपसदन सांगतो —

प्रबुद्ध उवाच-प्रबुद्ध बोलला,—दुःखहत्यै-दुःखाच्या प्रतीकारासाठीं, च-आणि, सुखाय-सुखासाठीं, कर्माणि-कर्में, आरभमाणानां-आरंभ करणाऱ्या, मिथुनीचारिणां नृणां-परस्पर संबद्ध होऊन प्रवृत्त होणाऱ्या मनुष्यांच्या, पाकविपर्यासं पश्येत्-फलाच्या विपरीतत्वाचें अलोचन करावें. [दुःखाचा प्रतीकार व सुखाची प्राप्ति यांसाठीं त्रिविध कर्मांचा आरंभ करणाऱ्या व पतिपत्नी इत्यादि भावानें परस्पर संबद्ध होऊन प्रवृत होणाऱ्या मनुष्यांच्या फलाचा विपर्यास कसा होतो, त्याचा विचार अवश्य करावा.] १८.

मुख्य मायेच्या तरणाचा उपाय पूर्ण ज्ञानीच जाणतो. स्वतः ज्ञानी झाल्यावर मायेचें उल्लंघन करण्यास फार कष्ट करावे लागत नाहींत. २९ मनांत विषयांचा नाद असणें हा फारच मोठा प्रतिबंध आहे. जो विषयांचा त्याग करितो, तोच ज्ञानी होय. आतां हाच आशय अधिक विशद करून सांगतो. २३० विषयासक्त मनामध्यें वैराग्य व ज्ञान यांचा उदय कधींहि होत नाहीं. वैराग्यासाठीं शास्त्रें व ज्ञानी पुरुष विषयांची अशी निंदा करितात. ३१ विषय क्षणभंगुर आहेत; पण अविवेकी त्यालाच परम सुख मानितात. पण तें सुखहि दुःख देणारें आहे. स्त्रीविषयक इच्छेनें मुख्य माया दुःख देते. ३२ आपल्या पदरचें धन खर्चून सुखासाठीं स्त्रीला आणून पाटावर बसविलें. पण तीच स्त्री या कामी पुरुषाला अनेक दुःखें भोगावयास लाविते. स्त्री-कामना हीच या जगांतील जबरदस्त माया आहे. ३३ तिच्यामुळेंच प्रपंच सबळ होतो. दुःख प्रबल होते, मायेला बळ चढतें. तिच्यामुळेंच सर्व जगत् मोहित झालें आहे. ३४ स्त्रीला मोठ्या आवडीनें गृहदेवता करून पाटावर बसविलें असतां ती प्रपंचाच्या कोटी वाढविते आणि स्त्रीकाम महामोहाच्या गांठी मारून पुरुषाला दुःखसागरांत लोटितो. ३५ जी माता नऊ महिने आपल्या उदरांत वहाते, तिला दूर करून मूढ स्त्रीला परम आप्त मानितात. स्त्रीकामानें माया अशी समर्थ झाली आहे. ३६ जी आई आपल्या तोंडांतील व पोटांतील घास काढून याला खाऊं घालते व बाळपणीं याच्या मल-मूत्रांचे लेप सहन करिते, तिच्याहूनहि स्त्री या जगांत मायामोहानें आप्त झाली आहे. ३७ 'स्त्रिया

न मिळे त्रिजगतीं । ऐसे जे सज्ञान जाणती । तेही आप्त मानिती स्त्रियेतें ॥ ३८ ॥ मातेतें भजतां भुक्तिमुक्ती । स्त्रियेतें भजतां नरकप्राप्ती । ऐसें जे शास्त्रज्ञ जाणती । तेही माता उपेक्षिती स्त्रीकामें ॥ ३९ ॥ एवं स्त्रीकामाचिया व्याप्ती । माया व्यापिली त्रिजगतीं । सज्ञानही पाडले भ्रांतीं । स्त्रीकामासक्ती महामाया ॥२४०॥ मानूनि विषयांचें सुख । काम्य कर्म करितां देख । तेणें अतिदुःखी होती लोक । दुःखदायक काम्य कर्म ॥ ४१ ॥ कामिनीकामें गृहासक्ती । प्राणी प्राणांतें स्वयें शिणती । त्या श्रमाची निदानस्थिती । सांगेन तुजप्रती राजाधिराजा ॥ ४२ ॥ निर्मळ जळें भिंती धुतां । जळाचीच नासे निर्मळता । हात माखती धुतले म्हणतां । भिंतीही तत्वतां निढळ केली ॥ ४३ ॥ तेवीं विषयांचेनि सुखें सुख । न पावतीच ब्रह्मादिक । विषयाचा जे मानिती हरिख । ते परम मूर्ख पशुदेही ॥ ४४ ॥

नित्यार्तिदेन वित्तेन दुर्लभेनात्ममृत्युना । गृहापत्याप्तपशुभिः का प्रीतिः साधितैश्चलैः ॥ १९ ॥

रातिदिवस निजनिकटें । मरणेंसीं घेतां झटें । कवडीची प्राप्ती न भेटे । प्राणांतकष्टें द्रव्य जोडे ॥ ४५ ॥ एवं कष्टें जोडलें धन । तें महादुःखाचें जन्मस्थान । अर्थ अनर्थाचें अधिष्ठान । निजात्ममरण निजमूळ ॥४६॥ द्रव्य नसतां उपायें शिणवी । जाल्या सरंक्षणीं आधी लावी । रात्रिंदिवस हृद्रोग जीवीं । अविश्वासें नांदवी धनलोभू ॥ ४७ ॥ मायबापाशीं चोरी करवी । स्त्रीपुत्रांसी कलहो लावी । सुहृदांतें दूरीं दुरावी । हे द्रव्याची पदवी स्वाभाविक ॥ ४८ ॥ द्रव्यापाशीं आधिव्याधी । द्रव्यापाशीं दुष्ट बुद्धी ।

मिळवूं लागल्यास असंख्य मिळतील, पण माता त्रिभुवनांत एकहि मिळणार नाहीं' असें जे ज्ञानी जाणतात, तेहि स्त्रीला परम आप्त मानितात. ३८ मातेची सेवा केल्यास ऐहिक सुख व मोक्ष हीं दोन्ही मिळतात आणि स्त्रीचें भजन केल्यास नरक प्राप्त होतो, असें जाणणारे शास्त्रज्ञसुद्धां स्त्रीच्या नादानें मातेची उपेक्षा करितात. ३९ याप्रमाणें स्त्रीकामाच्या व्याप्तीनें माया त्रिभुवनास व्यापून राहिली आहे. सज्ञानहि भ्रांतींत पडले आहेत. खरोखर स्त्रीविषयासक्ति हीच महामाया आहे. २४० विषयांचें सुख मानून काम्यकर्म केल्यास लोक अति दुःखी होतात. यास्तव काम्यकर्म दुःखदायक आहे. ४१ स्त्रीच्या इच्छेनें गृहावरील आसक्ति वाढून प्राणी स्वतः मरेपर्यंत शीण भोगितात. हे राजा, मी तुला त्या श्रमाचें निदान सांगतो. ४२ स्वच्छ पाण्यानें भिंत धुवूं लागल्यास जलाचीच निर्मलता नाहींशी होते, हातहि चिखलानें माखतात आणि भिंतीवरील माती गेल्यामुळें त्याहि निर्बल होतात. ४३ त्याचप्रमाणें विषयांच्या सुखानें ब्रह्मादिकहि सुखी होत नाहींत. पण अशा विषयांचा जे हर्ष मनितात ते परम मूर्ख नराकार पशूच आहेत. २४४.

—त्याचप्रमाणें कर्मांनीं संपादन केलेलेहि द्रव्यादि पदार्थ सुखाचे हेतु होत नाहींत, असें पहावें हें सांगतो—

नित्यार्तिदेन—सतत पीडा देणाऱ्या, **दुर्लभेन**—दुर्लभ व, **आत्ममृत्युना**—स्वतःच्या मृत्युरूप, **वित्तेन**—अशा धनानें व, **साधितैः**—संपादन केलेल्या, **चलैः**—अनित्य, **गृहापत्याप्तपशुभिः**—गृह-अपत्य-आप्त-पशु यांनीं, **का प्रीतिः**—काय इष्ट होणार ! [सतत दुःख देणाऱ्या, दुर्लभ व आपल्या मृत्युरूप वित्तानें व मोठ्या कष्टानें संपादन केलेल्या अनित्य गृहादिकांनीं आपलें कोणतेंहि अभीष्ट साधणार नाहीं, असा सतत विचार करावा.] १९.

अहोरात्र, स्वतःच्या आवडीनें, मरेमरेतों मेहनत करूनहि कवडीची प्राप्ति होत नाहीं, तथापि तो प्राणान्त कष्ट करून कसेंबसें धन जोडतो. ४५ पण याप्रमाणें मोठ्या कष्टानें मिळविलेलेंहि धन महादुःखाला कारण होतें. तें अनर्थाचें मूळ आहे, स्वतःच्या नाशाला स्वतःच धाडलेलें मूळ आहे. ४६ द्रव्य नसलें म्हणजे अनेक उपायांनीं हा आपल्याला शिणवितो. तें मिळालें म्हणजे त्याला त्याच्या रक्षणाची भयंकर चिंता लागते. त्याच्या जीवाला अहोरात्र हृद्रोग लागतो. धनलोभ त्याला अविश्वासानेंच नांदवितो. ४७ आईबापांपासून चोरून ठेवणें, स्त्री-पुत्रांत कलह लाविणें आणि परम मित्रांसहि दूर सारणें हा द्रव्याचा स्वाभाविक धर्म आहे. ४८ द्रव्यापाशीं आधि, व्याधि, दुष्ट-

द्रव्यापाशीं सलोभ क्रोधी । असत्य निरवधी द्रव्यापाशीं ॥ ४९ ॥ द्रव्यापाशीं अतिविकल्प । द्रव्यापाशीं वसे पाप । द्रव्यापाशीं अतिसंताप । पूर्ण दुःखरूप तें द्रव्य ॥ २५० ॥ हें दानें त्यागितां फळ गोमटें । लोभियां नरका न हटेंतटें । द्रव्याऐसें गा वोखटें । आन न भेटे तिहीं लोकीं ॥५१॥ नळिया चणियांचें आशा । वानरें मुठीं धरणें तोचि फांसा । तेवीं द्रव्यदाराभिलाषा । नरदेहदशा अधःपातीं ॥ ५२ ॥ द्रव्य सहसा न मिळे पाहीं । मिळे तरी अनीति अपायीं । यालागीं द्रव्याच्या ठायीं । सुख नाहीं त्रिशुद्धी ॥ ५३ ॥ धन वेंचोनि फाडोवाडें । घर करिती वाडेंकोडें । अध्रुवत्वें सवेंचि पडे । थितें द्रव्य बुडे आयुष्येंसीं ॥ ५४ ॥ करूनि आयुष्याचा मातेरा । मुद्लेंसीं जेणें जोडिलें पुत्रा । त्या पुत्राच्या मरणद्वारा । दुःखदुर्धरामाजीं बुडती ॥ ५५ ॥ प्रपंचींचें सुहृद समस्त । जंव स्वार्थ तंव होती आप्त । स्वार्थविरोधें ते अनाप्त । होऊनि घात सुहृदां करिती ॥ ५६ ॥ करोनियां अतिहव्यासू । मेळविती नाना पशू । त्यांचा सवेंचि होय नाशू । तेणें दुःखें त्रासू गृहस्थांसी ॥ ५७ ॥ निजदेहोचि नश्वर येथ । प्रपंच नव्हे गा शाश्वत । अवघें जगचि काळग्रस्त । इहलोकीं समस्त ठकिलें काळें ॥ ५८ ॥ मनुष्यदेहो कर्मभूमिप्राप्त । तो लोक म्हणती कर्मजित । हा जैसा नश्वर येथ । तैसाच निश्चित नश्वर स्वर्गू ॥ ५९ ॥

एवं लोकं परं विद्यान्नश्वरं कर्मनिर्मितम् । सतुल्यातिशयध्वंसं यथा मण्डलवर्तिनाम् ॥ २० ॥

बुद्धि, लोभ, क्रोध व परमावधीचें असत्य, अति विकल्प, पाप व अति संताप हे दोष नित्य रहातात. त्यामुळें द्रव्य सर्वथा दुःखरूप आहे. ४९–२५० दानाकडे त्याचा विनियोग केल्यास त्यापासून पुण्य लागतें, पण लोभ्यांना तें बळजबरीनें दुःखांत लोटतें. यास्तव हे जनका, द्रव्यासारखी वाईट वस्तु या त्रिभुवनांत दुसरी नाहीं. ५१ वानरानें चण्याच्या आशेनें पाशाजवळ येऊन त्याची नळी जों हातांत धरावी, तोंच तो पाशांत अडकतो, त्याचप्रमाणें द्रव्य व स्त्री यांच्या अभिलाषानें नरदेहाची दुर्दशा होऊन त्याचा अधःपात होतो. ५२ अगोदर जीवापाड कष्ट करूनहि सहसा द्रव्य मिळत नाहीं. आणि जरी कदाचित् मिळालें तरी लोभ्याची नीति सुटते व त्यामुळें तें त्याला अपायच करितें. यास्तव द्रव्यामध्यें सुख नाहीं हें मी तुला त्रिवार सांगतों. ५३ अहो, पुष्कळ धन खर्चे करून मोठ्या आवडीनें घर बांधतात, पण क्षणभंगुरत्वामुळें आयुष्यासह तें सर्व बुडून जातें. ५४ सर्व आयुष्याचा मातेरा करून व आगणित धन खर्चे करून पुत्र संपादन केला, पण त्या पुत्राच्या मरणद्वारां बिचारा दुःखांतच बुडाला. ५५ प्रपंचांतील सर्व सुहृद जोंवर त्यांचा स्वार्थ साधत असतो, तोंवरच आप्त असतात, पण स्वार्थाशीं विरोध येऊं लागला कीं, तेच वैरी होऊन त्याचाच घात करितात. ५६ मोठा हव्यास धरून गायी, म्हशी, घोडे इत्यादि अनेक पशु संपादन करितो, पण लागलाच त्यांचा नाश होतो. त्यामुळें या गृहस्थाला अतिशय दुख होतें. ५७ अगोदर आपला देहच जर नश्वर आहे, तर प्रपंच तरी सत्य कसा असेल ! या सर्व जगाला काळानें ग्राशिलें आहे, त्यानें सृष्टींतील सर्व प्राण्यांना ठकविलें आहे, सर्व लोकांना फसविलें आहे, ५८ या कर्मभूमींत जो मनुष्यदेह प्राप्त होतो, त्याला कर्मजित-कर्मानें संपादिलेला असें म्हणतात. पण हा लोक जसा नश्वर आहे, तसाच स्वर्गहि नश्वर आहे. कारण तोहि कर्मजितच. ५९

एवं परं लोकं—याप्रमाणें परलोकाला, **कर्मनिर्मितं नश्वरं**—कर्मानें उत्पन्न केलेला व त्यामुळें नश्वर, **विद्यात्**—जाणावें, **यथा**—ज्याप्रमाणें, **मंडलवर्तिनां**—मंडलवर्ति राजांमध्यें परस्परस्पर्धा वगैरे चालते, त्याप्रमाणें परलोकहि, **सतुल्यातिशय-ध्वंसं**—समानांशीं स्पर्धा, अधिकांशीं असूया, व नाश, यांनीं युक्त आहे असें जाणावें. [इहलोकांप्रमाणें परलोकहि नश्वर आहे, असें समजावें. कारण तोहि कर्मानें संपादन केलेला आहे. ' ज्याप्रमाणें इहलोकीं कर्मानें संपादन केलेलें फल जसें नाश पावतें, त्याप्रमाणें परत्र पुण्यानें संपादन केलेलें फलहि नाश पावतें. '—सु. उपनिषत्संग्रह पृ. ४६८—अशी श्रुति आहे. शिवाय वर्तमान समयींहि परलोक दुःखयुक्त आहे, असें पहावें. कारण तो लोक तुल्य, अतिशय व ध्वंस यांनीं युक्त आहे. त्यामुळें पर-लोकहि तुल्यांशीं स्पर्धा, अधिकांशीं असूया व विनाश उपस्थित झाला असतां भयादिक हीं अपरिहार्य आहेत. त्याविषयीं या लोकींच्या चक्रवर्ति राजांचा दृष्टांत दिला आहे. सार्वभौम व मांडलिक राजे यांच्यामध्यें परस्पर स्पर्धादिक कशा चालतात, तें प्रसिद्धच आहे.] २०.

मनीं धरोनि विषयभोग । इहलोकीं करिती याग । पुण्य जोडोनियां सांग । पावती स्वर्ग निजपुण्ययोगें ॥ २६० ॥ स्वर्गसुखा इंद्र अधिपती । तोही पतनार्थ धाके चित्तीं । विघ्न सूचित सांप्रतीं । स्वर्गस्थिति अपायी ॥ ६१ ॥ यापरी निजपुण्यें स्वर्गप्राप्ती । त्या लोकातें पुण्यजित म्हणती । तेही पुण्यक्षयें क्षया जाती । तेणें धाकें धाकती स्वर्गस्थ श्रेष्ठ ॥ ६२ ॥ गांठीं पुण्य असतां चोख । स्वर्गभोगीं असेल सुख । हेही वार्ता समूळ लटिक । स्वर्गीचें दुःख ऐक राया ॥ ६३ ॥ समान पुण्यें समपदप्राप्ती । त्यांसीं स्पर्धाकलहो करिती । आपणाहूनि ज्यां अधिक स्थिती । त्यांचा द्वेष चित्तीं अहर्निशीं ॥ ६४ ॥ जैसे राजे मंडळवर्ती । राज्यलोभें कलहो करिती । तैशी स्वर्गस्थां कलहस्थिती । द्वेषें होती अतिदुःखी ॥ ६५ ॥ पतनभयें कलहद्वेषवोढी । क्षयातें पावे पुण्यजोडी । अधोमुख पडती बुडी । याज्ञिकें बापुडीं चरफडती ॥ ६६ ॥ एवं स्वर्गसुखउल्हासू । मानिती ते केवळ पशू । प्रत्यक्ष तेथ द्वेष नाशू । असमसाहसू नित्य कलहो ॥ ६७ ॥ सेविलाचि विषयो नित्य सेविती । परी कदा नव्हे मानसी तृप्ती । तरी मिथ्या म्हणोनि नेणती । हे मोहक शक्ती मायेची ॥ ६८ ॥ जैसें वेश्येचें सुख साजणें । वित्त घेऊनि बोसंडणें । तेवीं विषयाचा संगु धरणें । तंव तंव होणें अतिदुःखी ॥६९॥ यालागीं उभयभोगउपाया । जे जे प्रवर्तले गा राया । ते ते जाण ठकिले माया । थितें गेलें वायां उत्तम आयुष्य ॥ २७० ॥ कर्मभूमी नरदेहप्राप्त । हें पूर्ण निजभाग्यांचें मथित । देव नरदेह वांछित । ते देव केले व्यर्थ विषयार्थीं ॥७१॥ एवं विषयाची आसक्ती । माया ठकिले नेणों किती । यालागीं विषयाची विरक्ती । करावी गुरुभक्ती तेंचि सांगों ॥७२॥

मनामध्यें विषयावासना धरून या लोकीं मोठमोठे यज्ञ करितात व सांग पुण्य जोडतात. त्या पुण्याच्या योगानें त्यांना स्वर्ग मिळतो. २६०. पण स्वर्गसुखाचा अधिपति जो इंद्र तोहि आपलें या स्थानापासून पतन होईल म्हणून अहर्निश मनांत भीति बाळगितो. विषयभोगसमयींहि विघ्नांची भीति असते. त्यामुळें स्वर्गस्थितीसुद्धां अपायकारक आहे. ६१ आपल्या पुण्यानें स्वर्गप्राप्ति होते, म्हणून स्वर्गाला पुण्यजितलोक म्हणतात. पण पुण्य क्षय झालें असतां तेहि क्षय पावतात, म्हणून स्वर्गांतील श्रेष्ठ देवहि क्षयाच्या भीतीनें नेहमीं सचिंत असतात. ६२ अहोपण, आपल्या पदरीं जर उत्तम पुण्य असेल तर स्वर्गलोकींहि सुख होईल असें जर म्हणाल तर, ही समजूत सर्वथा खोटी आहे. राजा, स्वर्गांमध्यें किती दुःख आहे तें ऐक. ६३ ज्यांचें एकसारखेंच पुण्य असतें, त्यांना समानपदाची प्राप्ति होते. अर्थात् त्यांची परस्पर स्पर्धा व कलह चालतो. आपणाहून ज्यांना उच्चस्थिति प्राप्त झालेली असते, त्यांच्याविषयीं चित्तांत अहर्निश द्वेष वाटतो. ६४ जसें इहलोकचे मांडलिकराजे राज्यलोभानें परस्पर भांडतात, तसेंच स्वर्गस्थहि भांडतात आणि द्वेषानें अतिशय दुःखी होतात. ६५ पतनाची भीति, कलह व द्वेष यांच्या ओढीनें पुण्याची जोड संपते आणि बिचारे याज्ञिक चडफडत अधोमुख खालीं पडतात. ६६ यास्तव जे स्वर्गसुखाचा हव्यास धरितात ते केवळ पशु होत. द्वेष नाश, असहिष्णुता, नित्यकलह इत्यादि दोष तेथें प्रत्यक्ष असतात. ६७ एकदां भोगलेला विषय पुनःपुनः नित्य भोगितात. तरी त्यांच्या मनाची तृप्ति होत नाहीं आणि हे कधींहि तृप्ति न करणारे विषय मिथ्या आहेत असें ते जाणत नाहींत. हीच मायेची ती मोहक शक्ति आहे. ६८ जसें मोलानें संपादन केलेलें सुख वित्तासह सोडावें लागतें व शेवटीं अतिशय पश्चाताप होतो, त्याप्रमाणें विषयासक्ति जशी जशी वाढत जाते तसें तसें दुःखाचें प्रमाणहि वाढत जातें. ६९ यास्तव ऐहिक व पारलौकिक भोगांच्या उपायामध्यें जे जे प्रवृत्त झाले, ते ते मायेकडून ठकविलें गेलें व त्यांचें उत्तम आयुष्य फुकट गेलें. २७० या कर्मभूमीमध्यें मनुष्यदेहाची प्राप्ति होणें हें आपल्या पूर्व भाग्याचें सारभूत फल आहे. देवहि मनुष्यदेहाची इच्छा करितात. पण ते सुद्धां बिचारे विषयांच्या नादीं लागून व्यर्थ जातात. ७१ याप्रमाणें विषयाच्यासक्तीच्या द्वारां मायेनें कितीजणांना ठकविलें आहे याची कांहीं गणना नाहीं. म्हणून विषयाविषयीं विरक्त होऊन गुरुभक्ति करावी हेंच आतां प्रबुद्ध पुढील श्लोकांत सांगतो. २७२.

तस्माद्‌गुरुं प्रपद्येत जिज्ञासुः श्रेय उत्तमम् । शाब्दे परे च निष्णातं ब्रह्मण्युपशमाश्रयम् ॥ २१ ॥

जाणोनि विषयांचें नश्वरपण । पावावयालागीं ब्रह्म पूर्ण । सद्‌गुरूसी अनन्यशरण । रिघावें संपूर्ण श्रद्धायुक्त ॥ ७३ ॥ सद्‌गुरुवचनमात्रें माया । तरोनि हा निश्चयो राया । येणें सद्भावें लागतों पायां । पावावया निजस्वार्थू ॥ ७४ ॥ गुरुऐसें जें ह्मणणें । तेंही आहे बहुसालपणें । ऐक राया तीं लक्षणें । तुजकारणें सांगेन ॥ ७५ ॥ एक वेदाध्ययन गुरू । एक व्याख्यानदानीं उदारू । एक ज्योतिषज्ञानीं गंभीरू । परी ते सद्‌गुरू न म्हणती ज्ञाते ॥ ७६ ॥ एक आगमोक्त मंत्र उपासिती । जप करावा विधानयुक्तीं । मग कैं होईल निजप्राप्ती । हें न कळे निश्चिती गुरुशिष्यां ॥ ७७ ॥ एक वायुधारणा लाविती । एक नाना लक्ष्यें दाविती । एक हठयोगें गोंविती । एक बैसविती महामुद्रा ॥ ७८ ॥ एक ब्रह्मानुवादें चोखट्ट । तत्त्वनिरूपणीं उद्‌भट्ट । वैराग्यबोलिका वरिष्ठ । उपजवी विट्ट उभयभोगांचा ॥७९॥ कैसें निरूपी शुद्ध ब्रह्म । ऐकोनि सात्विकां येत प्रेम । परी निजहृदयींचा भ्रम । निरसे तें वर्म नेणेची ॥ २८० ॥ जेवीं गुळउंसाचा घाणा । तोंडींचा रसु भरे भाणा । शब्दचोपटें भरोनि वदना । करी परिभ्रमणा करकरितू ॥ ८१ ॥ ऐसा जो कां शब्दज्ञानी । उत्तम व्याख्याता ज्ञानगुणीं । तो जन रंजवी निरूपणीं । स्वयें कोरडेपणीं करकरितू ॥ ८२ ॥ योगक्षेम चाले गोमटा । लौकिकीं थोर प्रतिष्ठा । तेथें

तस्मात्–म्हणून, उत्तमं श्रेयः जिज्ञासुः–परमश्रेयाला जाणण्याची इच्छा करणाऱ्या पुरुषानें, शाब्दे परे च ब्रह्मणि–वेदाख्य ब्रह्मामध्यें व परब्रह्मामध्यें, निष्णातं–प्रवीण असलेल्या, उपशमाश्रयं–व निवृत्तिमार्गाचा आश्रय, गुरुं–अशा गुरुला, प्रपद्येत–शरण जावें. [परम श्रेय जें परमात्मतत्त्व त्याला जाणण्याची इच्छा करणाऱ्या साधकानें गुरूला शरण जावें. तो गुरु कसा असावा ! शाब्द ह्म० वेदाख्य ब्रह्मामध्यें निष्णात असावा. म्ह० न्यायानें वेदार्थ जाणणारा असावा. तसा नसल्यास तो शिष्याच्या संशयाची निवृत्ति करण्यास समर्थ होणार नाहीं. तसाच तो परब्रह्मामध्येंहि अपरोक्ष साक्षात्कारानें निष्णात असावा. कारण त्यावांचून तो आपलें ज्ञान श्रोत्यांच्या मनांवर ठसवूं शकणार नाहीं. 'उपशमाश्रय' हें गुरूचें विशेषण त्याचें परब्रह्म-निष्णातत्व सुचवितें. उपशम म्हणजे शांति, विरक्ति व कर्मापासून निवृत्ति.] २१.

विषयांची क्षणभंगुरता जाणून पूर्णब्रह्माला प्राप्त होण्यासाठीं सद्‌गुरूला दृढ श्रद्धेनें अनन्य शरण रिघावें. ७३ 'मी केवळ सद्‌गुरुवचनानेंच मायेला तरून जाईन' असा माझा पूर्ण निश्चय आहे असें म्हणून सद्भावनेनें आत्मस्वार्थ साधण्यासाठीं मी तुमच्या पाया पडतों. ७४ हे राजा, एखाद्याला गुरु म्हणणें यांतहि पुष्कळ प्रकार आहेत. यास्तव मी तुला गुरूचीं लक्षणें सांगतों. ७५ एक वेदाध्यायन सांगणारे गुरु असतात. कांहीं नुस्तें व्याख्यान देण्यांत कुशल असतात. कित्येक ज्यौतिषज्ञानांत प्रविण असतात. पण ज्ञाते त्यांना सद्‌गुरु म्हणत नाहींत. ७६ कित्येक मंत्र-शास्त्रांतील मंत्राची उपासना करितात. यथाविधि जप करावा असें सांगतात, पण त्यामुळें इष्टप्राप्ति केव्हां होईल हें गुरुंनाहि निश्चयानें सांगवत नाहीं व शिष्यालाहि कळत नाहीं. ७७ कित्येक प्राणायामाच्या योगानें वायु कोंडावयास लावितात. कांहींजण ब्रह्माचीं अनेक प्रतीकें दाखवितात. कित्येक शिष्याला हठयोगांत गोंवितात व कोणी मौन धरून बसवितात. ७८ कित्येक ब्रह्माचें निरूपण करण्यांत फार चतुर असतात, ते तत्त्वाचें प्रतिपादन मोठ्या आवेशानें करितात. वैराग्याचें उपपादन करण्यांत अतिशय वरिष्ठ असतात. ते आपल्या मोहक भाषणानें श्रोत्यांच्या मनांत दोन्ही लोकांतील भोगाविषयीं वैराग्य उत्पन्न करितात. ७९ अहो, अशा वक्त्यांचें शुद्ध ब्रह्म निरूपण ऐकून सात्त्विक श्रोत्यांच्या मनांत प्रेमाचें भरतें येतें. पण आपल्या मनांतील भ्रम जाईल हें वर्म त्यांनाहि ठाऊक नसतें. २८० जसा ऊंसाचा घाणा आपल्या तोंडांतील रसानें त्याच्याखालीं ठेवलेलें भांडें भरतो, पण त्याला आपलें तोंड वारंवार चोयट्यांनींच भरून घेऊन एकसारखेंच 'कर्र कर्र' असा आवाज करीत भ्रमण करावें लागतें. ८१ या दृष्टान्ताप्रमाणेंच जो केवळ शब्दज्ञानी उत्तम व्याख्याता असतो तो ज्ञानगुणानें आपल्या निरूपणशक्तीनें लोकांचें रंजन करितो. पण स्वतः कोरडाच राहून घाण्याप्रमाणें नुस्ती वटवट करीत असतो. ८२ आपला योगक्षेम चांगला चालावा, लोकांमध्यें आपली मोठी प्रतिष्ठा व्हावी, एवढीच त्याची लालसा असते. आपल्या

निजप्राप्तीची उत्कंठा । न वचे वरिष्ठा शिष्यांची ॥ ८३ ॥ जेवीं अमृत म्हणतां । चवी न लभे गा सर्वथा । तेवीं शाब्दिकज्ञानयोग्यता । अनुभववार्ता स्वयें नुपजे ॥ ८४ ॥ जेणें स्वयें चाखिली नाहीं चवी । तो दुजयातें गोडी केवीं लावीं । यालागीं जो पूर्णानुभवी । तो तारी सद्भावें सच्छिष्यासी ॥ ८५ ॥ एवं गुरुपणाची वदंती । असे बहुपणें नांदती । जो करी अपरोक्षप्राप्ती । त्यातें म्हणती सद्गुरुस्वामी ॥ ८६ ॥ ज्याचेनि वाक्यें असंतता । निःशेष मावळे तत्त्वतां । त्यासीच गा सद्गुरुता । वेदशास्त्रार्थीं तत्त्वता प्रतिपाद्य ॥ ८७ ॥ जे उपदेशिती मंत्रतंत्र । तेही पूज्यत्वें अतिसधर । जेथें नुरे पूज्यपूजकताविकार । तोचि साचार सद्गुरुस्वामी ॥८८॥ एकाचें शुद्ध ब्रह्मज्ञान । वस्तु देखोनि विरालें मन । मावळलें द्वैताचें भान । पडिलें मौन चहूं वाचां ॥ ८९ ॥ इंद्रियें टवकारिलीं समस्त । प्राण पांगुळला जेथींचा तेथ । वस्तु देखोनियां परमाद्भुत । पडलें ताटस्थ्य देहभावा ॥ २९० ॥ ऐसा जो आत्मानुभवी । त्यातें सद्भावें शिष्यु विनवी । तंव तो पुसे ना समजावी । ताटस्थ्यभावीं अबोलणा ॥ ९१ ॥ एका अनुभवा आलें ब्रह्म । फिटला बाध्यबाधकतेचा भ्रम । मोडलें द्वैतभावाचें कर्म । जगीं विषम असेना ॥ ९२ ॥ परी अचुंबित वर्तणें । अघटमान कर्म करणें । अत्यंत उग्रता मिरवणें । दुर्धरपणें भयानकू ॥ ९३ ॥ आपण आपणियामाजीं हंसत । ध्वनितें बोले परमार्थ । तेथें बोधेना शिष्याचें चित्त । पडे दुश्चित्त ते ठायीं ॥ ९४ ॥ ऐसा जो वर्ते ब्रह्मज्ञानी । त्याची ब्रह्मस्थिती न मने जनीं । मा कोण जाईल भाव धरोनी । बोधालागोनी त्यापाशीं ॥ ९५ ॥ आतां सद्गुरूचीं जीं निजलक्षणें । राया सांगेन तुजकारणें । जे ऐकतां अंतःकरणें । सुखी होणें सद्भावें ॥ ९६ ॥ तरी जो कायावाचामनें । अतिकृपाळू दीनाकारणें । तोडी शिष्यांचीं भवबंधनें । उठवी ठाणें

शिष्यांना आत्मप्राप्ति व्हावी अशी मुळींच उत्कंठा नसते. ८३ जसे म्हणतांना म्हणावयाचें अमृत, पण त्यांत चवीचा लेशहि नसावा, त्याप्रमाणें शाब्दिक ज्ञानाची योग्यता मोठी, पण स्वतःला अनुभवाच्या नांवांनीं पूज्य. ८४ अहो, ज्यानें स्वतः एखाद्या वस्तूची चव मुळींच घेतलेली नाहीं, तो दुसऱ्याला त्याची गोडी कशी लावणार ? यास्तव जो गुरु पूर्ण अनुभवी असतो तोच सच्छिष्याला सद्भावानें तारूं शकतो. ८५ गुरुत्वाची वार्ता या जगामध्यें अशी अनेक प्रकारची आहे, पण जो शिष्याला अनुभवाची प्राप्ति करून देतो, त्यालाच सद्गुरुस्वामी म्हणतात. ८६ ज्याच्या वाक्यानें शिष्याची मिथ्या जगद्भावना तत्त्वतः निःशेष मावळते, त्यालाच सद्गुरुत्व आहे, असें वेद व शास्त्रें यांत प्रतिपादन केलें आहे. ८७ जे मंत्रतंत्रांचा उपदेश करितात तेहि पूज्यत्वानें फार थोर होत. पण जेथें मी पूज्य व हा पूजक असा विकार रहात नाहीं, तोच खरा सद्गुरुस्वामी होय. ८८ ज्याचें ब्रह्मज्ञान शुद्ध आहे, ब्रह्मवस्तूला पाहून ज्याचें मन विरून गेलें आहे, द्वैताचें भान मावळलें आहे, चारी वाणींना मौन पडलें आहे, ८९ सर्व इंद्रियें तटस्थ झालीं आहेत, परम अद्भुत वस्तु पाहून प्राण जेथल्यातेथें पांगुळला आहे, देहभावाला तटस्थत्व प्राप्त झालें आहे, २९० असा जो आत्मानुभवी गुरु त्याला शिष्य सद्भावानें विनवितो. पण असला गुरु त्या शिष्याला कांहीं विचारीत नाहीं व कांहीं समजून सांगत नाहीं, तर तटस्थपणें मौन धरून बसतो. ९१ ब्रह्म अनुभवाला आलें व बाध्यबाधकतेचा भ्रम निवृत्त झाला. द्वैतभावाचें कर्म थांबलें. जगांतील विषमभाव गेला, ९२ तथापि कोठेंहि आसक्त न होतां जगांत रहाणें, दुसऱ्या कोणालाहि करतां येणार नाहीं, असें कर्म करणें. न्यायनिष्ठुर होऊन जगत् आपल्याला वचकून राहील, अशा प्रकारें जगांत मिरवणें हें सद्गुरूचें लक्षण आहे. ९३ जो मनांतल्या मनांत जगाची मूढता पाहून हंसत असतो, अन्योक्तीनें परमार्थ बोलतो, आणि त्यामुळें शिष्याच्या चित्ताला कांहीं उमज न पडून तो गोंधळांत पडतो. ९४ जो ब्रह्मज्ञानी असें वर्तन करितो त्याची ब्रह्मस्थिति सामान्य लोकांना प्रतीत होत नाहीं. असें वागण्यांत त्याचा हा आशय असतो कीं, आपल्याजवळ बोधासाठीं लोकांची व्यर्थ गर्दी होऊं नये. ९५ आतां सद्गुरूचीं जीं स्वाभाविक लक्षणें असतात तीं मी तुला सांगतों. तीं ऐकून तुझें अंतःकरण सद्भावानें सुखी होईल. ९६ जो दीनावर शरीर, वाणी व मन यांनीं अतिशय कृपा करितो, शिष्यांचीं संसारबंधनें तोडितो,

अहंकाराचें ॥ ९७ ॥ जो शब्दज्ञानें पारंगतू । ब्रह्मानंदें सदा डुल्लतू । शिष्यप्रबोधनीं समर्थू । यथोचितू निजभावें ॥ ९८ ॥ ज्याचा जैसा जैसा भावो । तैसा तैसा करी अनुभवो । तरी गुरुत्वाचा अहंभावो । अणुमात्र पहा हो धरीना ॥ ९९ ॥ शिष्यापासूनि सेवा घेणें । हें स्वप्नींही न स्मरे मनें । शिष्याची सेवा स्वयें करणें । पूज्यत्वें पाहणें निजशिष्यां ॥ ३०० ॥ शिष्य देखावा पुत्रासमान । हें स्मृतिवाक्य असे प्रमाण । दृष्टी देखों नेणे गौण । शिष्या देखे पूर्ण ब्रह्मत्वें ॥ १ ॥ शिष्यसेवा करी निजभावार्थे । परी तो सेवक न म्हणे त्यातें । ज्यासी भगवद्रूप सर्व भूतें । शिष्य वेगळा तेथें सेवकत्वें नुरे ॥ २ ॥ ऐसा मी एक महायोगी । हेंही न मिरवी तो जगीं । गुरुत्वाचा ताठा अंगीं । सर्वथा शिगीं लागों नेदी ॥ ३ ॥ आपुल्या योगक्षेमाचें सांकडें । स्वप्नींही न घाली शिष्याकडे । शिष्यसंकट अतिगाढें । निवारी रोकडें निजांगें जो ॥ ४ ॥ मी एक अकर्ता निजात्मयोगी । म्हणोनि विषयांतें न भोगी । अथवा विषयो निःशेष त्यागी । हाही आग्रहो अंगीं असेना ॥ ५ ॥ तो विषय भोगी ना स्वयें त्यागी । तो अदृष्टाच्या निजविभागीं । लावूनियां देहाच्या अंगीं । परब्रह्मयोगीं विचरत ॥ ६ ॥ देह दैवें पालखीमाजीं चढे । अथवा विष्टेमाजीं पडे । तें दोहींचें सुखदुःख त्याकडे । मी ह्मणोनि पुढें कदा न रिघे ॥ ७ ॥ देहीं असोनि नाहीं अहंकृती । देहीं असोनि नाहीं गृहासक्ती । शेखीं लोकांमाजी लौकिकस्थितीं । सुखें वर्तती लोकांसरिसें ॥ ८ ॥ त्यासी स्त्री म्हणे माझा भर्ता । पुत्र ह्मणे माझा पिता । शिष्य म्हणती गुरु तत्वतां । तो त्यांहूनि परता त्यांमाजीं वर्ते ॥ ९ ॥ ऐशिया पूर्णप्रतीती । आचरोनि दावी भक्ती । हरि भजावा सर्वांभूतीं । हेंच शिष्यांप्रती उपदेशी ॥ ३१० ॥ हीं सद्गुरूचीं निजलक्षणें । पंडितां न कळती ज्ञातेपणें । पूर्णानुभवी जाणती खुणे । इतरांचें जाणणें

अहंकाराची ठाणीं उठवितो, ९७ शब्दज्ञानामध्यें पारंगत असतो, ब्रह्मानंदानें सदा डुलत असतो, शिष्याला आत्मभावानें अधिकाराप्रमाणें बोध करण्यास समर्थ असतो, ९८ ज्याचा जसा भाव असतो तशीच त्याला प्रतीति आणून देतो; तथापि गुरुत्वाचा अहंभाव अणुमात्रहि धरीत नाहीं. ९९ शिष्यापासून सेवा करून घेण्याची कल्पना कधीं स्वप्नांतहि त्याच्या चित्तांत उद्भवत नाहीं. उलट स्वतः शिष्याची सेवा करणें व आपल्या शिष्याला पूज्यत्वानें पहाणें हा सद्गुरूचा स्वभावच आहे. ३०० 'शिष्याला पुत्रासमान पहाणें ' हें स्मृतिवाक्य याविषयीं प्रमाण आहे, त्यामुळें शिष्याला कमी समजणें हें त्याला ठाऊकच नसतें. त्याला तो पूर्ण ब्रह्मभावानें पहातो. १ शिष्य आपल्या भावनेनेंच त्याची सेवा करितो, पण सद्गुरू त्याला आपला सेवक म्हणत नाहीं, कारण ज्याला सर्व भूतें भगवद्रूप झालीं त्याला शिष्य सेवकत्वानें वेगळा कोठचा रहाणार ? २ मी हा असा एक महायोगी आहें, असेंहि तो जगांत मिरवीत नाहीं. तो आपल्या अंगीं सद्गुरुत्वाचा ताठा केव्हांहि भरू देत नाहीं. ३ आपल्या चरितार्थाचा भार स्वप्नांतहि शिष्यावर घालीत नाहीं. उलट शिष्याचें फार मोठेंहि संकट स्वतःच निवारण करितो. ४ मी एक अकर्ता आत्मयोगी आहें, अशा अभिमानानें विषयांचा भोग घेत नाहीं. किंवा विषयाचा निःशेष त्याग करावा असाहि त्याचा आग्रह नसतो. ५ तो आसक्तीनें विषयभोगहि घेत नाहीं व स्वतः त्याचा त्यागहि करीत नाहीं. तर प्रारब्धाच्या अनुसार जें प्राप्त होईल तें देहाकडून करवून परब्रह्मचिंतनांत निमग्न असतो. ६ देह पालखींत बसला किंवा विष्ठेंत पडला तरी त्या दोहोंचेंहि सुखदुःख त्याच्यापुढें 'मी ' म्हणून कधींच उभें रहात नाहीं. ७ देहांत असूनहि त्याचा अहंकार नाहीं व गृहासक्ति नाहीं. उलट तो व्यवहारांत लौकिक स्थितीला अनुसरून लोकाप्रमाणें सुखानें वागतो. ८ त्याची पत्नी त्याला हा माझा पति असें म्हणते. पुत्र हा माझा पिता असें म्हणतो, शिष्य हा आपला गुरु असें म्हणतात. पण तो तत्त्वतः त्या सर्वांहून अलिप्त राहून, त्यांच्यांत असतो ९ व अशा आपल्या पूर्ण प्रतीतीनें ईश्वराची भक्ति करून दाखवितो आणि सर्व भूतांमध्यें हरीचें भजन करावें असाच शिष्यांना उपदेश करितो. ३१० सद्गुरूचीं हीं स्वाभाविक लक्षणें पंडितांना पांडित्याच्या अभिमानामुळें कळत नाहींत. जे पूर्णानुभवी असतात तेच ही सद्गुरूची खूण ओळखितात. इतरांचें

पांगुळे तेथ ॥ ११ ॥ त्याचे गुरुत्वाची वोळखण । अंगीं निजशांति पूर्ण । हेंचि सद्गुरुत्वाचें लक्षण । मुख्य भूषण हेंचि राया ॥ १२ ॥ जगीं शांति जाली परदेशी । कोठेंही ठावो न मिळे तिशीं । ते आली सद्गुरुपायांपाशीं । सुखवासासी वसावया ॥ १३ ॥ यापरी सद्गुरूपाशीं शांती । स्वयें आली सुखवासवस्ती । जेवीं कां माहेराआंतौती । स्वानंदें क्रीडती कन्या जैशी ॥ १४ ॥ जाणोनि वेदशास्त्र निश्चितीं । जो न मिरवी गा व्युत्पत्ती । ज्यासी अपरोक्ष पूर्ण शांती । तो सद्गुरुमूर्ति निश्चयें राया ॥ १५ ॥ ह्मणीं श्रोते कोपती येथ । ह्मणतील ग्रंथ वाढविला व्यर्थ । 'निष्णात' या पदाचा अर्थ । काढितां तेथ स्फुरलें हो ॥ १६ ॥ हे माझे गांठींची नव्हे युक्ती । सदगुरु आपण आपुली स्थिती । बोलवीतसे ग्रंथार्थी । पदपदार्थी साधूनी ॥१७॥ तरी सद्गुरूचीं लक्षणें । न वर्णवती अगाधपणें । वेद वेडावले मुकेपणें । तेथें माझें बोलणें सरे केवीं ॥ १८ ॥ येथ आश्चर्य कैसें देखा । श्रीभागवत देशभाखा । परमार्थु साधिला नेटका । तुष्टला निजसखा जनार्दनस्वामी ॥ १९ ॥ एका जनार्दना शरण । त्याची जैं होय कृपा परिपूर्ण । त्या देहीं असतां देहबंधन । नातळे जाण गुरुभक्तां ॥ ३२० ॥ ज्याचे सेवितां निजचरण । देहीं न बाधी देहबंधन । त्यासी जाहलिया अनन्य शरण । दे अगाध कोण हें न कळे ॥ २१ ॥ न करितां सद्गुरुभक्ती । कदा नव्हे परमार्थप्राप्ती । यालागीं सद्गुरुभक्ती । बोलिली ग्रंथीं शिष्यहितार्थ ॥ २२ ॥ यालागीं पूर्ण सद्गुरूपाशीं । अनन्य शरण होतां त्यासी । तो सद्भावें निववी शिष्यासी । निजबोधेंसी यथार्थ ॥ २३ ॥ सद्गुरुस्थितीचें निरूपण । राया सांगितलें संपूर्ण । आतां शिष्याचें लक्षण । सावधान अवधारीं ॥ २४ ॥

ज्ञान त्याच्या ठिकाणीं कुंठित होतें. ११ पूर्ण शांति, हीच त्याच्या गुरुत्वाची खूण आहे. तेंच सद्गुरुत्वाचें मुख्य लक्षण व मुख्य भूषण आहे. १२ या जगांत शांतीला कोठेंच अवकाश मिळेनासा झाल्यामुळें ती बिचारी निराधार होऊन सद्गुरूंच्या पायापाशीं सुखानें रहावयास आली. १३ आणि कन्या माहेरीं आल्यावर जशी स्वानंदानें रममाण होते, त्याप्रमाणें सद्गुरूपाशीं आलेली शांति तेथें सुखानें रहाते. १४ वेदशास्त्रांचें निश्चित ज्ञान असूनहि जो आपलें पांडित्य मिरवीत नाहीं आणि पूर्ण शांतीचा साक्षात् अनुभव घेतो, तोच सद्गुरु होय, असें तूं निश्चयानें जाण. १५ सद्गुरूचें हें सविस्तर वर्णन ऐकून श्रोते कदाचित् रागावतील आणि म्हणतील कीं, 'हा ग्रंथ तुम्हीं व्यर्थ वाढविलांत.' पण मी तरी काय करूं ! श्लोकांतील 'निष्णात' या पदाचा अर्थ सांगत असतांना मला हें वर्णन सहज स्फुरलें. १६ पण ही युक्ति माझ्या पदरची नव्हे. सद्गुरु आपणच आपली स्थिति माझ्याकडून शब्द व शब्दार्थ साधवून ग्रंथार्थ रूपानें बोलवीत आहे. १७ तथापि सद्गुरूचीं लक्षणें अगाध आहेत; त्यामुळें मला त्यांचे यथार्थ वर्णन करवत नाहीं. अहो, वेद सुद्धां जेथें वेडावले व स्तब्ध बसले तेथें माझें बोलणें कसें पुरें पडणार ! १८ पण यांत एक मोठें आश्चर्य कसें आहे तें पहा ! श्रीमद्भागवतांतील परमार्थ या देशभाषेनें चांगला साधला व त्यामुळें निजसखा जनार्दनस्वामी संतुष्ट झाला. १९ हा एकनाथ जनार्दनस्वामींनाच शरण आहे. त्याची ज्यावर पूर्ण कृपा होते, तो देहामध्यें असला तरी त्याला देहबंधन स्पर्श करीत नाहीं. गुरुभक्तांना देहबंध प्राप्त होत नाहीं, हें तूं निश्चयानें जाण. ३२० त्याच्या चरणाचें सेवन केलें असतां देहांत असूनहि देहबंधन प्राप्त होत नाहीं. त्यालाच अनन्य शरण झाल्यावर अगाध ज्ञानाचा ठेवा कोण कसा देतो हें कळत नाहीं. २१ सद्गुरूची भक्ति केल्यावांचून परमार्थप्राप्ति केव्हांहि होत नाहीं. म्हणून शिष्याच्या हितासाठीं या ग्रंथांत गुरुभक्ति सांगितली. २२ गुरूला अनन्य शरण झालें असतां तो यथार्थ आत्मबोधानें व सद्भावनेनें शिष्याला सुखी करितो. २३ राजा, मीं सद्गुरुस्थितीचें पूर्णपणें निरूपण केलें, आतां तूं सावधान मनानें शिष्याचें लक्षण ऐक. ३२४.

तत्र भागवतान्धर्मान् शिक्षेद्गुर्वात्मदैवतः अमाययाऽनुवृत्त्या यैस्तुष्येदात्मात्मदो हरिः ॥ २२ ॥

वरीवरी दिसती सात्विक । भीतरीं विकल्पी शिष्य एक । एक केवळ दांभिक । एक ज्ञानठक अतिधूर्त ॥२५॥ एक ते केवळ प्रतिष्ठाकाम । एकासी पूज्यतेचा संभ्रम । एकासी जाणिवेचा आक्रम । एकाचे पोटीं भ्रम महासिद्धींचा ॥ २६ ॥ एक वाग्वादी वाजट । एक अतिशयेंसीं कर्मठ । एक केवळ कर्मनष्ट । आम्ही ब्रह्मनिष्ठ अभिमानें ॥२७॥ एका आवडे वायुधारण । एका आसनजयाभिमान । एकाचें संशयी मन । विश्वास पूर्ण दृढ नाहीं ॥ २८ ॥ एक आदरें उपदेशु घेती । मग होय नव्हे विकल्प चित्तीं । ऐशा अनेक शिष्यपंक्ती । ते जाण निश्चितीं मायिक ॥२९॥ आतां जे कां अमायिक । शोधितसत्वाचें सात्विक । मुख्य परमार्था साधक । जे अवंचक सर्वस्वें ॥ ३३० ॥ जे गुरुचरणाचे अंकिले । जे गुरुवाक्या जीवें विकले । सद्गुरूलागीं वहिलें । सर्वस्व आपुलें वोवाळिती ॥ ३१ ॥ जो सद्गुरूच्या बोलावरी । जीविताची कुरवंडी करी । जो गुरुआज्ञेबाहेरी । तिळभरी हों न शके ॥ ३२ ॥ सद्गुरूतें मनुष्यबुद्धी । पाहोंचि नेणे जो त्रिशुद्धी । सेवेलागीं निरवधी । हर्षानंदीं तत्पर ॥ ३३ ॥ निजभावार्थें सादर । सेवेलागीं अतितत्पर । शरीर आठही प्रहर । अणुमात्र वंचीना ॥ ३४ ॥ उंच अथवा नीच काम । म्हणों नेणे मनोधर्म । गौण करोनि नित्यकर्म । मानी उत्तमोत्तम गुरुसेवा ॥ ३५ ॥ सेवेलागीं निष्कपट । नित्य निजभावें चोखट । जंव जंव सेवा पडे सदट । तंव तंव उद्भट उल्हासु ॥ ३६ ॥ सच्छिष्य असच्छिष्य समुदावो । सद्गुरूसी सारिखेचि पहा हो । ज्याचे हृदयीं

तत्र गुर्वात्मदैवतः—गुरूला शरण आल्यावर गुरु हाच ज्याचा आत्मा व दैवत आहे अशा शिष्यानें, अमायया अनुवृत्त्या–निष्कपट सेवेनें, भागवतान् धर्मान्—भागवत धर्म, शिक्षेत्—शिकावे. यैः—ज्या धर्मांनीं, आत्मा आत्मदः हरिः तुष्येत्—वस्तुतः आत्मा व उपासकांना आत्मस्वरूप देणारा हरि संतुष्ट होईल. [ज्या भागवत धर्मांनीं वस्तुतः सर्व भूतांचा आत्मा पण बलिप्रभृतीप्रमाणें उपासकांना आत्मभाव देणारा हरि संतृप्त होईल, ते भागवतधर्म गुरु हाच ज्याचा आत्मा व दैवत आहे, अशा शिष्यानें निष्कपट सेवेनें गुरूपासून शिकावे.] २२.

कांहीं शिष्य वरून मात्र सात्त्विक दिसतात, पण आंतून मोठे विकल्पी व दांभिक असतात. कोणी ठकवून ज्ञान संपादन करणारे अतिधूर्त असतात. २५ कित्येकांना केवळ प्रतिष्ठेची हौस असते. कित्येकांना पूज्यतेची हांव असते. कोणाला ज्ञातृत्वाचा अभिमान असतो. कोणाला आपण महासिद्धि मिळवाव्या असें वाटतें. २६ कोणी नुस्ते वावदूक असतात. कोणी अतिशय कर्मठ असतात. तर कोणी 'आम्ही ब्रह्मनिष्ठ आहों' या अभिमामानें कर्मभ्रष्ट झालेले असतात. २७ कोणाला प्राणायामाची आवड असते. कित्येकांना आसनजयाचा अभिमान असतो. कित्येकांचें मन संशयी असतें. पूर्ण विश्वास कोठेंच नसतो. २८ कित्येक मोठ्या आदरानें गुरूपदेश घेतात, पण या उपदेशानें आपलें परमार्थिक कल्याण होईल किंवा नाहीं असा विकल्प त्यांच्या मनांत असतोच. शिष्याचे असे अनेक प्रकार आहेत, पण ते सर्व ढोंगी आहेत, असें तूं समज. २९ आतां जे निष्कपट, शुद्ध सत्त्वगुणसंपन्न, मुख्य परमार्थाचे साधक, सर्वथा अवंचक, गुरुचरणाचे अंकित झालेले, ३३० गुरुवाक्याला मनानें विकून घेतलेले व आपलें सर्वस्व सद्गुरूवरून सत्वर ओवाळून टाकणारे, ३१ जो सद्गुरूच्या शब्दावर आपल्या जीविताची कुरवंडी करितो, गुरूच्या आज्ञेबाहेर तीळभरही जाऊं शकत नाहीं, ३२ सद्गुरूला मनुष्यबुद्धीनें पहाणें ज्याला ठाऊकहि नाहीं आणि जो गुरुसेवेसाठीं सत्य सत्य, निरतिशय हर्षानें तत्पर असतो ३३ व आठहि प्रहर ती करण्यांत एक अणुमात्रहि अंतर करीत नाहीं, ३४ हें काम माझ्या योग्यतेचें आहे व हें काम योग्यतेचें नाहीं, असें ज्याच्या मनाला वाटत नाहीं, आपलें नित्यकर्महि गौण मानून जो गुरुसेवेला उत्तमोत्तम समजतो, ३५ मोठ्या श्रद्धेनें सेवा करण्यासाठीं गुरुसंनिध रहातो आणि कष्टतर सेवा करण्याचा जसा जसा प्रसंग येतो, तसा तसा त्याचा उल्हास वाढत जातो. ३६ सद्गुरूला अशाप्रकारचे सच्छिष्य व पूर्वीं सांगितल्याप्रकारचे कपटी असच्छिष्य हे दोन्हीं

जैसा भावो । तैसा पहा हो फळभोग ॥ ३७ ॥ ' भावेषु विद्यते देवो ' । हा उपदेशी मुख्य निर्वाहो । आपुला आपणयां भावो । फळभोग पहा हो भोगवी ॥ ३८ ॥ चुकवावया मृत्यूचा ठावो । जाणिवे आणितां निजभावो । हिरण्यकशिपु नाडला पहा हो । संधी साधोनि देवो निर्दळी त्यासी ॥ ३९ ॥ तेथेंचि प्रल्हादाचा भावो । मज रक्षिता देवाधिवो । त्यासी साक्षेपें मारितां रावो । मरणाचि वावो भावार्थे केलें ॥ ३४० ॥ परमार्थी जें जाणपण । ते जाणावी नागवण । यालागीं सद्भावें जो संपूर्ण । तो जन्ममरणछेदकू ॥ ४१ ॥ मी शिष्यपरीक्षकु ज्ञाता । हे सद्गुरूसी नाहीं अहंता । तेथें जैशी त्याची भावार्थता । तैशा तैशा अर्था तो पावे ॥ ४२ ॥ हें असो सच्छिष्याचा सद्भावो । राया अभिनव कैसा पहाहो । गुरु ब्रह्म ऐक्यभावो । निजनिर्वाहो निष्टंक ॥ ४३ ॥ माझ्या इंद्रियवृत्ती चाळिता । सद्गुरु निजात्मा मजआंतौता । बाह्य सेवेलागीं सर्वथा । ब्रह्ममूर्ती तत्वतां सद्गुरु मानी ॥ ४४ ॥ सद्गुरुचरणीं आपण । चित्तवित्तजीवितेंसीं पूर्ण । करूनि घाली आत्मार्पण । सर्वस्वें संपूर्ण सर्वभावें ॥ ४५ ॥ तेथें संतुष्टला स्वामी पूर्ण । तोही सर्वस्वेंसीं भुलोन । आवडी निजांगें आपण । सेवकाआधीन स्वामी होय ॥ ४६ ॥ आत्मार्पण करितां बळी । द्वारीं द्वारपाळ जाला वनमाळी । ऐसी भजनभावाची नवाळी सेवकाजवळीं स्वामी तिष्ठे ॥ ४७ ॥ एवढी ये अगाध प्रीती । उत्तम भक्त स्वयें पावती । भाळ्याभोळ्यां हेचि स्थिती । कैशा रीतीं आतुडे ॥ ४८ ॥ याचिलागीं सद्गुरूपाशीं । शरण रिघावें सर्वस्वेंशीं । तो संतोषोनियां शिष्यासी । भजनधर्माशीं उपदेशी ॥ ४९ ॥ जेणें भजनें भगवंत । भजोनि जाले उत्तम भक्त । ते भागवतधर्म समस्त । शिकावे निश्चित सद्भावेंसीं ॥ ३५० ॥ मुख्य भागवतधर्मस्थिती । अवश्य करावी सत्संगती । हेंचि सद्गुरु उपदेशिती । असत्संगतीत्यागार्थ ॥ ५१ ॥

सारखेंच. पण ज्याचा जसा भाव असतो, तसा त्याला फलाचा लाभ होतो. ३७ ' भावेषु विद्यते देवः ' जेथें भाव तेथें देव, हाच न्याय उपदेशालाहि लागू आहे. प्रत्येकाला त्याच्या त्याच्या भावनेप्रमाणें फल मिळत असतें. ३८ हिरण्यकश्यपूनें मृत्यु टाळण्यासाठीं आपल्या भावनेप्रमाणें यत्न केला, पण तो बिचारा फसला. देवानें संधि साधून त्याचा घात केला. ३९ पण त्याच्या उलट ' माझें रक्षण करणारा देवाधिदेव आहे ' असा प्रल्हादाचा भाव होता, त्यामुळें त्याच्या पित्यानें त्याला मारण्यासाठीं वाटेल तितके जरी प्रयत्न केले, तरी त्याच्या भावनेनें ते सर्व फुकट गेले. ४० परमार्थांत ज्ञानीत्वाचा अभिमान ही शुद्ध नागवण आहे. जो पूर्ण सद्भावानें युक्त असतो, तोच जन्ममरणाचा उच्छेद करितो. ४१ मी मोठा ज्ञाता, शिष्याची परीक्षा करणारा आहें, ही अहंता सद्गुरूला नसते. त्यामुळें त्या शिष्याचा जसा भाव असतो तसें त्याला फळ मिळतें. ४२ सच्छिष्याचा सद्भाव कसा अपूर्व असतो, तो पहा. गुरु आणि ब्रह्म यांचा ऐक्यभाव हाच त्याचा निश्चित निर्वाह असतो. ४३ माझ्या इंद्रियवृत्तींना प्रेरणा करणारा माझा आत्मा सद्गुरु माझ्या हृदयांत आहे आणि बाह्य सेवेसाठीं तत्त्वतः हा ब्रह्ममूर्ति सद्गुरु आहे, असें तो मानितो ४४ तो पूर्ण भावनेनें चित्त, वित्त व जीवित हें एकरूप करून सद्गुरुचरणीं घालितो व सर्वस्वानें आत्मार्पण करितो. ४५ त्यामुळें पूर्ण संतुष्ट झालेला स्वामी प्रेमाला सर्वथा भुळून आपण स्वांगानें सेवकाधीन होतो. ४६ बलीनें आत्मसमर्पण केलें असतां स्वतः वनमाळीहि त्याच्या द्वारांतील द्वारपाल झाला. भजनभावाची अपूर्वता ही आहे कीं, स्वामी सेवकाजवळ रहातो. ४७ जे उत्तम भक्त असतात, ते स्वतःच अशा अगाध प्रीतीला पात्र होतात. पण भाळ्याभोळ्या लोकांना ही स्थिति कशी प्राप्त होते ! ४८ त्यांनींहि सद्गुरूला सर्वभावानें शरण जावें, म्हणजे तोहि संतुष्ट होऊन शिष्याला उपदेश करितो. ४९ ज्या भजनानें भगवंताचें भजन करून उत्तम भक्त झाले, ते सर्व निश्चित भागवतधर्म सद्भावानें शिकावें. ३५० सत्संगति अवश्य करावी. कारण ती मुख्य भागवतधर्मस्थिति आहे आणि सद्गुरुहि असत्संगतीच्या त्यागासाठीं शिष्याला हेंच शिकवितात. ३५१.

सर्वतो मनसोऽसङ्गमादौ सङ्गं च साधुषु । दयां मैत्रीं प्रश्रयं च भूतेष्वद्धा यथोचितम् ॥ २३ ॥

सर्वांपासोनि निःसंग । जरी मनीं होणें आहे चांग । तैं अवश्य धरावा सत्संग । असत्संग त्यागावा ॥ ५२ ॥ मुख्य असत्संग देहसंगती । त्याची समूळ करावी निवृत्ती । जगीं दाटुगी सत्संगती । जाण निश्चितीं नृपनाथा ॥ ५३ ॥ जेथें दया मैत्री प्रश्रयो पूर्ण । मुख्यत्वें हें त्रिविध लक्षण । अवश्य करावें आपण । सत्संग प्रमाण स्वहितासी ॥ ५४ ॥ सांडोनियां थोरपण । साधूसी लीन होआवें संपूर्ण । सांडोनियां देहाभिमान । त्यासी लोटांगण घालावें ॥ ५५ ॥ साधूपरता पूज्य पहाहो । जगीं नाहीं आन देवो । संतपूजनें देवाधिदेवो । स्वयमेवो संतुष्टे ॥ ५६ ॥ संतपदींचे रजःकण । शिरीं वंदावे श्रद्धेनें पूर्ण । संतांपुढें जाणपण । सर्वथा आपण न मिरवावें ॥ ५७ ॥ देखोनि संतसमुदावो । अनन्यगती भगवद्भावो । भगवद्भावें नम्र स्वभावो । प्रश्रयो पहा हो या नांव ॥ ५८ ॥ नम्रता सेवितां संतचरण । जेथें भूतदया वाढे पूर्ण । हें दयेचें निजलक्षण । सावधान अवधारीं ॥ ५९ ॥ भूतांसी कठिणपण । देखतांचि निघों पाहे प्राण । मा स्वयें करील आपण । हें सर्वथा जाण स्वप्नीं न घडे ॥ ३६० ॥ जेणें आपणासी होय दुःख । तें भूतांसी करीना निःशेख । जेणें आपणासी होय सुख । तें आवश्यक करी दीनां ॥ ६१ ॥ सर्व भूतीं दया समान । कदा न बोले कठिणपण । भूतांची पीडा निवारण । करोनि आपण सुखोपाय चिंती ॥ ६२ ॥ जीवमात्रीं दुरुक्ती बोलतां । जिव्हेच्या घेवों पाहे जीविता । भूतीं दुष्टपण चाळितां । समूळ निजचित्ता निर्दाळूं पाहे ॥ ६३ ॥ भूतांसी जेथ पीडा पावे । त्यातळीं जीव घालूं धांवे । जीवापरीस भूतें सर्वें । दयागौरवें पाळियेतीं ॥ ६४ ॥

सर्वतः मनसः असंगं—सर्व विषयांविषयीं मनाची अनासक्ति, च—आणि, आदौ साधुषु संगं—त्याच्याहि आधीं साधूंच्या ठिकाणीं प्रीति, भूतेषु—प्राण्यांमध्यें, यथोचितं—उचित, अद्धा दयां मैत्रीं प्रश्रयं—दया मैत्री व विनय हे धर्म साक्षात् शिकावे. [अनासक्ति, साधुसंग, व हीन प्राण्यांवर दया, समानशीलांशीं मैत्री व श्रेष्ठांशीं विनय हे गुण साक्षात् शिकावे.] २३.

मनानें सर्व विषयांपासून विरक्त व्हावें, अशी जर इच्छा असेल तर अगोदर सत्संग अवश्य धरावा व असत्संग सोडावा. ५२ देहसंगति हाच मुख्य असत्संग आहे. त्याची समूळ निवृत्ति करावी. जगामध्यें सत्संगति प्रबल आहे, असें हे राजा, तूं निश्चयानें जाण. ५३ जेथें पूर्ण दया, मैत्री व विनय हें त्रिविध लक्षण मुख्यत्वेंकरून असतें, त्याचाच सत्संग करावा. कारण तोच स्वहिताला कारण होतो. ५४ आपलें थोरपण सोडून साधूपुढें पूर्णपणें लीन व्हावें. देहाभिमान सोडून त्यांना लोटांगण घालावें. ५५ या जगांत साधूहून निराळा पूज्य देव नाहीं. संतांच्या पूजनानें देवाधिदेव स्वतःच संतुष्ट होतो. ५६ संतचरणाचे रजःकण मोठ्या श्रद्धेनें मस्तकावर धारण करावे. संतांपुढें आपलें ज्ञान सर्वथा मिरवूं नये. ५७ संतांचा समुदाय पाहून त्यांमध्यें अनन्यभावानें भगवद्भाव ठेवावा, कारण भगवद्भावानें नम्र होण्याचें जें शील त्यालाच विनय म्हणतात. ५८ नम्रपणानें संतचरणांची सेवा केली असतां भूतदया पूर्णपणें वाढते. हे राजा, आतां तूं दयेचें लक्षण सावधान चित्तानें ऐक. ५९ भूतांशीं कोणी निष्ठुरपणानीं वागत आहे, असें पहातांच याचे प्राण कासावीस होतात. मग हा स्वतः त्यांच्याशीं निष्ठुरपणानें वागेल, हें त्याच्याकडून स्वप्नींहि घडत नाहीं. ३६० ज्याच्या योगानें स्वतःला दुःख होतें, तसलें वर्तन तो भूतांशीं कधींच करीत नाहीं. ज्याप्रकारच्या वर्तनानें त्याला स्वतःला सुख होतें, तसेंच वर्तन तो दीनाशीं करितो. ६१ त्याची सर्व प्राण्यांवर सारखीच दया असते. तो कोणालाहि कधीं कठिण शब्द बोलत नाहीं. भूतांच्या पीडेचें निवारण करणें हाच आपल्या सुखाचा उपाय आहे, असें तो समजतो. ६२ एखाद्या सामान्य जीवाला उद्देशून तोंडांतून कठिण शब्द निघाल्यास तो त्या जिव्हेचा जीव घेऊं पहातो. एखाद्या प्राण्याविषयीं दुष्ट संकल्प मनांत आल्यास आपल्या चित्ताचा समूळ नाश करण्यास तयार होतो. ६३ प्राण्यांना जेथें पीडा होत असेल तेथें आपला जीव घालवावयास धांवतो. दयेमुळें त्याला सर्व भूतें आपल्या जीवापेक्षांहि अधिक वाटतात. ६४ असल्या कारुण्यालाच

ऐसें जें कारुण्य पूर्ण । त्या नांव दया संपूर्ण । आतां मैत्रीचें लक्षण । असाधारण तें ऐका ॥ ६५ ॥ सर्व भूतांचे ठायीं । सुहृदांवांचोनि दुजें नाहीं । तरी न करितांचि मैत्री पाहीं । ठायींचे ठायीं अलोलिक ॥ ६६ ॥ जो विषययोगें न विटे । नाना विकल्पीं न उठे । आलिया परम संकटें । मैत्री नेटेंपाटें सदा ग्राह्य ॥ ६७ ॥ या नांव गा मित्रभावो । प्राण गेलिया न तुटे पहा हो । देखतां कल्पांतकाळघावो । निजमित्रसमुदावो एकवटे कीं ॥ ३८ ॥ ऐसी आचरतां निजस्थिती । श्रद्धा उपजे सर्वां भूतीं । त्या श्रद्धेची व्युत्पत्ती । यथानिगुतीं सांगेन ॥ ६९ ॥ नवल श्रद्धेचें लक्षण । ब्रह्मा मुंगी समसमान । तरी यथोचितविधान । सर्वथा जाण चुकेना ॥ ३७० ॥ अर्घ्यपाद्यादि पूजन । सकळ दान आणि सन्मान । हे श्रद्धा ब्राह्मणीं संपूर्ण । एकासी तें जाण अन्नमात्रची ॥७१॥ एका अन्न आच्छादन । एकासी ते कोरडे कण । एका तृण आणि जीवन । एका पयपान यथोचित ॥ ७२ ॥ जेणें ज्यासी सुख संपूर्ण । तें तें करी उचित श्रद्धें जाण । अनुचित श्रद्धेचें विंदाण । दुःखकारी अपूर्ण सर्वार्थीं ॥७३॥ जेवीं ब्राम्हणा वाढिलें तृण । गाईस वाढिलें मिष्टान्न । श्वानासी बैसणें सिंहासन । साधूसी आसन थारोळा ॥ ७४ ॥ व्याघ्रासी पडिल्या लंघन । त्यासी अर्पूं नये गोदान । गाय गादल्या संपूर्ण । तैलाभ्यंजन करूं नये ॥ ७५ ॥ हो कां देहइंद्रियें जरी एकें । तरी जिव्हाकर्म नव्हे नाकें । तेवीं एक भूतात्मा भूतवेखें । उचितोन्मुखें यजावा ॥ ७६ ॥ करितां यथोचित अर्पण । जरी क्रिया दिसे भिन्न भिन्न । तरी अंतरश्रद्धा अभिन्न । हें मुख्य लक्षण भागवतधर्मीं ॥ ७७ ॥ भूतीं भूतात्मा अभिन्नस्थिती । दया मैत्री साधूंची भक्ती । हेच आतुडे कैशा रीतीं । प्रबुद्ध तदर्थीं उपाव सांगे ॥ ७८॥ तेचि नव श्लोकीं श्लोकोक्ती । समूळ भागवतधर्मस्थिती । प्रबुद्ध सांगे रायाप्रती । साधकां निजप्राप्ती साधावया ॥ ७९ ॥

दया हें योग्य नांव आहे. आतां मैत्रीचें लक्षण सांगतों, तें लक्ष देऊन ऐक. ६५ सर्व भूतांमध्यें जो सुहृदभाव ठेवितो, म्ह० त्याला आपल्या सुहृदावांचून दुसरें कांहीं दिसतच नाहीं व अशी मैत्री न ठेवितां जो भूतांमध्यें भेदभाव ठेवितो तो भगवद्भक्तच नव्हे. ६६ जो विषयसंबंधाचा कंटाळा करीत नाहीं, ज्याच्या मनांत अनेक विकल्प उठत नाहींत, अनेक संकटें जरी आलीं, तरी जो मैत्रीपासून ढळत नाहीं, ६७ यालाच साधूचा मित्रभाव म्हणतात. प्राण जरी गेला व कल्पान्त कालाचा घाला येत आहे असें दिसलें, तरी त्याचा मित्रभाव तुटत नाहीं. उलट तशा प्रसंगींहि त्याचा मित्रसमुदाय एकरूप होतो. ६८ अशा आत्मस्थितीचें आचरण करीत असतां सर्व भूतांविषयीं श्रद्धा उत्पन्न होते. श्रद्धेचीहि मी आतां उपपत्ति सांगतो. ६९ श्रद्धेचें लक्षण आश्चर्यकारक आहे. तिच्या योगानें मुंगी व ब्रह्मदेव समान असतात, तथापि प्रत्येक प्राण्याशीं त्याच्या त्याच्या योग्यतेप्रमाणें आचरण करणें सर्वथा चुकत नाहीं. ३७० अर्घ्य-पाद्यादिकांनीं पूजन, सर्वस्वदान आणि सन्मान हीं पूर्ण श्रध्दा ब्राह्मणांमध्येंच उचित आहे; पण कित्येकांना नुस्तें अन्न देणेंच उचित आहे. ७१ दुसऱ्या कित्येकांना अन्न व आच्छादान उचित. कांहींना धान्याचे कोरडे कण, कोणाला तृण व जळ व कांहींना नुस्तें जलपान उचित आहे. ७२ ज्यानें ज्याला पूर्णसुख होईल, तें तेंच श्रद्धेनें करणें उचित होय. अनुचित श्रध्देचें लक्षण दुःखकर व सर्वांशीं अपूर्ण आहे. ७३ जसें ब्राह्मणापुढें गवत वाढणें व गायीपुढें मिष्टान्न ठेवणें, कुत्र्याला सिंहासनावर बसविणें आणि साधूला थारोळ्यावर बसण्यास सांगणें हें श्रद्धेचें अनुचित लक्षण आहे. ७४ वाघ उपाशी आहे म्हणून त्याला गोदान करतां येत नाहीं. गायीला जरी त्रास झाला तरी तिला तेल लावून अभ्यंगस्नान घालतां येत नाहीं. ७५ देह व इंद्रियें हीं जरी एक असलीं तरी जिव्हेचें काम नाकानीं होत नाहीं, त्याच न्यायानें एकाच भूतात्म्याचें भूतवेषाला उचित असेंच यजन करावें. ७६ याप्रमाणें यथोचित अर्पण करीत असतां क्रिया जरी भिन्नभिन्न दिसली, तरी आंतील श्रद्धा अभिन्न असणें हें भागवत धर्मीचें मुख्य लक्षण आहे. ७७ भूतांमध्यें भूतात्मा एकरूपानें स्थित आहे. दया आणि मैत्री ही साधूची भक्ति आहे. तीच कोणत्या उपायानें साध्य होते ७८ तें प्रबुद्ध महर्षि पुढील नऊ श्लोकांनीं राजाला सांगेल. साधकांना आत्मप्राप्ति होण्यास हीच मुख्य भागवतस्थिति आहे. ३७९.

शौचं तपस्तितिक्षां च मौनं स्वाध्यायमार्जवम् । ब्रह्मचर्यमहिंसां च समत्वं द्वन्द्वसंज्ञयोः ॥ २४ ॥

मुख्य साधावया परमार्थां । अवश्य पाहिजे गा शुचिता । शुचित्वावांचोनि तत्वता । न लभे हाता निजस्वार्थु ॥ ३८० ॥ यालागीं गा नृपनाथा । शुद्ध शौचाची आइक कथा । आंतर मल न क्षाळितां । न लभे हाता बाह्यशुद्धी ॥ ८१ ॥ मन मळिण वासनामळें । तें न करितां सोंवळें । बाह्य पवित्रता अहंबळें । तें जाण आंधळें न्याहाळी जैसें ॥ ८२ ॥ मन माळिण वासनामळें । तें प्रक्षाळूनि सोनिविळें । करावें गा भावबळें । गुरुवाक्यमेळें निजनिष्ठा ॥ ८३ ॥ सोनें जेवीं पुटीं पडे । मळ तुटे वानी चढे । तेवीं गुरुसेवा जडत्व मोडे । चित्तशुद्धी जोडे निर्दुष्ट ॥ ८४ ॥ आरशासी सहाणीं तोडिजे । तेणें स्वमुखा शुद्धत्व जोडिजे । तेवीं चित्तशुद्धी उघडिजे । सहजीं सहजें निजशुद्धी ॥ ८५ ॥ लोहें परीसु झांकिजे । तंव लोहत्वा मुकिजे । तेवीं अंतरशुद्धीनें कीजे । महा निर्बुजे स्थूळबुद्धी ॥ ८६ ॥ सूर्यासन्मुख सूर्यकांत । जालिया शुद्धत्वें होय दीप्त । ते प्रभा बाह्य प्रकाशत । अग्निहोत्रार्थ महायागा ॥ ८७ ॥ तेवीं गुरुवाक्यें अंतरशुद्धता । सबाह्य आली शुचिता । हे न करिती जे पवित्रता । ते जाण तत्वतां अतिभंडिमा ॥ ८८ ॥ अल्प जळ शौचाप्रती । तेणें हात करकटले ठाती । शेवटीं गिरबडे बृहती । तेवीं विकल्पीं होती अपवित्र ॥ ८९ ॥ भरलें काळकूट जीवीं । वरी टवटव अतिबरवी । तें इंद्रावण कोणही न सेवी । अंतरस्वभावीं अतिमळिण ॥ ३९० ॥ तीर्थीं धुतला रजकराजु । तो काय

शौचं–आंतर-बाह्य शुद्धि, तपः–स्वधर्माचरण, तितिक्षां–क्षमा, मौनं–वायफळ बडबड न करणें, स्वाध्यायं–यथाधिकार वेद-शास्त्रादिपठण, आर्जवं–अंतःकरणाचा सरळपणा, ब्रह्मचर्यं–इंद्रियनिग्रह, अहिंसा–कोणत्याहि प्राण्याला देहानें किंवा शब्दानेंहि पीडा न देणें, च– आणि, द्वंद्वसंज्ञयोः समत्वं– सुख दुःखादिकांविषयीं हर्षविषाद नसणें. [मृत्तिका व जल यांनीं बाह्य देहाची शुद्धि आणि अदंभ, अमान इत्यादि आभ्यंतर शुद्धि शिकावी. स्वधर्माचरण, क्षमा, व्यर्थ शब्द न उच्चारणें, अधिकारानुसार वेदपाठादिक, सरळपणा, गृहस्थांचें गौण आणि यति व ब्रह्मचारी यांचें मुख्य ब्रह्मचर्य, प्राणिमात्राचा अद्रोह, शीतोष्णसुख-दुःखादि द्वंद्वप्राप्ति झाली असतां हर्ष व विशाद यांचा अभाव इत्यादि धर्म शिकावे.] २४.

मुख्य परमार्थ साधण्यासाठीं शुचिर्भूतपणा अवश्य पाहिजे. शुद्धीवांचून निजहित केव्हांहि हातीं लागणार नाहीं. ३८० यासाठीं हे राजा, शुद्ध शौच्याची कथा ऐक. अंतःकरणाची मलिनता घालविल्यावांचून बाह्य देहाची शुद्धि प्राप्त होत नाहीं. ८१ वासनारूपी मळानें मलिन झालेलें मन स्वच्छ न करितां बाह्य पवित्रतेचा मात्र नुस्ता अहंकार धरणें, हें आंधळ्यानें पहाण्यासारखेंच आहे. ८२ यास्तव आपली भावना व गुरुवाक्यावरील निष्ठा यांनीं मनाचा वासनामळ धुवून त्याला स्वच्छ करावें. ८३ सोन्याला मुशींत टाकिलें, म्हणजे त्यावरील मळ निघून जातो व त्याचा कस वाढतो, त्याप्रमाणें गुरुसेवेनें जडत्व निघून जातें व चित्त शुद्ध होतें. ८४ आरशाला घांसून स्वच्छ केलें असतां त्यांत आपल्या मुखाचें शुद्ध प्रतिबिंब दिसतें, त्याचप्रमाणें चित्तशुद्धि झाली असतां आत्मशुद्धि अनायासानें होते. ८५ लोखंडानें परिसाला जों झांकावें, तों त्यानें आपल्या लोखंडपणालाच मुकावें, त्याप्रमाणें चित्तशुद्धीनें स्थूलबुद्धीला पळावयास लावावें. ८६ सूर्यकांत मणि सूर्याच्या समोर धरल्यास तो आपल्या शुद्धपणानें प्रदीप्त होतो. त्याची प्रभा काष्ठादि बाह्य पदार्थांत प्रकट होते, आणि तोच अग्नि महायागांच्या उपयोगी पडतो, ८७ त्याच न्यायानें गुरुवाक्यानें अंतःशुद्धि होऊन शरीराला सबाह्य शुचित्व येतें. पण जे ही पवित्रता संपादन करीत नाहींत, ते खरोखर मोठे दांभिक होत. ८८ शुद्धीसाठीं थोडेंसेंच जल घेतल्यास हातालाहि घाण रहाते व शरीरहि निर्मल होत नाहीं, त्याचप्रमाणें विकल्पानें मन अपवित्र होतें. ८९ मनांत काळकूट विष भरलें आहे व वरून वटवट मात्र फार चांगली चालली आहे, पण तें तसलें कवंडळ कोणीहि स्वीकारीत नाहीं. कारण त्या वटवट करणाराचें अंतःकरण स्वभावतःच मलिन असतें. ३९० परटाच्या नायकाला पवित्र तीर्थांत चांगलें धुतलें तरी तो काय पवित्र ब्राह्मण

होईल शुद्ध द्विजु । नटें घेतला राजध्वजू । तो नव्हे पूज्यु बाह्यक्रियावशें ।। ९१ ।। सुंदरी सुकुमार साजिरी । बोठीं कुष्ठता तिळभरी । जालिया तीतें कोणी न वरी । वरीवरी बरी दिसतांही ।। ९२ ।। नागवीमाथां मोत्यांची जाळी । शिंबरी सुपाणीदाणा ल्याली । तेवीं बाह्य पवित्रता दाविली । ते ते केली निजभंडिमा ।। ९३ ।। दहें माखला वायसू । तो काय होईल राजहंसू । दहीं म्हणोनि मथितां कापुसू । तृप्ती नव्हे उपहासू जगीं प्रगटे ।। ९४ ।। तेवीं अंतरीं विकल्पु असतां । बाह्य जे जे पवित्रता । ते ते क्रिया नृपनाथा । जाण तत्वतां अतिभंडिमा ।।९५।। अंतर क्षाळिलें गुरुप्रतीतीं । बाह्य क्षाळिलें शास्त्रयुक्तीं । ऐसें शुचित्व निजनिश्चितीं । अद्वैतस्थिती तेथें नांदे ।।९६।। अंतरीं शुचित्व पूर्ण वसे । तें बाह्यकर्मीं स्वयें प्रकाशे । तें शुचित्वचि अनायासें । परमार्थदशे प्रकाशी ।। ९७ ।। ईश्वरभावाचें निजवर्म । त्याचे पोटीं रिघल्या सप्रेम । त्याचें कर्मचि होय ब्रह्म । त्या देहभ्रम बाधीना ।। ९८ ।। या नाम शुचिष्मता । सत्य जाण गा नृपनाथा । तपाचीही स्थिती आतां । ऐक तत्वतां सांगेन ।। ९९ ।। शरीरशोषणा नांव तप । तें प्रारब्धें भोगानुरूप । हृदयीं वाहणें कृष्णस्वरूप । तो शुद्ध साक्षेप तपाचा ।। ४०० ।। जेवीं धुरसूनि दिठी । सैरा रणामाजीं उठी । तेवीं ईश्वर धरोनि पोटीं । वर्ते तो सृष्टीं तपिया शुद्ध ।। १ ।। हेंचि तपाचें निजस्वरूप । याचि नांव शुद्ध तप । यावरतें न चले रूप । व्यर्थ वाग्जल्प कां करावे ।। २ ।। द्वंद्वसहिष्णुता मुमुक्षां । या नांव म्हणिजे तितिक्षा । तेही आणावया लक्षा । नृपाध्यक्षा अवधारीं ।। ३ ।। सुखदुःख उभय भोग । दोंमाजीं अखंड आपुलें अंग । जेवीं चीत्रींची वाघीण बाघ । दोहींमाजीं साङ्ग निजत्वें भिंती ।। ४ ।। जेवीं दावाग्नीचे उल्हाळें । आकाश जैसें न पोळे । असोनि त्यांचेनि मेळें । त्यांवेगळें

होणार आहे ! नटानें राजाची चिन्हें धारण केलीं तरी तो बाह्य उपचारांनीं खरा राजा कधींच होत नाहीं. ९१ एखादी कन्या अति सुंदर, कोमल व गोमटी आहे पण तिच्या ओंठावर तिळाएवढें जरी कोड असलें, तरी ती वरून सुंदर असूनहि तिला कोणी वरीत नाहीं. ९२ एखाद्या नग्न स्त्रीनें डोक्यावर मोत्याची जाळी घालावी किंवा नकटीनें नाकांत पाणीदार मोत्यांची नथ घालावी, त्याप्रमाणें एखाद्या ढोंग्यानें बाह्य पवित्रता कितीहि जरी दाखविली तरी ती व्यर्थच होय. ९३ कावळ्याला दह्याचा लेप दिला तरी तो काय राजहंस होईल ! कापसाला दहीं म्हणून किती जरी घुसळलें तरी त्यापासून लोणी निघत नाहीं, उलट जगांत उपहासच होतो. ९४ त्याच न्यायानें मनांत विकल्प असतांना बाहेरून पवित्रतेचा आव कितीहि जरी आणिला, तरी खरोखर तें ढोंग आहे असें तूं समज.९५ गुरुवाक्याच्या प्रतीतीनें ज्यानें आपलें अंतःकरण शुद्ध केलेलें असतें व शास्त्रोक्त स्नानादि उपायांनीं बाह्य शरीर शुद्ध केलेलें असतें, म्हणजे असें दोन प्रकारचें शुचित्व जेथें निश्चित असतें तेथेंच अद्वैतस्थिति नांदते. ९६ अंतःकरणांत पूर्णपणें राहणारें शुचित्व बाह्यकर्मांमध्यें आपोआप प्रकट होतें आणि असलें शुचित्वच परमार्थदशेला अनायासानें व्यक्त करितें. ९७ ईश्वरभावाचें हें मुख्य वर्म प्रेमासह मनांत भिनल्यास त्याचें कर्मच ब्रह्म होतें. नंतर त्याला देहभ्रम बाधत नाहीं. ९८ हे राजा, अशा शुद्धीलाच खरें शौच म्हणतात. आतां मी तुला तपाची स्थिति सांगतों, ती ऐक. ९९ व्रतादि उपायांनीं शरीराला कृश करणें याला तप असें म्हणतात, पण तें प्रारब्धानेंच प्राप्त होतें, वस्तुतः हृदयामध्यें श्रीकृष्णस्वरूपाचें सतत ध्यान करणें हें शुद्ध तपाचें लक्षण आहे. ४०० समरांगणांत उडालेल्या धुळीनें दृष्टि मलिन झाली असतां एखादा शूर योद्धा कांहीं एक विचार न करितां जसा पराक्रम गाजवीत सुटतो, त्याप्रमाणें ईश्वराला मनांत धरून जो या सृष्टींत प्राप्त व्यवहार करितो तो शुद्ध तपस्वी होय. १ तपाचें मुख्य स्वरूप हेंच आहे. यालाच शुद्धतप असें नांव आहे. या पलीकडे त्याचें वर्णन करितां येत नाहीं. व्यर्थ वटवट करण्यांत काय अर्थ आहे. २ मुमुक्षूंनीं शीतोष्णादि द्वंद्वांना सहन करणें यालाच तितिक्षा हें नांव आहे. तिचेंहि स्वरूप कळावें, म्हणून आतां मी सांगतों तें तूं ऐक. ३ सुख व दुःख असे दोन भोग आहेत. ज्याप्रमाणें भिंतीवरील चित्रांतील वाघीण आणि वाघ या दोहोंमध्यें भिंत स्वरूपानें सारखीच असते, त्याप्रमाणें आपलें शरीर त्या दोन्ही भोगप्रसंगीं अखंड एकरूप असतें. ४ दावाग्नीच्या प्रचंड ज्वालांनीं आकाश पोळत नाहीं. त्यांच्याशी त्याचा संसर्ग झालेला असूनहि

अलिप्त ॥५॥ शीतळ जळ का हींव पडे । पृथ्वी निजक्षमा न कांकुडे । तेवीं निजस्वरूपसुरवाडें । द्वंद्वा नातुडे निजसाधू ॥ ६ ॥ शरीर जरी हिंवें कांपे । तेणें देह कांपे साधू न कांपे । शरीर अतिउष्णें तापे । परी साधू न तापे देहतापामाजीं ॥ ७ ॥ सुखें देखोनि दिठी । ज्या गोडिया घाली मिठी । दुःखही त्याचि आवडीं घोंटी । द्वंद्वसहिष्णुता मोटी या नांव राया ॥ ८ ॥ गोफणगुंडा सन्मुख । लागतां अवश्य उठे दुःख । तोच सुवर्णाचा जाहलिया देख । दुःख लोपोनि सुख अनिवार वाढे ॥ ९ ॥ सुखदुःखप्रकाशक । निजवस्तु असे एक । त्या एकात्मता देख । द्वंद्वें साधक सुखें साधिती ॥ ४१० ॥ तेवीं द्वंद्वाचें जाणपण । जाणवीत असे जें ज्ञान । तें जाणितल्या आपण । द्वंद्वें संपूर्ण निर्द्वंद्वें होतीं ॥ ११ ॥ रसउसीं कठिणपण । त्यामाजीं गोडी अखंड पूर्ण । तेवीं द्वंद्वामाजीं वस्तु चिद्घन । अखंडदंडायमान स्वयें देखे ॥ १२ ॥ ऐशी हे अखंडता । जंव न ये साधकाचे हातां । तंव द्वंद्वाची सहनता । नव्हे नृपनाथा निश्चयेंसीं ॥ १३ ॥ या नांव द्वंद्वसहन । निजनिश्चयें जाण पूर्ण । आतां मौनाचें लक्षण । सावधान अवधारीं ॥१४॥ वाग्वादु करावा जनीं । तैं दृढ व्हावें देहाभिमानीं । सांडविला तो सद्गुरूंनीं । निःशेष धोउनी शब्देंसीं ॥ १५ ॥ सद्गुरुवचन पडतां कानीं । स्तुति निंदा गिळोनि दोन्हीं । बोल बोलणें निरसुनी । हृदयभुवनीं परिपक्कले ॥ १६ ॥ जेव्हां ज्याचे बोलावे अवगुण । तेथें तेथें दिसे आपण । यालागीं बोलतां पैशुन्य । पडे मौन गुरुवाक्यें ॥ १७ ॥ गुण देखोनियां स्तवन । करितां पडे दृढ मौन । मीचि स्तव्य स्तविता स्तवन । मज म्यां वानितां पूर्ण मूर्खत्व माझें ॥१८॥ निजात्मा निःशेष नसे । ऐसा रिता ठाव न दिसे । तेथें जें जें कांहीं दिसे । तें आत्मप्रकाशें सदोदित ॥ १९ ॥ ऐसी सद्गुरूंनीं दाखविली युक्ती । ती विश्वासें स्थिरावली चित्तीं । यालागीं निंदा आणि स्तुती । वाचेप्रती

तें स्वरूपानें त्याहून भिन्न व अलिप्तच असतें. ५ पृथ्वीवर शीतल जल पडो कीं बर्फ पडो, पृथ्वी आपल्या स्वाभाविक क्षमेमुळें कधीं कांकडत नाहीं, त्याचप्रमाणें साधु आपल्या स्वरूपानुभवानें द्वंद्वांनीं व्याकुळ होत नाहीं. ६ शरीर हिंवानें जरी कांपत असलें तरी विद्वान् साधु कांपत नाहीं. त्याचें शरीर कांपतें. शरीर तापानें जरी अतिशय तप्त झालें, तरी साधु त्या देहतापानें संतप्त होत नाहीं. ७ हे राजा, तो जितक्या आवडीनें सुखांत आसक्त होतो, तितक्याच आवडीनें तो दुःखाचाहि अनुभव घेतो. यालाच द्वंद्वसहिष्णुता हें नांव आहे. ८ गोफणींतून मारलेला दगड अंगाला लागला असतां दुःख अवश्य होतें. पण तोच जर सोन्याचा असला तर तो लागल्यामुळें झालेलें दुःख लोपून जातें व अनिवार सुख होतें. ९ सुख व दुःख यांची निजवस्तु एक आहे. त्यामुळें साधक द्वंद्वांना एकात्मतेनें पहातात व त्यामुळें त्यांपासून सुख साधितात. ४१० जें ज्ञान द्वंद्वांचा अनुभव घेतें त्याला जाणलें असतां द्वंद्वें पूर्णपणें निर्द्वंद्व होतात. ११ रसानें भरलेल्या ऊसांत कठिणपणा असतो, पण त्यामध्यें गोडी अखंड असते. त्याचप्रमाणें द्वंद्वांमध्यें अखंड एकरूप चिद्घन वस्तु हा स्वतः पहातो. १२ अशी ही अखंडता साधकाच्या हाताला जोंवर लागत नाहीं तोंवर द्वंद्वाची सहनशीलता निश्चयानें साध्य होत नाहीं. १३ म्ह० तोंवर द्वंद्वें सहन करण्याचें सामर्थ्य येत नाहीं. यालाच द्वंद्वसहन-तितिक्षा म्हणतात. आतां मौनाचें लक्षण सावधान चित्तानें ऐक. १४ लोकांमध्यें वादविवाद करावयास लागावें तों देहाभिमान दृढ होतो. पण सद्गुरु आपल्या शब्दांनीं तो वादविवाद निःशेष धुवून टाकितात. १५ सद्गुरुवचन कानीं पडतांच स्तुति व निंदा या दोहोंनाहि गिळून वागिंद्रियानें बोलणें सोडून दिलें व तें हृदयकमलांत एकरूप होऊन राहिलें. १६ एखादे वेळीं एखाद्याचे अवगुण बोलूं लागावें, तर त्याच्या जागीं त्याला स्वतःचीच प्रतीति येते. त्यामुळें आपोआपच बोलणें बंद पडून गुरुवाक्यानें वाणीला मौन पडतें. १७ एकाद्याचें गुण पाहून स्तुति करावयास जों प्रवृत्त व्हावें तों वाणीला दृढ मौन पडतें. कारण मीच स्तुतींतील स्तव्य, स्तविता व स्तवन आहें. त्यामुळें मीच माझी स्तुति केल्यास माझ्या पदरीं पूर्ण मूर्खत्व येईल. १८ जेथें निजात्मा सर्वथा नाहीं, असा रिता ठावच कोठें दिसत नाहीं. त्यामुळें तेथें जें जें कांहीं दिसतें, तें तें सर्व आत्मप्रकाशानेंच सदा प्रकाशित झालेलें असतें. १९ सद्गुरूंनीं अशी युक्ति दाखविली व ती चित्तांत विश्वासानें स्थिर झाली, त्यामुळें वाणी, निंदा व स्तुति यांतील कांहींच करूं शकत नाहीं. ४२० आपल्या हितासाठीं संवाद

बोलेना ॥ ४२० ॥ संवाद करावा निजस्वार्थी । तंव सद्गुरूच्या वचनोक्ती । खुंटल्या वेदशास्त्रांच्या युक्ती । त्यावरी स्थिती चढेना ॥२१॥ एवं स्तुति निंदा वाग्वाद । करितां खुंटला संवाद । महामौनें अतिशुद्ध । परमानंद साधकां ॥ २२ ॥ ऐसें साधावया दृढ मौन । सद्गुरु शिकवी वेदाध्ययन । उपनिषदर्थ विवंचून । पढवी संपूर्ण अर्थावबोधें ॥२३॥ अथवा अतिशयें दृढ मौन । श्रीरामकृष्णनामस्मरण । अखंड नामें गर्जतां पूर्ण । वेदार्थ जाण तिष्ठती पुढें ॥ २४ ॥ नित्य रामनाम गर्जे वाणी । त्या तीर्थे येती लोटांगणीं । सुरवर लागती चरणीं । यम पायवणी स्वयें वंदी ॥ २५ ॥ रामनामाचें जें स्मरण । या नांव गा महामौन । वेदें नाम स्तविलें पूर्ण । शुद्ध अध्ययन हरिनाम ॥ २६ ॥ वेद अथवा नामस्मरण । या नांव गा स्वाध्यायो जाण । आतां आर्जवाचें लक्षण । ऐकें संपूर्ण महाराजा ॥ २७ ॥ आतां आर्जव तें ऐसें । सर्वां जीवां जीवन जैसें । कां तंतू जैसा निजविलासें । अविरोधें असे पटामाजीं ॥ २८ ॥ साखरेचें इंद्रावण । केलिया न वचे गोडपण । तैसें विषमांही जीवां जाण । आर्जवें पूर्ण रंजवी स्वभावें ॥ २९ ॥ वक्र चंद्राची चंद्रिका । परी अमृत वक्र नव्हे देखा । तैसें देखोनि विषमां लोकां । मनोवृत्ती देखा पालटेना ॥ ४३० ॥ निपराद न देखे कोणासी । जिवलग सोयरा सर्वांशीं । वोळखी जीवमात्रांशी । जैसी तैसी जुनाट ॥ ३१ ॥ यापरी जयासी आप्त सर्वदा सर्व । ऐसा जो कां निजस्वभाव । तया नांव गा आर्जव । अतिअपूर्व गुरुदीक्षा ॥ ३२ ॥ असुर सुर नर ऋषीश्वर । मदनें केले निजकिंकर । कंदर्पाचा मार थोर । अतिदुर्धर अनंत ॥ ३३ ॥ अंतरीं कामाचें दृढ ठाणें । वरीवरी दांत चाऊनि साहणें । त्याचें मनचि निष्काम न म्हणे । चालवणें लौकिकु ॥ ३४ ॥ तैशी नव्हे सद्गुरूची युक्ती । कामाची पालटे कामनावृत्ती । अभंग ब्रह्मचर्यस्थिती । शिष्यांप्रती उप-

---

करावा तर सद्गुरूंच्या वचनसामर्थ्यानें वेदशास्त्रांच्या युक्ति कुंठल्या आणि त्यामुळें संवादाचीहि प्रवृत्ति थांबली. २१ स्तुति, निंदा, वाद, संवाद इत्यादि सर्व वाग्व्यापार कुंठित झालें असतां त्या अतिशुद्ध महामौनानें साधकाला परमानंद होतो. २२ अशा प्रकारचें दृढ मौन साधण्यासाठीं सद्गुरु वेदाध्ययन करावयास शिकवितो. उपनिषदांच्या ब्रह्मसिद्धांताचें विवेचन करून अर्थज्ञानासह त्यांचे पाठ सांगतो, २३ किंवा श्रीराम व कृष्ण यांचें नामस्मरण हेंच अति दृढ मौन होय, कारण अखंड नामगर्जना केल्यानें वेदार्थ जणुं काय पुढें उभे रहातात. २४ ज्याची वाणी रामनामाची सतत गर्जना करिते, त्याच्यापुढें तीर्थें लोटांगणें घालीत येतात. देव त्याच्या पायां पडतात आणि यम त्याच्या पायाच्या तीर्थाला वंदन करितो. २५ रामनामाचें जें स्मरण त्यालाच महामौन असें नांव आहे. वेदानें त्या नामाची स्तुति केली आहे, म्हणून हरिनाम हें शुद्ध अध्ययन आहे. २६ वेद किंवा नामस्मरण याला स्वाध्याय हें नांव आहे. आतां आर्जवाचें लक्षण ऐक. २७ सर्व जीवांना जसें जीवन किंवा पटामध्यें जसा तंतु आपल्या विलासानें अविरोधानें रहातो, तसेंच हें आर्जव आहे. २८ साखरेचें कवंडळ केल्यास त्याची गोडी नाहींशी होत नाहीं म्ह० तें कडु होत नाहीं, त्याचप्रमाणें दुष्ट, क्रूर, इत्यादि विषम जीवांनाहि हा साधक स्वभावतःच आर्जवानें पूर्णपणें रंजवितो. २९ चंद्राची कोर वांकडी असते, पण त्यांतील अमृत कांहीं वांकडें नसतें, त्याच न्यायानें विषम लोकांना पाहून याची मनोवृत्ति पालटत नाहीं. ४३० तो कोणालाहि आपल्याहून कमी योग्यतेचा पहात नाहीं. सर्वांशीं जिवलग सोयऱ्याप्रमाणें वागतो. एखाद्याची जशी फार जुनी ओळख असावी, त्याप्रमाणें सर्व जीवांशीं ओळख असल्याप्रमाणेंच तो वागतो. ३१ याप्रमाणें त्याला सर्व जीव सर्वदा आप्त भासतात व तसा त्याचा स्वभावच बनलेला असतो. त्याच्या या स्वभावाला आर्जव असें नांव आहे. गुरुदीक्षा अशी अपूर्व आहे. ३२ मदनानें दानव, देव, मनुष्य, ऋषि या सर्वांना आपले दास केले. कामदेवाचा मारा अति दुर्धर असून ३३ मनामध्यें कामाचें दृढ ठाणें बसलें आहे. पण हा उसनें अवसान आणून वरवर निष्कामतेचा आव आणितो व लौकिक चालवितो. ३४ तथापि त्याचें मनच निष्कामता कबूल करीत नाहीं. सद्गुरूची युक्ति तशी नाहीं. तिच्या योगानें साधकाची कामनावृत्ति पालटते. गुरु शिष्याला

देशी ॥ ३५ ॥ कंदर्पराणिवे स्त्रीपुरुष । तेथें गुरुदीक्षा अलोलिक । मिथ्या स्त्रीपुरुष मायिक । विषयसुख भ्रम मात्र ॥ ३६ ॥ आनंदाचें उपस्थ एकायतन । हें काय मिथ्या वचन । ते अर्थी पूर्ण वेदज्ञ । वेद-विवंचना दाविती ऐशी ॥ ३७ ॥ पुसतां साखरेची गोडी कैशी । तो स्वादु नये सांगावयासी । तेथें चाखों देती अणुमात्रेंशीं । तेचि गोडपणराशी जाणती जाण ॥ ३८ ॥ तेवीं परमानंदसुखप्राप्ती । उपस्थद्वारा नर चाखिती । आनंद एकायतनस्थिती । बोलिल्या उपस्थीं या हेतु वेदें ॥ ३९ ॥ त्या उपस्थसुखाची नित्यस्थिती । संभोगेंवीण जे वाढविती । तेथ मिथ्या स्त्रीपुरुषव्यक्ती । सहजें होती सज्ञान ॥ ४४० ॥ चाखिली गोडी तेचि साखर । परमानंद मैथुन मात्र । मानूनियां मैथुनपर । जाहले पामर विषयांध ॥ ४१ ॥ उपस्थीं परमानंदगोडी । यालागीं स्त्रीकामाची अतिवोढी । सदा सोसिजे महामूढीं । ताडातोडी जीविताच्या ॥ ४२ ॥ साखरेचें केलें नारियेळ । तेथ त्वचा गर्भ साखरची केवळ । तेवीं विषयद्वारा सुखकल्लोळ । उठती सकळ परमानंदें ॥ ४३ ॥ नाना पक्वान्नपरवडी । गुळाच्या गोड्यां ते चवी गाढी । तेवीं विषयाची जे जे आवडी । ते ते गोडी निजानंदें ॥४४॥ हे नेणोनि मुळींची निजगोडी । सोशिती विषयांच्या अतिवोढी । बाप सद्गुरुकृपा गाढी । विषयांची आवडी एकत्वा आणि ॥ ४५ ॥ यालागीं विषयांची आस्था । न चढे सच्छिष्याचे माथां । स्त्रीभोगाची आसक्तता । मिथ्या तत्वतां गुरुवाक्यनिष्ठा ॥ ४६ ॥ हा आत्मा हे आत्मी पाहीं । ऐसें मिथुन मुळीं नाहीं । तें निजमूळ पाडितां ठायीं । ब्रह्मचर्य पाहीं अभंग ॥ ४७ ॥ या नांव गा निजनैष्ठिक्य । ब्रम्हचर्य अतिसुटंक । सद्गुरुंनीं बोधिलें निष्टंक । अलोलिक अभंग ॥ ४८ ॥ आतां अहिंसेची स्थिती ।

अखंड ब्रह्मचर्यवृत्तीचा उपदेश करितो. ३५ स्त्री व पुरुष हें कामदेवाचें राज्य आहे; पण गुरुदीक्षा अद्भुत आहे. ती स्त्री व पुरुष हीं दोन्ही मिथ्या आहेत व विषयसुख हा मायिक भ्रम आहे, असा प्रत्यय आणून देते. ३६ उपनिषदांत 'सर्व आनंदाचें उपस्थेंद्रिय हें एकायतन आहे.' असें सांगितलें आहे. तें खोटें आहे कीं काय! वेदाचा अर्थ जाणणारे वेदवेत्ते या अर्थाचें असें विवेचन करून दाखवितात. ३७ साखरेची गोडी कशी आहे, असें कोणाला विचारल्यास ती शब्दानें सांगतां येत नाहीं, पण साखरेचा लहानसा कणहि तोंडांत घातल्यास तिची रुचि खाणाराच्या लक्षांत आपोआप येते. ३८ त्याच न्यायानें पुरुष उपस्थेंद्रियाच्या द्वारां आनंदाचा अनुभव घेतात, म्हणून वेदानें उपस्थ हा आनंदाचा एक आधार आहे, असें म्हटलें आहे. ३९ जे संभोगावांचून विषयजन्य सुखाची नित्य स्थिति वाढवितात त्यांना त्या सुखाचा केवल भ्रम झालेला असतो. कारण स्त्री व पुरुष या व्यक्ति मिथ्या आहेत. ४४० साखर खाल्ल्यावांचून तिची गोडी जशी कळत नाहीं, त्याप्रमाणें विषयजन्य आनंद प्रत्यक्ष संभोगावांचून अनुभवास येत नाहीं. यास्तव संभोग हेंच आनंदाच्या ज्ञानाचें प्रधान कारण आहे. तथापि विषयांध पामर संभोगालाच परम आनंद मानून त्यांत आसक्त होतात. ४१ यांतच परमानंद आहे असें मानून त्यांची विषयासक्ति अतिशय वाढते व मूढलोक जीवाची आटापिट करून त्यासाठीं अनेक क्लेश सोशितात. ४२ साखरेचा नारळ केल्यास त्यांतील करवंटी, खोबरें वगैरे सर्वच भाग जशी केवल साखरच असते, त्याप्रमाणें विषयांच्या द्वारां उत्पन्न होणारे सर्व सुखतरंग केवल परमानंदरूप आहेत. ४३ अनेक पक्वानें जरी केलीं, तरी त्यांतील गोडी एका गुळा-मुळेंच जशी असते, त्याप्रमाणें विषयांपासून होणारें सर्व सुख एका निजानंदामुळें आहे. ४४ ही मूळची निजगोडी न जाणल्यानें पामर लोक विषयासक्तीमुळें क्लेश भोगितात. पण सद्गुरूंची कृपा अति प्रबळ आहे. ती विषयप्रीतीला एकरूप करिते, ४५ त्यामुळें सच्छिष्यामध्यें विषयाची आसक्ति नसते. गुरुवाक्यावरील निष्ठेमुळें विषयासक्ति मिथ्या आहे हें त्याला तत्त्वतः कळतें. ४६ हा आत्मा व ही आत्मी जसें जोडपें मुळांत नाहीं. तर सर्वत्र एक आत्माच आहे हें मूळतत्त्व प्रत्ययाला आलें, म्हणजे मग ब्रह्मचर्य अखंड रहातें. ४७ यालाच अखंड नैष्ठिक ब्रह्मचर्य म्हणतात. सद्गुरूंनीं त्याचा निश्चित बोध केला असतां तें दृढ व अभंग रहातें. ४८ आतां हे राजा; अहिंसेची स्थिति एक. स्वप्न,

ऐकें राया चक्रवर्ती । भंवई उचलणें नाहीं भूतीं । स्वप्न सुषुप्ती जागतां ॥ ४९ ॥ पावो आदळतां देख । म्हणीं पृथ्वी पावेल दुःख । या काकुलती आवश्यक । पाउलें अलोलिक हळुवार ठेवी ॥ ४५० ॥ आकाश दचकेल देख । यालागीं नेदी सैरा हाक । वाचा परिपक्वपीयूख । वचनें परम सुख सर्वांसी देतु ॥५१॥ त्याचा शब्दु जैं गगनीं भरे । तेणें शब्दानंदचमत्कारें । गगनचि निजसुखें सुभरे । येणें सुखोद्गारें बचनोक्ती ॥५२॥ जळामाजीं घालितां उडी । म्हणीं उदक दडपे बुडीं । तरंगन्यायें देणें बुडी । जीवनाची दुथडी न हेलावतां ॥ ५३ ॥ त्यासी जळीं होतां निमग्न । जळाचा तापु शमे संपूर्ण । यापरी करी स्नान । जीवना जीवनु निववितु ॥ ५४ ॥ म्हणीं दुःख पावेल वारा । म्हणोनि श्वासु न घाली सैरा । नेमुनी प्राणसंचारा । निजशरीरा वागवी ॥ ५५ ॥ निजदेहा करावया घातु । सर्वथा जेवीं नुचले हातु । तेवीं भूतांवरी निघातु । ज्याच्या पोटांतु उपजेना ॥ ५६ ॥ अत्यंत न्याहारें पाहतां । बचकु पडेल प्राण्यांच्या चित्ता । यालागीं बाह्यदृष्टीं क्रूरता । न पाहे भूतां भूतभावें ॥ ५७ ॥ रोम रगडतील संपूर्ण । यालागीं न करी अंगमर्दन । एवं स्वदेहाचें देहपण । भूतहिंसेभेणें अहंत्वा नाणी ॥ ५८ ॥ भूतां देतां दुःखलेशु । भूतीं दुखवेल भूतेशु । ऐसा ज्याचा दृढ विश्वासु । तेथ रहिवासु अहिंसेचा ॥ ५९ ॥ कायिक वाचिक मानसिक । भूतां उपजे त्रिविध दुःख । तें जेथें निमालें निःशेख । अहिंसा देख ते ठायीं ॥ ४६० ॥ या नांव गा शुद्ध अहिंसा । सत्य जाण नृपवरेशा । आतां द्वंद्वसाम्याची दशा । आइक क्षितीशा सांगेन ॥ ६१ ॥ सुखदुःख अदृष्टाधीन । तें अदृष्ट देहाचे माथां पूर्ण । ऐसें जाणोनि आपण । निर्द्वंद्व संपूर्ण सद्गुरुवाक्यें ॥ ६२ ॥ अदृष्टें देह सुखदुःख भोगी । मूर्ख तेथ रागी विरागी । शिष्यु

सुषुप्ति व जागृति या तिन्ही अवस्थांमध्यें जो कोणत्याहि प्राण्याकडे डोळे वटारून व कपाळाला आंठी घालून पहात नाहीं, ४९ आपण जोरानें पाऊल टाकल्यास पृथ्वीला दुःख होईल या काकुळतीनें अगदीं अवश्य तितकीं पावलें मोजकीं व हळू ठेवीत चालतो. ४५० कदाचित् आकाश दचकेल, म्हणून कधीं ओरडून बोलत नाहीं. तर आपल्या अमृतासारख्या वचनानें सर्वांना परम सुख देतो. ५१ याचा शब्द जेव्हां आकाशांत प्रवेश करितो, तेव्हां शब्दानंद चमत्कारानें आकाशालाहि सुखाचें भरतें येईल, अशा सुखावह शब्दांनीं तो भाषण करितो. ५२ पाण्यांत उंचावरून उडी टाकल्यास कदाचित् तें खालीं दडपेल, या भीतीनें तो तरंगाप्रमाणेंच प्रवाहाच्या दोन्ही थडी क्षुब्ध न होतील अशा बेतानें हळूच बुडी मारितो. ५३ जळांत निमग्न होतांच जळाचा ताप पूर्णपणें शांत होईल, अशा प्रकारें तो स्नान करितो. म्ह० आपल्या स्पर्शानें तो स्वभावतःच शितळ असलेल्या जळालाहि शितळ करितो. ५४ कदाचित् वाऱ्याला दुःख होईल म्हणून तो श्वासहि जपून सोडतो. श्वासोच्छ्वासाचें नियमन करून आपल्या शरीराला वागवितो. ५५ आपल्यालाच मारण्यासाठीं आपले हात जसे उचलत नाहींत, त्याप्रमाणें इतर प्राण्यांवर प्रहार करावा असें त्याच्या मनांतहि येत नाहीं. ५६ करडया नजरेनें पाहिल्यास प्राण्यांना भीति वाटेल, म्हणून क्रूर दृष्टीनें तो कधींच पहात नाहीं. ५७ अंगावरील रोम रगडले जातील म्हणून तो अंगमर्दन करीत नाहीं, याप्रमाणें स्वदेहाचें देहत्व भूतहिंसेच्या भीतीनें आपलेंसें मानीत नाहीं. ५८ भूतांना यत्किंचित्हि दुःख दिल्यास त्यांतील भूतात्मा दुःखी होईल, असा ज्याचा दृढ विश्वास असतो त्याच्याच ठिकाणीं अहिंसा वास करिते. ५९ भूतांना शरीर, वाणी आणि मन या तीन साधनांनीं तीन प्रकारचें दुःख होतें; पण ज्याच्या ठिकाणीं त्या तिहींचाहि निःशेष अभाव असतो, तेथेंच अहिंसा राहते. ४६० राजा, हीच शुद्ध अहिंसा आहे, असें तूं निश्चयानें जाण. आतां द्वंद्वसाम्याची स्थिति ऐक. ६१ सुख व दुःख हीं दोन्हीं अदृष्टाच्या अधीन आहेत आणि तें अदृष्ट देहाच्या डोक्यावर बसलें आहे, असें जाणून हा स्वतः सद्गुरुवाक्यानें पूर्णपणें निर्द्वंद्व होतो. ६२ अदृष्टामुळेंच देह सुख-दुःख भोगितो. पण अविवेकी त्यांतील सुखामध्यें आसक्त

लागों नेदी निजांगीं । गुरुवाक्यरंगीं रंगला ॥ ६३ ॥ देहींचेनि सुखें सुखावतां । सर्वांचि दुःख चढे माथां । हें गुरूनें जाणोनि तत्त्वतां । देहअहंता सांडविली ॥ ६४ ॥ निरभिमान्याच्या अंगीं । दुःख नुरेचि दुःखनियोगीं । सुख नुरेचि सुखसंभोगीं । तो उभयभागीं अलिप्त ॥६५॥ छाया उष्णामाजीं तापली । ते छाया छायेंचि निवाली । तेवीं सुखदुःखें मिथ्या जालीं । स्थिती सुखावली यथानुलाभें ॥६६॥ अदृष्टें देहीं वर्ततां देख । बाधूं न शके सुखासुख । हें गुरुगम्य आलोलिक । शिष्य विश्वासिक पावती ॥ ६७ ॥ विश्वासें-वीण सर्वथा । गुरुगम्य नये हाता । गुरुगम्येंवीण तत्वतां । द्वंद्वसमता कदा न घडे ॥ ६८ ॥ देहीं दृढता जंव मीपण । तंव तंव द्वंद्वबाधा दारुण । जे गुरुवाक्यें निरभिमान । त्यांसीं द्वंद्वें जाण अतिमिथ्या ॥ ६९ ॥ स्वप्नींचें दरिद्र समर्थता । जेवीं दोनीं समान जागृता । तेवीं द्वंद्वबाधेची वार्ता । न बाधे गुरुभक्तां अपरोक्षबोधें ॥ ४७० ॥ लेंकुरांच्या खेळापाशीं । पारणें तैशी एकादशी । द्वंद्वाची दशा तैशी । गुरुवाक्यासरिसी समूळ उडे ॥ ७१ ॥ जेवीं चंदनाचिया वृत्तीं । आरीबोरी चंदन होती । तेवीं गुरुवाक्यप्रतीती । सकळ द्वंद्वें येती निजसाम्या ॥ ७२ ॥ चंदनासभोंवतीं झाडें । तेंही रोकडीं लांकडें । देवद्विजांचे मस्तकीं चढे । भाग्य एवढें सत्संगीं ॥७३॥ सद्‌गुरु तोचि सत्संगती । सत्संगें शिष्य पालटती । स्वयें ब्रह्मरूप होती । तेव्हां द्वंद्वें येती निर्द्वंद्वा ॥ ७४ ॥ एवं गुरुवाक्यीं विश्वासतां । द्वंद्वसाम्य चढे हाता । तें गुरुवाक्यही तत्वतां । ऐक आतां सांगेन ॥ ७५ ॥

सर्वत्रात्मेश्वरान्वीक्षां कैवल्यमनिकेतताम् । विविक्तचीरवसनं संतोषो येनकेनचित् ॥ २५ ॥

होतो व दुःखाचा द्वेष करितो. पण गुरुवाक्याच्या रंगांत रंगलेला शिष्य त्या दोहोंचाहि आपल्याला लेप लागूं देत नाहीं. ६३ देहाच्या सुखानें हा सुखावला कीं लागलेंच त्याच्या डोक्यावर दुःख येऊन कोसळेल हें तत्त्वतः जाणून गुरूनें त्याचा देहाहंकार सोडविला. ६४ निरभिमानी पुरुषाला दुःखसंयोगानें दुःख होत नाहीं व सुखसंयोगानें सुख होत नाहीं. तो त्या दोहींपासून अलिप्त असतो. ६५ छाया उन्हामध्यें तापते व छायेनेंच थंड होते, त्याप्रमाणें सुख-दुःखें मिथ्या झालीं म्हणजे मग त्यांतील ज्याची प्राप्ति होईल त्यानें याला सुखच होतें. ६६ देह अदृष्टाप्रमाणें वागूं लागला असतां सुखदुःख पीडा देऊं शकत नाहींत, ही गुरुकृपेनेंच प्राप्त होणारी निश्चित युक्ति श्रद्धाळु शिष्यालाच प्राप्त होते. ६७ श्रद्धेवांचून गुरुगम्य तत्त्व हातीं लागत नाहीं आणि गुरुगम्य तत्त्व जाणल्यावांचून द्वंद्वाचें समत्व कदापि संभवत नाहीं. ६८ 'देहच मी' हा अभिमान जोंवर दृढ आहे, तोंवर सुख-दुःखादि द्वंद्वांची भयंकर पीडा होत असते. पण गुरुवाक्यानें जे निरभिमानी झाले, त्यांना हीं द्वंद्वें सर्वथा मिथ्या वाटतात. ६९ स्वप्नांतील दारिद्र्य आणि श्रीमंती हीं दोन्हीं जागृतींत जशीं एकसारखींच, त्याप्रमाणें अपरोक्षसाक्षात्कारामुळें द्वंद्वाच्या पीडेची वार्ता गुरुभक्तांच्या कधीं कानांवरहि येत नाहीं. ४७० मुलांच्या खेळांतील पारणें आणि एकादशी दोन्हीं जशीं सारखींच, तशीच द्वंद्वाची दशाहि गुरुवाक्याबरोबर समूळ नाहींशी होते. ७१ चंदनाच्या संगतींत असलेल्या बोरीबाभळीहि चंदन होतात म्ह० त्यांच्या लांकडाला चंदनाचा वास येऊं लागतो, त्याचप्रमाणें गुरुवाक्यप्रतीतीनें सर्व द्वंद्वें एकरूप होतात. ७२ चंदनाच्या सभोंवार असलेलीं झाडें गंधरहित शुद्ध लांकडें असतात; पण संगतीच्या बलानें तीं देव-ब्राह्मणांच्या मस्तकावर चढतात. सत्संगामध्यें एवढें सामर्थ्य आहे. ७३ जो सद्‌गुरु तीच सत्संगति, तिच्या योगानें शिष्य पालटतात, व स्वतः ब्रह्मरूप होतात. त्यानंतर द्वंद्वें निर्द्वंद्वअवस्थेस प्राप्त होतात. ७४ याप्रमाणें ज्या गुरुवाक्यावर विश्वास ठेविला असतां द्वंद्वसाम्य प्राप्त होतें तें गुरुवाक्यहि मी तुला आतां तत्त्वतः सांगतों. ४७५.

सर्वत्र–सर्व ठिकाणीं, आत्मेश्वरान्वीक्षां–सच्चिद्रूपानें आत्म्याला व नियंतृरूपानें ईश्वराला पहाणें, कैवल्यं–एकांतशीलता, अनिकेततां–गृहादिकांवरील अभिमानाचा अभाव, विविक्तचीरवसनं–ज्या ठिकाणीं लोकांची रहदारी नाहीं, अशा मार्गादिकां-मध्यें पडलेल्या वस्त्रांच्या तुकडयाचें किंवा शुद्ध वल्कलाचें परिधान व, संतोषः येनकेनचित्–जें कांहीं मिळेल त्यांत संतोष मानणें. २५.

सद्‌गुरुवचनविश्वासें । मानी सर्वत्र परमात्मा ऐसें । तेचि निजबुद्धी निश्चयवशें । निजमानसें विवंची ॥ ७६ ॥ मजमाजीं परमात्मा वसे । तेणें स्थूळदेहो वर्ततसे । त्याचेनि पूर्ण चित्प्रकाशें । जग भासे जगद्रूपें ॥ ७७ ॥ तेणें निजात्मप्रकाशें । माझे दृष्टीसी दृश्य दिसे । दृश्यद्रष्टृदर्शनविलासें । विलसतसे परमात्मा ॥ ७८ ॥ दृश्यद्रष्टृपणें जें जें उठी । तेथ निजात्मता पाठींपोटीं । तेणें अन्वयें देवो देखे दृष्टी । आहाळबाहाळ सृष्टि दुमदुमित ॥ ७९ ॥ तेव्हां जें जें देखे भूताकृती । तेथ परमात्मा ये प्रतीतीं । मी नियंता ईश्वर त्रिजगतीं । हेही स्फूर्ती स्फुरों लागे ॥ ४८० ॥ जग वर्ते माझिया सत्ता । मी कळिकाळाचा नियंता । मी उत्पत्तिस्थितिप्रलयकर्ता । हे मूळ अहंता स्वभावें स्फुरे ॥८१॥ येणें पूर्वान्वयें जंव पाहे । तंव सर्वां सर्व मीचि आहें । तें पाहातें पाहाणें पाहों ठाये । तेथें अहं जाये विरोनी ॥ ८२ ॥ तेथें परब्रह्मैक प्रसिद्ध । कोंदला ठाके सच्चिदानंद । ऐसा गुरुवाक्यें प्रबोध । शिष्य अतिशुद्ध पावती ॥८३॥ तेव्हां वैकुंठीं देवो आहे । हें बोलणें त्या आहाचि होये । क्षीरसागरीं देवो राहे । हें ऐकतांचि पाहें अनिवार हांसे ॥ ८४ ॥ देवावांचोनि तत्त्वतां । तिळभरी ठावो नाहीं रिता । त्यातें एकदेशी नेणितां । न मने वस्तुतां सच्छिष्यासी ॥ ८५ ॥ वैकुंठ आणि क्षीराब्धी । ज्याचेनि प्रकाशे ज्यामधीं । तो वैकुंठवासी अथवा क्षीराब्धीं । हे बोल सोपाधी शबलत्वाचे ॥ ८६ ॥ जेथ सर्वां सर्व परमात्मा । तेथ एकदेशी न सरे महिमा । तो पूर्णब्रह्म अनाश्रमा । वैकुंठादि आश्रमा वश नव्हे ॥ ८७ ॥ अखंडा आवाहन । अधिष्ठाना आसन । सर्वगता सिंहासन । कल्पिती स्थान निज-कल्पना ॥ ८८ ॥ तेही कल्पिती निजवृत्ती । जे ब्रम्हरूप नित्य पाहती । त्यांची परब्रह्मस्थिती । कदा

सद्‌गुरूवरील विश्वासानें सर्व ठिकाणीं परमात्मा आहे, असें मानितो आणि तीच आपली बुद्धि निश्चय-बलानें दृढ करून सर्वदा मनानें तिचेंच विवेचन करितो. ७६ माझ्यामध्यें परमात्मा आहे, त्यामुळेंच हा स्थूल देह सर्व व्यवहार करितो. त्याच्याच पूर्ण चित्प्रकाशानें हें जगत् जगदाकारानें भासतें. ७७ त्या निजात्मप्रकाशानें माझ्या दृष्टीला दृश्य दिसतें. याप्रमाणें एक परमात्माच दृश्य, द्रष्टा, दर्शन या आकारांनीं विकास पावतो. ७८ दृश्य व द्रष्टा या रूपानें जो जो परिणाम होतो तेथें त्याच्या जागोजाग अस्तित्व असतेंच. त्या चैतन्याच्या अनुवृत्तीनेंच हृदयस्थ देव आपल्या दृष्टीनें ही सर्व विविध प्रकारांनीं दुमदुमलेली सृष्टि पहातो. ७९ त्यामुळें भक्त जी जी भूताकृति पहातो, तिच्यामध्यें परमात्माच त्याच्या प्रतीतीस येतो. या त्रिभुवनांतील नियंता ईश्वर मीच आहें, अशीहि प्रतीति त्याला येऊं लागते. ४८० हें जगत् माझ्याच सत्तेनें सर्व व्यवहार करितें. मी कळीकाळाचा नियंता आहें. मी जगाची उत्पत्ति, स्थिति व प्रलय करणारा आहें. ही मूळ अहंता त्याच्यामध्यें स्वभावतःच स्फुरते. ८१ या पूर्वानुवृत्तीनें म्ह० मूळ चैतन्याच्या अनुवृत्तीनें भक्त जों पहातो तों सर्वांमध्यें 'मीच सर्व आहें' असें त्याला भासतें आणि मग दृश्य, दर्शन, द्रष्टा इत्यादि त्रिपुटी जागच्याजागीं थांबते व अहंभाव विरून जातो. ८२ त्या अवस्थेंत परब्रह्माचें ऐक्य पूर्णपणें सिद्ध होतें. सर्वत्र सत्-चित्-आनंद भरून रहातो. अति शुद्ध शिष्याला गुरुवाक्यानें असा साक्षात्कार होतो. ८३ त्यानंतर देव वैकुंठीं आहे, हें बोलणें व्यर्थ होतें. देव क्षीरसागरामध्यें रहातो. हें अज्ञाचें वाक्य ऐकतांच त्या ज्ञानी शिष्याला अनिवार्य हंसू कोसळतें. ८४ देवावांचून वस्तुतः एक तीळभरहि जागा रिकामी नाहीं, पण अज्ञ त्याला एकदेशी म्हणतो. त्यामुळें सच्छिष्याला तत्त्वतः त्याचें म्हणणें पटत नाहीं. ८५ अहो, वैकुंठ आणि क्षीरसागर ज्याच्या प्रकाशानें प्रकाश पावतात व ज्यामध्यें रहातात, तो परमात्मा वैकुंठांत किंवा क्षीरसागरांत रहातो, हें म्हणणें त्याला कसें पटावें ! कारण हे अशाप्रकारचे बोल सोपाधिक शबल ब्रह्मालाच म्ह० हिरण्यगर्भालाच साजतात. ८६ जेथें सर्वांमध्यें सर्व परमात्मा आहे तेथें हा असला एकदेशी महिमा पुरेसा होत नाहीं. कारण पूर्ण ब्रह्म आश्रमादि देशानें मर्यादित होत नाहीं. त्यामुळें तो वैकुंठादि आश्रमाला वश होत नाहीं. ८७ अखंड परमात्म्याचें पूजासमयीं आवाहन, सर्वगत ईश्वराला बसण्यासाठीं सिंहासनादि आसन, इत्यादिकांची कल्पना हा निव्वळ भ्रम आहे. ८८ तथापि कांहीं परिच्छिन्न दृष्टीचें लोक आपल्या समजुती-

कल्पांतीं भंगेना ॥ ८९ ॥ ऐशी परब्रह्मअवाप्ती । साधकीं पावावया निश्चितीं । नित्य बसावें एकांतीं । द्वैताची स्फूर्ती त्यागोनी ॥ ४९० ॥ साधितां परमार्थनिधान । साधकां अडवी वस्त्रअन्न । निर्मोली वल्कलें परिधान । कां त्यागिलीं अतिजीर्णं वस्त्रें घ्यावीं ॥ ९१ ॥ शाकफलमूलकंदभोजन । येणें करावें जठरतर्पण । सांडूनि परमार्थसाधन । जोडावया अन्नधन न वेंचावें कदा ॥ ९२ ॥ चौपालवी बांधोनि करीं । भीक मागावी दारोदारीं । परी अन्नआच्छादनावरी । आयुष्य तिळभरी न वेंचावें ॥ ९३ ॥ मेळवावया अन्नआच्छादन । न शिणती साधक सज्ञान । देह अदृष्टाधीन । तें सहजें जाण प्रतिपाळी ॥ ९४ ॥ स्वयें शिणता अहोराती । अदृष्टावेगळी अणुभरी प्राप्ती । कदा न चढे कोणाचे हातीं । हें साधक जाणती सज्ञान ॥ ९५ ॥ यालागीं अदृष्टें जें प्राप्त । तेणें निर्वाहें सदा निश्चित । साधक परमार्थ साधित । संतोषयुक्त गुरुवाक्यें ॥ ९६ ॥ देहअदृष्टपरवडी । होती सुखदुःखघडामोडी । साधकां संतोषु चढोवढी । गुरुवाक्यें गोडी दृढ लागली ॥ ९७ ॥ जैसें देहाचें प्राक्तन । तैसें होय अशनवसन । परी गुरुवाक्यसुख सांडून । देहावरी मन ममत्वें न ये ॥ ९८ ॥ याञ्चेविण यथाकाळें । यदृच्छया जें जें मिळे । तें तें सेवी सकळ मंगळें । गुरुवाक्यमेळें स्वानंदें ॥ ९९ ॥ शरीरनिर्वाहाविखीं । कोठें कांहीं नाभिलाखी । जें जें मिळे तेणेंचि सुखी । निजात्मतोखी संतुष्ट ॥५००॥ प्रारब्धें सुखदुःख भोगितां । संतोष साधकांच्या चित्ता । हें गुरुवाक्यें विश्वासतां । चढे हाता शिष्याच्या ॥ १ ॥ त्याच्या दृढ विश्वासाशीं । भागवतशास्त्र गुरूपाशीं । अभ्यासावें आदरेंशीं । दृढनिश्चयेंसीं प्रबोधक ॥ २ ॥

प्रमाणें त्यांचीहि कल्पना करितात. परंतु जे नित्यब्रह्मरूप पहातात, त्यांची परब्रह्मस्थिति कधीं कल्पांतींहि भंग पावत नाहीं. ८९ साधकाला अशी परब्रह्मप्राप्ति निश्चयानें व्हावी म्हणून त्यानें द्वैतदृष्टि सोडून नित्य एकांतात बसावें. ४९० परमार्थरूपी निधान साधण्यासाठीं यत्न करीत असतांना साधकाला अन्न-वस्त्र प्रतिबंध करितें. म्हणून त्यानें अरण्यांत फुकट मिळणारीं वल्कलें धारण करावीं किंवा लोकांनीं टाकून दिलेलीं फाटकींतुटकीं वस्त्रें नेसावीं. ९१ यदृच्छेनें प्राप्त झालेली शाक, फळ, मूळ किंवा कंद खाऊन जठराची तृप्ति करावी. पण परमार्थाचें साधन सोडून अन्न व धन मिळविण्यासाठीं आपलें आयुष्य कधीं फुकट दवडूं नये. ९२ हातांत चौपदरी घेऊन दारोदार भीक मागावी. पण अन्न व आच्छादन यांसाठीं एक क्षणभरहि आयुष्य खर्चीं घालूं नये. ९३ जे साधक ज्ञानी असतात ते अन्न-वस्त्र मिळविण्यासाठीं कष्ट करीत नाहींत. देह अदृष्टाधीन आहे, तें अदृष्टच त्याचें अनायासानें प्रतिपालन करील. ९४ स्वतः अहोरात्र वाटेल तितके जरी कष्ट केले तरी अदृष्टावांचून अणुमात्रहि लाभ कोणाला कधींच होत नाहीं, हें ज्ञानी साधक जाणतात. ९५ त्यामुळें अदृष्टानें जें प्राप्त होईल त्यावर निर्वाह करून सर्वदा निश्चित असलेले साधक गुरुवाक्यानें संतोषयुक्त होऊन परमार्थ साधितात. ९६ देहप्रारब्धाप्रमाणें सुख-दुःखांच्या घडामोडी होतात. साधकाचा संतोष उत्तरोत्तर वाढत असतो. गुरुवाक्यानें साधकाला त्या संतोषाची पूर्ण गोडी लागलेली असते. ९७ देहाचें प्राक्तन जसें असतें तसें त्याला अन्न-वस्त्र अनायासानें प्राप्त होतें. पण गुरुवाक्याचें सुख सोडून त्याचें मन ममत्वानें देहावर आसक्त होत नाहीं. ९८ याचनेवांचून त्या त्या कालीं यदृच्छेनें जें जें प्राप्त होईल तें तें सर्व गुरुवाक्यानें प्राप्त झालेल्या संतोषानें गोड मानून त्याचें सेवन करितो. ९९ शरीरनिर्वाहासाठीं कोठें कशाचाहि अभिलाष धरीत नाहीं, तर जें जें मिळेल त्यानेंच संतुष्ट होतो. तो आत्मसंतोषानेंच सदा संतुष्ट असतो. ५०० प्रारब्धानुसार सुख-दुःख भोगित असतां साधकाच्या चित्ताला संतोषच होतो, हें म्हणणें गुरुवाक्यावर विश्वास ठेविला असतां शिष्याच्या प्रतीतीला येतें. १ गुरुवाक्यावर दृढ विश्वास बसण्यासाठीं गुरुपाशींच भागवतशास्त्राचें आदरानें अध्ययन करावें. म्हणजे तें शास्त्र निश्चयानें ज्ञानदायक होतें. ५०२.

श्रद्धां भागवते शास्त्रेऽनिन्दामन्यत्र चापि हि । मनोवाक्कर्मदण्डं च सत्यं शमदमावपि ॥ २६ ॥

सगुण अथवा निर्गुण । जेथ भगवत्स्वरूपवर्णन । कां भगवंत बोलिला आपण । अथवा भगवद्‌गुणकीर्ति जेथें ॥ ३ ॥ तें तें राया शास्त्र जाण । आवडे जैसें जीवूप्राण । विशेषेंसीं ज्ञानकथन । सप्रेम पूर्ण पढियंतें ॥ ४ ॥ गुरुमुखें ज्ञानकथा गोड । तेणें श्रीभागवतीं श्रद्धा दृढ । श्रवणें पुरे जीवाचें कोड । वोसरे चाड विषयांची ॥ ५ ॥ जीवीं नाहीं विषयकौतुक । तरी विषय आवश्यक । साधकां होती बाधक । तेणें आत्यंतिक अनुतापू ॥ ६ ॥ अनिवार विषयावस्था । यालागीं न वचे निजसत्ता । तेणें मुमुक्षूच्या चित्ता । अत्यंत व्यथा अनुतापें ॥ ७ ॥ नसतां विषयांची अतिप्रीती । स्वतां नव्हे विषयनिवृत्ती । ऐशियां साधकांप्रती । निर्णीत शास्त्रार्थी नेमिला नेमु ॥ ८ ॥ नाहीं विषयांची आसक्ती । नव्हे विषयनिवृत्ती । ऐशी जे कां साधकस्थिती । नेमू त्याप्रती शास्त्रें केला ॥ ९ ॥ जो कां केवळ विषयासक्त । कदा न मनी शास्त्रार्थ । कां जो जाला जीवन्मुक्त । तोही शास्त्रार्थ मानूनि न मनी ॥ ५१० ॥ जैशी मृगजळाची भासे स्थिती । तैसे विषय मुक्ताप्रती । त्या विषयांचिये निवृत्ती । कोणते शास्त्रार्थी मानावा नेमू ॥ ११ ॥ एवं अत्यासक्त अतिविरक्त । त्यांसी नेमू न चले येथ । मुमुक्षूंसींच शास्त्रार्थ । नेमी निश्चित निजनेमें ॥ १२ ॥ तेथ गुरुशिष्यसंवाद । करितां ज्ञानार्थप्रबोध । ते बोधीं बाधी विषयबाध । तत्त्यागीं प्रसिद्ध शास्त्रार्थनेमू ॥ १३ ॥ मनसा वाचा कर्मविरोधु । येणें विषयांचा त्रिविध बाधु । त्या तिहींसही त्रिविधु । शास्त्रें अतिशुध्दु नेमिला नेमू ॥ १४ ॥

भागवते शास्त्रे श्रद्धां–भगवानाचें प्रतिपादन करणाऱ्या शास्त्रावर श्रद्धा, च–आणि, अन्यत्र अपि–इतर शास्त्रांमध्येंहि, अनिंदां–अनिंदा, मनोवाक्कर्मदण्डं सत्यं शमदमौ अपि च—मन-वाणी-कर्म यांचा दंड, सत्य आणि शम व दम हे सुद्धां शिकावे. [भगवत्स्वरूपाचें प्रतिपादन करणाऱ्या शास्त्रावर श्रद्धा ठेवण्यास शिकावें. अन्य शास्त्रादिकांचीहि निंदा न करण्यास शिकावें. मनाचा प्राणायामांनीं निरोध करावा, वाणीचें मौनानें नियमन करावें. शरीराला कर्मत्यागानें दंड करावा. सत्य म्ह० यथार्थ भाषण, अंतःकरणाचा निग्रह हा शम व बाह्येंद्रियांचा निग्रह हा दम, यांचें शिक्षण घ्यावें.] २६.

ज्यांत सगुण किंवा निर्गुण भगवत्स्वरूपाचें वर्णन असतें किंवा जें स्वतः भगवानानें सांगितलेलें असतें, अथवा ज्यांत भगवद्‌गुणकीर्ति असते, ३ तें तें भागवत शास्त्र होय. ज्याला असलें शास्त्र आपला जीव कीं प्राण वाटतो, विशेषतः ज्यांत सप्रेम ज्ञानकथन असतें, तें ज्याला फार आवडतें, ४ गुरुमुखानें ऐकत असलेली ज्ञानकथा ज्याला फार गोड वाटते व त्यामुळें श्रीभागवत शास्त्रावरील ज्याची श्रद्धा दृढ होते, अशा शास्त्राच्या श्रवणानें त्याच्या मनांतील हौस पुरी होते आणि विषयप्रीति नाहींशी होते. ५ त्याला विषयांचें कौतुक वाटत नाहीं, कारण विषय साधकांना अवश्य बाधक होतात व त्यामुळें साधकाला अत्यंत पश्चात्ताप होतो. ६ विषयप्रीति अनिवार आहे. तिच्यापुढें आत्मप्रतीति येत नाहीं. म्हणून मुमुक्षूच्या चित्ताला पश्चात्तापाची फार व्यथा होते. ७ विषयांची अतिशय प्रीति तर नाहीं, पण विषयांची निवृत्तिहि आपोआप होत नाहीं, अशा साधकांसाठीं शास्त्रामध्यें निश्चित नियम सांगितला आहे. ८ विषयासक्तीहि नाहीं व विषयनिवृत्तीहि नाहीं अशी जी साधकांची स्थिति तिला उद्देशून शास्त्रांनीं नियम केलेला आहे. ९ जो केवल विषयासक्त असतो तो शास्त्रार्थाला केव्हांहि मानीत नाहीं आणि जो जीवन्मुक्त झाला तोहि पूर्वीं जरी शास्त्रार्थ मानीत असला तरी आतां मानीत नाहीं. ५१० मुक्तांना विषय मृगजळासारखे भासतात. तेव्हां त्यांनीं विषयांच्या निवृत्तीसाठीं कोणत्या शास्त्रांतील कोणता नियम मानावा ! ११ याप्रमाणें अति आसक्त व अति विरक्त या दोघांपुढेंहि शास्त्रनियमांचें कांहीं चालत नाहीं. वास्तव शास्त्र मुमुक्षूंनाच निश्चित आपल्या नियमानें नियत करितें. १२ याविषयीं गुरु व शिष्य यांमध्यें होणारा जो संवाद त्यापासून ज्ञानार्थ बोध होतो. त्या बोधानें विषयपीडा नाहींशी होते. विषयत्यागासाठीं शास्त्रार्थाचा नियम प्रसिद्ध आहे. १३ मन, वाणी व शरीर यांच्या विरोधानें मानसिक, वाचिक व शारीरिक विषयांचा बाध होतो. त्या त्रिविध बाधासाठीं या श्लोकाच्या ' मनोवाक्कर्मदण्डम्० ' या उत्तरार्धांत शास्त्रानें तीन प्रकारचा अति शुद्ध नियम नियत केला आहे. १४ मनाला उपशमाचा म्ह० शांतीचा

पूर्वश्लोकोत्तरार्धम् ॥ ॥ मनोवाक्कर्मण्दडं च शमदमावपि ॥

मनासी नेमू उपशमाचा। इंद्रियां नेमू तो दमाचा । सत्यें नेमिली वाचा। तिहींसही तिहींचा निजनेमू ॥ १५ ॥ विषयकामगज दारुण । अहंमहामदें उन्मत्त पूर्ण । देहतारुण्यें अतिघूर्ण । तोडी बंधन विधीचें ॥ १६ ॥ खंदी सहृद राजा गुरु । सोंडां कवळी स्वर्गशिखरू । नरकनदीमाजीं अपारू । अतिदुस्तरू बुड्या देतु ॥ १७ ॥ धर्मजळें क्षाळे अवचिता । सवेंचि सलोभ धुळी घाली माथां । घोळसी ब्रह्मादिकां समस्तां । अहंममता गर्जतू ॥ १८ ॥ त्यासी विवेकमहावंत जाण । माथां चढों जाणे आपण । शास्त्रविधिअंकुशें पूर्ण । धरिला आवरून करकरितू ॥ १९ ॥ त्यासी उपशमाचें संरक्षण । वैराग्ययुक्त ठेवूनि जाण । दमाचे श्रृंखळीं आकळून । सत्याचे स्तंभीं विवेकू बांधे ॥ ५२० ॥ मनसा वाचा कायिक कर्म । येणें विषयाबाधा बाधी परम । त्या तिहींसी केला त्रिविध नेम । त्या नेमाचें वर्म ऐक राया ॥ २१ ॥ आतां शमाची ऐशी स्थिती । मनबुद्ध्यादि चित्तवृत्ती । सांडवूनि विषयासक्ती । लावी परमार्थीं प्रबोधूनी ॥ २२ ॥ पूर्वे उगवतां गभस्ती । आंधारू सांडी त्रिजगती । तेवीं गुरुवाक्यें शमाची प्राप्ती । विषयनिवृत्ती मानसिक ॥ २३ ॥ बाह्य इंद्रियप्रवृत्ती । दमें दमोनि गुरुवाक्यस्थिती । मग शमाची संगती । आणी निवृत्ती इंद्रियकर्मे ॥ २४ ॥ कन्या प्रतिपाळूनि जैसी । दान देतां जांवयासी । त्यागी बापाचे कुळगोत्रासी । दमें इंद्रियें तैशीं विषयार्थां ॥ २५ ॥ झणीं वाचा जाईल विकळ । तिसी सत्याचा महामोकळ । देऊनि केली निखळ । अतिअढळ सत्यधूतवाणी ॥ २६ ॥ सत्यवादिया ब्रह्मादि वंदिती । असत्या होय अधोगती । ऐसें व्याख्यान जे करिती । तेही वदती असत्य ॥ २७ ॥ कां रामनामाच्या

नियम आणि इंद्रियांना दमाचा म्ह० बाह्य इंद्रियनिग्रहाचा नियम सांगितला आहे. वाणीला सत्यानें नियत केलें आहे. याप्रमाणें या तीन साधनांचे नियम सांगितले आहेत. १५ विषयेच्छा हा भयंकर हत्ती आहे. तो 'अहं' या महामदानें अतिशय मत्त झालेला असतो. देहाच्या तारुण्यानें त्याचे डोळे फिरून गेलेले असतात. त्यामुळें तो शास्त्रविधीचें बंधन तोडून टाकतो. १६ सुहृद्, राजा, गुरु यांचा अपमान करितो. आपल्या सोंडेनें स्वर्गाच्या शिखरालाहि कवटाळतो व अपार नरकनदीमध्यें अति दुस्तर बुड्या मारितो. १७ कदाचित् एखाद्या वेळीं धर्मजलांत तो स्नान करितो; पण लागलीच लोभरूपी माती आपल्या डोकीवर घेतो. ब्रह्मादि सर्व समर्थांना पायांखालीं तुडवितो आणि अहं–ममतेनें गर्जना करूं लागतो. १८ त्याला वठणीवर आणणारा विवेक हाच महात आहे. त्या विषयकामरूप मत्तगजाच्या मस्तकावर कसें चढावें हें तो जाणतो व शास्त्रविधि याच तीक्ष्ण अंकुशानें त्यानें त्या गजाला आंवरून धरलें. १९ म्हणजे तो चिं चिं करूं लागतो. त्याचें संरक्षण करण्यासाठीं त्याच्यावर वैराग्ययुक्त उपशमाचा पहारा ठेवून व दमाच्या शृंखलांनीं त्याला बांधून तो विवेकमहात सत्याच्या स्तंभाशीं त्याला जखडून टाकितो. ५२० याप्रमाणें कायिक, वाचिक व मानसिक कर्मांच्या योगानें शास्त्र विषयपीडेला प्रतिबंध करितें. शास्त्रानें त्या तीन साधनांचे तीन नियम सांगितले आहेत. राजा, त्यांचें वर्म मी तुला सांगतों. २१ मन, बुद्धि इत्यादि चित्तवृत्तींचें नियमन करून, विषयासक्ति सोडवून व बोध करून शम त्याला परमार्थीं लावितो. २२ पूर्वेस सूर्य उगवतांच अंधकार जसा नाहींसा होतो, त्याप्रमाणें गुरुवाक्यानें शमाची प्राप्ति होते. मानसिक विषयांची निवृत्ति हाच शम होय. २३ ह्या नियमानें, गुरुवाक्याच्या आधारानें, बाह्यइंद्रियप्रवृत्तीचें नियमन करून, शमाच्या साह्यानें इंद्रियकर्मांची निवृत्ति करितो. २४ कन्येला वाढवून जांवयाला तिचें दान दिलें असतां ती पित्याच्या कुलगोत्राला जशी सोडिते, तशीं इंद्रियें दमाच्या योगानें विषयप्रवृत्तीला सोडितात. २५ कदाचित् वाचा असत्य, अभद्र भाषण करील म्हणून तिला सत्याचा तोबरा देऊन प्रतिबध्द केलें. त्यामुळें ती नियमानें सत्य व पवित्र झाली. २६ 'सत्य भाषण करणाराला ब्रह्मादि देवहि वंदन करितात व असत्य भाषण करणारास अधोगति मिळते' असें भर सभेंत जे मोठ्या आवेशानें व्याख्यान देतात तेहि प्रसंगीं खोटें बोलतात. २७ रामनामाच्या स्मरणाचा

आवृत्ती । वाचा धुतली स्मरणोक्तीं । ते असत्यामाजीं पुढतीं । कदा कल्पांतीं बुडेना ॥ २८ ॥ मंथूनि काढिलें नवनीत । तें पुढती न बुडे ताकांत । तेवीं नामें वाचा निर्धूत । असत्य तेथें स्पर्शेना ॥ २९ ॥ जेवीं लागलेनि रविकरें । घृतकणिका स्वयें विरे । तेवीं सत्याचेनि निजनिर्धारें । असत्य चमत्कारें समूळ उडे ॥ ५३० ॥ चंदनाचिया चौफेरीं । काष्ठत्वा मुकती खैर बोरी । तेवीं नामाच्या निजगजरीं । वाचेमाझारीं निजसत्य प्रगटे ॥ ३१ ॥ झालेनि अर्कप्रकाशें । खद्योत हारपती जैसे । तेवीं रामनामसौरसें । लोपे अनायासें असत्य ॥ ३२ ॥ अंशांशीं प्रतिपदे कुहू । गेलिया बिंब सांडी राहू । तेव्हां प्रकाशाचा समुहू । प्रगटे बहू जगामाजीं ॥ ३३ ॥ तेवीं असत्याचेनि आक्रमें । वाचा प्रकाशे सत्यसंभ्रमें । जेवीं राजाज्ञा अनुक्रमें । प्रजा स्वधर्में वर्तती ॥ ३४ ॥ सत्यापरतें नाहीं तप । सत्यापरता नाहीं जप । सत्यें पाविजे सद्रूप । सत्यें निष्पाप साधक होती ॥३५॥ एवं काया वाचा मनें । शमदमादि सत्य लक्षणें । जो नेमिला त्रिविधाविंदानें । त्याचे विषयाचें धरणें तत्काळ उठी ॥ ३६ ॥ ऐसिया स्वार्थालागीं जीवीं । भगवच्छास्त्रीं आवडी दावी । परी आणिकां शास्त्रां न लावी । द्वेषभावीं निंदेचें बोट ॥ ३७ ॥ एका स्तुती एका निंदा । करितां आदळे अंगीं बाधा । यालागीं निंदानुवादा । साधक कदा नातळती ॥ ३८ ॥ अर्धांगींची लक्ष्मी वंदावी । मा चरणींची गंगा काय निंदावी । निजजननी नमस्कारावी । काय येरां द्यावी पांपर ॥ ३९ ॥ तरी भज्य भजावें भजनीं । परी निंदा स्तुती सांडूनि दोनी । जो निजसत्यें होय मौनी । तैं ब्रह्मज्ञानीं अधिकारु ॥ ५४० ॥ ऐशी न करितां व्युत्पत्ती । न सोशितां हे कष्टस्थिती । भावें करितां भगवद्भक्ती ।

अविच्छिन्न आवृत्ति केल्यानें ज्याची वाचा निर्मळ झाली आहे, ते पुढें कधीं कल्पांतींहि असत्यांत बुडत नाहींत. २८ दहीं घुसळून लोणी काढल्यावर मग तें ताकांत बुडत नाहीं, त्याप्रमाणें रामनामानें वाणी पवित्र झाली म्हणजे मग तिला असत्य स्पर्शहि करीत नाहीं. २९ सूर्यकिरणांचा स्पर्श होतांच तुपांतील कण्या जशा विरघळून जातात, त्याप्रमाणें सत्याच्या निर्धारानें असत्य मोठ्या चमत्कारानें समूळ नाहींसें होतें. ५३० चंदनाच्या सहवासांत असलेला खैर, बोरी इत्यादि वृक्ष आपल्या काष्ठत्वालाच मुकतात, त्याप्रमाणें रामनामाच्या गजरानें वाणीमध्यें स्वाभाविक सत्य प्रकट होतें. ३१ सूर्याचा प्रकाश पडतांच काजव्याचा प्रकाश लोपतो, त्याप्रमाणें रामनामाच्या प्रभावानें असत्य अनायासानें लोपतें. ३२ पूर्ण अमावास्येला एक अंशानें असलेला चंद्र प्रतिपदेमध्यें गेला म्हणजे राहु त्याच्या बिंबाला सोडतो आणि मग त्याचा प्रकाश जगांमध्यें प्रकट होतो, ३३ त्याप्रमाणें असत्याला पराभूत करून वाणीमध्यें सत्य अनायासानें प्रकट होतें. राजाज्ञेच्या अनुसार प्रजा स्वधर्मानें जशी वागते, ३४ त्याप्रमाणें वाणी सत्यालाच अनुसरते. सत्याहून निराळें तप नाहीं, सत्याहून वेगळा जप नाहीं, सत्यानें सद्रूपाची प्राप्ति होते व सत्यानें साधक निष्पाप होतो. ३५ याप्रमाणें शरीर, वाक् व मन यांनीं शम, दम, सत्य इत्यादि त्रिविध श्रेष्ठ साधनांमध्यें जो निमग्न झालेला असतो त्याच्या मनांतील विषयांचें धरणें तत्काळ उठतें. ३६ अशा स्वार्थासाठीं तो आपल्या मनांत भगवत्स्वरूप प्रतिपादनशास्त्रावर मोठी प्रीति ठेवितो; पण इतर शास्त्रांना द्वेषभावानें निंदेचें बोट लावीत नाहीं. ३७ कारण एकाची स्तुति व एकाची निंदा करूं लागलें असतां मोठा दोष लागतो. म्हणून साधक कोणाची निंदा करीत नाहीं. ३८ भगवानांच्या अर्धांगीं असलेल्या लक्ष्मीला मात्र वंदन करावें आणि त्याच्या चरणापासून निघालेल्या गंगेची काय निंदा करावी, होय! आपल्या जननीला मात्र नमस्कार करावा आणि इतर स्त्रियांना काय लाथा माराव्या! ३९ यास्तव आपल्या उपास्याचें प्रेमानें भजन करावें, पण तें निंदा व स्तुति या दोहोंना सोडून करावें. जो स्वाभाविक सत्यानें मौनी होतो, तोच ब्रह्मज्ञानाचा अधिकारी आहे. ५४० शास्त्रव्युत्पत्तीसाठीं विशेष खटपट न करितां व प्राणायामादि साधनांचें कष्टहि न सोशितां भगवद्भक्तांना केवल निरतिशय प्रेमानें भगवद्भक्ति केल्यानेंच मुक्ति अनायासानें

फुकाची मुक्ती हरिभक्तां ॥ ४१ ॥ ते भक्तीची निजस्थिती । राया सांगेन तुजप्रती । सुगमत्वें परमात्मप्राप्ती । हरिभक्त पावती तें ऐक ॥ ४२ ॥

श्रवणं कीर्तनं ध्यानं हरेरद्भुतकर्मणः । जन्मकर्मगुणानां च तदर्थेऽखिलचेष्टितम् ॥ २७ ॥

मुख्य भक्तीचें कारण । हरीचे जन्मकर्मगुण । पूर्ण श्रद्धा करावें श्रवण । हरिकीर्तन स्वानंदें ॥ ४३ ॥ हरिकीर्तनाचिया जोडी । सकळ साधनें केलीं बापुडीं । अद्‌भुत कर्में हरीचीं गाढीं । गातां अतिआवडी उल्हासे ॥ ४४ ॥ शिळा तारिल्या सागरीं । गोवर्धन धरिला करीं । निद्रा न मोडितां सकळ नगरी । द्वारकेमाझारीं आणिली मथुरा ॥ ४५ ॥ निमाला गुरुपुत्र दे आणूनी । मुखें प्राशिला दावाग्नी । गत गर्भ आला घेऊनी । निजजननी तोषार्थ ॥४६॥ अजन्म्या जन्में नेणों किती । अकर्म्याचीं कर्में गाती । अगुणाचे गुण वर्णिती । तेणें श्रीपती सुखावे ॥ ४७ ॥ जो सुखैकमूर्ती निजस्वभावें । तोही जन्मकर्मगुणवैभवें । गातां कीर्तनीं अतिसुखावे । स्वानंदगौरवें डुल्लतु ॥४८॥ऐशी कीर्तनीं गातां कीर्ती । निर्मळ होय चित्तवृत्ती । तेथें ठसावें ध्यानस्थिती । ऐक ते नृपती सांगेन ॥ ४९ ॥ मुकुटकुंडलें मेखळा । कांसे कसिला सोनसळा । आपाद रुळे वनमाळा । घनसांवळा धवधवित ॥ ५५० ॥ ऐशी मूर्ती सुरेख सगुण । कां निरसूनि रूप नाम गुण । ध्यानीं ठसावें निजनिर्गुण । ब्रह्म परिपूर्ण पूर्णत्वें ॥ ५१ ॥ ऐसें ठसावतां ध्यान । भक्तांची सबाह्य क्रिया पूर्ण । ते ते होय कृष्णार्पण । स्त्रीपुत्रादि जाण सर्वस्वें ॥ ५२ ॥

मिळते. ४१ हे राजा, मी तुला त्या भक्तीचीच स्वाभाविक स्थिति सांगतों. हरिभक्तांना अनायासानें परमात्मप्राप्ति कशी होते, ती ऐक. ५४२.

अद्‌भूतकर्मणः हरेः—ज्यांचीं कर्में अद्‌भुत आहेत अशा हरीचे, जन्म-कर्म—गुणानां—जन्म-कर्म व गुण यांचें, श्रवणं कीर्तनं ध्यानं-श्रवण, कीर्तन व ध्यान शिकावें, च—आणि, तदर्थे अखिलचेष्टितं—हरीच्या उद्देशानें यजनादि सर्व कर्म शिकावें. [अद्‌भुत कर्में करणाऱ्या हरीच्या जन्मादिकांचें श्रवणादि शिकावें व ईश्वरार्थ केलेल्या सर्व कर्मांचें ज्ञान संपादन करावें.] २७.

हरीचे जन्म, कर्म व गुण हें भक्तीचें मुख्य कारण आहे. यास्तव त्याच्या जन्मादिकांचें श्रवण पूर्ण श्रद्धेनें करावें व स्वानंदानें हरिकीर्तन करावें. ४३ हरिकीर्तनाशीं तुलना करूं लागल्यास इतर सर्व साधनें कमी प्रतीचीं ठरतात. हरीच्या अद्‌भुत कर्मांचें मोठ्या प्रेमानें गायन करूं लागलें असतां मनाला मोठा आल्हाद होतो. ४४ हरीनें समुद्रावर शिळा तरावयास लावल्या, हातांत गोवर्धन पर्वत धरिला व लोकांची झोंप न मोडतां सर्व मथुरानगरी द्वारकेंत नेली. ४५ मेलेल्या गुरुपुत्राला परत आणून दिलें. दावाग्नीला गिळिलें. आपल्या मातेला संतुष्ट करण्यासाठीं कंसानें मारलेल्या तिच्या गर्भांना परत आणिलें. ४६ जन्मरहित असलेल्याहि त्याचे किती जन्म झाले कांहीं कळत नाहीं. तथापि भक्त जन्मरहिताच्याहि जन्मांचें, कर्मरहिताच्या कर्मांचें व निर्गुणाच्या गुणांचें वर्णन करितात व त्यामुळें तो श्रीपति संतुष्ट होतो. ४७ जो स्वभावतःच केवळ सुखरूप असलेला हरि तोहि भक्त कीर्तनामध्यें जन्म, कर्म व गुण यांचें वैभव गावूं लागले असतां अति प्रसन्न होतो व स्वानंदभरानें डोलूं लागतो. ४८ कीर्तनामध्यें भक्त याप्रमाणें हरीची कीर्ति गाऊं लागला असतां त्याची चित्तवृत्ति प्रसन्न होते व हरीच्या स्वरूपांत ध्यानस्थिति ठसते. राजा, मी आतां तुला हरीचें सगुण स्वरूपच सांगतों. ४९ मस्तकावर मुकुट, कानांत कुंडलें, कमरेला मेखळा, पीतांबराचें परिधान, पायांपर्यंत लोंबणारी वनमाळा यांनीं युक्त असलेला तो मेघश्याम सूर्याप्रमाणें झळकत आहे, ५५० अशी सुरेख सगुण मूर्ति नाम, रूप व गुण यांचें निरसन करून ध्यानामध्यें ठसते. स्वभावतः निर्गुण व परिपूर्ण ब्रह्म ५१ याप्रमाणें पूर्णत्वानें ठसलें असतां भक्तांची जी जी बाह्य किंवा आंतर क्रिया ती ती सर्व स्त्री-पुत्रादि सर्वस्वासह कृष्णार्पण होते. ५५२.

इष्टं दत्तं तपो जप्तं वृत्तं यच्चात्मनः प्रियम् । दारान्सुतान्गृहान्प्राणान्यत्परस्मै निवेदनम् ॥ २८ ॥

अग्निहोत्रादि याग होम । ग्रहणादि दान अनुत्तम । तप म्हणिजे स्वधर्म । जो वर्णाश्रम यथोचित ॥ ५३ ॥ आगमोक्त यथाशास्त्र । आवरणविधिविधानतंत्र । गुरुदीक्षा शुद्ध मंत्र । अथवा नाममात्र तो जपू कीजे ॥ ५४ ॥ तें यज्ञ दान क्रिया तप । दीक्षा मंत्र कां नामजप । तेथें न घालितां संकल्प । करी निर्विकल्प कृष्णार्पण ॥ ५५ ॥ हरीशीं जाहले जे अनन्य शरण । ते हरीचे लडिवाळ पूर्ण । त्यांचें हरी करी प्रतिपाळण । जेवीं जननी जाण तानुलेया ॥ ५६ ॥ यालागीं जें जें जीविकावर्तन । तेंही करावें कृष्णार्पण । हें माझें म्हणोनि अभिमान । भक्त सज्ञान न धरिती कदा ॥ ५७ ॥ ज्याची आवडी अतिशयें चित्तीं । ज्याची आपणिया अतिप्रीती । तें तें कृष्णार्पण करिती । गुरुवाक्यस्थिती विश्वासें ॥ ५८ ॥ यालागीं आठी प्रहर । सेवेसी वेंचिती निजशरीर । निमिषार्धही व्यापार । विषयाकार करिती ना ॥ ५९ ॥ अन्नालागीं होऊनि बेडें । साधनांच्या पायां न पडे । आयुष्याचे तिनी कवडे । विषयाचे चाडे कदा न करी ॥ ५६० ॥ आयुष्याची अर्ध घडी । वेंचितां न मिळे लक्ष कोडी । तेणें आयुष्यें परमार्थ जोडी । विषयांच्या कोडी थुंकोनि सांडी ॥ ६१ ॥ त्यागोनियां राज्यसंपत्ती । राजे जाऊनि वनाप्रती । स्वयें परमार्थ साधिती । विषयासक्ति थुंकोनी ॥ ६२ ॥ कैशी भक्तीची गोडी संपूर्ण । रिता जावों नेदी अर्ध क्षण । अवघें जीवितचि जाण । करी कृष्णार्पण सर्वस्वें ॥ ६३ ॥ आणि पुत्रदारादिक जें जें घरीं । तें तें भगवत्सेवेवारी । स्वयें कृष्णार्पण करी । माझी म्हणोनी न धरी ममता जीवीं ॥ ६४ ॥ दारा पुत्र देह गेह प्राण । यांसी आत्मा सबाह्य पूर्ण । तेथें संकल्पेंवीण जाण । ब्रह्मार्पण सहजची ॥ ६५ ॥

इष्टं–याग, दत्तं–दान, तपः–कृच्छादि तप, जप्तं–जप, वृत्तं–सदाचार, **यत् च**–आणि जें, **आत्मनः प्रियं**–आपणाला प्रिय असलेलें गंध-पुष्पादि, दारान् सुतान् गृहान् प्राणान्–स्त्री, पुत्र, गृह, प्राण यांचें, **परस्मै निवेदनम्**–परमात्म्याला निवेदन. [यागादि प्राणान्त सर्व वस्तूंचें ' मी परमात्म्याचा सेवक आहें ' या भावनेनें त्याला समर्पण करणें, हेंहि शिकावें.] २८.

अग्निहोत्रादि याग व होम, ग्रहणादिप्रसंगीं उत्तम दान, तप म्ह० वर्णाश्रमोचित स्वधर्म, ५३ शास्त्रोक्त आचार, आवरणादि विधिविधान तंत्रें, गुरुदीक्षा: शुद्धमंत्राचा किंवा नाममंत्राचा जप ५४ इत्यादि हें सर्व करून ' यांचा कर्ता मी आहें,' असा संकल्प न करितां निर्विकल्प मनानें त्यांना कृष्णार्पण करावें. ५५ हरीला जे अनन्य शरण होतात ते त्याला अतिशय आवडतात आणि माता आपल्या तान्ह्या मुलाचें जसें परिपालन करिते, तसें हरि त्यांचें परिपालन करितो. ५६ यास्तव आपल्या उपजीविकेची वृत्तीहि कृष्णार्पण करावी. ज्ञानी भगवद्भक्त ' हें माझें ' असें म्हणून कोठेंहि अभिमान ठेवीत नाहींत. ५७ मनांत ज्याची अतिशय आवड असते आणि ज्यावर अतिशय प्रीति असते तें तें सर्व गुरुवाक्यावरील विश्वासानें कृष्णार्पण करितात. ५८ भगवद्भक्त आठहि प्रहर भगवत्सेवेंत आपलें शरीर वेंचितात. अर्धा क्षणहि विषयाकार व्यापार करीत नाहींत. ५९ अन्नासाठीं वेडे होऊन धनिकांच्या पायां पडत नाहींत. विषयतृष्णेनें आपलें आयुष्य तीन कवडीचें म्ह० कवडीमोल करीत नाहींत. ५६० लक्षावधि होन जरी खर्च केले तरी आयुष्याची अर्ध घडी मिळत नाहीं, हें जाणून भक्त असंख्य विषयांनाहि थुंकून टाकून म्ह० तुच्छ मानून त्याच आयुष्यानें परमार्थ जोडितात. ६१ राजे राज्यसंपत्तीचा त्याग करून वनांत जातात आणि विषयासक्ति टाकून स्वतःच परमार्थ साधितात. ६२ अहो, या भक्तीची गोडी काय सांगावी ! भक्त तिच्यावांचून एकक्षण रिता जाऊं देत नाहींत. तर आपलें सर्व जीवित सर्वस्वीं कृष्णार्पण करितात. ६३ घरामध्यें स्त्री, पुत्र, इत्यादि जें जें कांहीं असतें, तें तें सर्व भक्त भगवत्सेवेमध्यें लावितो. आपण होऊन त्यांना कृष्णार्पण करितो. त्यांतील कशालाहि ' हें माझें ' असें म्हणून मनांत ममता धरीत नाहीं. ६४ स्त्री, पुत्र, गृह व प्राण यांत आत्मा सबाह्यपूर्ण आहे, त्यामुळें संकल्पावांचूनच त्याचें ब्रह्मार्पण सहजच सिद्ध होतें, असें तूं जाण ५६५.

एवं कृष्णात्मनाथेषु मनुष्येषु च सौहृदम् । परिचर्यां चोभयत्र महत्सु नृषु साधुषु ॥ २९ ॥

एवं दारा गेह देह संपदा । आत्मार्पणें शुद्ध श्रद्धा । भजले सर्वकाळीं सर्वदा । ते भक्त गोविंदा पढियंते ॥ ६६ ॥ जो सर्व भूतीं हृदयस्थू । परमात्मा श्रीकृष्णनाथू । त्याचे ठायीं जो भक्तू । साधावया निजस्वार्थू सर्वस्वें भजे ॥ ६७ ॥ त्या हृदयस्थाचे ठायीं । दृढ दृष्टी जंव बसली नाहीं । तंव सगुणमूर्तीं हृदयीं । भजावी पाहीं सर्वात्मभावें ॥ ६८ ॥ सगुणमूर्ती नातुडे ध्यानीं । तरी भजावें प्रतिमेच्या स्थानीं । तेथेंही चलाचल दोनी । भजाव्या गुरुवचनीं समसाम्यभावें ॥ ६९ ॥ ज्यां उपासक पूजिती । त्या जाणाव्या चला मूर्ती । ज्या पांडुरंगादि द्वारावती । त्या स्थावरा मूर्ती पुराणोक्त ॥५७०॥ त्या मूर्तींहूनि श्रेष्ठ स्थान । पूर्ण पूज्यत्वें ब्राह्मण । तेथें करावें गा भजन । सर्वस्वें जाण सर्वदा ॥ ७१ ॥ त्या ब्राह्मणांमाजीं अतिश्रेष्ठ । श्रोत्रिय सदाचारनिष्ठ । त्यांतहि वेदशास्त्रार्थीं प्रविष्ट । ते अतिवरिष्ठ पूज्यत्वें ॥ ७२ ॥ त्यांहीमाजीं जे भागवत । भागवतधर्मीं नित्य निरत । जे निकर्षैसीं भगवद्भक्त । ज्यांचा भावार्थ श्रीकृष्णीं ॥ ७३ ॥ ज्यांसी आत्मा श्रीकृष्ण हृदयस्थ । ज्यांचा अनन्य स्वामी श्रीकृष्णनाथ । ऐसे जे भगवद्भक्त । ते पूज्य निश्चित निजभक्तां ॥ ७४ ॥ अतिमहत्वें पूज्य गहन । ज्याचे सुर नर वेद बंदिजन । तो सद्गुरु श्रेष्ठ पूज्य स्थान । शिष्यासी जाण सर्वस्वें ॥ ७५ ॥ गुरु ब्रह्म दोनी समान । हेंही वचन दिसे गौण । गुरुवाक्यें ब्रह्मा ब्रह्मपण । तेथें व्हावया समान भिन्नत्व नुरे ॥ ७६ ॥ जैसा देवाचे ठायीं भावो । तैसाचि गुरुचरणीं सद्भावो । गुरुदेवांमाजीं पहा हो । भिन्नत्वभावो असेना ॥ ७७ ॥ देवो पूजिल्या गुरु तोषे । गुरु पूजिल्या देवो संतोषे । दों नांवांचेनि

एवं–याप्रमाणें, कृष्णात्मनाथेषु मनुष्येषु–श्रीकृष्णच ज्यांचा अंतरात्मा आहे अशा मनुष्यांमध्यें, सौहृदं–प्रीति, च–आणि, उभयत्र परिचर्यां–स्थावर व जंगम या दोन्ही प्राण्यांतील परिचर्या, त्यांतल्यात्यांत, नृषु–मनुष्यांमध्यें, साधुषु–स्वधर्मशीलांमध्यें व, महत्सु–भगवद्भक्तांमध्यें जी परिचर्या ती शिकावी. [श्रीकृष्ण ज्यांचा आत्मा व नाथ आहे, किंवा ज्यांच्या जीवाचा स्वामी आहे, अशा मनुष्यांमध्यें प्रीति, स्थावर व जंगम या दोन्हीं प्रकारच्या प्राण्यांची परिचर्या, त्यांतहि विशेषतः मनुष्यांची, मनुष्यांतहि स्वधर्मशील साधूंची आणि त्यांतहि भगवद्भक्त महात्म्यांची परिचर्या शिकावी.] २९.

याप्रमाणें स्त्री, गृह, देह, संपत्ति यांसह आत्मसमर्पण करून जे भक्त शुद्ध श्रद्धेनें गोविंदाला सर्वदा भजतात ते त्याला आवडतात. ६६ भक्त परमार्थ साधण्यासाठीं सर्व प्राण्यांच्या हृदयांत स्थित असलेल्या परमात्म्या श्रीकृष्णाचें भजन सर्वस्वानें करितो. ६७ त्या हृदयस्थ परमात्म्यामध्यें जोंपर्यंत दृढ दृष्टि बसली नाहीं, तोंपर्यंत त्यानें हृदयांत सगुणमूर्तीचेंच सर्वात्मभावानें भजन करावें. ६८ ध्यानामध्यें सगुणमूर्तीवर मन जर स्थिर होत नसेल तर प्रतिमेमध्यें तिची कल्पना करून ध्यान करावें. त्यांतहि गुरुवचनानें चल व अचल मूर्तींचें समभावानें पूजन करावें. ६९ उपासक ज्या मूर्तींची पूजा करितात त्या चलमूर्ति समजाव्या आणि पुराणांत वर्णिलेल्या क्षेत्रादिकांतील पांडुरंगादिकांच्या ज्या मूर्ति त्या अचल जाणाव्या. ५७० त्या मूर्तींहूनहि पूर्ण पूज्यत्वानें ब्राह्मण हें श्रेष्ठस्थान आहे. त्यांत सर्वस्वानें सर्वदा भजन करावें. ७१ ब्राह्मणांमध्यें सदाचारनिष्ठ श्रोत्रिय अतिश्रेष्ठ, त्याहूनहि वेदशास्त्रार्थांध्यें प्रविष्ट झालेले ब्राह्मण पूजत्वानें अधिक श्रेष्ठ होत. ७२ त्यापेक्षांहि भागवत धर्मांत सतत तत्पर असलेले जे अनन्य भागवतभक्त, ज्यांची श्रीकृष्णामध्यें पूर्ण निष्ठा असते, ७३ हृदयस्थ आत्मा हाच श्रीकृष्ण आहे असें ज्ञान झालेलें असतें, ज्याचा श्रीकृष्णनाथ हाच अनन्य स्वामी असतो, ते भगवद्भक्त परमात्मभक्तांना निश्चयानें पूज्य असतात. ७४ देव, मनुष्य, वेद इत्यादि हे ज्याचे स्तुतिपाठक भाट आहेत व अतिमहत्त्वामुळें जो अतिशय पूज्य आहे तो सद्गुरु शिष्याला अत्यंत पूज्य आहे, असें तूं जाण. ७५ गुरु व ब्रह्म हे दोन्ही समान आहेत, हें म्हणणें गौण दिसतें. कारण गुरुवाक्यानें ब्रह्माला ब्रह्मत्व येतें. त्यानंतर मग ब्रह्म व गुरु यांचें साम्य कल्पावयास त्यांचें भिन्नत्व उरत नाहीं. ७६ देवाच्या ठिकाणीं जसा भाव असतो, तसाच गुरुचरणांवरहि सद्भाव ठेवावा लागतो. त्यामुळें गुरु व देव यांमध्यें भेदभाव उरत नाहीं. ७७ देवाची पूजा केल्यास गुरु संतुष्ट होतो. पण गुरूचें पूजन

हरुषें । स्वरूपें एकें वर्तती ॥ ७८ ॥ सुवर्ण आणि कांकण । दों नांवीं एक सुवर्ण । तेवीं गुरुब्रह्मांमाजीं जाण । भिन्नपण असेना ॥ ७९ ॥ त्या सद्गुरूचें निजभजन । चित्तवित्तें अवंचन । गुरुचरणीं आत्मार्पण । करावें आपण सर्वस्वेंसीं ॥ ५८० ॥ तैसेचि साधु श्रोते सज्ञान । तेही मानावे सद्गुरू-समान । त्यांचेनि संवादें आपण । श्रवण कथन करावें ॥ ८१ ॥

परस्परानुकथनं पावनं भगवद्यशः । मिथो रतिर्मिथस्तुष्टिर्निवृत्तिर्मिथ आत्मनः ॥ ३० ॥

तेथ करितां कथानुवादू । परस्परें निजात्मबोधू । करितां गुह्यज्ञानसंवादू । परमानंदू वोसंडे ॥ ८२ ॥ एवं हरिकथेच्या आवडी । परस्परें श्रद्धा गाढी । सुखसंवादपरवडी । निजसुखगोडी चाखिती ॥ ८३ ॥ चाखितां निजसुख गोडी । हारपती दुःखकोडी । उभवूनि भक्तिसाम्राज्यगुढी । स्वानंदजोडी जोडावी ॥ ८४ ॥ भावें करितां अभेदभजन । भक्त पावती स्वानंद पूर्ण । त्या स्वानंदाचें निजचिन्ह । ऐक सांगेन नृपनाथा ॥ ८५ ॥

स्मरन्तः स्मारयन्तश्च मिथोऽघौघहरं हरिम् । भक्त्या सञ्जातया भक्त्या बिभ्रत्युत्पुलकां तनुम् । ।३१ ॥

क्वचिद्रुदन्त्यच्युतचिन्तया क्वचिद्धसन्ति नन्दन्ति वदन्त्यलौकिकाः ।
नृत्यन्ति गायन्त्यनुशीलयन्त्यजं भवन्ति तूष्णीं परमेत्य निर्वृताः ॥ ३२ ॥

केल्यास देव संतुष्ट होतो; पण या दोन नांवांच्या हर्षानें ते दोघेहि स्वरूपानें एकरूप होऊन रहातात. ७८ सुवर्ण आणि कंकण या दोन नांवांमध्यें सुवर्ण एक असतें. त्याचप्रमाणें गुरु व ब्रह्म यांमध्यें भेद असत नाहीं. ७९ अशा सद्गुरूचें निष्कपटबुद्धीनें चित्त व वित्त यांचें गुरुचरणीं सर्वस्वीं आत्मार्पण करून भजन करावें. ५८० त्याचप्रमाणें सज्ञान साधु जे श्रोते त्यांनाहि सद्गुरुतुल्य मानावें. त्यांच्याशीं संवाद करून आपण श्रवण व कथन करावें. ५८१.

यत् पावनं भगवद्यशः— जें भगवानाचें पवित्र यश त्याचें, **परस्परानुकथनं**—परस्परानुकथन म्ह० एकमेकांस कथन करणें शिकावें, **मिथः आत्मनः रतिः**—त्याचप्रमाणें परस्पर आपलें रमण, **मिथः तुष्टिः**—परस्पर सुख, **मिथः निवृत्तिः**—परस्पर सर्व दुःखाची निवृत्ति शिकावी. [त्या साधूंची संगति करून पवित्र भगवद्यशाचें परस्पर संकीर्तन कसें करावें, तें शिकावें. द्वैत वादविवादी स्पर्धा वगैरे टाकून परस्परांची रति, सुख व दुःखनिवृत्ति हीं शिकावीं.] ३०.

साधूंच्या समागमांत कथानुवाद करीत असतां एकमेकांस निजात्मबोध होऊन त्या गुह्यज्ञानाच्या संवादानें परमानंद नुस्ता उचंबळून येतो. ८२ हरिकथेच्या प्रेमानें परस्परांची श्रद्धा दृढ होत जाते आणि त्या सुखसंवादप्रसंगीं आत्मसुखाचा अनुभव येतो. ८३ याप्रमाणें आत्मसुखाची गोडी चाखिली असतां कोट्यवधि दुःखें नाहींशीं होतात. यास्तव भक्तिरूप साम्राज्याची गुढी उभारून स्वानंदाची जोड जोडावी. ८४ प्रेमानें अभेदभक्ति केली असतां भक्त पूर्ण स्वानंदाला प्राप्त होतात. हे राजा, त्या स्वानंदाचें स्वरूप मी सांगतों, तें ऐक. ५८५.

—याप्रमाणें भगवद्भजनांत प्रवृत्त होणाऱ्या भक्तांना परमानंदप्राप्ति होते, असें पुढील दोन श्लोकांनीं सांगतात—

भक्त्या— साधनभक्तीनें, **संजातया भक्त्या**—उत्पन्न झालेल्या प्रेमलक्षण भक्तीनें, **अघौघहरं हरिं**—पापसमूहाचें हरण करणाऱ्या हरीचें, **स्मरंतः**—स्मरण करणारे, **च मिथः स्मारयंतः**—आणि परस्पर स्मरण करविणारे भक्त, **उत्पुलकां तनुं बिभ्रति**—रोमांचित तनु धारण करितात. ३१. **अच्युतचिंतया क्वचित् रुदन्ति**—अच्युताच्या चिंतनानें भक्त केव्हां केव्हां रडतात. **क्वचित् हसन्ति**—केव्हां केव्हां हंसतात, **क्वचित् नन्दन्ति**—केव्हां केव्हां आनंदित होतात. **अलौकिकाः वदन्ति**—अलौकिकांसारखे बोलतात, **नृत्यन्ति**—नाचतात, **गायन्ति**—गातात. **अजं अनुशीलयान्ति**— हरीच्या लीलेचा अभिनय करितात, **परं एत्य निर्वृताः तूष्णीं भवान्ति**—याप्रमाणें परमात्मस्वरूपाला प्राप्त होऊन सुखी होत्साते मुकाट्यानें बसतात. [पूर्वी साधन-भक्ति केल्यानें उत्पन्न झालेल्या प्रेमलक्षण साध्यभक्तीनें सर्व पापाचें हरण करणाऱ्या हरीचें स्वतः स्मरण करून आपसांत संवाद-रूपानें इतरांकडूनहि स्मरण करविणारे भक्त रोमांचित होतात. ते अच्युताच्या स्मरणानें केव्हां रडतात, केव्हां हंसतात, केव्हां आनंदित होतात, केव्हां जणुंकाय अलौकिक असल्याप्रमाणें बोलतात, कधीं नाचतात, कधीं गातात, केव्हां केव्हां भगवानाच्या लीलेचा हावभाव करितात. याप्रमाणें परमात्ममय होऊन अत्यंत सुखी होत्साते तूष्णींभाव धारण करितात.] ३१–३२.

हरिकथेची महिमा कैसी । आदरें पुसत्यासांगत्यासी । होती पुण्याचिया राशी । पाप वोखदासी मिळेना ॥ ८६ ॥ त्याचें नामस्मरण करी । सकळ पातकांतें हरि हरी । तो स्वयें प्रगटला अंतरीं । पातकां उरी उरे कैची ॥ ८७ ॥ साधनरूपभक्तीच्या युक्तीं । पूर्ण सप्रेम उपजे भक्ती । ते भक्तीची निजस्थिती । ऐक चक्रवर्ती सज्ञाना ॥ ८८ ॥ सद्भावें निजभजन करी । हृदयीं प्रकटतां श्रीहरी । तंव देहींचीं चिन्हें बाहेरी । क्षणामाझारीं पालटती ॥ ८९ ॥ परस्परें निजसंवादू । करितां जाला स्वरूपावबोधू । नेत्रीं जळ अंगीं स्वेदू । प्राणस्पंदू पांगुळे ॥ ५९० ॥ चित्तचैतन्यां होतां भेटी । हर्षें बाष्प दाटे कंठीं । पुलकांकित रोमांच उठी । उन्मीलित दृष्टी पुंजाळे ॥ ९१ ॥ करितां अच्युतचिंतन । सप्रेम गहिंवरे मन । अट्टहासें करी रुदन । अनिवार स्फुंदन ऊर्ध्वश्वासें ॥ ९२ ॥ त्या रुदनासवेंचि हर्ष प्रगटे । त्या हर्षाचेनि नेटेंपाटें । हांसों लागे कडकडाटें । सुखोद्भटें गदगदोनी ॥ ९३ ॥ मीपपणाचेनि अनुरोधें । गिळिलों होतों मोहमदें । तो सुटलों गुरुकृपावबोधें । तेणें परमानंदें डुल्लत ॥ ९४ ॥ मी माझेनि भवभानें । मज मी चुकलों मीपणें । मज मी भेटलों सद्गुरुवचनें । आनंदें तेणें उल्हासे ॥ ९५ ॥ कैसें सद्गुरुवचन अलोलिक । मीच भोगीं नित्यसुख । येणें आश्चर्यें देख । स्वानंदोन्मुख उल्हासें ॥ ९६ ॥ संसारबागुलाचें । भय लागलें नेणों कैचें । तें गुरुवाक्यें दवडिलें साचें । म्हणोनि नाचे निर्लज्ज ॥ ९७ ॥ जेवीं माउली देखोनी डोळां । बालक नाचे नानाकळा । तेवीं गुरुवाक्याचा सोहळा । देखोनि स्वलीळा निजभक्त नाचे ॥ ९८ ॥ तेणें निजनृत्यविनोदें । फावलेनि निजबोधें । नानापरींचीं भगवत्पदें । सुखानुवादें स्वयें गातू ॥ ९९ ॥ तेणें कीर्तनकीर्तिगजरें । त्रैलोक्य सुखें सुभरे । परमानंदूही डुंबरे । सुखोद्गारें तुष्टोनि ॥ ६०० ॥ तेंही सांडोनियां गाणें ।

हरिकथेचा महिमा कसा आहे, हें आदरानें विचारणारा आणि तो सांगणारा यांच्यापुढें पुण्याच्या राशी पडतात. त्यांच्यापाशीं पाप औषधालाहि सांपडत नाहीं. ८६ नुस्तें नामस्मरण केल्यानें जर श्रीहरि सर्व पातकांचें हरण करितो, तर मग तो स्वतःच हृदयांत प्रकट झाला असतां तेथें पातक उरणार कोठलें ? ८७ हे ज्ञानी सार्वभौम राजा, साधनरूप भक्तीच्या योगानें पूर्ण सप्रेम भक्ति उत्पन्न होते. त्या भक्तीचें स्वरूप मी तुला सांगतों. ८८ सद्भावानें भजन करितां करितां हृदयामध्यें श्रीहरि प्रकट होतो, त्याबरोबर एका क्षणांत देहांतील चिन्हें बाहेर उमटलेलीं दिसतात. ८९ परस्परांनीं आत्मस्वरूपाचा संवाद केला असतां जेव्हां स्वरूपाचा बोध होतो, तेव्हांच नेत्रांत आनंदाश्रु येतात, अंगाला घाम सुटतो आणि श्वासोच्छ्वास मंद होतो. ५९० अनेक चित्तांमध्यें-चैतन्य आत्मा प्रकट झाला असतां आनंदातिशयानें कंठ दाटून येतो, अंगावर रोमांच येतात, डोळे अर्धवट मिटूं लागतात व प्रेमाश्रु वाहूं लागतात. ९१ अच्युताचें चिंतन केलें असतां मन प्रेमानें आर्द्र होतें आणि भक्त अतिशय स्फुंदून स्फुंदून ओक्साबोक्सीं रडूं लागतो. ९२ त्या रडण्याबरोबरच हर्षहि प्रकट होतो, आणि तो पोट धरून मोठमोठ्यानें हंसूं लागतो. ९३ 'मी आजपर्यंत अहंकारामुळें प्राप्त झालेल्या मोहमदाकडून गिळिलों गेलों होतों, तो आतां गुरुकृपेनें झालेल्या बोधानें मुक्त झालों,' असें म्हणून त्या परमानंदानें डोलूं लागतो. ९४ 'हा संसार माझा आहे या मिथ्या अभिमानानें मी मलाच पारखा झालों होतों पण, आतां सद्गुरुवचनानें, मीं आपल्याला ओळखिलें,' असें बोलून तो आनंदानें उल्हसित होतो. ९५ सद्गुरूचें वचन कसें निश्चित आहे, पहा. पूर्वी संसारतापानें तप्त होणारा मीच आतां नित्य सुख भोगीत आहें, याचें त्याला आश्चर्य वाटतें. ९६ संसाररूपी बागुलबुवाचें भय कोठून कसें आलें, तें कांहीं कळत नाहीं. पण गुरुवाक्यानें त्याला घालवून व खरोखरच त्याला घालवून दिलें, असें समजून तो निर्भय होऊन नाचूं लागतो. ९७ ज्याप्रमाणें माता दृष्टीस पडतांच बालक नानाप्रकारच्या चेष्टा करीत नाचूं, बागडूं लागतें, त्याप्रमाणें गुरुवाक्याचा सोहळा पाहून भक्त आपल्या लीलेनें नाचूं लागतो. ९८ या आपल्या नृत्यविनोदानें प्राप्त झालेल्या आत्मबोधानेंच अनेक प्रकारचीं भगवद्वर्णनपर पदें स्वतः मोठ्या आनंदानें गाऊं लागतो. ९९ त्या कीर्तनगजरानेंच त्रैलोक्य सुखानें भरून जातें. त्या सुखोद्गारानें संतुष्ट होऊन परमानंदहि उचंबळतो. ६०० पुढें

गर्जों लागे अतिसत्राणें । दुजें नाहीं नाहीं म्हणे । गाणें ऐकणें म्यां माझें ॥ १ ॥ मीचि गाता मीचि श्रोता । माझें गाणें मीचि तत्त्वतां । जगीं मीचि एकुलता । द्वैताची कथा असोनि नाहीं ॥ २ ॥ सद्भावें भगवत्परिचर्या । करितां पारुषे कर्मक्रिया । अहं सोहं निरसोनियां । वृत्तीहि लया जाय तेथें ॥ ३ ॥ एवं सप्रेम भक्तिसंभ्रमू । तेणें निरसे साधनश्रमू । फिटे निःशेष भवभ्रमू । वाचांसीं उपरमू इंद्रियां होय ॥ ४ ॥ जेथें एक ना दुसरें । सन्मुख ना पाठिमोरें । जेथ सुखही निजसुखामाजीं विरे । तें स्वरूप निर्धारें निजशिष्य होती ॥ ५ ॥ जेवीं बाळाचे लळे पाळणें । हे व्यालीचि वेदना जाणे । कां शिष्यासी पूर्ण बोध करणें । तेथील कळवळणें सद्गुरु जाणे ॥ ६ ॥ बाळका लेवविल्या लेणें । जेवीं माउली निवे तेणें । कां शिष्यसुखें सुखावणें । हें सद्गुरु जाणे परिपूर्णबोधें ॥ ७ ॥ इंद्रियें नेणती ज्याचें घर । जें मना वचना अगोचर । बुद्धीसि न कळे ज्याची मेर । ऐशी निर्विकार निजवस्तु ॥ ८ ॥ दृष्टीं दाविजे साक्षात । हातीं देईजे पदार्थ । तैसा नव्हे गा परमार्थ । तोहि सद्गुरुनाथ प्रबोधी शिष्यां ॥ ९ ॥ शिष्यासी करावया प्रबोध । बोधिता सद्गुरु अगाध । यालागीं शिष्य सुखें स्वानंद । भोगी परमानंद गुरुरावो ॥ ६१० ॥ शिष्यासी आकळे परब्रह्म । तंव तंव निरसे त्याचा भ्रम । तेणें सद्गुरूसी परम । सुखसंभ्रम उल्हासे ॥ ११ ॥ सेवकु परचक्र विभांडी । तंव राजा उभारी यशाची गुढी । शिष्य परमानंदीं दे बुडी । तेणें गुरूसी गाढी सुखावस्था ॥ १२ ॥ जो शिष्यकृपेची कळवळ । ज्या सद्गुरूमाजीं प्रबळ । तेथें भागवतधर्म हे सकळ । कवि अविकळ अनन्यश्रद्धा ॥ १३ ॥

तें गायनहि सोडून तो मोठमोठ्यानें 'द्वैत नाहीं द्वैत नाहीं. गाणाराहि मीच व ऐकणाराहि मीच' असें गर्जूं लागतो. १ 'गाता, श्रोता व गायन हें तत्त्वतः मीच आहें. जगांत मी एकुलता एक आहें. द्वैताची वार्ता असली तरी वस्तुतः नाहीं.' २ याप्रमाणें सद्भावनेनें भगवद्भक्ति करूं लागलें असतां कर्मानुष्ठान आपोआप थांबतें. मी, तूं तोच मी इत्यादि भावना सोडून वृत्तीहि भजनांत लय पावते. ३ याप्रमाणें सप्रेम भक्ति दृढ झाली असतां साधनानुष्ठानामुळें होणारा श्रम आपोआप नाहींसा होतो व सर्व संसारभ्रम निवृत्त होतो. परा, पश्यंती, मध्यमा व वैखरी या चार वाणींसह इंद्रियें शांत होतात. ४ जेथें अद्वैत व द्वैतहि नाहीं, संमुख असें कांहीं नाहीं व विमुख असेंहि कांहीं नाहीं, जेथें लौकिकसुखहि आत्मसुखांत विरून जातें तेंच स्वरूप शिष्य निश्चयानें होतात. ५ जी पुत्रवती आहे तीच आपल्या बालकाला कसें पाळलें पाहिजे, तें जाणतें. त्याचप्रमाणें शिष्याला पूर्ण बोध होईल असें शिक्षण प्रेमानें कसें द्यावें, हें एक सद्गुरूच जाणतो. ६ बाळकाच्या अंगावर अलंकार घालून आईला जसें सुख होतें, त्याचप्रमाणें शिष्याला पूर्णज्ञानी करून त्याच्या सुखानें आपण सुखी कसें व्हावें हें एक सद्गुरूच जाणतो. ७ इतर इंद्रियें, वाणी व मन यांचा विषय न होणारी व निरतिशय व्यापक अशी निर्विकार आत्मवस्तु ८ साक्षात् डोळ्यांनीं दाखवितां येईल किंवा एखाद्या पदार्थाप्रमाणें हातांत देतां येईल अशी नाहीं. हे राजा, परमार्थ ही लौकिक वस्तु नव्हे. तथापि सद्गुरूनाथ शिष्यांना त्याचाहि बोध करितात. ९ शिष्याला परमार्थाचा बोध करावयास बोध करणारा सद्गुरूहि तितकाच अगाध ज्ञानी लागतो आणि असाच अगाध ज्ञानी शिष्याला सुखी करून त्याच्या सुखानें स्वतः परमानंद भोगितो. ६१० शिष्याच्या बुद्धीला परब्रह्माचें आकलन जसें जसें होत जातें तसा तसा त्याचा भ्रम कमी होऊं लागतो आणि त्याचा भ्रम कमी होऊं लागला आहे, असें पाहून गुरूलाहि आनंदाचें भरतें येतें. ११ तिकडे सेनापति वगैरे राजसेवक शत्रुसैन्याचा पराभव करितो; पण इकडे राजा यशाची गुढी उभारितो. तसेंच शिष्य परमानंदांत निमग्न झाला आहे असें पाहून गुरूहि परम सुखी होतो. १२ ज्या सद्गुरूमध्यें शिष्यावर अनुग्रह करण्याची प्रबल कळकळ असते, त्यामध्यें हे भागवतधर्म पूर्णपणें रहातात आणि तोच ज्ञानी सद्गुरु पूर्ण अनन्यश्रद्धेनें युक्त असतो. ६१३.

इति भागवतान् धर्मान् शिक्षन् भक्त्या तदुत्थया । नारायणपरो मानामञ्जस्तरति दुस्तराम् ॥ ३३ ॥

ऐशी हे भागवतधर्मस्थिती । शरण जाऊनि सद्गुरूप्रती । अभ्यासावी भगवद्भक्ती । तैं मायेची शक्ती बाधूं न शके ॥ १४ ॥ माया वेदशास्त्रां अनावर । ब्रह्मादिकां अतिदुस्तर । ते सुखें तरती भगवत्पर । हरिनाममात्रस्मरणार्थें ॥ १५ ॥ हरिनामाच्या गजरापुढें । माया पळे लवडसवडें । यालागीं तरणोपावो घडे । सुख सुरवाडे हरिभक्तां ॥ १६ ॥ परात्पर नारायणाची माया । भजतां नारायणाच्या पायां । सुखेंचि तरिजे गा राया । त्या भजनउपाया सांगीतलें ॥ १७ ॥ मायातरणोपायस्थिती । राया तुवां पुशिली होती । तदर्थीं मुख्य भगवद्भक्ती । जाण निश्चिती नृपनाथा ॥ १८ ॥ भक्तीपाशीं नित्य तृप्ती । भक्तीपाशीं नित्यमुक्ती । भक्तीपाशीं भगवत्प्राप्ती । मायानिवृत्ती हरिभजनें ॥ १९ ॥ हरिनामभजन-कल्लोळें । माया जीवित्व घेऊन पळे । भक्त तरती भाळेभोळे हरिभजनबळें महामाया॥६२०॥करितां नारायणाची भक्ती । निजभक्त सुखें माया तरती । ते नारायणाची मुख्य स्थिती । स्वयें चक्रवर्ती पुसतु ॥२१॥

रा०—नारायणाभिधानस्य ब्रह्मणः परमात्मनः । निष्ठामर्हथ नो वक्तुं यूयं हि ब्रह्मवित्तमाः ॥ ३४ ॥

—आतां प्रबुद्ध आपल्या उपदेशाचा उपसंहार करितो—

इति भागवतान् धर्मान् शिक्षन्—याप्रमाणें भागवतधर्मांचें शिक्षण घेणारा, **तदुत्थया भक्त्या** —त्या भागवत धर्मापासून उत्पन्न झालेल्या भक्तीनें, **नारायणपरः**—नारायणपरायण झालेला भक्त, **दुस्तरां मायां**—दुस्तर मायेला, **अंजः तरति**—अनायासानें तरून जातात. [याप्रमाणें भागवतधर्मांचें शिक्षण घेणारा भक्त त्या धर्माचरणामुळें उत्पन्न झालेल्या भक्तीनें नारायणपरायण होत्साता दुस्तर मायेचें उल्लंघन करितो.] ३३.

भागवधर्माची स्थिति अशी आहे. सद्गुरूला शरण जाऊन भगवद्भक्तीनें तिचा अभ्यास करावा, म्हणजे मायेची शक्ति बाधूं शकत नाहीं. १४ माया वेदशास्त्रांना अनावर आहे, ब्रह्मादिकांना अति दुस्तर आहे. परंतु भगवद्भक्त केवळ हरिनामस्मरणानें त्या मायेला अनायासानें तरून जातात. १५ हरिनामाच्या गजरापुढें माया त्वरेनें पळून जाते. यामुळें हरिभक्तांस तरणोपाय घडतो व सुखाचा सुकाळ होतो. १६ हे राजा, नारायणाच्या चरणांचें भजन केलें असतां त्या श्रेष्ठ परमात्म्याची माया सहज तरून जातां येते. त्या भजनाचा उपाय मीं तुला सांगितला. १७ राजा, तूं मायेच्या तरणोपायाविषयीं प्रश्न केला होतास, यास्तव हे नृपश्रेष्ठा, भगवद्भक्ति हाच त्याचा मुख्य उपाय आहे, हें तूं निश्चयानें समज. १८ भक्तीजवळ तृप्ति, मुक्ति व भगवतप्राप्ति नित्य असते व हरिभजनानें मायेची निवृत्ति होते. १९ भगवन्नामकीर्तनाच्या गर्जनेनें माया जीव घेऊन पळत सुटते. भाळेभोळे भक्तसुध्दां हरिभजनाच्या सामर्थ्यानें महामायेला तरून जातात. ६२० ज्या नारायणाच्या भक्तीनें भक्त मायेला तरून जातात त्या नारायणाचें मुख्य लक्षण स्वतः सार्वभौम राजा पुढें विचारितो. ६२१.

—नारायणपरायण भक्त मायेला तरतात, असें प्रबुद्धानें सांगितलें असतां—

राजोवाच—राजा म्हणाला, **नारायणाभिधानस्य**—नारायणसंज्ञक, **ब्रह्मणः**—ब्रह्माचें, **परमात्मनः**—परमात्म्याचें, **निष्ठा**—स्वरूप, **नः**—आम्हांला, **वक्तुं**—सांगण्यास, **अर्हथ**—तुम्ही योग्य आहांत. **हि**—कारण, **यूयं**—तुम्ही, **ब्रह्मवित्तमाः**—श्रेष्ठ ब्रह्मवेत्ते अहां. [ब्रह्मच नारायण, भगवान्, परमात्मा असें म्हटलें जातें. याविषयीं शास्त्रांमध्यें तत्त्ववेत्ते जें अद्वयज्ञान त्याचाच ' ब्रह्म, परमात्मा, भगवान् ' या शब्दांनीं उल्लेख करितात. ' भगवान् नारायणामध्यें हें विश्व आरोपित आहे ' इत्यादि प्रमाणें आहेत. तेव्हां " या सर्व शब्दांनीं ती निर्विशेष वस्तूच सांगितली जाते किंवा त्यांत कांहीं विशेषांश आहे, " असा या राजाच्या प्रश्नाचा भावार्थ आहे.] ३४.

सर्वांभूतीं भगवद्भावो। हा मुख्य मायातरणोपावो। आइकोनि सुखावला रावो। तेणें आनंदें पहाहो परब्रह्म पुसे ॥ २२ ॥ करितां नारायणाची भक्ती। उत्तम भक्त माया तरती। ते नारायणाची निजस्थिती। साक्षेपें नृपती पुसतु ॥ २३ ॥ ब्रह्म परमात्मा नारायण। वस्तूसीच म्हणणें जाण। ते वस्तुनिष्ठा परिपूर्ण। राजा आपण पुसतु ॥ २४ ॥ सकळांमाजीं अधिष्ठान। सबाह्य ज्याचेनि परिपूर्ण। त्या स्वरूपातें नारायण। स्वयें वेदज्ञ बोलती ॥ २५ ॥ तुम्हांऐसे ज्ञाननिधी। भाग्यें जोडलेति त्रिशुद्धी। तुमच्या वचनामृतबोधीं। अहंबुद्धी उपजेना ॥ २६ ॥ तुमचिया वचनोक्तीं। वोसंडली स्वानंदस्फूर्ती। लांचावली चित्तवृत्ति। श्रवणें तृप्ती कदा न मनी ॥ २७ ॥ ऐकोनियां रायाचा श्रेष्ठ प्रश्न। प्रबुद्धाधाकुटा पिप्पलायन। तो बोलावया आपण। स्वानंदें पूर्ण सरसावला ॥ २८ ॥

पिप्पलायन उवाच—स्थित्युद्भवप्रलयहेतुरहेतुरस्य यत्स्वप्नजागरसुषुप्तिषु सद्बहिश्च।
देहेन्द्रियासुहृदयानि चरन्ति येन सञ्जीवितानि तदवेहि परं नरेन्द्र ॥ ३५ ॥

अगा ज्याचेनि उपजे उत्पत्ती। त्याचेनि अंगें स्थितीसी स्थिती। ज्याचेनि प्रळया प्रळयशक्ती। ऐसा जो त्रिजगतीं मुख्य हेतू ॥ २९ ॥ यापरी जो जगाचा हेतू। स्वयें स्वसत्ता हेतुरहितू। सच्चिदानंदें सदोदितू। तो जाण निश्चितू नारायणु ॥ ६३० ॥ जेवीं साय-

---

सर्व प्राण्यांमध्यें भगवद्भावना ठेवणें हा मायेच्या तरणाचा मुख्य उपाय आहे. हें ऐकून राजा अत्यंत संतुष्ट झाला आणि त्या आनंदानें तो परब्रह्माचें स्वरूप विचारूं लागला. २२ ज्या नारायणाची भक्ति केली असतां उत्तम भक्त मायेला तरतात, त्या नारायणाचें स्वरूप राजा बुद्धिपुरःसर विचारितो. २३ सद्वस्तूलाच ब्रह्म, परमात्मा व नारायण म्हणतात. तेंच परिपूर्ण वस्तुस्वरूप आहे. २४ तेंच सर्व जगाचें अधिष्ठान, त्याच्याच योगानें सर्व सबाह्य परिपूर्ण व त्यालाच वेदज्ञ स्वतः नारायण असें म्हणतात. यास्तव त्याचें तत्त्व मला सांगा. २५ खरोखर, तुमच्यासारखे ज्ञाननिधि मला आज मोठ्या भाग्यानेंच लाधले आहेत. तुमच्या वचनामृताचें प्राशन करून माझी अहंबुद्धि शांत झाली आहे. २६ स्वानंदाला भरतें आलें आहे. चित्तवृत्ति श्रवणास लांचावली आहे. कितीहि श्रवण केलें तरी तिची तृप्ति होत नाहीं. २७ राजाचा हा श्रेष्ठ प्रश्न ऐकून प्रबुद्धाचा धाकटा भाऊ पिप्पलायन मोठ्या आनंदानें बोलावयास पुढें सरसावला. ६२८.

पिप्पलायनः उवाच–पिप्पलायन बोलला, अस्य–या विश्वाची, स्थिति-उद्भव-प्रलयहेतुः – स्थिति, उत्पत्ति व लय यांचें कारण, अहेतुः–पण स्वतः हेतुरहित, यत् स्वप्नजागरसुषुप्तिषु सत्–जें स्वप्न, जागर व सुषुप्ति यांमध्यें अनुवृत्त होणारें, बहिः च–आणि जें समाध्यादि बाह्य अवस्थांतहि अनुवृत्त असलेलें, येन–ज्याच्या योगानें, देहेंद्रियासुहृदयानि संजीवितानि चरन्ति–देह, इंद्रियें, प्राण व मन हीं सचेतन होऊन प्रवृत्त होतात, नरेंद्र–हे राजा, तत् परं अवेहि–तेंच परम तत्त्व आहे, असें तूं जाण. [या श्लोकांत पूर्वोक्त प्रश्नाचें उत्तर दिलें आहे. त्याचा भावार्थ असा–या विश्वाच्या उत्पत्ति-स्थिति-लयांचें कारण, पण स्वतः हेतुरहित, असा जो नारायण तें परम तत्त्वच आहे, असें तूं समज. स्वप्न, जागृति, सुषुप्ति यांमध्यें अनुवृत्त होणारें, कारण ' तुरीयं त्रिषु संततं ' असें हाच मुनि पुढें सांगणार आहे व या तीन अवस्थांहून भिन्न अशा समाधि इत्यादि अवस्थांमध्येंहि अनुवृत्त होणारें जें सत्, ज्याला ब्रह्म असें म्हणतात, तेंहि परतत्त्वच आहे असें तूं जाण. देह, इंद्रियें, प्राण व मन हीं ज्याच्या योगानें संजीवित होऊन आपापल्या व्यापारांत प्रवृत्त होतात त्यालाच परमात्मा म्हणतात. हा परमात्माहि परमतत्त्व आहे, असें तूं जाण. याप्रमाणें जगत्हेतुत्व, सर्वत्र अनुवृत्ति व संजीवन या तीन लक्षणांनीं नारायण, ब्रह्म व परमात्मा या तीन नांवांनीं बोललें जात असलेलेंहि तें एकच परमतत्त्व आहे, असें तूं समज.] ३५.

हे राजा, ज्याच्यापासून सृष्टि उत्पन्न होते, तिचें पालन होतें व प्रलय काळीं ज्यांत तिचा लय होतो, जो त्रैलोक्याचें व जगाचें मुख्य कारण आहे, २९ पण स्वतः मात्र आपल्या सत्तेनें हेतुरहित आहे, जो सत्, चित् व आनंद यांनीं सर्वदा परिपूर्ण आहे, तोच नारायण होय, असें तूं निश्चयानें जाण. ६३० ज्याप्रमाणें सायंकाल, प्रातःकाल

प्रातर्मध्यान्ह । तिहीं काळीं अलिप्त गगन । तेवीं उत्पत्ति-स्थिति-प्रळयीं जाण । समान नारायण परमात्मा ॥ ३१ ॥ उत्पत्ति-स्थिति-प्रळयांत । म्हणसी कोण देखे येथ । तेचि अर्थीचा दृष्टांत । स्फुरदर्थ अवधारीं ॥ ३२ ॥ जागृतीं स्वप्न आणि सुषुप्ती । तिन्ही व्यापूनि समाधीही परती । ज्याची साक्षित्वें स्फुरे स्फूर्ती । तो जाण निश्चितीं नारायण ॥ ३३ ॥ जागृतीचें जाणपण । स्वप्नाचें मिथ्या भान । सुषुप्तीचा साक्षी पूर्ण । तो नारायण निश्चित ॥ ३४ ॥ एवं परमात्मा परंज्योती । आत्मा हृदयस्थ त्रिजगतीं । त्यातें नारायण म्हणती । जाण निश्चितीं नृपनाथा ॥ ३५ ॥ ऐसी सांगतां ब्रह्मस्फूर्ती । अगम्य वाटेल ब्रह्मप्राप्ती । सहजें ब्रह्म आतुडे हातीं । ऐक ते उपपत्ती सांगेन ॥ ३६ ॥ तरी परमात्मा ब्रह्ममूर्ति पूर्ण । तुझे हृदयीं नांदे आपण । ज्याचेनि मन बुद्धि प्राण । इंद्रियें जाण वर्तती ॥ ३७ ॥ नयनें तेणें तेजें देखणें । रसना तेणें स्वादें चाखों जाणे । श्रवण तेणें अवधानें । शब्दज्ञानें प्रबोधिती ॥ ३८ ॥ तेणें अहंकारां अहंभाव । तेणेंचि मनासी मंतव्य । तेणेंचि चित्तासी चेतव्य । बुद्धि बोद्धव्य तेणें ब्रह्मावबोधें ॥ ३९ ॥ तेणें जड देह सचेतन । तेणेंचि कळे मृदु कठिण । तेणेंचि चरणाच्या ठायीं गमन । करीं करग्रहण त्याचिये सत्ता ॥ ६४० ॥ त्याचेनि प्राण परिचरती । त्याचेनि निमिषोन्मेषस्फूर्ती । त्याच्या आनंदलेशस्थिती । आनंद उपस्थीं भोगिती प्राणी ॥ ४१ ॥ एवं चाळकू जो त्रिजगतीं । जो स्वानंदें नांदे हृदयस्थिती । त्यातें नारायण म्हणती । तोचि निश्चितीं परमात्मा ॥ ४२ ॥ ज्याचेनि मन बुद्धि प्राण । इंद्रियें विचरती संपूर्ण । तो तूं म्हणसी त्यांअधीन । हें कल्पांतीं कदा न घडे ॥ ४३ ॥ तेथ जाणपणें जाणों जासी । तैं जाणावें तेंचि नेणसी । तेथ ज्ञातेपणें ज्ञानासी । स्वरूपापाशीं रिगू नाहीं ॥ ४४ ॥ जाणीव आणि नेणीव । हे सोडूनि सर्व भाव । जैं उपजे सद्भाव । तैं ब्रह्म स्वयमेव पाविजे ॥ ४५ ॥

व मध्यान्ह या तीन्ही कालांनीं आकाश लिप्त होत नाहीं, त्याप्रमाणें उत्पत्ति-स्थिति-लय या तिन्ही कालीं परमात्मा नारायण समान व अलिप्त असतो. ३१ उत्पत्ति, स्थिति व प्रलय यांमध्यें पहाणारा कोण म्हणून म्हणशील तर याविषयीं स्पष्टार्थ दृष्टान्त देतों, तो ऐक. ३२ जाग्रदादि तीन अवस्थांना व्यापून त्यांच्या पलीकडे असलेल्या समाधीमध्येंहि साक्षित्वानें ज्याचा अनुभव येतो, तो नारायण होय, असें तूं निश्चयानें जाण. ३३ जागृतीचें ज्ञातृत्व, स्वप्नाचें मिथ्याभान व सुषुप्तीचा पूर्ण साक्षी तो नाराणच आहे. ३४ याप्रमाणें जो हृदयस्थ परमज्योति परमात्मा सर्व भूतांचा अंतरात्मा आहे त्यालाच नारायण म्हणतात. ३५ पण ही अशा प्रकारची ब्रह्मप्राप्ति अगम्य आहे, असें तुला वाटेल, म्हणून ब्रह्म सहज हातीं कसें लागेल ती युक्ति मी तुला सांगतों. ३६ तो पूर्ण ब्रह्ममूर्ति परमात्मा तुझ्या हृदयामध्यें आहे. त्याच्या सत्तेनेंच मन, बुद्धि, प्राण व इंद्रियें आपापला व्यापार करितात. ३७ त्याच्याच तेजानें नेत्र रूप पहातात, त्याच्याच स्वादानें रसना रस ग्रहण करिते, श्रवणेंद्रिय शब्दाचें ग्रहण करितें, ३८ अहंभाव अहंकार धारण करितो, त्याच्याचमुळें मन मनन करितें, चित्त चिंतन करितें व बुद्धि जाणते. ३९ त्यामुळेंच देह सचेतन होतो. मृदु, कठिण इत्यादि स्पर्श कळतात, पायांमध्यें गमन करण्याची व हातांमध्यें ग्रहण करण्याची शक्ति येते. ६४० प्राण श्वासोच्छ्वास करितात, नेत्रांचे निमिषोन्मेष होतात व प्राणी विषयानंदानुभव घेतात. ४१ याप्रमाणें जो त्रिभुवनांतील चालक हृदयामध्यें स्वानंदानें नांदतो त्याला नारायण म्हणतात व तोच परमात्मा आहे. ४२ ज्याच्या योगानें मन, बुद्धि, प्राण, इंद्रियें आपला सर्व व्यवहार करितात तो इंद्रियादिकांच्या अधीन आहे असें तूं म्हणतोस, पण ही गोष्ट कल्पांतींहि घडणें शक्य नाहीं. ४३ तूं ज्ञाता होऊन त्याला जाणावयास जातोस पण तें जाणणेंच विसरतोस. कारण स्वरूपामध्यें ज्ञातृत्वानें ज्ञानाचा प्रवेश होत नाहीं. ४४ यास्तव ज्ञानत्व, अज्ञानत्व इत्यादि सर्व भाव सोडून जेव्हां सद्भाव उपजतो, तेव्हां ब्रह्म स्वतःच प्राप्त होतें. ६४५.

नैतन्मनो विशति वागुत चक्षुरात्मा प्राणेन्द्रियाणि च यथाऽनलमर्चिषः स्वाः ।
शब्दोऽपि बोधकनिषेधतयात्ममूलमर्थोक्तमाह यदृते न निषेधसिद्धिः ॥ ३६ ॥

वैकुंठ कैलास क्षीराब्धी । मन कल्पी कल्पनाविधी । परी आत्मा कल्पावया त्रिशुद्धी । मनबुद्ध्यादी सरेना ॥ ४६ ॥ स्वयें कल्पी त्रिभुवन । तें स्वरूपीं रिघों न शके मन । बुद्धि निश्चयात्मक पूर्ण । तीसही जाण अगम्य वस्तू ॥ ४७ ॥ जें मनबुद्धिअगोचर । तें वाचेसी अतिदुस्तर । वस्तु नव्हे शब्दगोचर । परात्पर परब्रह्म ॥ ४८ ॥ मोटे बांधतां आकाशातें । चारी पालव पडती रिते । तेवीं शब्दें बोलावें वस्तूतें । तंव शब्द शब्दार्थें निर्धर्म ॥ ४९ ॥ प्राणाचेनि निजढाळें । जे कां क्रियाशक्ती चळे । ते क्रियेसी वस्तु नातळे । मा इंद्रियां आकळे कैसेनी ॥ ६५० ॥ जेवीं थिल्लरांआंतौता ॥ बिंबोनि वोला नव्हे सविता । तेवीं मनबुद्धिइंद्रियांपरता । जाण तत्त्वतां परमात्मा ॥५१॥ जो मनाचें आदि मन । जो बुद्धीची

—वरील श्लोकांत 'अवेहि' म्ह॰ जाण असें सांगितलें; पण त्यामुळें त्या तत्त्वाला विषयत्व प्राप्त झालें, म्हणून पुढील श्लोकानें त्याचा निषेध करितात—

मनः एतत् न विशति–मन या परम तत्त्वाला विषय करीत नाहीं, **वाक् उत्**-तसेंच वागिंद्रिय, **चक्षुः**–चक्षुरिंद्रिय, **आत्मा**–बुद्धि, **प्राण–इंद्रियाणि च**–क्रियाशक्ति व इंद्रियें या परम तत्त्वाला विषय करीत नाहींत. **यथा**–ज्याप्रमाणें, **अनलं**–अग्नीला, **स्वाः अर्चिषः**–त्याचे अंशभूत विस्फुलिंगादि प्रकाशित करीत नाहींत व जाळीत नाहींत त्याप्रमाणें, **शब्दोपि**–शब्दहि, **बोधकनिषेधतया**–बोधकनिषेधरूपत्वानें, **आत्ममूलं**–आत्म्याविषयीं प्रमाण होऊन, **अर्थोक्तं**–आर्थिकरीत्या, **आह**–त्याचा बोध करितो. कारण, **यदृते**–त्या ब्रह्मावांचून, **निषेधसिद्धिः न**–निषेधाची सिद्धि होत नाहीं. [या परम तत्त्वाला मन विषय करीत नाहीं. वाक्हि विषय करीत नाहीं. चक्षुरिंद्रिय, आत्मा म्ह० बुद्धि त्याला विषय करीत नाहीं. प्राणहि आपल्या क्रियाशक्तीनें त्याला प्राप्त होत नाहीं. इतर इंद्रियेंहि त्याला विषय करीत नाहींत. जसे अग्नीचे अंशभूत विस्फुलिंगादिक अग्नीला प्रकाशित करीत नाहींत किंवा दग्ध करीत नाहींत, त्याप्रमाणेंच अंशभूत इंद्रियादि त्याला प्रकाशित करीत नाहींत. जड मन–आदिवृत्तींमध्यें अभिव्यक्त होणारा जो आत्मप्रकाश त्याला व त्या त्या वृत्तीला प्रकाशित करणाऱ्या आत्मप्रकाशाला मन-आदिप्रकाशविषयत्व नाहीं. याविषयीं 'प्राणस्य प्राणं' बृ. भा. अ. ४ ब्रा. ४ पृ. ३२४ 'यतो वाचो निवर्ततें' तै. भा. २-९ पृ. १७२ इत्यादि श्रुति प्रमाण आहेत. अहोपण, 'मी त्या औपनिषद पुरुषाविषयीं प्रश्न करितों.' बृ. ३-९-२६ पृ. २६२ अशी श्रुति असल्यामुळें आत्म्याचें शब्दविषयत्व प्रतीत होतें, अशी आशंका घेऊन पिप्पलायन 'शब्दोपि' इत्यादि उत्तरार्धानें म्हणतो. शब्दहि आत्म्याविषयीं प्रमाण होत नाहीं म्ह० तो सुद्धां साक्षात् आत्मप्रतिपादन करूं शकत नाहीं तर लक्षणेनें आत्मप्रतिपादन करितो. कारण तो स्वतःच आपल्या बोधकत्वाचा निषेध करणारा आहे. 'यतो वाचो निवर्तंते' इत्यादि अनेक श्रुति आत्मा वागादि इंद्रियांचा विषय होत नाहीं असें सांगतात. तर मग श्रुति आत्मप्रतिपादन करीत नाहींतच, मग असें असतांना त्या लक्षणेनें प्रतिपादन करितात असें कां म्हणतां ? अशी आशंका आली असतां मुनि म्हणतो– 'नेति नेति' 'अस्थूलं, अनणु,' इत्यादि निषेधाचें अवधिभूत–अधिष्ठानभूत जें ब्रह्म त्यावांचून त्या निषेधाची सिद्धीच होत नाहीं. कारण जो जो निषेध तो सावधि म्ह० अधिष्ठानयुक्त असतो.] ३६.

मन, वैकुंठ, कैलास, क्षीरसागर वगैरे सर्वांची कल्पना करितें; पण आत्म्याची कल्पना करण्याचें सामर्थ्य त्यामध्यें नाहीं. ४६ स्वतः त्रिभुवनाची कल्पना करणारें मनहि आत्मस्वरूपांत प्रवेश करूं शकत नाहीं. निश्चयात्मक बुद्धीलाहि तें अगम्य आहे. ४७ जें मन व बुद्धि यांचा विषय न होणारें तें परात्पर परब्रह्म वागिंद्रियाचा विषय होणें कधींच शक्य नाहीं. ४८ आकाशाची मोट बांधूं लागलें असतां त्याचे चारी पदर रिते पडतात. त्याप्रमाणें शब्दानें आत्मवस्तु बोलूं लागल्यास तो शब्दार्थहीनच होतो. ४९ प्राणाच्या चलनसामर्थ्यानें शरीरांतील सर्व क्रिया होतात, पण वस्तु त्यांचा विषय होत नाहीं. मग इंद्रियांचा विषय कसा होणार ? ६५० डबक्यांत प्रतिबिंबित झालेला सूर्य त्यांतील पाण्यानें जसा भिजत नाहीं, तसाच मन-बुद्धि-इंद्रियें यांहून पर असलेला परमात्मा वस्तुतः त्यांनीं लिप्त होत नाहीं. ५१ जो मनाचेंहि आदिमन, जो बुद्धीचेंहि कारण, नयनाची दर्शनशक्ति, श्रवणाचें सावधान

बुद्धि सज्ञान। जो नयनाचें आदि नयन। जो श्रवणाचें श्रवण सावधानत्वें ॥ ५२ ॥ जो घ्राणाचें निज-घ्राण। जो रसनेची रसना आपण। जो त्वचेची निजत्वचा पूर्ण। जीवाचा तो जाण जीवू स्वयें ॥५३॥ जो इंद्रियांचा प्रकाशिता। जो कर्म करोनि अकर्ता। तो इंद्रियीं इंद्रियार्था-। विषयीं सर्वथा हों नेणे ॥५४॥ जेथ बुद्धीचि न वळंघे। तेथ मन मनपणें केवीं रिघे। मा श्रवणनयनघ्राणयोगें। विषयसंयोगें केवीं भेटे ॥ ५५ ॥ जेथ प्राणशक्ती न चले पुढें। तेथ वाचा स्वयें लाजिली मुरडे। मा कर्मेंद्रियांसी कोणीकडे। पवाडु पुढें जोडेल ॥ ५६ ॥ अग्नीपासूनि आल्या अनेग। क्षणक्षणां निघती चांग। परी आल्यांमाजीं अग्नीचें अंग। सर्वथा सांग प्रगटेना ॥ ५७ ॥ कां सूर्यापासूनि सूर्यकांत। प्रकाशती असंख्यात। परी सूर्यकांताआंत। कदा भास्वत प्रगटेना ॥ ५८ ॥ जेवीं सिंधूपासूनि तरंग। प्रकाशती अति अनेग। परी तरंगीं सिंधूचें अंग। सर्वथा सांग प्रगटेना ॥५९॥ तेवीं ब्रह्मापासोनि करणें। प्रकाशती अनेकपणें। परी त्यां इंद्रियां ब्रह्म जाणणें। हें जीवें प्राणें घडेना ॥६६०॥ जरी केळापासूनि केळी निपजे। कां साखरेपासूनि ऊंस उपजे। तरी इंद्रियीं ब्रह्म जाणिजे। हें न ये निजवोजें ब्रह्मादिकां॥ ६१ ॥ आशंका॥ इंद्रियीं नव्हे ब्रह्मज्ञान। तैं जीवाचें भवबंधन। कदाकाळीं न तुटे जाण। जन्ममरण अनिवार ॥६२॥ 'शब्दादेवापरोक्षे' ति। ऐशी श्रुतिशास्त्रोपपत्ती। तेही मिथ्या वाटे वदंती। ऐसें तूं निश्चितीं मानिसी राया ॥ ६३ ॥ तेंही अर्थीचें निरूपण। ऐक राया सावधान। शब्द निमोनि आपण। दे ब्रह्मज्ञान जीवासी ॥ ६४ ॥

पूर्वील श्लोकार्ध–शब्दोऽपि बोधकनिषेधतयात्ममूलमर्थोक्तमाह यदृते न निषेधसिद्धिः।

जीवू सोडवावया होडा। शब्दें सवेग उचलिला विडा। तेणें घेतां तत्वांचा झाडा। आपणही पुढां निमाला ॥ ६५ ॥ श्रुति 'नेति नेति' येणें शब्दें। अतद्व्यावृत्तिनिषेधबोधें। परी साक्षात् वेदानुवादें। निज वस्तु शब्दें न बोलवे ॥ ६६ ॥ शब्दासी जें वाच्य नोहे। तेंचि परब्रह्म जाणावें।

श्रवण, ५२ जो घ्राणाचें मूळ, रसनेचीहि रसना, त्वगिंद्रियाचा आधार, जीवाचा जीव, इंद्रियांना प्रकाशित करणारा, कर्में करूनहि अकर्ता, तो इंद्रियांचा विषय केव्हांहि होत नाहीं. ५४ अहो, जेथें बुद्धि सुद्धां पोंचत नाहीं, तेथें मन आपल्या मननसामर्थ्यानें प्रवेश कसें करणार ! आणि श्रवण, नयन, इत्यादि विषयांचा तरी तें विषय कसें होणार ! ५५ अहो, जेथें प्राणहि कुंठित होतो आणि वागिंद्रिय लाजून परत फिरतें, तेथें कर्मेंद्रियाची काय कथा ! ५६ अग्नीपासून क्षणोक्षणीं अनेक ठिणग्या उडतात, पण त्यांत अग्नीचें स्वरूप पूर्णपणें प्रकट होत नाहीं. ५७ सूर्यापासून असंख्य किरण प्रकाश पावतात, पण त्यांत स्वतः सूर्य प्रकट होत नाहीं. ५८ समुद्रापासून अनेक तरंग उद्भवतात, पण त्यांत समुद्राचें पूर्ण स्वरूप प्रकट होत नाहीं. ५९ त्याप्रमाणें ब्रह्मापासून अनेक इंद्रियें उद्भवतात, पण त्यांनीं ब्रह्माला जाणणें हें कधींहि संभवत नाहीं. ६६० केळ्यापासून जर केळ उत्पन्न झाली किंवा साखरेपासून ऊंस उत्पन्न झाला तर इंद्रियें ब्रह्माला जाणूं शकतील, पण तसें होणें केव्हांहि शक्य नाहीं. ब्रह्मादिकांनाहि आपल्या सामर्थ्यानें ही गोष्ट घडवून आणतां येत नाहीं. ६१ अहोपण, इंद्रियांनीं जर ब्रह्मज्ञान होत नसेल तर जीवाचें भवबंधन कधींच तुटणें शक्य नाहीं आणि त्यामुळें जन्म--मरण अनिवार्य आहेत, असें होईल. ६२ शब्दापासूनच अपरोक्ष साक्षात्कार होतो अशी श्रुति व शास्त्र यांची प्रतिज्ञा आहे पण तीहि यावरून खोटी ठरते, अशी आशंका तुला येईल, ६३ म्हणून तिचेंहि निरसन मी करितों, तें तूं सावधान चित्तानें ऐक. शब्द विद्यावृत्ति उत्पन्न करून स्वतः लय पावतो व जीवाला ब्रह्मज्ञान देतो. ६४ त्याविषयींची उपपत्ति मी तुला या श्लोकाच्या उत्तरार्धानें सांगतों. शब्दानें जीवाला संसारांतून सोडविण्याची पैज लावून मोठ्या त्वेषानें विडा उचलला. पण तो जेव्हां तत्त्वांचें परीक्षण करूं लागला, तेव्हां आपला विषय होणारे पदार्थजात आत्मा नव्हे असें पाहून तोहि शेवटीं थकला. ६५ त्यामुळें श्रुति 'नेति नेति' म्ह० पृथ्वी, आप व तेज हें मूर्त भूतत्रयहि आत्मा नव्हे आणि आकाश व वायु हें अमूर्त भूतद्वयहि आत्मा नव्हे; अशा अनात्म पदार्थांच्या निषेधानें बोध करिते; पण तिलाहि साक्षात् वेदानुवादानें आत्मवस्तूचा बोध करवत नाहीं. ६६

तेथील जो खुणे पावे । तो ब्रह्म सद्भावें स्वयें होय ॥ ६७ ॥ श्रुति 'नेति नेति' येणें वचनें । शब्द निषेधूनि वस्तु दावणें । शब्दीं निःशब्द जो लक्षूं जाणे । तेणें पावणें परब्रह्म ॥ ६८ ॥ शब्दु निज-निषेधें जें बोधी । तेथ समरसे ज्याची बुद्धी । तेंचि परब्रह्म गा त्रिशुद्धी । निषेधावधी तो ठावो ॥ ६९ ॥ शब्द निमोनि सर्व शक्ती । जीवासी दे ब्रह्मप्राप्ती । शब्दादेवापरोक्षेति जाण निश्चितीं या नांव ॥ ६७० ॥ वाचा निःशेष निवर्ते । मन बुद्धि न पवे जेथें । तेचि अवधी निषेधातें । परब्रह्म त्यातें बोलिजे ॥ ७१ ॥ जें वाचेचें वदवितें । परी वाचा वदों न शके ज्यातें । जें मनबुद्ध्यादिकां जाणतें । परी मन बुद्धि ज्यातें नेणती ॥ ७२ ॥ जें नयनांतें दाखवितें । परी नयन न देखती ज्यातें । जें श्रवणघ्राणांतें चेतवितें । परी श्रवण घ्राण ज्यातें नेणती ॥ ७३ ॥ एवं सर्वांचें तें जाणतें । परी सर्व सर्वथा नेणे ज्यातें । ज्यासी जाणावयालागीं येथें । आणिक जाणतें असेना ॥ ७४ ॥ ऐसें स्वसंवेद्य निजज्ञातें । ज्यासी दुजें नाहीं जाणतें । शब्द रिघावया तेथें । रिगमु त्यातें असेना ॥ ७५ ॥ जें कृश ना पुष्कळ । जें वक्र ना वर्तुळ । जें सूक्ष्म ना नव्हे स्थूळ । वस्तु केवळ निर्विकार ॥ ७६ ॥ ज्यासी नाहीं रूपगुण । ज्यासी नाहीं आश्रमवर्ण । ज्यासी नाहीं मीतूंपण । ज्यासी जन्ममरण असेना ॥ ७७ ॥ जें हळुवट ना गहिंस । जें चिवळ ना सपोस । जें वसतें ना ओस । जें कां निःशेष निर्धर्म ॥ ७८ ॥ जें ऱ्हस्व ना मोटें । जें वडिल ना धाकुटें । जें विचारितां विवेकवाटे । विवेकुही आटे निःशेष ॥ ७९ ॥ ज्यासी आदि ना अंतु । जें मध्यस्थितिरहितु । जें गुण ना गुणातीतु । अच्युतानंतू अद्वयत्वें ॥ ६८० ॥ त्या स्वरूपाचा वचनपाठ । करावया वेदें केली खटपट । तेथ श्रुतीचाही बोभाट । लाजिली करूनि कष्ट नेतिनेतिवादें ॥ ८१ ॥ वेदू काय नेणोनि परतला । जाणोनि न बोलवेंचि बोला । याचिलागीं

जें शब्दाचा विषय होत नाहीं तेंच ब्रह्म होय व त्याची खूण ज्याला कळते तोच स्वरूपानें स्वतः ब्रह्म होतो. ६७ श्रुति 'नेति नेति' या वचनानें शब्दाचा निषेध करून लक्षणावृत्तीनें वस्तु दाखविते. त्या शब्दांनीं निःशब्द ब्रह्मात्म्याला जो ओळखूं शकतो तोच साक्षात् परब्रह्म होतो. ६८ शब्द निषेधमुखानें ज्याचा बोध करितो, त्या तत्त्वांत ज्याची बुद्धि एकरूप होऊन जाते, तें तत्त्वच परब्रह्म आहे, असें तूं निश्चयानें जाण. तें तत्त्वच निषेधाचा परमावधि आहे. द्वैतनिषेधाचें तें अधिष्ठान आहे. ६९ शब्द आपल्या सर्व शक्तिसह लीन होऊन जीवाला परब्रह्मप्राप्ति करून देतो. शब्दापासूनच अपरोक्षज्ञान होतें, असें जें श्रुतीनें म्हटलें आहे, तें हेंच होय. ६७० वाणी, मन व बुद्धि, हीं ज्याला विषय करीत नाहींत तो निषेधाचा अवधि आहे. त्यालाच परब्रह्म म्हणतात. ७१ जें वाचेला बोलविणारें, पण ती वाक् ज्याच्याविषयीं बोलूं शकत नाहीं, जें मन, बुद्धि, इत्यादिकांना जाणणारें, पण मन, बुद्धि ज्याला जाणत नाहींत, ७२ जें नेत्रांना रूपादि दाखविणारें, पण ज्याला नेत्र पहात नाहींत, जें श्रवण व घ्राण यांना ऐकण्याची व वास घेण्याची शक्ति देतें, पण हीं दोन्हीं इंद्रियें ज्याला जाणत नाहींत, ७३ याप्रमाणें तें सर्वांना जाणणारें, पण सर्व ज्याला सर्वथा जाणत नाहीं व ज्याला जाणण्यास समर्थ असें दुसरें या जगांत कांहींहि नाहीं. ७४ अशा स्वसंवेद्य म्ह० स्वतःच स्वतःला जाणणारें जें तत्त्व त्यांत शब्दाला प्रवेश करावयास अवकाशच मिळत नाहीं. ७५ जें कृश किंवा विपुल नाहीं, जें वक्र किंवा वर्तुळ नाहीं, जें सूक्ष्महि नाहीं व स्थूलहि नाहीं, तेंच केवळ निर्विषय आहे. ७६ ज्याला रूप-गुण-आश्रमवर्ण व 'मी तूं'–पण नाहीं, जन्म, मरण नाहीं, ७७ जें हलकें नाहीं व जडहि नाहीं. जें रोड नाहीं व लठ्ठहि नाहीं, जें वसतें किंवा ओस नाहीं, तर जें निःशेष निर्विषय आहे, ७८ जें आखुड किंवा लांब नाहीं, वडील किंवा धाकटें नाहीं, विवेकाद्वारां विचार करूं लागलें असतां जेथें विवेकहि कुंठित होतो, ७९ ज्याला आदि–अंत-मध्यस्थिति नाहीं, जें सगुण नाहीं व गुणातीतहि नाहीं, जें अद्वयत्वानें अनंत व अच्युत आहे, ६८० त्या स्वरूपाचें शब्दांनीं वर्णन करण्याची खटपट वेदांनीं केली; श्रुतीनेंहि पुष्कळ वाग्विस्तार केला; पण शेवटीं तीं बिचारीं इतके कष्ट करूनहि शेवटीं

तो मौनावला । तटस्थ ठेला निःशब्दें ॥ ८२ ॥ वेदे धरितां दृढ मौन । दर्शनें भांबावलीं जाण । तिहीं धरोनि मताभिमान । करिती वल्गन अतिवादें ॥ ८३ ॥ शब्दांतीं ब्रह्मज्ञान । हे वेदें पावोनि पूर्ण खूण । शब्दें शब्द निषेधून । दृढ मौन तेणें धरिलें ॥ ८४ ॥ वेदरायें धरितां मौन । शास्त्रें भांबावलीं जाण । शोधितां शब्दांचें रान । निजसमाधान न पावती ॥ ८५ ॥ ज्यासी शब्दांतीं ब्रह्मप्राप्ती । त्यासी दर्शनें ऐक्या येती । शास्त्रें स्वयेंचि समजती । ऐक्यें त्रिजगती आभासे ॥ ८६ ॥ ब्रह्म एकाकी अद्वयस्थिती । तुवांचि दाविली उपपत्ती । तेथें ऐक्यरूपें त्रिजगती । म्हणसी कवणाप्रती आभासे ॥ ८७ ॥ ज्याची तुटली वासनाफांसोटी । विराली अहंकाराची गांठी । प्रारब्ध उतरलें देहाचे तटीं । त्यासी ऐक्यें सृष्टी आभासे ॥ ८८ ॥ त्याच्या अनुभवाची गोड गोष्टी । सांगावया उल्हास पोटीं । पिप्पलायनु स्वानंदतुष्टी । ब्रह्मैक्यें सृष्टीं वाखाणी ॥ ८९ ॥

सत्त्वं रजस्तम इति त्रिवृदेकमादौ सूत्रं महानहमिति प्रवदन्ति जीवम् ।
ज्ञानक्रियार्थफलरूपतयोरुशक्ति ब्रह्मैव भाति सदसच्च तयोः परं यत् ॥ ३७ ॥

'नेति नेति' असें म्हणून लाजून मुकाट्यानें बसलीं.८२ तर मग काय ! वेदहि त्याला न जाणतां परत फिरला ! नाहीं, असें नाहीं. त्याला त्याचें स्वरूप कळलें; पण त्याला तें शब्दांनीं वर्णितां येईना; त्यासाठीं त्यानें मौन धरिलें व निःशब्द होऊन तो तटस्थ राहिला. ८२ याप्रमाणें वेदानें दृढ मौन धारण केलें असतां षट्शास्त्रें भांबावलीं. तीं मताभिमान धरून अतिवादानें वल्गना करूं लागलीं; ८३ पण शब्दवृत्ति सोडल्यानेंच ब्रह्मज्ञान होतें, हें रहस्य पूर्णपणें ओळखून वेदानें शब्दानेंच शब्दाचा निषेध केला व दृढमौन धारण केलें. ८४ वेदराजानें मौन धारण केलेलें पाहून भांबावलेलीं शास्त्रें शब्दांचें रान शोधूं लागलीं; पण त्यांना आत्मसमाधान लाधलें नाहीं. ८५ वेदार्थ समजून घेऊन ज्यांनीं ब्रह्म संपादन केलेलें असतें त्यांच्या ठिकाणीं सर्वदर्शनें एकत्वास प्राप्त होतात, त्यांना शास्त्रें आपोआप कळतात व त्रिभुवन एकरूप दिसूं लागतें. ८६ यावर राजा म्हणतो-'हे मुने, ब्रह्म एकच व अद्वितीय आहे, असें आतां तुम्हींच सांगितलेंत; तेव्हां त्रिभुवन एकरूपानें भासतें असें जें म्हणतां तें कोणाला ?' ८७ मुनि म्हणतो-'हे राजा, ज्याचा वासनेचा फांस तुटला आहे व अहंकाराची गांठ सुटली आहे आणि प्रारब्ध देहधर्म होऊन राहिलें आहे, त्याला ही सर्व सृष्टि एकरूपानें भासते. ८८ त्याच्या अनुभवाची मधुर कथा या राजास सांगावी असा पिप्पलायनाच्या मनाला मोठा उल्हास वाटला आणि तो त्यामुळें स्वानंदतृप्तीनें सर्व सृष्टीला ब्रह्मैक्यानें वाखाणूं लागला. ८९

—तर मग प्रमाणाचा विषय होत नसल्यामुळें ब्रह्म नाहींच, असें म्हणण्याचा प्रसंग येतो, अशी आशंका घेऊन पिप्पलायन म्हणतो--

आदौ-सृष्टीच्या पूर्वीं, यत् एकं- जें एकच ब्रह्म,तत् एव-तेंच,सत्त्वं रजः तमः इति त्रिवृत्-सत्त्व, रज व तम असें त्रिगुणयुक्त प्रधान आहे. सूत्रं-तेंच सूत्र आहे. महान्-तेंच महत्तत्त्व आहे. अहं जीवं-तोच जीवोपाधि अहंकार आहे, इति प्रवदन्ति-असें म्हणतात. ज्ञानक्रियार्थफलरूपतया-देवता, क्रिया, इंद्रियें, विषय व सुखादि फल, या रूपानें, उरुशक्ति ब्रह्म एव-प्रचंड शक्तिमान ब्रह्मच, भाति-भासतें. सत् असत् च-कार्य व कारण तें ब्रह्मच आहे, यत् तयोः परं-कारण त्या कार्य-कारणांचेंहि मूळ कारण ब्रह्मच आहे. [सत्-स्थूल-कार्य, व असत्-सूक्ष्म-कारण तें सर्वहि ब्रह्मच आहे. कारण तें त्या दोहोंचेंहि आदि कारण आहे. पण एकच ब्रह्म बहुविध कार्य-कारणांचें कारण कसें असूं शकेल ? उत्तर-कारण तें उरुशक्ति आहे. उरु म्ह० फार मोठी जी मायारूप शक्ति ती त्याची उपाधि आहे. म्हणजे तें अनेक शक्तियुक्त आहे. आतां त्याचें अनेक प्रकारें भान कसें होतें, तेंच दाखवितात. पूर्वीं जें एकच असलेलें ब्रह्म तेंच सत्त्व, रज व तम या तीन गुणांनीं युक्त असलेलें प्रधान आहे, असें म्हणतात. त्यानंतर क्रियाशक्तीनें युक्त असलेल्या त्याला सूत्र असें म्हणतात. ज्ञानशक्तीनें युक्त असलेल्या त्याला महत् असें म्हणतात. अहं म्हणून प्रसिद्ध असलेल्या जीवाला जीवोपाधि अहंकार म्हणतात. पुढें ज्ञान म्हणजे देवता. सर्व क्रिया, इंद्रियें, विषय व त्यांचें ज्ञान किंवा सुखादि हें फल या रूपानेंहि तें ब्रह्मच भासतें. अर्थात् मायेपासून फळापर्यंत सर्व कार्यकारणरूपानें स्वतः भासणाऱ्या ब्रह्माच्या सिद्धीसाठीं प्रमाणाची अपेक्षा नाहीं, असा याचा भावार्थ.]३७.

ब्रह्मनिजऐक्यपरिपाटी । प्रपंचू ब्रह्मत्वेंचि उठी । संतासंत सकळ सृष्टी । देखती दृष्टीं ब्रह्मरूप ॥ ६९० ॥ जेवीं नभीं नीळिमेचें भान । तेवीं ब्रह्मीं माया नांदे संपूर्ण । नवल तियेचें विंदान । नपुंसका जाण पुरुषत्व केलें ॥ ९१ ॥ अगाध तिचा पतिव्रताधर्म । नपुंसकीं उपजवी काम । अनाम्या ठेवी नाम । कीं निष्कर्मा कर्म तिचेनी ॥ ९२ ॥ ते निःसंगसंगा रातली । स्पर्शेंवीण गुर्विणी झाली । प्रधानमहत्तत्त्वें गर्भा आली । तेथ त्रिगुणांतें व्याली विकारयुक्त ॥ ९३ ॥ विद्याअविद्या निजस्वभावीं । जीवशिवांची भेदपदवी । प्रिया पुरुषातें भोगवी । ज्ञानाज्ञानगांवीं वसोनियां ॥ ९४ ॥ जेवीं सुवर्णी अलंकार । तंतूमाजीं पटाकार । भिंतीवरी भासे चित्र । तेवीं माया साकार ब्रह्मीं भासे ॥ ९५ ॥ मृत्तिकेचीं गोकुलें केलीं । नाना नामाकारीं जरी पूजिलीं । तरी मृत्तिकाचि संचली । तेवीं ब्रह्मीं संचली जगद्रूपें माया ॥ ९६ ॥ जैशा घृताच्या कणिका । घृतेंसीं नव्हती आणिका । तेवीं ब्रह्मीं मायाशक्ती देखा । दावी अनेका अर्थांतें ॥ ९७ ॥ ब्रह्म पूर्वीं एकाकी एक । तेंचि केवीं झालें अनेक । तो मायायोग-परिपाक । विषद अर्थ देख पिप्पलायनू सांगे ॥ ९८ ॥ मुळीं मुख्य ब्रह्म 'ओंकार' । तें एकचि झालें त्रिप्रकार । अकार उकार मकार । सत्वादि विकार गुणत्रयात्मक ॥ ९९ ॥ गुणत्रय समसमान । त्या नांव बोलिजे 'प्रधान' । तेंचि क्रियाशक्तिसूत्र जाण । तेथें प्रगटल्या ज्ञाना 'महत्तत्त्व' म्हणती ॥ ७०० ॥ 'अहं ब्रह्म' हे पूर्णस्फूर्ती । तें अहंकारलें देहाकृती । देहाभिमानें निश्चितीं । 'जीव' म्हणती वस्तूतें ॥ १ ॥ क्रिया म्हणजे 'दशधा करणें' । 'ज्ञान' शब्दें देवताधिष्ठानें । 'अर्थ' ऐसें विषयांसी म्हणणें । तेथ 'फळ' जाणणें सुखदुःख ॥ २ ॥ गुणभूतें विषय करणें । जीव भोक्ता सुखदुःखपणें । ज्ञानक्रिया कर्माचरणें । हें सर्वही जाणणें पूर्ण ब्रह्म ॥ ३ ॥ साकरेचा फणस प्रबळ ।

ब्रह्म स्वभावतःच एकरूप आहे आणि हा प्रपंच ब्रह्मत्वानेंच उद्भवला आहे. म्हणून ज्ञाते लोक सृष्टींतील सर्व शुभाशुभ पदार्थांना आपल्या ज्ञानदृष्टीनें ब्रह्मरूप पहातात. ६९० जसें आकाशामध्यें नीलत्वाचें भान होतें, त्याप्रमाणें ब्रह्मामध्यें सर्व माया नांदते. तिचें कौशल्य विलक्षण आहे. तिनें नपुंसकालाहि पुरुषत्व आणिलें आहे. ९१ तिचा पतिव्रताधर्म विचित्र आहे. ती नपुंसकाच्या ठिकाणींहि काम उत्पन्न करिते. नामरहिताला नांव ठेवते. तिच्यामुळें निष्कर्माला कर्म प्राप्त होतें. ९२ ती माया असंगाच्याहि संगाला प्रवृत्त झाली. त्याच्या स्पर्शावांचूनहि गर्भवती झाली. प्रधान व महत्तत्त्व हीं तिच्या पोटीं आलीं व विकारयुक्त त्रिगुणांना ती प्रसवली. ९३ विद्या व अविद्या या आपल्या स्वभावांनीं तिनें जीव व शिव हा भेद उत्पन्न केला. पुरुषाला अतिप्रिय होऊन आणि ज्ञान व अज्ञान या गांवांमध्यें राहून त्याच्याकडून आपला भोग घेववूं लागली. ९४ सुवर्णामध्यें जसा अलंकार, तंतूंमध्यें जसा पटाकार व भिंतीवर जसें चित्र भासतें, त्याप्रमाणें ब्रह्मामध्यें माया साकार भासते. ९५ मृत्तिकेचीं गोकुलें व गायींचीं खिल्लारें केलीं, अनेक नांवें व आकार यांनीं त्यांची पूजा केली, तरी त्यांत सर्वत्र मृत्तिकाच जशी व्याप्त असते, त्याप्रमाणें ब्रह्मामध्यें माया जगद्रूपानें भासते. ९६ तुपाच्या कण्या जशा तुपाहून निराळ्या नसतात, त्याप्रमाणें ब्रह्मामध्यें अभिन्न असलेली मायाशक्ति अनेक पदार्थांना भासविते. ९७ उत्पत्तीच्या पूर्वीं ब्रह्म एक व अद्वितीय होतें, पण तेंच अनेक कसें झालें ? हा मायासंबंधाचा परिणाम आहे. पिप्पलायन मुनि हाच अर्थ आतां विशद करून सांगतात. ९८ मूळचें मुख्य ब्रह्म ओंकार तेंच अकार, उकार व मकार असें तीन प्रकारचें झालें. तेच सत्त्वादि त्रिगुणात्मक विकार होत. ९९ त्रिगुणांच्या साम्यावस्थेला प्रधान म्हणतात. तेंच क्रियाशक्तिसूत्र आहे. त्यांत प्रकट झालेल्या ज्ञानाला महत्तत्त्व म्हणतात. ७०० 'अहं ब्रह्म' ही पूर्ण स्फूर्ति आहे. पण तेंच देहाकारानें परिणत होऊन 'देहच मी' असें निश्चयानें म्हणूं लागलें. म्हणजे वस्तूलाच जीव असें म्हणूं लागतात. १ क्रिया म्ह० दहा इंद्रियें. त्यांच्या अधिष्ठातृदेवतांना येथें ज्ञान असें म्हटलें आहे. अर्थ म्ह० विषय, फल म्ह० सुख–दुःख, २ गुणांचे विकार असे विषय, त्यांचें ग्रहण करणारीं इंद्रियें, सुख–दुःखपणानें भोक्ता जीव व कर्माचरणानें ज्ञानक्रिया, हें सर्वहि पूर्ण ब्रह्म आहे, असें जाणावें. ३ साखरेचा मोठा फणस केला असतां त्याचे कांटे,

तेथें कांटे त्वचा बीजगोळ । अवघी साकरचि केवळ । तेवीं ब्रह्मचि सकळ जगदाकारें ॥४॥ जेवीं पाटाउ पुतळीकृत । तेथ विषमावयवीं समान सूत । तेवीं जगदाकारें आकारवंत । दिसे अविकृत परब्रह्म ॥ ५॥ जग 'विश्वप्रपंचू' नाम । परी तें निखळ परब्रह्म । हा उपनिषदर्थ उत्तम । वेदांतीं परम परमार्थु तो हा ॥ ६ ॥ जगदाकारें ब्रह्म निश्चित । जग अवघें विकारवंत । तें ब्रह्मासही विकार प्राप्त । म्हणती तो अर्थ न घडे राया ॥ ७ ॥

नात्मा जजान न मरिष्यति नैधतेऽसौ न क्षीयते सवनविद्व्यभिचारिणां हि ।
सर्वत्र शश्वदनपाय्युपलब्धिमात्रं प्राणो यथेन्द्रियबलेन विकल्पितं सत् ॥ ३८ ॥

ब्रह्मासी नाहीं माता पिता । या लागीं न घडे जन्मकथा । आत्मा एकदेशी होता । तरी जन्मा येता जननीजठरा ॥ ८ ॥ आत्म्यावेगळा कांहीं । तिळभरी ठावो रिता नाहीं । यापरी पूर्णत्वें

साल–चारखंड, आठळ्या, हें सर्वहि केवळ साखरच असते. त्याप्रमाणें सर्व जगदाकार केवळ ब्रह्म आहे. ४ चिंध्यांची बाहुली केली व भिन्न भिन्न अवयव दाखविले, तरी त्यांत केवळ सूतच असतें. त्याप्रमाणें निर्विकार परब्रह्म जगदाकारानें आकारवान् दिसतें. ५ जगाला विश्वप्रपंच असें नांव आहे; परंतु तें शुद्ध परब्रह्म आहे. हा उत्तम उपनिषदर्थ आहे. वेदान्तांतील परम परमार्थ तो हाच. ६ पण ब्रह्मच जगदाकार झालें आहे व सर्व जगत् विकारवान् आहे, त्यामुळें ब्रह्मालाहि विकार होतो, असें कित्येक म्हणतात. परंतु हे राजा, ही गोष्ट त्रिकाली संभवत नाहीं. ७०७.

—अहोपण, ब्रह्म जर सर्वात्मक असेल तर सर्व कार्याला जन्मादि विकारतत्त्व असल्यामुळें ब्रह्मालाहि विकारतत्त्व प्राप्त होतें, अशी आशंका घेऊन पिप्पलायनमुनि म्हणतो—

आत्मा न जजान–आत्मा जन्मला नाहीं, न मरिष्यति–मरणार नाहीं, असौ न एधते–तो वाढत नाहीं, न क्षीयते–तो क्षय पावत नाहीं, हि व्यभिचारिणां सवनवित्–कारण उत्पत्ति-विनाशशील देहांच्या त्या त्या कालाचा तो द्रष्टा आहे. उपलब्धिमात्रं–तो केवळ अनुभवरूप आहे. सर्वत्र शश्वत् अनपायि–सर्व ठिकाणीं, सर्वदा अनुवृत्त होणारा आहे. यथा प्राणः–जसा प्राण तसाच आहे, सत् इंद्रियबलेन विकल्पितं–सद्रूप ज्ञानच इंद्रियबलानें नानाप्रकारें कल्पिलेलें आहे. [आत्मा म्ह० ब्रह्म उत्पन्न झालेलें नाहीं. जन्माच्या अभावामुळेंच अस्तित्वरूप दुसरा विकारहि त्याला नाहीं. त्याची वृद्धि होत नाहीं. वृद्धि या तिसऱ्या भावविकाराच्या अभावामुळेंच त्याचा विपरिणाम व अपक्षयहि होत नाहीं व शेवटीं तो मरणारहि नाहीं. कारण उत्पन्न होऊन नाश पावणाऱ्या बाल, तरुण इत्यादि देहांच्या त्या त्या कालाचा हा द्रष्टा आहे. अवस्थावानांचा द्रष्टा त्या अवस्थांनीं युक्त होत नाहीं, असा याचा भावार्थ. तर मग अवस्थारहित असा हा आत्मा कोण आहे ? उत्तर–हा केवळ अनुभवरूप–ज्ञानरूप आहे. तर मग त्याला क्षणिकत्व असेल ! नाहीं, त्याचें स्वरूपज्ञान क्षणिक नाहीं. कारण तो सर्व देशांमध्यें सर्वदा अनुवृत्त होतो. अहोपण, नील वर्णाचें ज्ञान नष्ट झालें, पीतवर्णाचें ज्ञान नष्ट झालें, अशी प्रतीति येत असल्यामुळें ज्ञानाला अनपायित्व नाहीं, अशी आशंका घेऊन मुनि म्हणतो–सद्रूपज्ञानच इंद्रियबलानें नानाप्रकारें कल्पिलेलें आहे. म्ह० नीलादि आकाराच्या वृत्तीच उत्पन्न होतात व नाश पावतात. ज्ञान कधीं उत्पन्न होत नाहीं व नाशहि पावत नाहीं, असा याचा भावार्थ. व्यभिचार पावणाऱ्या वृत्तींमध्यें व अवस्थांमध्यें ज्ञानाचा व आत्म्याचा अव्यभिचार कसा असतो, याविषयीं 'जसा प्राण' असा येथें दृष्टांत दिला आहे.] ३८.

ब्रह्माला आईबाप नाहींत, त्यामुळें त्याला जन्मच नाहीं. आत्मा जर एकदेशी असता तर तो मायेच्या पोटीं जन्माला आला असता. ८ परंतु आत्म्यानें रहित अशी तिळभरहि कोठें जागा सांपडणार नाहीं, असें त्याचें पूर्णत्व

पाहीं । जन्म ते ठायीं स्पर्शेना ॥ ९ ॥ जन्मापूर्वीं बाळाचें नास्तिक्य । जन्मापाठीं मानिती आस्तिक्य । या अस्तिनास्तीची भाख । आत्म्यासी देख असेना ॥ ७१० ॥ आतां आहे पूर्वीं नाहीं । ऐसें आस्तिक्य आत्म्याचे ठायीं । कदाकाळीं न रिघे कांहीं । तो नित्य पाही निरंतर ॥ ११ ॥ देहीं जन्मल्या बाळकासी । वाढी दिसे दिवसदिवसीं । तो बाळजन्म नाहीं आत्म्यासी । यालागीं वृद्धत्व त्यासी घडेना ॥ १२ ॥ ज्यासी वृद्धी नाहीं तत्वतां । त्यासी न ये विपरिणामता । बाल्य तारुण्य वृद्धावस्था । आत्म्यासी सर्वथा असेना ॥ १३ ॥ जो मी बाळत्वें होतों धाकुटा । तोचि मी तारुण्यें जालों मोटा । तो मी वृद्ध जालों कटकटा । ऐसा त्रिकाळद्रष्टा परमात्मा ॥ १४ ॥ द्रष्टा साक्षी जो अवस्थातीत । तो कदा नव्हे अवस्थाभूत । देहीं असोनि अवस्थारहित । जाण तो निश्चित परमात्मा ॥ १५ ॥ निरवस्थ आत्मा अविकारी पूर्ण । त्यासी कदा न ये क्षीणपण । ज्यासी जन्मचि नाहीं जाण । त्यासी मरण असेना ॥ १६ ॥ जो अविकारी निरवस्थ पूर्ण । ज्यासी नाहीं जन्ममरण । ऐसा तूं आत्मा म्हणशील कोण । तरी जाण सर्वज्ञ ज्ञानस्वरूप ॥ १७ ॥ म्हणसी ज्ञानही क्षणिक असे । घटज्ञानें पटज्ञान निरसे । तेथ इंद्रियार्थवृत्तीचि नासे । ज्ञान जैसें तैसें अविनाशी ॥ १८ ॥ तेचि अर्थीचा पूर्ण दृष्टांत । जेवीं प्राणु देहातें वाढवित । तो देहोचि होय अवस्थाभूत । प्राण निरवस्थ जैसा तैसा ॥१९॥ प्राणु देहातें चाळिता । त्यासी न बाधी देहावस्था । आत्मा प्राणातें चेतविता । त्यासी देहावस्था असेना ॥ ७२० ॥ येणेंचि प्राणदृष्टांतें । साधूनि घ्यावें परब्रह्मातें । देहेंद्रियांवेगळें आत्म्यातें । पुढील श्लोकार्धें प्रबोधी ॥ २१ ॥

आहे. त्यामुळें त्याच्या ठिकाणीं जन्माचा गंधहि नाहीं. ९ जन्मापूर्वीं बाळाचें नास्तित्व असतें. म्ह० तें नसतें. जन्मानंतर त्याचें अस्तित्व मानितात; पण ही 'अस्ति नास्ति-' भाषा आत्म्याला नाहीं. ७१० आत्मा आतां आहे व पूर्वीं नव्हता, असें कधींहि म्हणतां येत नाहीं. कारण तो नित्य अखंड आहे. ११ बालक देहरूपानें जन्माला आला असतां त्याची दिवसेंदिवस वाढ होत असलेली दिसते. पण आत्म्याला तसा बालजन्म नाहीं. त्यामुळें त्याची वृद्धिहि होत नाहीं. १२ ज्याला तत्त्वतः वृद्धि नाहीं त्याचा विपरिणामहि संभवत नाहीं. त्यामुळें आत्म्याला बाल्य, तारुण्य व वृद्धावस्था सर्वथा नाहींत. १३ मी जो बालत्वानें लहान होतों, तोच तारुण्यानें मोठा झालों आणि हर हर, आतां या वृद्धावस्थेला प्राप्त झालों आहें. असा जो तिन्ही अवस्था जाणणारा, तो परमात्मा होय. १४ जो द्रष्टा, साक्षी व अवस्थातीत तो अवस्थाभूत केव्हांहि होणें शक्य नाहीं. देहांत असूनहि जो अवस्थारहित तोच निश्चित परमात्मा होय. १५ अवस्थाशून्य आत्मा पूर्ण निर्विकार आहे. त्यामुळें त्याला क्षीणत्व कधींच येत नाहीं. ज्याला जन्मच नाहीं, त्याला मरण कोठचें! १६ पण 'पूर्ण निर्विकार, अवस्थाशून्य व जन्म-मरणरहित असा तो आत्मा कोण आहे,' म्हणून म्हणशील तर तो सर्वज्ञ, ज्ञानस्वरूप आहे, असें तूं जाण. '१७ ज्ञानहि क्षणिक आहे, कारण घटज्ञानानें पटज्ञानाचें निरसन होतें,' म्हणून म्हणशील तर ज्ञानाचें निरसन होत नसून इंद्रियविषयवृत्तींचा नाश होतो. ज्ञान जसेंच्या तसेंच अविनाशी असतें. १८ त्याविषयींच मी एक पूर्ण दृष्टान्त सांगतों. जसा प्राण देहाला वाढवितो, पण देहच अवस्थांनीं युक्त होतो, प्राण जशाच्या तसा अवस्थाशून्य असतो. १९ प्राण देहाकडून सर्व क्रिया करवितो, पण देहावस्था प्राणालाहि बाध करूं शकत नाहीं. आत्मा तर प्राणालाहि सामर्थ्य देणारा आहे, तेव्हां त्याला देहावस्था कशा असणार! ७२० याच प्राणाच्या दृष्टान्तानें परब्रह्माचें निर्विकारत्व निश्चित करावें. आतां मुनि पुढील श्लोकार्धानें आत्मा, देह व इंद्रिय यांहून वेगळा आहे, असा बोध करितो. ७२१.

अण्डेषु पेशिषु तरुष्वविनिश्चितेषु प्राणो हि जीवमुपधावति तत्र तत्र ।
सन्ने यदिन्द्रियगणेऽहमि च प्रसुप्ते कूटस्थ आशयमृते तदनुस्मृतिर्नः ॥ ३९ ॥

अंडज स्वेदज जारज । चौथें जाण गा उद्भिज । त्याचे ठायीं प्राणु सहज । आत्मयोगें सदा वर्ते ॥ २२ ॥ प्राणयोगें आत्मा वर्ततां । त्यासी जीव म्हणती तत्वतां । त्या प्राणासी न बाधिती देहावस्था । मा जीवाचे माथां त्या कैंच्या ॥२३॥ देहेंद्रियांमाजीं वर्ततां । आत्मा अलिप्त देहावस्था । तो कैसा म्हणसी आतां । ऐक त्याही दृष्टांता सांगेन ॥ २४ ॥ आत्मा जागृतदेहीं वर्ते । तैं सविकार मानिती त्यातें । तोचि सांडूनि देहेंद्रियांतें । स्वप्नीं वर्ते पूर्वानुध्यासें ॥ २५ ॥ देहेंद्रियांविहीन । केवळ लिंगदेह जाण । निजात्मा देखे स्वप्न । जागृत्यभिमानसंकल्पें ॥ २६ ॥ तें उपरमल्या स्वप्न । देहाभिमान झालिया लीन । सर्वविकारविहीन । सुषुप्तिकाळीं पूर्ण परमात्मा उरे ॥ २७ ॥ देहेंद्रियांसीं अभिमान लीन । कोणीही स्फुरेना स्फुरण । तरी तें झालें सर्व शून्य । आत्मा चिद्घन नाहीं म्हणसी ॥ २८ ॥ जरी सुषुप्तीसी आत्मा नाहीं । तरी सुखें निजेलों होतों पाहीं । हें उपजे ज्याच्या ठायीं ।

पूर्वोक्त प्राणदृष्टान्ताचेंच विवरण करणारा मुनि इंद्रियादिकांच्या लयानें निर्विकार आत्म्याचा अनुभव कसा येतो तें दाखवितो—

अंडेषु—अंडजशरीरांमध्यें. **पेशिषु**—जरायुज शरीरांमध्यें, **तरुषु**—उद्भिज्ज शरीरांमध्यें, **अविनिश्चितेषु**—स्वेदज शरीरांमध्यें, **तत्र तत्र प्राणः हि जीवं उपधावति**—ठिकठिकाणीं प्राणच जीवामध्यें अनुवृत्त होतो, **यत्**—जेव्हां, **इंद्रियगणे अहमि च सन्ने**—इंद्रियसमूह व अहंकार लीन होतो, **तदा**—तेव्हां, **प्रसुप्ते**—सुषुप्तींत, **कूटस्थः**—आत्मा निर्विकारच होतो. **आशयं ऋते**—कारण तो ' लिंगशरीर ' या उपाधिवांचून असतो, **नः तदनुस्मृतिः**—व आम्हांला त्याचें अनुस्मरण होतें. [अंडज, स्वेदज, जरायुज व उद्भिज्ज या शरीरांतील प्रत्येक जीवामध्यें प्राणाची अनुवृत्ति होते. याप्रमाणें दृष्टान्तभूत प्राणाचें निर्विकारित्व दाखवून द्राष्टांतिकांतहि तें दाखवितात. त्याच वेळीं आत्मा सविकार असल्याप्रमाणें कसा प्रतीत होतो ? उत्तर-जेव्हां जागरावस्थेंत इंद्रियगण जागत असतो व स्वप्नांत जागृतींतील संस्कारांनीं युक्त असा अहंकार जागत असतो, तेव्हांच आत्मा सविकार असल्याप्रमाणें भासतो. पण जेव्हां सुषुप्तावस्था सुरू होते, तेव्हां त्या अवस्थेंत इंद्रियसमूह लीन झाला असतां व अहंकारहि लीन झाला असतां आत्मा निर्विकारच होतो. कारण विकाराचें निमित्त असें जें लिंगशरीर त्या उपाधीचा त्या वेळीं अभाव होतो. अहोपण, अहंकारापर्यंत सर्वांचा लय झाला असतां शून्यच अवशिष्ट रहाणार ! तेव्हां निर्विकार आत्म्याचा तेथें संभव कसा आहे ? ' तदनुस्मृतिर्नः ' या पदांनीं उत्तर–त्या विशेषज्ञानशून्य सुखात्मरूप सुषुप्तिसाक्षीची स्मृति आम्हांला होते. मी एवढा वेळ सुखानें निजलों होतों, मला कांहीं कळलें नाहीं, असें त्याचें निजून उठल्यावर स्मरण होतें. ज्याचा अनुभव घेतला नाहीं, त्याचें स्मरण होत नाहीं; पण झोंपेंतील सुखाचें व अज्ञानाचें स्मरण होतें, त्यावरून सुषुप्तींतहि आत्मानुभव आहेच. तथापि विषयसंबंधाच्या अभावामुळें तो स्पष्ट नाहीं, असा याचा भावार्थ. ' यद्वै तन्न पश्यति ' अशी याविषयीं श्रुति आहे. बृ. भा. अ. ४. ३. २३. पृ. १९३ पहा.] ३९.

जरायुज, अंडज, स्वेदज व उद्भिज्ज, यांमध्यें प्राण सहजच आत्मसंबंधानें सदा रहातो. २२ प्राणसंबंधानें आत्मा वागूं लागला असतां त्यालाच जीव म्हणतात. त्या देहावस्था प्राणालाहि विकारयुक्त करूं शकत नाहींत; तर मग त्या जीवाला विकृत कशा करणार ! २३ आत्मा देहेंद्रियांदिकांत रहात असतांना देहावस्थांहून अलिप्त असतो. पण तो कसा आहे, हेंहि मी दृष्टान्तानें सांगतों. २४ आत्मा जेव्हां जाग्रद्देहांत असतो तेव्हां त्याला सविकार म्हणतात. तोच देहेंद्रियावरील अभिमान सोडून स्वप्नांत पूर्वचिंतानानुसार रहातो. २५ देहेंद्रियांनीं रहित केवळ लिंग देहाभिमानी आत्मा जागृतींतील अभिमानसंकल्पानें स्वप्न पहातो. २६ पुढें तें स्वप्न शांत होऊन देहाभिमान लीन झाला असतां सुषुप्तिकालीं सर्व विकारशून्य पूर्ण परमात्मा होतो. २७ ' पण देहेंद्रियांवरील अभिमान लीन झाल्यावर कांहींच भासत नाहीं, त्यावेळीं सर्व शून्य होतें. अर्थात् त्यावेळीं चिद्घन आत्माहि नाहीं, ' म्हणून म्हणशील तर सांगतों. २८ जर सुषुप्तींत आत्मा नाहीं तर मी एवढा वेळ सुखानें निजलों होतों हें स्मरण कसें होतें ?

तो सर्वथा नव्हे कांहीं शून्य ॥ २९ ॥ जो मी जागृतीं जागता । जो मी सुषुप्तिसुखभोक्ता । जो मी स्वप्नातें देखता । एवं तिहीं अवस्थां साक्षी जो ॥ ७३० ॥ जो अवस्थात्रयीं साक्षी पूर्ण । तो सर्वथा नव्हे शून्य । तोचि परमात्मा परिपूर्ण । शुद्ध चिद्घन तो राया ॥ ३१ ॥ सुषुप्ती ब्रह्मानुभवो आहे । तरी कां पुढतीं संसारू पाहे । तेथ अविद्येसीं अहं लीन राहे । यालागीं होये भवभ्रमु ॥ ३२ ॥ ते अविद्या अहंकारेंसीं नाशे । तैं जगद्रूपें ब्रह्मचि भासे । जन्ममरणांचा ठावोचि पुसे । जीव समरसे परब्रह्मीं ॥ ३३ ॥ तेथ हेतु-मातु-दृष्टांत- । प्रमाण-प्रमेयविवर्जित । परमात्मा सदोदित । परब्रह्म निश्चित परमानंदें ॥ ३४ ॥ तेथ सुखावरी सुख नांदे । आनंदु भोगिजे आनंदें । जग दुमदुमी परमानंदें । स्वानंदबोधें संपूर्ण ॥ ३५ ॥ निरसोनिया निजमाया । ऐसा अनुभवो मुनिवर्या । कैं होईल म्हणसी राया । तैं भजावें यदुवर्या निष्कामभावें ॥ ३६ ॥

यर्ह्यब्जनाभचरणैषणयोरुभक्त्या चेतोमलानि विधमेद्गुणकर्मजानि ।
तस्मिन् विशुद्ध उपलभ्यत आत्मतत्त्वं साक्षाद्यथाऽमलदृशोः सवितृप्रकाशः ॥ ४० ॥

अर्थात् तें ज्याच्या ठिकाणीं उपजतें त्याला शून्य म्हणतां येत नाहीं. २९ मी जागृतींत जागणारा, सुषुप्तींत सुख भोगणारा व स्वप्नांत स्वप्नद्रष्टा, असा तिन्ही अवस्थांत जो साक्षी ७३० तो केव्हांहि शून्य होऊं शकत नाहीं. राजा, तोच शुद्ध चिद्घन पूर्ण परमात्मा आहे. ३१ 'सुषुप्तींत असा ब्रह्मानुभव जर येतो, तर पुढें—जागृतींत पुनः संसार कां भासतो,' असें म्हणशील तर त्या अवस्थेंत अहंकार अविद्येंत लीन होऊन रहातो. त्याचा सर्वथा बाध होत नाहीं. यामुळें संसारभ्रम होतो. ३२ पण ती अविद्याच अहंकारासह जेव्हां नाश पावते, तेव्हां जगद्रूपानें ब्रह्मच भासतें. जन्म-मरणाचें नांवहि उरत नाहीं. जीव ब्रह्मामध्यें एकरूप होतो. ३३ त्या अवस्थेंत परमात्मा हेतु, दृष्टान्त, प्रमाण, प्रमेय, प्रमाता इत्यादिकांनीं रहित, सदा प्रकाशरूप, परमानंद व निश्चित परब्रह्म होतो. ३४ त्या अवस्थेंत निरतिशय सुख नांदतें. आनंदानेंच आनंदाचा अनुभव येतो. जगत् स्वानंदानें दुमदुमून जातें. सर्वत्र स्वानंदबोध भरून रहातो. ३६ 'मायेचें निरसन होऊन असा आत्मानुभव केव्हां येईल' म्हणून जर विचारशील तर हे राजा, यदुश्रेष्ठाला निष्कामभावानें भजावें म्हणजे मायेची निवृत्ति होऊन असा स्वात्मानुभव येतो. ७३६.

अहोपण, सुषुप्तींत कूटस्थ आत्म्याचा अनुभव जर येत असेल तर पुनरपि संसार कसा संभवेल ! अविद्या व अविद्येचे संस्कार विद्यमान असल्यामुळें तो संभवेल ! असें म्हणाल तर अविद्यादिकांची निवृत्ति करणारा आत्मानुभव केव्हां येतो ! पिप्पलायन याचें उत्तर पुढील श्लोकांत देत आहे—

यर्हि—ज्यावेळीं पुरुष, **अब्जनाभचरणैषणया उरुभक्त्या**—भगवानाच्याच इच्छेनें जी श्रेष्ठ भक्ति त्या भक्तीनें, **गुणकर्मजानि चेतोमलानि**—गुण व कर्म यांपासून उत्पन्न झालेल्या अंतःकरणमलांचा, **विधमेत्**—नाश करितो, **तदा**—त्यावेळीं, **अमलदृशोः यथा सवितृप्रकाशः**—निर्दोष दृष्टीला सूर्यप्रकाश जसा साक्षात् दिसतो त्याप्रमाणें, **विशुद्धे तस्मिन्**—अतिशुद्ध अंतःकरणांत, **आत्मतत्त्वं साक्षात् उपलभ्यते**—आत्मतत्त्व साक्षात् उपलब्ध होतें. [द्रव्यादिकांची इच्छा टाकून केवळ भगवच्चरणांच्या इच्छेनें केलेल्या श्रेष्ठ भक्तीनें शरीरेंद्रियांकडून होणाऱ्या कर्मांपासून उत्पन्न झालेल्या रागद्वेषादि चित्तमलांचा पुरुष जेव्हां नाश करितो, किंवा येथें पुरुष हा कर्ता न घेतां 'चेतः' हाच कर्ता घ्यावा. चेतः म्ह० अंतःकरण आपल्यांतील गुणकर्मजन्य मलांचें पूर्वोक्त भक्तीनें जेव्हां क्षालन करितें तेव्हां तें चित्त अतिशय शुद्ध झालें असतां त्यांत आत्मतत्त्व साक्षात् उपलब्ध होतें. नेत्र निर्मल झाले असतां पूर्वीं सिद्ध असलेलाच सूर्यप्रकाश जसा दिसतो, त्याप्रमाणें पूर्वीं सिद्ध असलेलाच आत्मा शुद्ध अंतःकरणांत साक्षात् उपलब्ध होतो.] ४०.

निर्विकारस्वरूपप्राप्ती । अवश्य पावणें आहे चित्तीं । तैं करावी भगवद्भक्ती । उत्कटा प्रीति अविश्रम ॥ ३७ ॥ त्यजूनि पुत्रवित्तेषणेचें काज । जिणोनि लौकिकाची लाज । पद्मनाभभजनें भोज । अतिनिर्लज्ज नाचावें ॥ ३८ ॥ पुत्रवित्तलोकेषणा । त्यजूनि भजतां हरिचरणां । तंव तंव चित्ताचे चैत्यमळ जाणा । क्षणक्षणां नाशती ॥ ३९ ॥ रजतमादि कर्मजमळ । चित्तीं बैसले जे सबळ । ते प्रक्षाळती सकळ । भक्तिप्रेमजळक्षाळणें ॥ ७४० ॥ जंव जंव थोरावे सप्रेम भक्ती । तंव तंव पायां लागे विरक्ती । स्वयें विरमे विषयासक्ती । होय चित्तवृत्ती निर्मळ ॥ ४१ ॥ निर्मळ जाहलिया चित्तवृत्ती । परमात्मया सर्व भूतीं । भजों लागे अनन्यप्रीतीं । हे चौथी भक्ति उदार ॥ ४२ ॥ हे भक्ति अतिशयें उदार । निर्दाळी भक्तांचा अहंकार । उद्धरी सुर नर स्त्रिया शूद्र । आनंदनिर्भर करी जीवू ॥ ४३ ॥ हे भक्ति जैं लागे हातीं । तैं भवभयाची निःशेष शांती । पायां लागती चारी मुक्ती । ऐशी उदार भक्ति हरीची ॥ ४४ ॥ जेवीं डोळां असतां पडळ । सविता उगवे सर्वकाळ । तो सन्मुख न देखे रविमंडळ । मा पदार्थ सकळ त्या कैंचे ॥ ४५ ॥ तेंचि फिटलिया पडळ । दृष्टी होय अतिनिर्मळ । देखों लागे पदार्थ सकळ । रविमंडळ समन्वयें ॥ ४६ ॥ तेवीं निजात्मा हृदयीं वसे । परी चित्तवृत्ती मळिण असे । तंव परब्रह्म न प्रकाशे । चित्तवासनादोषें दूषित ॥ ४७ ॥ तेथ करितां भगवद्भक्ती । निर्मळ होय चित्तवृत्ती । तेव्हां निर्विकारस्वरूपप्राप्ती । भक्त पावती निजभजनें ॥ ४८ ॥ पावावया परमात्मप्राप्ती । जगीं दाटुगी भगवद्भक्ती । ते म्यां सांगीतली तुजप्रती । यथानिगुतीं नृपनाथा ॥ ४९ ॥ जेवीं डोळ्यांचें पडळ फिटे । तेथ प्रकाशेंसीं सविता भेटे । तेवीं कल्पनालोपें प्रगटे । नेटेपाटे परब्रह्म ॥ ७५० ॥ जेथ निर्विकल्पसमान । निश्चयेंसीं जाहलें मन । त्यासी देहीं वर्ततांही जाण । भवबंधन स्पर्शेना ॥ ५१ ॥ ऐसें गर्जोनियां

आपल्याला निर्विकार स्वरूपाची प्राप्ति अवश्य व्हावी असें जर वाटत असेल तर त्यानें मोठ्या उत्साहानें व न कंटाळतां भगवद्भक्ति करावी. ३७ पुत्रैषणा, वित्तैषणा इत्यादि एषणांचा त्याग करून, लौकिकाची लाज सोडून ईश्वराच्या भजनानें लौकिकदृष्टया एखाद्या सोंगासारखें निर्लज्जपणें नाचावें. ३८ पुत्र, वित्त व लोक, यांच्या प्राप्तीची इच्छा याच पुत्रादि तीन एषणा होत. त्यांचा त्याग करून हरिचरणांचें भजन करूं लागलें असतां चित्ताचे मल हळूहळू नाश पावूं लागतात. ३९ राजस व तामस कर्मांमुळें चित्तावर जे प्रबल मळ बसलेले असतात ते भक्तिरूप प्रेमजळानें धुतले जातात. ७४० सप्रेम भक्ति जशी जशी वाढूं लागते, तशी तशी विरक्ति येऊं लागते. विषयासक्ति आपोआप निवृत्त होते व त्यामुळें चित्तवृत्ति निर्मल होते. ४१ ती निर्मल झाली असतां हा विरक्त भक्त परमात्म्याला सर्वभूतांमध्यें अनन्य प्रीतीनें भजूं लागतो. ही ज्ञानलक्षण चवथी भक्ति श्रेष्ठ आहे. ४२ कारण ती भक्तांचा अहंकार घालविते. देव, मनुष्यें, स्त्रिया, शूद्र यांचा उद्धार करिते. जीवाला आनंदपूर्ण करिते. ४३ ही भक्ति जेव्हां हातीं लागते, तेव्हां संसारभयाची निःशेष शांति होते. चारी मुक्ति त्याच्या पायां पडूं लागतात. ही ज्ञानलक्षण हरिभक्ति अशी उदार आहे. ४४ डोळ्यांवर पडदा बांधिला असतां किंवा सारा वगैरे दृष्टीला प्रतिबंध करणारा कांहीं दोष उद्भवला असतां सर्वकाल समोर असलेलाहि सूर्य दिसत नाहीं; मग इतर पदार्थ कोठून दिसणार ! ४५ पण डोळ्यांवरील तो प्रतिबंध उपायानें दूर केला असतां दृष्टि अतिशय निर्मळ होते व सूर्यमंडळासह ती सर्व पदार्थ पाहूं लागते. ४६ त्याच न्यायानें आत्मा हृदयामध्यें रहातो; पण चित्तवृत्ति जोंवर मलिन असते, तोंवर परब्रह्म प्रकाश पावत नाहीं. चित्त वासनादोषानें दूषित झालेलें असतें. ४७ चित्तवृत्ति भगवद्भक्तीनें निर्मल होते आणि त्यामुळें भक्त आपल्या निर्विकार स्वरूपास प्राप्त होतात. ४८ या जगांत भगवद्भक्तीच परमात्मप्राप्ति करून देण्यास समर्थ आहे व मी तीच तुला यथार्थपणें सांगितली आहे. ४९ ज्याप्रमाणें डोळ्यांवरील आवरण निघून गेलें असतां सूर्याचा प्रकाश साक्षात् दिसतो, त्याप्रमाणें कल्पनांचा लोप झाला असतां निर्विकल्प अंतःकरणांत परब्रह्म प्रकट होतें. ७५० ज्याचें मन निश्चयानें निर्विकल्प झालें आहे तो देहांत जरी असला तरी त्याला संसारबंधन

जाण । हर्षें बोले पिप्पलायन । तंव राजा सुखावला संपूर्ण । जीवींची खूण बाणली ॥ ५२ ॥ ऐकतां ब्रह्मनिरूपण । राजा लांचावला पूर्ण । पुढें वाढावया निरूपण । अन्वयें प्रश्न पुसतसे ॥ ५३ ॥ जेणें तुटे कर्मबंधन । त्या कर्मयोगाचें लक्षण । समूळ ऐकावया जाण । राजा आपण सादरें पुसतू ॥ ५४ ॥

रा०–कर्मयोगं वदत नः पुरुषो येन संस्कृतः । विधूयेहाशु कर्माणि नैष्कर्म्यं विन्दते परम् ॥ ४१ ॥

राजा निजश्रद्धासंपन्न । अतिविनीत करी प्रश्न । जेणें तुटे कर्मबंधन । तो कर्मयोग संपूर्ण सांगा स्वामी ॥ ५५ ॥ कोणें कर्में कर्म तुटे । नैष्कर्म्यसिद्धि स्वयें प्रगटे । पुरुषा पुरुषोत्तम भेटे । हें मज गोमटें कर्म सांगा ॥ ५६ ॥

एवं प्रश्नमृषीन्पूर्वमपृच्छं पितुरन्तिके । नाब्रुवन्ब्रह्मणः पुत्रास्तत्र कारणमुच्यताम् ॥ ४२ ॥

पूर्वीं हाचि प्रश्नु सनकादिकां । पित्यासंनिध पुशिला देखा । ते उत्तर न देतीचि कां । हेही आशंका फेडावी माझी ॥ ५७ ॥ रायाचे प्रश्न अतिपवित्र । त्यांचें द्यावया प्रतिउत्तर । हरिखावला आविर्होत्र । तो कर्मवैचित्र्य निरूपी ॥ ५८ ॥

स्पर्श करीत नाहीं. ५१ पिप्पलायनमुनि मोठ्या हर्षानें गर्जना करून असें सांगत असतां राजालाहि मोठा हर्ष झाला. त्याला स्वात्मानुभवाची खूण पटली. ५२ या ब्रह्मनिरूपणास राजा अतिशय लांचावला व तें आणखीं वाढावें म्हणून त्या मुनींना याच विषयाला अनुरूप असा आणखी प्रश्न विचारूं लागला. ५३ ज्या कर्मयोगानें कर्मबंधन तुटतें त्याचें समूळ लक्षण ऐकण्यासाठीं तो राजा आदरानें विचारूं लागला. ७५४.

——भक्ति कर्मयोगाच्या अधीन असल्यामुळें राजा त्या कर्मयोगाविषयीं प्रश्न करितो——

राजा उवाच-राजा म्हणाला, येन पुरुषः संस्कृतः सन्–ज्या कर्मयोगानें पुरुष संस्कृत होऊन, इह कर्माणि आशु विधूय–या लोकीं कर्मांचा सत्वर त्याग करून, परं नैष्कर्म्यं विन्दते–श्रेष्ठ ज्ञानास प्राप्त होतो, तं कर्मयोगं नः वदत–तो कर्मयोग आम्हांला सांगा. [ज्या कर्मयोगाच्या अनुष्ठानानें पुरुष संस्कारयुक्त होऊन कर्मांचा त्याग करून कर्मनिवृत्तीनें साध्य होणाऱ्या ज्ञानाला प्राप्त होतो, तो कर्मयोग मला सांगा.] ४१.

श्रद्धाळु राजा नम्रपणानें म्हणाला कीं, हे स्वामिन्, ज्याच्या योगानें कर्मबंधन तुटून जातें तो कर्मयोग मला पूर्णपणें सांगा. ५५ कोणत्या कर्मानें कर्माची निवृत्ति होऊन नैष्कर्म्यसिद्धि आपोआप प्रकट होते व पुरुषाला पुरुषोत्तम भेटतो, तें उत्तम कर्म मला सांगा. ७५६.

——राजा आणखी एक प्रश्न करितो——

पूर्वं–पूर्वीं पितुः अन्तिके–पित्याच्या समीप मीं, ऋषीन्–ऋषींना, एवं प्रश्नं–हाच प्रश्न, अपृच्छम्–विचारिला ब्रह्मणः पुत्राः–पण ब्रह्मदेवाचे सनकादिक पुत्र, न अब्रुवन्–कांहीं बोलले नाहींत. तत्र–त्याविषयीं, कारणं उच्यताम्–कारण सांगा. [पित्याच्या समक्ष पूर्वीं मीं एकदा ब्रह्मदेवाच्या सनकादिपुत्रांना हाच प्रश्न केला. पण सर्वज्ञ असूनहि त्यांनीं मला उत्तर दिलें नाहीं. त्याचें कारण काय, तें मला सांगा.] ४२.

पूर्वीं मीं हाच प्रश्न सनकादिकांना पित्यासमोर विचारिला होता, पण त्यांनीं त्याचें उत्तर दिलें नाहीं, तें कां दिलें नाहीं ? ही माझी आशंका घालवावी. ५७ रायाचे हे दोन्ही प्रश्न अति पवित्र होते. यास्तव त्याचें प्रत्युत्तर देण्यासाठीं आविर्होत्र मोठ्या हर्षानें पुढें झाला व तो कर्मवैचित्र्याचें निरूपण करूं लागला. ७५८.

अ० उ०— कर्माकर्मविकर्मेति वेदवादो न लौकिकः । वेदस्य चेश्वरात्मत्वात्तत्र मुह्यन्ति सूरयः ॥ ४३ ॥

कर्मा-ऽकर्म-विकर्म जाणा । सामान्य नव्हे नृपनंदना । करितां विभागविवंचना । नुगवे सज्ञानां स्मृतिकारांसी ॥ ५९ ॥ जे स्वयें प्रतिसृष्टिकारी । तेही भुलले कर्मविभागावरी । जे समुद्र घोटिती चुळेंकरीं । तेही कर्मसागरीं बुडाले ॥ ७६० ॥ येचि कर्मविवंचनेसाठीं । ऋषिमहर्षींचिया कोटी । मताभिमानें झाले हिंपुटी । त्यांसीही शेवटीं नुगवेची ॥ ६१ ॥ कर्माकर्मविभाग जाणा । स्वयें नुगवेचि चतुरानना । इतरांची कोण गणना । कर्मविवंचना करावया ॥ ६२ ॥ कर्म वेदमूळ जाण । वेदु स्वयें नारायण । वेदवादविवंचन । करितां मौन श्रुतिशास्त्रां ॥६३॥ कर्म अकर्म विकर्म जाण । एकचि परी त्रिविध भिन्न । तेही विभागविवंचन । सावधान अवधारीं ॥ ६४ ॥ श्वेत मृदु मधुर । त्रिविध भेदें एक साकर । तेवीं एकचि त्रिप्रकार । कर्मठ नर मानिती कर्म ॥ ६५ ॥ भिन्न करितां मधुरता । तीमाजीं ये मृदु श्वेतता । श्वेतताचि भिन्न करितां । मृदु मधुरता तीमाजीं ॥ ६६ ॥ तेवीं भिन्न करितां कर्म । कर्मा सर्वांगीं अकर्म । कर्मअकर्मामाजीं विकर्म । मिरवे परम सौभाग्यें ॥ ६७ ॥ मुख्य मूळीं जें कां निपजे । कर्म ऐसें त्यातें म्हणिजे । विहिताविहितक्रिया जे जे । विकर्म म्हणिजे तिये नांव ॥ ६८ ॥ कर्म अकर्मयोगें चळे । ऐसें विकर्मीं ज्यासी विवळे । त्यास निष्कर्मता आकळे । गुरुकृपाबळें तत्काळ ॥ ६९ ॥ कर्मावरी कर्म विशेष वाढे । विकर्म त्यातें म्हणणें घडे । जेथें कर्म रिघों न शके

—प्रश्नाचें गहनत्व प्रकट करण्यासाठीं मुनि अगोदर दुसऱ्या प्रश्नाचें उत्तर सांगतो—

अविर्होत्रः उवाच—अविर्होत्र म्हणाला, कर्म-अकर्म-विकर्म—विहित कर्म, निषिद्ध कर्म, व विहितकर्माचें अनुष्ठान न करणें, इति—असा हा, वेदवादः—वेदवाद आहे, न लौकिकः—लौकिकवाद नव्हे. वेदस्य च ईश्वरात्मत्वात्—आणि वेदाला ईश्वरात्मत्व असल्यामुळें,तत्र—त्या कर्मादि विषयांमध्यें, सूरयः—विद्वानहि, मुह्यन्ति—मोहित होतात. [वेदविहित कर्म, वेदनिषिद्ध अकर्म आणि विहिताचें अकरण हें विकर्म हा वेदवाद आहे. हें कर्मत्रय केवल वेदावरूनच ज्ञात होतें. तें लौकिक नाहीं आणि वेद ईश्वरापासून श्वासोच्छ्वासाप्रमाणें अप्रयत्नानें उत्पन्न झालेला असल्यामुळें अपौरुषेय आहे. पुरुषाच्या वाक्याचें वक्त्याच्या अभिप्रायावरून अर्थज्ञान होऊं शकतें. पण अपौरुषेयवेदांमध्यें केवल वाक्यांच्या पूर्वापार संबंधावरूनच तात्पर्याचा निश्चय करावा लागतो. पण ही गोष्ट दुष्कर आहे. त्यामुळें या कर्मादिकांविषयीं विद्वानांनाहि मोह होतो. मग इतर अविद्वानांविषयीं काय सांगावें ! पूर्वी तूं जेव्हां हा प्रश्न केलास तेंव्हां बालक होतास; त्यामुळें सनकादिकांनीं तुझ्या प्रश्नाचें उत्तर दिलें नाहीं.] ४३.

हे राजा, कर्म, अकर्म आणि विकर्म ही कांहीं सामान्य गोष्ट नव्हे. ज्ञानी स्मृतिकारांनाहि त्याच्या विभागाचा निर्णय करितां येत नाहीं. ५९ जे स्वतः साक्षात् प्रतिसृष्टि करणारे, तेहि या कर्मविभागामध्यें घुटमळतात. जे समुद्राला आपल्या चुळक्यांत घेऊन प्राशन करते झाले, तेहि या कर्मसागरांत बुडाले आहेत. ७६० याच कर्मविवंचनेंत अनेक ऋषि व महर्षि भिन्नभिन्न मतांच्या अभिमानानें निराश होऊन बसले, पण त्यांनाहि त्यांचा निर्णय कळला नाहीं. ६१ साक्षात् ब्रह्मदेवालाहि तो कळला नाहीं, मग इतरांची काय कथा ! ६२ कर्माचें मूळ वेद आहे व वेद साक्षात् नारायण आहे. वेदवादाचें विवेचन करितां करितां श्रुति- शास्त्रांनाहि मौन धारण करावें लागलें आहे. ६३ कर्म, अकर्म व विकर्म हे एकाचेच तीन प्रकार आहेत, तेहि मी तुला विशद करून सांगतों, तें सावधान मनानें ऐक. ६४ एकच साखर शुभ्र, मधुर व मृदु अशा त्रिविध भेदांनीं युक्त असते, त्याच न्यायानें कर्मठ पुरुष एकच कर्म तीन प्रकारचें मानितात. ६५ साखरेंतील मधुरता भिन्न केली असतां तिच्यामध्यें मृदुत्व व श्वेतत्व रहातें. श्वेततेला भिन्न केलें असतां मृदुत्व व मधुरत्व रहातें. ६६ त्याच न्यायानें कर्माला भिन्न केलें असतां कर्मामध्यें पूर्ण अकर्म रहातें, आणि कर्म व अकर्म यांमध्यें विकर्म परम सौभाग्यानें मिरवतें. ६७ अगदीं आरंभीं जें उत्पन्न होतें, त्याला कर्म म्हणतात. जी जी विहित व अविहित क्रिया तिला विकर्म म्हणतात. ६८ अकर्मसंबंधानें कर्म स्वरूपापासून ढळतें, असें विकर्मामध्यें ज्याला कळतें त्याची निष्कर्मता गुरुकृपेनें तत्काळ सिद्ध होतें. ६९ एका कर्मापासून दुसरें, दुसऱ्यापासून तिसरें अशी जी कर्माची वाढ होते, तिलाच विकर्म म्हणावें लागतें. पण, जेथें कर्माची वाढ खुंटते त्यालाच

पुढें । अकर्म चोखडें या नांव ॥ ७७० ॥ ऐशी कर्मविवंचना अटक । हा प्रश्न केला तैं तूं बाळक । त्याचिलागीं गा राया देख । सनकादिक न सांगतीची ॥ ७१ ॥ कर्माकर्मविवंचना । अधिकारेंवीण कोणा । सांगों नये नृपनंदना । कर्म सज्ञाना अतिदुर्बोध ॥ ७२ ॥

परोक्षवादो वेदोऽयं बालानामनुशासनम् । कर्ममोक्षाय कर्माणि विधत्ते ह्यगदं यथा ॥ ४४ ॥

जेवीं रोगु जालिया निश्चित । जावया बाळा बापु भेषज देत । तेथें साकर घाली हातांत । तत्सेवनार्थ प्रलोभें ॥७३॥ तेवीं वेदांचा परोक्षवाद । सत्य मानिती बुद्धिमंद । कर्मे छेदवी कर्मबाध । हा वेदानुवाद मुख्यत्वें ॥ ७४ ॥ वेदु बोले स्वर्गादि फळ । तो प्रवृत्तिलोभ केवळ । परी कर्मं छेदी कर्ममूळ । हें मुख्यत्वें फळ वेदोक्तीं ॥ ७५ ॥ लोहाची बेडी पडली पायीं । ते तोडावया घणु आणिला पाहीं । तो घणूचि विकून खादला जिहीं । त्यांचें बंधन कहीं तुटेना ॥ ७६ ॥ तेवीं कर्मे छेदावें कर्मबंधन । तें कर्म वेंचिती विषयीं पूर्ण । त्यांचें कदा न तुटे भवबंधन । जन्मरण सरेना ॥ ७७ ॥ आम्ही स्वर्गफळा विरक्त । म्हणोनि नाचरे जो वेदोक्त । त्याचें ज्ञान जालें विपरीत । अतिअनर्थ पावे तो ॥ ७८ ॥

अकर्म हें यथार्थ नांव आहे. ७७० राजा, कर्मांची विवंचना अशी अगाध आहे. तूं पूर्वी जेव्हां हा प्रश्न केलास त्यावेळीं तूं लहान बालक होतास, म्हणून सनकादिकांनीं तुला त्याचें उत्तर सांगितलें नाहीं. ७१ कारण अधिकारावांचून हा कर्माकर्मविवेक कोणाला सांगूं नये, अशी शास्त्रमर्यादा आहे. मोठमोठ्या शास्त्रज्ञांनासुद्धां हा कर्माकर्मविवेक समजणें कठिण आहे. ७७२.

—दुर्ज्ञेय वेदतात्पर्य सांगतात—

अयं वेदः परोक्षवादः—हा वेद परोक्षवाद आहे. कर्ममोक्षाय कर्माणि विधत्ते—कर्मातून मुक्त होण्यासाठीं कर्माचें विधान करितो. यथाहि अगदं—लहान मुलाला जसें औषध युक्तीनें, पाजवितात त्याप्रमाणें बालानां अनुशासनं—अज्ञांना ज्याप्रकारें अनुशासन होईल त्याप्रकारें कर्माचें विधान करितो. [मुख्य आशय गुप्त ठेवण्यासाठीं वरुन वरून दुसरा आशय व्यक्त केला जातो याला परोक्षवाद म्हणतात. याविषयीं श्रुतीमध्यें अनेक उदाहरणें आहेत. वेद मुख्य अर्थ गुप्त ठेवून दुसराच अर्थ प्रकट करितो म्हणून त्याला परोक्षवाद म्हटलें आहे. कर्मातून मुक्त होण्यासाठीं तो कर्माचें विधान करितो, हेंच त्याचें परोक्षवादत्व आहे. पण वेद स्वर्गादिकांसाठीं कर्माचें विधान करितो. कर्ममोक्षासाठीं त्यांचें विधान करीत नाहीं, म्हणून म्हणशील तर सांगतों. अज्ञांना कर्म करण्याची आवड ज्याप्रकारें होईल त्याप्रकारें तो बोध करितो. याविषयीं औषधाचा दृष्टांत दिला आहे. पिता बालकाला औषध पाजविण्यासाठीं, खडीसाखर, लाडू इत्यादिकांची लालुच दाखवितो, खाऊच्या लोभानें तो बालकहि कडू औषध पितो व त्याला खाऊहि मिळतो. पण तेवढ्यावरून खडीसाखर मिळणें हें औषधप्राशनाचें फल नव्हे तर आरोग्य हें त्याचें फल आहे, त्याच न्यायानें वेदहि स्वर्गादि अवांतर फलांनीं अज्ञाच्या मनांत कर्मानुष्ठानाची आवड उत्पन्न करून कर्मबंधनांतून मुक्त होण्यासाठींच कर्माचें विधान करितो.] ४४.

मुलाला कांहीं रोग झाला असतां,तो जाण्यासाठीं त्याचा पिता जसा त्याला औषध देतो व तें औषध घेण्यासाठीं लालुच दाखवून त्याच्या हातावर साखरेचा खडा ठेवितो, ७३ त्याचप्रमाणें अज्ञ लोक वेदाचा परोक्षवाद सत्य मानितात. पण कर्मानुष्ठानानेंच कर्मबंधनाचा छेद करविणें हा वेदानुवादाचा मुख्य आशय आहे. ७४ वेदानें स्वर्गादि जें फल सांगितलें आहे, ती केवळ कर्मप्रवृत्तीसाठीं लालुच आहे; परंतु कर्मानें कर्माचें मूळच तोडून टाकणें हेंच मुख्य फल वेदानें सांगितलें आहे. ७५ लोखंडाचीं बेडी पायांत पडली असतां ती तोडण्यासाठीं घण आणिला, पण ज्यांनीं तो घणच विकून खाऊन टाकला, त्यांचें बंधन कधींच तुटत नाहीं. ७६ त्याच न्यायानें वस्तुतः कर्मांनीं कर्माचें बंधन तोडावें. पण जे तें कर्मच विषयांमध्यें खर्चितात त्यांचें भवबंधन कधीं तुटत नाहीं व जन्म-मरण सरत नाहीं. ७७ आम्ही स्वर्गफलांविषयीं विरक्त आहों, असें म्हणून जो वेदोक्त कर्म आचरीत नाहीं, त्याला विपरीत ज्ञान झालें आहे. तो मोठ्या अनर्थाला प्राप्त होतो. ७७८.

नाचरेद्यस्तु वेदोक्तं स्वयमज्ञोऽजितेंन्द्रियः । विकर्मणा ह्यधर्मेण मृत्योर्मृत्युमुपैति सः ॥ ४५ ॥

आम्ही जितेंद्रिय म्हणवित । म्हणोनि नाचरे जो वेदोक्त । त्यासी नातुडे गा परमार्थ । अतिअनर्थ अंगीं वाजे ॥ ७९ ॥ जरी शास्त्रज्ञ ज्ञाता झाला । आणि वेदोक्ता विमुख ठेला । तरी तो जाणपणेंचि नागवला । जाण बुडाला दुःखार्णवीं ॥ ७८० ॥ नाचरे जो वेदोक्त कर्म । त्यक्तकर्में मानी निष्कर्म । त्यासी थोर पडला भ्रम । नाडला परम अभिमानें ॥ ८१ ॥ जरी विषयो निग्रहिला । आणि वेदोक्ता जो दुरावला । तो निजघाता प्रवर्तला । स्वयें बुडाला नरकार्णवीं ॥ ८२ ॥ वेद निजमूळ परमार्था । तें वेदोक्त नाचरतां । जें जें करणें नृपनाथा । तें तें तत्त्वतां अधःपाती ॥ ८३ ॥ डोळें देखणें तत्वतां । तो काढूनि पाहों जातां । न देखे आपुली डोळसता । मा इतर पदार्था कोण देखे ॥ ८४ ॥ तैसा नाचरोनि वेदार्थू । जो जो मानिला परमार्थू । तेणें आवर्तूनियां अनर्थू । जाण निश्चितू आणिला घरा ॥ ८५ ॥ तेणें आचार अनर्थपाटें । वाहावले जन्ममरणवाटे । तेथ नानायोनिगर्भसंकटें । सोसितां न सुटे कल्पांतीं ॥ ८६ ॥ तेथ जन्मजन्मों जन्म न टके । मरमरों मरण न चुके । जैं वेदविहित चुके । तैं अतिदुःखें दुःखभोगू ॥ ८७ ॥ 'विकर्मणा ह्यधर्मेण' । हें मुळींचें पदनिरूपण । तेणें विकर्मामाजीं अधर्म पूर्ण । परी अकर्म तें जाण अधर्म नव्हे ॥ ८८ ॥ ज्यासी लावितां न लागे कर्म । या नांव मुख्य निष्कर्म ।

—अहोपण, कर्ममोक्ष हा जर पुरुषार्थ असेल तर अगोदरच कर्मांचा त्याग करावा, असें कोणी म्हणेल म्हणून आविर्होत्र म्हणतो—

तु यः अजितेंद्रियः अज्ञः—पण जो अजितेंद्रिय अज्ञ, स्वयं वेदोक्तं— स्वतः वेदोक्त कर्म, न आचरेत्—न करील तर, सः विकर्मणा अधर्मेण—तो अनाचारलक्षण अधर्मानें, मृत्योः मृत्युं उपैति—मृत्यूनंतर पुनः मृत्यूला प्राप्त होतो. [अजितेंद्रियत्वामुळें अज्ञ असलेला जो मनुष्य वेदोक्त कर्मांचें आचरण करीत नाहीं, तो कर्मांचें अनुष्ठान न करणें या स्वरूपाच्या अधर्मानें मृत्युपरंपरेंत पडतो. याविषयीं ' स्वकर्मांनीं पीडिलें जाणारे जन पुनः पुनः मृत्युवश होतात ' अशा अर्थाची श्रुति आहे.] ४५.

आम्ही जितेंद्रिय आहों, असें मानून जो वेदोक्त कर्म आचरीत नाहीं, त्याला परमार्थाचा लाभ होत नाहीं. उलट त्याच्यावर मोठा अनर्थ कोसळतो. ७९ एखादा जरी मोठा शास्त्रज्ञ ज्ञाता झाला व वेदोक्तकर्मांपासून विमुख होऊन राहिला तरी तो आपल्या ज्ञानाच्या घमेंडीनेंच नागविला गेला असून दुःखसागरांत बुडाला असें तूं समज. ७८० जो वेदोक्त कर्म करीत नाहीं व तसल्या कर्मत्यागानेंच आपल्याला निष्कर्मी मानितो, त्याला फार मोठा भ्रम झाला आहे व अभिमानानें त्याला नाडलें आहे, असें तूं समज. ८१ एखाद्यानें विषयांचा जरी निग्रह केला आणि तो वेदोक्तकर्मांपासून दूर राहिला तर तो आपला घात करावयास प्रवृत्त झाला आहे व नरकसागरांत बुडाला आहे, असें तूं समज. ८२ वेद परमार्थाचें मूळ आहे. यास्तव वेदोक्त कर्म न करितां दुसरें जें जें करणें तें तें सर्व अधःपाताचें साधन आहे, असें तूं समज. ८३ पहाणें हें डोळ्याचें कार्य आहे. पण तो डोळाच काढून जर पाहूं लागलें तर डोळसताहि गेली व इतर पदार्थांचें पहाणेंहि गेलें; ८४ त्याच न्यायानें वेदार्थाचें आचरण न करितां परमार्थ साधूं लागणें, हें अनर्थाला निमंत्रण देऊन आपल्या घरीं आणण्यासारखें आहे. ८५ अशा आचरणानें त्यानें अनर्थांना जन्म-मरणांच्या मार्गांनीं वेगानें वहावयास लाविलें आहे, असें तूं निश्चयानें जाण. त्या मार्गांत अनेक योनींतील गर्भवासांतील संकटें सोशीत असतांना कल्पांतींहि त्याचा मोक्ष होत नाहीं. ८६ वेदविहितकर्माला जेव्हां हा चुकतो, तेव्हां अतिशय दुःख भोगितो. लक्षावधि जन्म घेऊनहि त्याचे जन्म संपत नाहींत व तितकेच वेळां पुनःपुनः मरूनहि त्याचें मरण चुकत नाहीं. ८७ 'विकर्मणा ह्यधर्मेण' या मूळ श्लोकांतील पदाचें निरूपण असें— विकर्मामध्यें अधर्म पूर्णपणें वास करितो, पण अकर्म हा अधर्म नव्हे. ८८ ज्याला कर्म लावीत असतांनाहि लागत

निष्कर्मलक्षण हाचि धर्म । येणेंचि परम मुक्त साधू । ८९ ॥ ज्यासी शुद्ध आकळे अकर्म । तो तत्काळ होय निष्कर्म । अकर्माचें कळल्या वर्म । मुक्तता परम पायां लागे ॥ ७९० ॥

वेदोक्तमेव कुर्वाणो निःसङ्गोऽर्पितमीश्वरे । नैष्कर्म्यां लभते सिद्धिं रोचनार्था फलश्रुतिः ॥ ४६ ॥

दासी स्वामीची आज्ञाधारी । कां राजमुद्रा प्रजांवरी । तैसी वेदाज्ञा जो शिरीं धरी । स्वधर्माचारी निष्काम ॥ ९१ ॥ मी एकु कर्मकर्ता । ऐशी उठों नेदी अहंता । तें कर्मचि स्वभावतां । अर्पी श्रीअनंता ईश्वरातें ॥ ९२ ॥ एवं ईश्वरीं जें अर्पे कर्म । तें कर्म होय निर्धर्म । यांचि नांव परम । नैष्कर्म्यनिजसिद्धी ॥ ९३ ॥ वेदें बोलिलें कर्मफळ । ज्याची वासना निष्काम निर्मळ । त्यासी वेदोक्त फळ प्रबळ । भोगावया केवळ स्वप्नीं न दिसे ॥ ९४ ॥ ऐसें असतां कर्मफळ । वांछितां नाडिजे केवळ । जेवीं परिसु देऊनि सोज्ज्वळ । मागिजे पोफळ तांबूलासी ॥ ९५ ॥ कर्मीं निष्कामता नित्य फळ । तेथ फळाशा नाडले सकळ । चंदन सर्वांगीं सफळ । तेथ मागतां फळ नाडिजे स्वयें ॥९६॥ हातीं आतुडावया मासा । गळीं लाविजे अल्प आमिषा । तेवीं निष्काम करावया मानसा । वेदू फळाशाप्रलोभी ॥ ९७ ॥ आमिष

नाहीं तेंच मुख्य निष्कर्म होय. हाच मुख्य निष्कर्मलक्षणधर्म आहे. यानेंच साधु परम मुक्त होतात. ८९ ज्याला शुद्ध अकर्म अवगत होतें, तो तत्काल कर्मशून्य होतो. अकर्माचें वर्म कळलें असतां मुक्ति त्याची दासी होते. ७९०.

--म्हणून--

ईश्वरे अर्पितं वेदोक्तं एव कुर्वाणः—ईश्वराला समर्पण केलेलें वेदोक्त कर्मच करणारा, **निःसङ्गः**—फलासक्तिशून्य होऊन, **नैष्कर्म्यां सिद्धिं लभते**—नैष्कर्म्यसिद्धीला प्राप्त होतो. **फलश्रुतिः रोचनार्था**—फलश्रुति रुचि उत्पन्न करण्यासाठीं आहे. [वेदोक्तच कर्म करणारा व निषिद्ध कर्म न करणारा नैष्कर्म्यरूप सिद्धीला प्राप्त होतो. अहोपण, कर्म करूं लागलें असतां त्याविषयीं मी कर्ता अशी आसक्ति व फल हीं दोन्हीं होतील, नैष्कर्म्यरूपसिद्धि होणार नाहीं, असें कोणी म्हणेल म्हणून मुनि सांगतो. ' मी कर्ता ' असा अभिनिवेश न ठेवितां जो पुरुष सर्व कर्में ईश्वरार्पण करितो, फळाच्या उद्देशानें तीं करीत नाहीं त्याला नैष्कर्म्यसिद्धि प्राप्त होते. अहोपण, फल श्रुत असल्यामुळें कर्म केलें असतां तें फल अवश्य प्राप्त होणारच. वेदानें कर्मांचें जें फल सांगितलें आहे तें पूर्वोक्त औषधप्राशनाच्या दृष्टांताप्रमाणें कर्मांविषयीं रुचि उत्पन्न करण्यासाठीं आहे. वेदोक्त फलश्रवणानें कर्मानुष्ठानाची आवड उत्पन्न झाली असतां पुरुष वेदार्थाचा विचार करूं लागतो. त्यांतील ' जो हे गार्गि, या अक्षर ब्रह्माला न जाणतां या लोकांतून मरून जातो, तो कृपण होय ' अशी अनात्मज्ञाचीच कृपणता व ' ब्राह्मण या आत्म्याला वेदानुवचन ब्रह्मचर्य, तप, श्रद्धा, यज्ञ, इत्यादि उपायानें जाणण्याची इच्छा करितात ' इत्यादि वचनांवरून यज्ञादिकांची ज्ञानांगता निश्चित करून निष्काम कर्मांमध्येंच प्रवृत्त होतो. त्यानंतर ' ज्याला स्वर्गाची इच्छा असते तो याग करितो ' इत्यादि वचनांवरून इच्छित स्वर्गादिकालाच फलत्व आहे, असा बोध होतो. पण स्वर्गादिकांची इच्छा न केल्यास तो प्राप्त होत नाहीं, असा नियम असल्यामुळें निष्कामकर्मानुष्ठनानें चित्तशुद्धि, ज्ञानप्राप्ति इत्यादि क्रमानें नैष्कर्म्यसिद्धि होते.] ४६.

एखादी दासी आपल्या स्वामीची आज्ञा जशी शिरसा मान्य करिते, किंवा प्रजा राजाच्या मुद्रेला प्रमाण मानिते, त्याप्रमाणें जो वेदाज्ञेला शिरसा मान्य करून निष्काम स्वधर्माचरण करितो, ९१ ' मी कर्मकर्ता आहें ' अशी अहंता उत्पन्न होऊं देत नाहीं व तें कर्म स्वभावतःच ईश्वरार्पण करितो, ९२ त्याचें तें ईश्वरार्पण केलेलें कर्मच निर्धर्म होतें. हीच नैष्कर्म्यनिजसिद्धि आहे. ९३ वेदानें जें कर्मफल सांगितलें आहे, त्याची वासना सोडून जो शुद्ध निष्काम कर्म करितो, त्याला वेदोक्त प्रबळ फलहि स्वप्नांतसुद्धां भोगावें लागत नाहीं; ९४ पण असें असतांहि जे कर्मफलाची इच्छा करितात ते केवळ नागविले जातात. आपल्या हातांतील सुंदर परीस देऊन त्याबद्दल विडा खाण्यासाठीं सुपारी मागण्यासारखेंच हें आहे. ९५ कर्मांतील निष्कामता हें नित्यफल आहे. पण फलाशेनें तें दुर्लभ होतें. चंदन सर्वांगीं सफल आहे म्ह० तो सुगंधानें ओतप्रोत भरलेला आहे. पण असें असतांहि त्याच्याजवळ जाऊन त्याच्यापाशीं गंधरहित फल मागणें म्हणजे स्वतःचीच फसवणूक करणें आहे. ९६ मासा हातीं लागावा म्हणून गळाला जसें थोडेंसें मांस लावितात, त्याप्रमाणें वेद मनाला निष्काम करण्यासाठीं फलाशेचा लोभ दाखवितो. ९७ गळाला

घालूनि मासेपाळी । कीं तद्योगें जळाबाहेर गाळी । तेवीं कर्म कर्मातें निर्दाळी । हें नेणिजे मुळीं फळकामी ॥ ९८ ॥ हो कां फळाचिये चाडें । स्वधर्मकर्मीं प्रवृत्ति घडे । तेणें नैष्कर्म्यसिद्धी आतुडे । हें वेदांचें फुडें निजगुह्य ॥ ९९ ॥ कर्म ब्रह्मत्वें सदा सफळ । फळ वांछी त्यातें निष्फळ । हें जाणोनि कर्मकुशळ । फळाशा समूळ छेदिती ॥ ८०० ॥ ऐसें आचरतां वैदिक कर्म । तेणें कर्में पाविजे नैष्कर्म्य । याहोनियां अतिसुगम । सांगेन वर्म तें ऐक ॥ १ ॥

य आशु हृदयग्रंथिं निर्जिहीर्षुः परात्मनः । विधिनोपचरेद्देवं तंत्रोक्तेन च केशवम् ॥ ४७ ॥

जेणें वासनेचें जाळ तुटे । अहंकाराची गांठी सुटे । जीवीं परमात्मा स्वयें प्रगटे । तें तांत्रिक विधान गोमटें ऐक राया ॥ २ ॥ जया तांत्रिक महापूजा । संतोष होय गरुडध्वजा । तें तांत्रिक विधान वोजा । महाराजा अवधारीं ॥ ३ ॥ वैदिक मंत्र तांत्रिक तंत्र । हे मिश्रपूजा अतिपवित्र । शीघ्र निष्काम करी नर । तो पूजाप्रकार अतिउत्तम ॥ ४ ॥ वैदिक अथवा तांत्रिक । गुरुमार्गें सिद्धिदायक । यालागीं गा आवश्यक । सद्गुरूसी देख शरण जावें ॥ ५ ॥

लब्धानुग्रह आचार्यात्तेन संदर्शितागमः । महापुरुषमभ्यर्चेन्मूर्त्याऽभिमतयाऽऽत्मनः ॥ ४८ ॥

प्रवृत्तिनिवृत्तिकृत कार्या । अवश्य पाहिजे आचार्या । आपमतीं भजतां राया । अनेक अपायांमाजीं पडे ॥ ६ ॥ भोयीं पाय सिद्ध आहेती । भुयाळेंवीण वृथा भ्रमती । तेवीं गुरुवीण जे जे

मांस लावून कोळी मोठा थोरला मासा जळांतून जसा बाहेर काढितो, त्याप्रमाणें कर्म कर्माचा नाश करितें, पण हें सकाम पुरुष जाणत नाहीं. ९८ अगोदर पुरुषाची फलाच्या इच्छेनेंच कां होईना पण स्वधर्मरूप कर्मांमध्यें प्रवृत्ति होऊं दे. पुढें त्या स्वधर्म कर्मानेंच क्रमानेंच नैष्कर्म्यसिद्धि होईल, हा वेदाचा गूढ आशय आहे. ९९ कर्म ब्रह्मत्वानें सदा सफल आहे. पण जे फलाची इच्छा धरितात, त्यांना तें निष्फल होतें, हें जाणून कर्मकुशल पुरुष फलाशेचा समूळ उच्छेद करितात. ८०० याप्रमाणें वैदिककर्म आचरीत असतांना त्या कर्मानेंच नैष्कर्म्यप्राप्ति होते. हे राजा, आतां याहीपेक्षां मी तुला अति सुगम उपाय सांगतों, तो ऐक. ८०१.

—याप्रमाणें वैदिक कर्मयोग सांगून तांत्रिक कर्मयोग सांगतात—

यः परात्मनः हृदयग्रंथिं आशु निर्जिहीर्षुः–जो वस्तुतः परमात्माच असलेल्या जीवात्म्याच्या अहंकारबंधाचा सत्वर परिहार करण्याची इच्छा करीत असेल त्यानें, **तंत्रोक्तेन विधिना च**–तंत्रोक्त विधीनेंहि, **केशवं देव**-केशवसंज्ञक भगवानाची, **उपचरेत्**-पूजा करावी. [जीवात्मा हा वस्तुतः परमात्माच आहे, यास्तव त्याच्या हृदयग्रंथीचा म्ह० अहंकारबंधनाचा सत्वर उच्छेद करण्याची ज्याला इच्छा असेल त्यानें तंत्रोक्त विधीनेंहि भगवानाची परिचर्या करावी.] ४७.

ज्याच्या योगानें वासनेचें जाळें तुटतें, अहंकाराची गांठ सुटते व जीवामध्यें परमात्मा स्वतः प्रकट होतो, तें उत्तम तांत्रिक विधान तूं आतां ऐक. २ ज्या तांत्रिक महापूजेनें गरुडध्वजाला संतोष होतो, तें तांत्रिक विधान तूं आतां लक्ष देऊन ऐक. ३ वैदिक मंत्र व तांत्रिक तंत्र अशी ही मिश्रपूजा अति पवित्र असून पुरुषाला निष्काम करिते. तो पूजाप्रकार उत्तम आहे. ४ पण वैदिक किंवा तांत्रिक विधान गुरुमार्गानें सिद्धिदायक होतें, यासाठीं सद्गुरूला अवश्य शरण जावें. ८०५.

—तोच तंत्रोक्त विधि पुढील श्लोकांत सांगतात—

आचार्यात् लब्धानुग्रहः–आचार्यापासून ज्यानें अनुग्रह संपादन केला आहे व, **तेन**–त्या गुरूनें, **संदर्शितागमः**–ज्याला पूजनाचा प्रकार सांगितला आहे अशा पुरुषानें, **आत्मनः**– स्वतःला, **अभिमतया मूर्त्या**–अभिमत असलेल्या मूर्तीनें, **महापुरुषं अभ्यर्चेत्**–महापुरुषाची पूजा करावी. [आचार्यांचा अनुग्रह संपादन करून, त्याच्यापासून पूजेचा प्रकार समजून घेऊन स्वतःला इष्ट असलेल्या मूर्तीनें भगवानाची पूजा करावी.]. ४८.

प्रवृत्ति किंवा निवृत्ति या कर्तव्याचें ज्ञान करून देण्यास गुरु अवश्य पाहिजे. हे राजा, मार्गदर्शक आचार्यावांचून आपल्याच बुद्धीनें कर्म आचरिलें असतां तो भक्त निःसंशय अनेक संकटांत पडतो. ६ भूमीवर चालण्यास पाय सिद्धच आहेत. परंतु मार्गदर्शक वाटाड्या नसला तर नवखा मनुष्य जसा व्यर्थ भटकत फिरतो, त्याचप्रमाणें जे

करिती । ते ते अहंमती भ्रमले ॥ ७ ॥ गुरु ब्रह्म दोनी एक । ऐशिया भावना आवश्यक । सेवा करूनि भावपूर्वक । संतोषवूनि देख अनुग्रहो घ्यावा ॥ ८ ॥ तेथ निजाधिकारप्राप्तें । जे मूर्ति आवडेल आपणियातें । तेचि मंत्रविद्या तेथें । श्रद्धासंभरितें अंगीकाराबी ॥ ९ ॥ तेव्हां गुरुमुखें मिश्र वोजा । पुरुषोत्तममहापूजा । शिकोनियां निजकाजा । भजावें अधोक्षजा शिक्षिता मतीं ॥ ८१० ॥ तेचि भजती हातवटी । आगमोक्त निजपुष्टी । राया सांगेन गोमटी । सावधानदृष्टीं अवधारीं ॥ ११ ॥

शुचिः संमुखमासीनः प्राणसंयमनादिभिः । पिण्डं विशोध्य संन्यासकृतरक्षोऽर्चयेद्धरिम् ॥ ४९ ॥

विध्युक्त करितां संध्यास्नान । तेथचि आहे ब्रह्मज्ञान । आचमनीं होय हरिरूप आपण । हें नेणोनि अज्ञान आगमीं भरती ॥ १२ ॥ केशवादि नामीं जाण । अंगप्रत्यंगीं न्यासितां पूर्ण । तेव्हां हरिरूप होय आपण । हें नेणोनि अज्ञान आगमीं भरती ॥ १३ ॥ करूनि आगमोक्त संध्यास्नान । मूर्तीपासीं येऊन जाण । संमुख घालावें आसन । चैलाजिनकुशयुक्त ॥ १४ ॥ रेचकपूरककुंभकें जाण । प्राणायामें प्राणसंयमन । भूतशुद्ध्यादिकीं जाण । शरीरशोधन करावें ॥ १५ ॥ भूतविलय भूतशुद्धी । प्राणप्रतिष्ठा पिंडादिशुद्धी । मूळमंत्रें न्यास प्रबुद्धीं । गुरुदीक्षाविधी विध्युक्त कीजे ॥ १६ ॥ हृदय कवच शिखा शिर । नेत्र अस्त्रादि फट्कार । एवंविधान अनुकार । आगमोक्त प्रकार करावे न्यास ॥ १७ ॥ यापरी मूळमंत्रदीक्षा । करोनि दिग्बंधादि संरक्षा । मग मूर्तिपूजनपक्षा । नृपाध्यक्षा अवधारीं ॥ १८ ॥

जे गुरूवांचून कर्म करितात, ते अहंकारी पुरुष खात्रीनें भ्रमांत पडतात. ७ 'गुरु व ब्रह्म ही दोन्हीं एकच आहेत' अशी भावना अवश्य ठेवावी आणि भक्तिपूर्वक गुरूची सेवा करून, त्याला संतोषवून त्याचा अनुग्रह संपादन करावा. ८ आपल्या अधिकारानुरूप जी मूर्ति आपल्याला आवडत असेल तिच्याच उपासनेची मंत्रविद्या श्रद्धेनें स्वीकारावी. ९ गुरुमुखानें पुरुषोत्तमाची मिश्रमहापूजा शिकून शिक्षितमतीनें आपल्या इष्टकार्यासाठीं भगवानाला भजावें. ८१० हे राजा, तीच तंत्रशास्त्रोक्त पूजापद्धति मी तुला सांगतों, ती सावधान चित्तानें ऐक. ८११.

शुचिः संमुखमासीनः प्राणसंयमनादिभिः पिंण्डं विशोध्य संन्यासकृतरक्षः हरिं अर्चयेत्—शुचिर्भूत होऊन, मूर्तीच्या संमुख बसून, प्राणायाम, भूतशुद्धि इत्यादिकांच्या योगानें शरीराचें शोधन करून, अंगन्यासांनीं त्याचें रक्षण करून हरीची पूजा करावी. ४९.

सशास्त्र स्नानसंध्या केली असतां त्यांतच ब्रह्मज्ञान आहे. आचमनानें तो स्वतः भगवद्रूपच होतो, हें न जाणून लोक अज्ञानांत शिरतात. १२ केशवादि नामांनीं अंगें व प्रत्यंगें यांवर न्यास केला असतां आपण स्वतः हरिरूप होतों हें न जाणतां लोक व्यर्थ अज्ञानांत पडतात. १३ आगमोक्त स्नानसंध्या करावी, मूर्तीजवळ येऊन तिच्यापुढें चैल–अजिन–कुश यांनीं युक्त आसन घालावें. १४ रेचक, पूरक व कुंभक करून प्राणायामाच्या द्वारां प्राणसंयमन करावें. 'अपक्रामंतु०' इत्यादि मंत्रांनीं भूतशुद्ध्यादिकांच्या योगानें शरीरशोधन करावें. १५ भूतविलय, भूतशुद्धि, प्राणप्रतिष्ठा, पिण्डादिशुद्धि, मूळमंत्रांनीं अंगावर देवतांचा न्यास इत्यादि सर्व यथाशास्त्र गुरूनें सांगितलेल्या पद्धतीनें करावें. १६ हृदय, कवच, शिखा, शिर, नेत्र अस्त्रादि फट्कार, इत्यादि सर्व न्यास आगमोक्त प्रकारानें यथाविधि करावे. १७ याप्रमाणें मूळ मंत्राची दीक्षा व दिग्बंधादि संरक्षा करून त्यानंतर मूर्तीचें पूजन कसें करावें, तें आतां सांगतों, ऐक. ८१८.

अर्चादौ हृदये चापि यथालब्धोपचारकैः । द्रव्यक्षित्यात्मलिङ्गानि निष्पाद्य प्रोक्ष्य चासनम् ॥ ५० ॥
पाद्यादीनुपकल्प्याथ सन्निधाप्य समाहितः । हृदादिभिः कृतन्यासो मूलमन्त्रेण चार्चयेत् ॥ ५१ ॥

प्रयोगछंद संपूर्ण । पूर्वान्वयो विपरीत जाण । द्रव्यशुद्धि क्षितिमार्जन । हें मागील निरूपण पुढां आलें ॥ १९ ॥ द्रव्यशुद्धि मुखशोधन । भूमिशुद्धि संमार्जन । आत्मशुद्धि सावधान । काढिल्या अनुलेपन मूर्तिशुद्धी ॥ ८२० ॥ पूजासंभार सिद्ध करून । समस्त शंखतोयें प्रोक्षून । निजासनीं सावधान । एकाग्र जाण बैसावें ॥ २१ ॥ ज्यासी ध्यानीं मूर्ति न ये संपूर्ण । तेणें प्रतिमामूर्ति अधिष्ठान । तेथेंचि करावें पूजन । लब्धोपचारें जाण आगमोक्त ॥ २२ ॥ ज्यासी ध्याना मूर्ति ये अतिसंकटीं । तेणें बाह्योपचार आटाटी । सांडूनियां ध्यानदृष्टीं । करावी गोमटी मानसपूजा ॥ २३ ॥ ज्याचें हृदयींचें न बिकरे ध्यान । बाह्यमूर्तिपूजेसी सावधान । तेणें उभयतां पूजन । करावें संपूर्ण आगमोक्त ॥२४॥ सकळ पूजासंभार । निकट ठेवूनि उपचार । मग मूर्तीसी न्यासप्रकार । उक्तशास्त्रें करावा ॥ २५ ॥ जैसे न्यास आपणास । तैसेचि करावे मूर्तीस । हा आगमोक्त गुरुसौरस । मूळमंत्रें न्यास मूर्तीसी ॥ २६ ॥ आगमोक्त करितां न्यास । अंगप्रत्यंगीं विन्यास । तेणें करितां होय हृषीकेश । हा अर्थसौरस दृढ करावा ॥ २७ ॥ दृढ करोनि अनुसंधान । मूळमंत्रें मूर्तिपूजन । हृदयीं आणि प्रतिमेसी जाण । पूजाविधान दोहीं ठायीं ॥ २८ ॥

अर्चादौ–मूर्त्यादिकांमध्यें, **च हृदये अपि**–व हृदयामध्येंहि, **यथालब्धोपचारकैः**–यथासंभव प्राप्त झालेल्या उपचारांनीं, **द्रव्यक्षित्यात्मलिङ्गानि निष्पाद्य आसनं प्रोक्ष्य**–पुष्पादि द्रव्यें निवडून, (त्यांतील जीव-जंतु, केर वगैरे काढून) पृथ्वीचें संमार्जन वगैरे करून चित्ताला अव्यग्र करून मूर्तीला आदल्या दिवशीं लावलेलें गंधादि धुवून टाकून, म्ह० या उपायांनीं पुष्पादि द्रव्यें, पूजाविधानाची भूमि, स्वतःचें चित्त व पूज्य मूर्ति यांना पूजनास योग्य करून व आसनाचें प्रोक्षण करून; **पाद्यादीन् उपकल्प्य**–अर्घ्य, पाद्य इत्यादिकांचीं पात्रें सिद्ध करून, **अथ संनिधाप्य**–व तीं आपल्याजवळ ठेवून घेऊन, **समाहितः**–शांतचित्त होऊन, **हृदादिभिः कृतन्यासः**- हृदयादि मंत्रांनीं अंगन्यास करून, **मूलमंत्रेण च अर्चयेत्**–मूलमंत्रानें पूजा करावी. [**मूर्त्यादिकांमध्यें** व हृदयांतहि प्राप्त झालेल्या उपचारांनीं हरीची पूजा करावी. पण त्यापूर्वीं पुष्पादि द्रव्यें भूमि इत्यादिकांना **पूजेला** योग्य करून अर्घ्यपाद्यादि पात्रें जवळ घेऊन हृदयामध्यें पूजिलेल्या भगवानाचें श्रीमूर्तीमध्यें ध्यान करून हृदय, शिर, **शिखा**, कवच, नेत्र, अस्त्र, यांचें ‘ हृदयाय नमः, ’ ‘ शिरसे स्वाहा ’ इत्यादि मंत्रांनीं व मूलमंत्रांनीं देवामध्यें न्यास करून **मूलमंत्रांनीं** त्याची पूजा करावी.] ५०–५१.

मंत्रांचा प्रयोग, त्यांचा छंद, इत्यादिकांचें पूर्णपणें स्मरण करून पूर्व श्लोकाशीं याचा संबंध आहे यास्तव द्रव्यशुद्धि, भूमार्जन इत्यादि मागील निरूपणच येथें आलें आहे. १९ द्रव्यशुद्धि म्ह० मुखशोधन, भूमिशुद्धि म्ह० संमार्जन, आत्मशुद्धि म्ह० मनाचें सावधानपण व मूर्तिशुद्धि म्ह० मूर्तीवरील गंधादिकांचें अनुलेपन वगैरे काढणें, ८२० पुष्पादि पूजासंभार सिद्ध करून, शंखांतील जलानें त्या सर्वांचें प्रोक्षण करून, आपल्या आसनावर सावधान व एकाग्र मनानें बसावें. २१ ज्याच्या ध्यानामध्यें मूर्ति पूर्णपणें येत नाहीं, त्यानें प्रतिमामूर्तीचें अधिष्ठान करून तेथेंच प्राप्त उपचारांनीं आगमोक्त विधीनें पूजन करावें. २२ पण ज्याच्या ध्यानामध्यें मूर्ति पूर्णपणें स्थित होत असेल त्यानें बाह्य उपचारांची खटपट टाकून ध्यानदृष्टीनें सुंदर मानसपूजा करावी. २३ ज्याच्या हृदयांतील ध्यान सुटत नाहीं व जो बाह्यमूर्तिपूजेमध्येंहि सावधान असतो, त्यानें आगमोक्त प्रकारानें दोन्हीं ठिकाणीं पूजन करावें. २४ पूजेचें सर्व साहित्य आपल्याजवळ ठेवून घ्यावें. मग शास्त्रोक्तप्रकारें मूर्तीच्या ठिकाणीं न्यास करावा. २५ आपण आपल्या अंगावर जसा न्यास करितो, तसाच तो मूर्तीच्या ठिकाणीं मूळमंत्रांनीं करावा २६ व तो गुरुमुखानें आगमद्वारां समजून घ्यावा. असा अंगन्यास केला असतां हा उपासकच साक्षात् हृषीकेष होतो, ही भावना दृढ करावी. २७ चित्ताचें अनुसंधान दृढ ठेवून हृदयामध्यें व प्रतिमेमध्यें अशा दोन्ही ठिकाणीं मूळमंत्रानें मूर्तीची यथाविधि पूजा करावी. ८२८.

साङ्गोपाङ्गां सपार्षदां तां तां मूर्तिं स्वमन्त्रतः । पाद्यार्घ्याचमनीयाद्यैः स्नानवासोविभूषणैः ॥ ५२ ॥
गन्धमाल्याक्षतस्रग्भिर्धूपदीपोपहारकैः । साङ्गं संपूज्य विधिवत्स्तवैः स्तुत्वा नमेद्धरिम् ॥ ५३ ॥

करचरणादि अव्यंग । मूर्ति चिंतावी सुंदर सांग । श्याम मनोहर श्रीरंग । उल्हास चांग निजध्यानीं ॥ २९ ॥ मूर्ति चतुर्भुज वेल्हाळ । शंख चक्र गदा कमळ । सुनंदादि पार्षदमेळ । चिंतावे सकळ आयुधादिक ॥ ८३० ॥ यथोक्त मधुपर्कविधान । अर्घ्यपाद्यादि आचमन । पुरुषसुक्तमंत्रें जाण । करावें स्नान निर्मळ जळें ॥ ३१ ॥ मुकुट कुंडलें कटीं मेखळा । कांसे मिरवे सोनसळा । आपाद रुळे वनमाळा । कौस्तुभ तेजागळा कंठीं झळके ॥ ३२ ॥ पादपद्मांकित सुकुमार । उर्ध्वरेखा ध्वज वज्र । वांकी अंदुवांचा गजर । चरणीं तोडर गर्जतु ॥ ३३ ॥ निढळीं शुद्ध श्यामकळा । टिळकु रेखिला पिंवळा । त्यावरी अक्षता सोज्वळा । आरक्त तेजाळा कुंकुमाक्त ॥ ३४ ॥ सुमनें गुंफिलीं वीरगुंठीं । त्यावरी मधुकरांची घरटी । तुळसीकमळमाळा कंठीं । चंदनाची उटी श्यामांगीं शोभे ॥ ३५ ॥ धूप दीप उपहार । तांबूल अर्पावें सकर्पूर । निरंजनें जयजयकार । मंत्रस्वरें अर्पावा ॥ ३६ स्तुति करावी वेदोक्त मंत्रें । कां पुराणोक्त नाना स्तोत्रें । अथवा प्राकृत नामोच्चारें । नाना प्रकारें गद्यपद्यें ॥ ३७ ॥ स्तवनें संतोष अधोक्षजा । ऐसें भावावें महाराजा । मग साष्टांगें अतिवोजा । गरुडध्वजा नमस्कारावें ॥ ३८ ॥

आत्मानं तन्मयं ध्यायन् मूर्तिं संपूजयेद्धरेः । शेषामाधाय शिरसि स्वधाम्न्युद्वास्य सत्कृतम् ॥५४॥

साङ्गोपाङ्गां सपार्षदां तां तां मूर्तिं—हृदयादि अंगें, सुदर्शनादि उपांगें व इतर परिवार हेच पार्षद, यांसह त्या त्या मूर्तीला, **स्वमंत्रतः**—मूळमंत्रानें, **पाद्यार्घ्याचमनीयाद्यैः**—पाद्य अर्घ्य-आचमनीय-मधुपर्क इत्यादि व, **स्नानवासोविभूषणैः**—स्नान, वस्त्रें, भूषणें, **गन्धमाल्याक्षतस्रग्भिः**—गंध-पुष्प-तिलकालंकारांतील अक्षता, फुलांच्या माळा, **धूपदीपोपहारकैः**—धूप, दीप, नैवेद्य या उपचारांनीं, **साङ्गं विधिवत् संपूज्य**—साङ्ग यथाविधि पूजून, **स्तवैः स्तुत्वा**—स्तोत्रांनीं स्तुति करून, **हरिं नमेत्**—हरीला नमस्कार करावा. [अक्षतांनीं विष्णूची व केतकीपुष्पांनीं महेश्वराची पूजा करूं नये, असा निषेध असल्यामुळें येथील अक्षता हें पूजासाहित्य न समजतां तिलकालंकारांतील अक्षता समजाव्या.] ५२-५३.

हात, पाय इत्यादि सर्व अवयवांनींयुक्त अशा श्यामसुंदर, मनोहर श्रीरंगाच्या सुंदर मूर्तीचें चिंतन करावें. आपल्या ध्यानामध्यें चांगला उल्हास धरावा. २९ चतुर्भुज सुंदर मूर्ति कल्पावी. तिच्या हातांत शंख, चक्र, गदा व कमल ही चिन्हें असावींत. सुनंदादि पार्षदांचा समूह व आयुधादि देवता यांची कल्पना करून अशा मूर्तीचें चिंतन करावें, ८३० आसन, अर्घ्य, पाद्य, आचमन, मधुपर्क इत्यादि उपचार पुरुषसूक्तमंत्रांनीं समर्पण करावे. निर्मलजलानें स्नान घालावें, ३१ मुकुट, कुंडलें, कंबरेंत मेखला, नेसावयास पिवळा पीतांबर, गळ्यांत पायापर्यंत लोंबणारीं वनमाळा, गळ्यांत अतिशय तेजस्वी कौस्तुभ, ३२ सुकुमार पायांवर ऊर्ध्वरेखांकित ध्वज व वज्र हीं चिन्हें, पायांत साखळ्या व छुमछुम वाजणाऱ्या तोरड्या आहेत, अशी कल्पना करावी. ३३ कपाळावर केशरी तिलक, त्यावर अक्षता, तेजस्वी रक्तवर्ण कुंकुमाचा लेप, ३४ केसांत फुलांची जाळी, त्यावर भ्रमरांचा थवा, गळ्यांत तुळसीच्या व कमलांच्या माळा आणि श्यामसुंदर अंगावर चंदनाची उटी शोभत आहे, अशी कल्पना करावी. ३५ धूप, दीप, नैवेद्य व कर्पूरयुक्त तांबूल अर्पण करावा. मंत्रस्वरानें निरंजन भगवानाचा जयजयकार करावा. ३६ वेदोक्तमंत्रांनीं किंवा पुराणोक्त विविध स्तोत्रांनीं स्तुति करावी. किंवा प्राकृत नामोच्चार करून अनेक प्रकारचीं गद्यें व पद्यें म्हणावी. ३७ या आपल्या स्तवनांनीं भगवानाला संतोष होतो, अशी भावना करावी. नंतर अति आदरानें भगवानाला साष्टांग नमस्कार घालावा. ८३८.

आत्मानं तन्मयं ध्यायन्—आपला आत्मा तद्रूप आहे असें ध्यान करीत, **हरेः मूर्तिं संपूजयेत्**—हरीच्या मूर्तीची पूजा करावी. **शेषां शिरसि आधाय**—निर्माल्य आपल्या मस्तकावर धारण करून, **सत्कृतं स्वधाम्नि उद्वास्य**—भगवानाचा सत्कार करून स्वस्थानीं म्ह० देवाची हृदयामध्यें व मूर्तीची संपुटामध्यें स्थापना करून पूजाविधि संपवावा ५४.

द्वैतभावें भजनविधी । ते जाणावी स्थूलबुद्धी । भजनाची भजनसिद्धी । जाण त्रिशुद्धी तन्मय होणें ॥ ३९ ॥ मूर्तिध्यानें तन्मय स्थिती । ऐक्यत्वें राहे निश्चळ वृत्ती । याचि नांव मुख्य भक्ती । उठलिया पुढती नमावें हरी ॥ ८४० ॥ ऐशी पूजा करूनि हरी । शेष प्रसाद धरोनि शिरीं । मग देवो आपणियांभीतरीं । हृदयमंदिरीं निजविजे ॥ ४१ ॥ एवं पूजेचें उद्वासन । ध्यानमूर्ति हृदयीं शयन । प्रतिमा पर्यंकीं निजवून । विधिविधानसमाप्ती ॥४२॥ जहालिया पूजाविसर्जन । विसर्जूं नये अनुसंधान । अखंड हरीचें स्मरण । सर्वस्वें आपण सर्वदा कीजे ॥ ४३ ॥ या नांव गा आगमविधी । राया जाण त्रिशुद्धी । सदा पाळिती सद्बुद्धी । परमात्मसिद्धिप्रापक ॥ ४४ ॥ आगमोक्त विधिलक्षण । प्रतिमाचि मुख्य नव्हे जाण । ज्यासी जेथ श्रद्धा पूर्ण । तेथ हें विधान सुखें कीजे ॥ ४५ ॥

एवमग्न्यर्कतोयादावतिथौ हृदये च यः । यजतीश्वरमात्मानमचिरान्मुच्यते हि सः ॥ ५५ ॥

हे पूजा नव्हे एकदेशी । बहुत स्थानें ये पूजेसी । त्यांत शीघ्रतर जें प्राप्तीसी । तें मी तुजपासीं सांगेन राया ॥ ४६ ॥ येणेंचि विधानें यथाकाळीं । सांग पूजा कीजे जळीं । अथवा सूर्यमंडळीं । पूजा सोज्ज्वळी हरिध्यानें कीजे ॥ ४७ ॥ अग्नीच्या ठायीं होय दीप्ती । पूजा कीजे कमळापती । अवघ्यापरीस शीघ्रप्राप्ती । पूजावा अतिथी भगवद्भावें ॥ ४८ ॥ आलिया वैश्वदेवाचे अंतीं । तो भलता हो भलते याती । त्यासी जे भगवद्भावें पूजिती । त्यांचे घरा पूर्ण प्राप्ती वोरसोनि ये ॥ ४९ ॥ पूर्वी अनोळखु निश्चितीं । आलिया वैश्वदेवाचे अंतीं । त्यातें ब्रह्मभावें जे पूजिती । त्यांसी भुक्तिमुक्ती आंदणी ॥ ८५० ॥ त्या वैश्वदेवाचे अंतीं जाण । निजभाग्यें आलिया शुद्ध ब्राह्मण । तयां

द्वैतभावानें भजन करणें ही स्थूलबुद्धि आहे. भजनसमयीं तन्मय होणें, हीच खरोखर भजनाची सिद्धि आहे. ३९ मूर्तीचें ध्यान करितां करितां तन्मय स्थिति झाली असतां वृत्ति एकत्वानें निश्चल रहाते. यालाच मुख्य भक्ति म्हणतात. ही ऐक्यभक्ति सोडून उठलें असतां हरीला नमस्कार करावा. ८४० अशी सांगपूजा करून निर्माल्यादि शेषप्रसाद मस्तकावर धारण करून देवाला हृदयमंदिरांत निजवावें. ४१ याप्रमाणें पूजेचें विसर्जन करावें. ध्यानाच्या मूर्तीला हृदयांत व मूर्तीला पर्यंकावर निजवून पूजाविधीची समाप्ति करावी; ४२ पण याप्रमाणें पूजेचें विसर्जन जरी केलें, तरी हरीचें अनुसंधान सोडूं नये, तर त्याचें अखंड, अहर्निश स्मरण करीत रहावें. ४३ राजा, हाच तांत्रिकविधि आहे. बुद्धिमान् लोक हाच सदा पाळितात व तो परमात्म्याची सिद्धि करून देणारा आहे. ४४ परंतु या आगमोक्तविधींत प्रतिमाच मुख्य आहे, असें तूं समजूं नकोस; तर ज्याची ज्यावर पूर्ण श्रद्धा असेल, त्यानें तेथेंच हें विधान खुशाल करावें. ८४५.

—तांत्रिक कर्मयोगाचा उपसंहार करितात—

एवं–याप्रमाणें, अग्न्यर्कतोयादौ–अग्नि, सूर्य, जल इत्यादिकांमध्यें, अतिथौ–अतिथीमध्यें, हृदये च–आणि हृदयामध्यें, यः–जो, ईश्वरं आत्मानं यजति–ईश्वराची म्ह० आत्म्याची पूजा करितो, सः–तो, अचिरात्–तत्काल, मुच्यते–मुक्त केला जातो. ५५ (३).

ही पूजा एकदेशी म्ह० केवळ मूर्तींतच होते, असें नाहीं. हिचीं अनेक स्थानें आहेत. त्यांतील हरीची प्राप्ति सत्वर करून देणारें स्थान मी तुला सांगतों. ४६ याच विधीनें प्रसंगीं जनांत सांगपूजा करावी. किंवा सोज्ज्वल सूर्यमंडळांत हरीच्या ध्यानानें पूजा करावी. ४७ अग्नीमध्यें दीप्ति असते. तिच्यामध्यें कमलापतीची पूजा करावी. ४८ या सर्वांपेक्षां भगवंताची प्राप्ति सत्वर करून देणाऱ्या अतिथीची भगवद्भावनेनें पूजा करावी. ४८ वैश्वदेवाच्या शेवटीं कोणीहि व कोणत्याहि जातीचा अतिथि जरी आला तरी त्याची पूजा भगवद्भावानें जे करितात, त्यांच्या घरीं पूर्णप्राप्ति धांवून येते. ४९ पूर्वी ज्याची कधीं ओळख नाहीं, असा एखादा अतिथि वैश्वदेवाच्या शेवटीं आल्यास त्याची ब्रह्मभावनेनें जे पूजा करितात, त्यांस भुक्ति व मुक्ति वश होतात. ८५० त्याच वैश्वदेवाच्या शेवटीं मोठ्या भाग्यानें एखादा

श्रद्धेनें पूजितां आपण । ते घरीं नारायण स्वानंदें वसे ॥ ५१ ॥ राया वैश्वदेवाचे अंतीं । अतिथीसवें ये भुक्तिमुक्ती । विमुख जाहल्या त्या लाभा नाडती । पूजकां सुखप्राप्ती परमानंदें ॥ ५२ ॥ अतिथीच्या ठायीं मूर्तिध्यान । सर्वथा करणें न लगे जाण । तो स्वरूपें स्वयें नारायण । पूजितां संपूर्ण सर्वार्थसिद्धी ॥ ५३ ॥ एवं अतिथीसी जें अर्पे । तें भगवंतमुखीं समर्पे । यालागीं अतिसाक्षेपें । अतिथि ब्रह्मरूपें पूजिजे सदा ॥ ५४ ॥ जें जें बोलिलें पूजास्थान । तेथें निजश्रद्धाचि प्रमाण । श्रद्धेवेगळें राया जाण । प्राप्ति संपूर्ण कदा न लभे ॥ ५५ ॥ निजश्रद्धेचें हृदय स्थान । ते हृदयीं विध्युक्त पूजन । करितां श्रद्धेनें आपण । प्राप्ति संपूर्ण उद्बोधें स्वयें ॥५६॥ येऱ्हवीं तरी आपुल्या देहीं । चाळक ईश्वरू आहे हृदयीं । श्रद्धेनें भजतां त्याचे ठायीं । निजप्राप्ती पाहीं सहजें लाभे ॥ ५७ ॥ जें जें आपण सेविजे । तें तें भगवन्मुखीं पाविजे । येणें निजभजनें पाविजे । जाण सहजें परमात्मा ॥ ५८ ॥ सांडोनि देहींची अहंता । सकळ भोग ईश्वरू भोक्ता । ऐशी दृढ भावना भावितां । पाविजे परमार्था अपरोक्षसिद्धी ॥ ५९ ॥ देह जड मूढ अचेतन । सकळ भोगभोक्ता ईश्वरू पूर्ण । तेथ वाढवूनि देहाभिमान । भोगिती अज्ञान अनेक दुःखें ॥ ८६० ॥ ते सांडूनि देहअहंता । हृदयस्था शरण जातां । पाविजे पूर्ण परमार्था । जाण तत्वतां नृपवर्या ॥ ६१ ॥ निःशेष सांडिजे मीपण । याचि नांव हृदयस्था शरण । तूं सहजें परब्रह्म परिपूर्ण । मिथ्या देहभिमान धरूं नको ॥६२॥ राया येणेंचि कर्म जाण । तुटे कर्माचें कर्मबंधन । पाविजे पूर्ण समाधान । तें हें मुख्य लक्षण नृपनाथा ॥ ६३ ॥ आगमोक्त निजभजन । कर्मयोगाचें मुख्य लक्षण । ऐकतां राजा समाधान । परमानंदें पूर्ण निवाला ॥ ६४ ॥ जंव जंव रायाचें पुरलें कोड । तंव तंव कथा लागे गोड । अतिशयें श्रवणाची चाड । विशेषें वाड थोरावली ॥ ६५ ॥ राजा निवालेनि परमानंदें । सुखावलेनि निजबोधें । लांचावलेनि स्वानंदें । पुढां प्रश्न विनोदें पुसेल ॥ ६६ ॥

सत्पात्र ब्राह्मण आल्यास त्याची जे मोठ्या श्रद्धेनें पूजा करितात त्यांच्या घरीं नारायण सानंदानें रहातो. ५१ राजा, वैश्वदेवाच्या शेवटीं अतिथींबरोबर भुक्ति व मुक्ति येतात. यास्तव अतिथि विमुख झाल्यास गृहस्थ त्यांच्या लाभाला अंतरतो. पण अतिथींची जे पूजा करितात, त्यांना सुखप्राप्ति होते. ५२ अतिथीच्या ठिकाणीं मूर्तीचें ध्यान मुळींच करावें लागत नाहीं. कारण तो स्वरूपानेंच साक्षात् नारायण असतो. यास्तव त्याची पूजा केली असतां पूर्णपणें सर्वार्थसिद्धि होते. ५३ अतिथीला जें जें अर्पण करावें तें तें भगवंताच्या मुखींच समर्पित होतें. म्हणून अतिथीचें सर्वदा मोठ्या आदरानें ब्रह्मरूपानें पूजन करावें. ५४ वर पूजेचें स्थान म्हणून जें जें सांगितलें आहे, त्यावरील पूजकाची श्रद्धा हेंच प्रमाण आहे. श्रद्धेवांचून पूर्णप्राप्ति कधींच होत नाहीं. ५५ हृदय हें श्रद्धेचें स्थान आहे. यास्तव हृदयामध्यें यथाविधि श्रद्धेनें पूजन केलें असतां पूर्णप्राप्ति आपोआप प्रकट होते. ५६ वस्तुतः चालक ईश्वर आपल्या देहांत हृदयामध्यें स्थित आहेच. श्रद्धेनें त्याचें भजन केलें असतां आत्मप्राप्ति अनायासानें होते. ५७ आपण ज्याचें सेवन करावें तें तें भगवंताच्या मुखीं अर्पावें. अशा भजनानें परमात्मा अनायासानें प्राप्त होतो. ५८ देहावरील अभिमान सोडून सर्व भोगांचा भोक्ता ईश्वर आहे, अशी भावना दृढ केली असतां परमार्थाची साक्षात् सिद्धि होते. ५९ देह जड, मूढ, अचेतन आहे; सर्व भोगांचा भोक्ता पूर्ण ईश्वर आहे.पण असें असतांहि अज्ञानी लोक देहाभिमान वाढवून अनेक दुःखें भोगितात. ८६० यास्तव देहाभिमान टाकून हृदयस्थ ईश्वराला शरण गेलें असतां पूर्ण परमार्थाची प्राप्ति होते. १ हे राजा, मीपण निःशेष टाकणें हेंच हृदयस्थ ईश्वराला शरण जाणें होय. तूं स्वरूपानें पूर्ण परब्रह्म आहेस, यास्तव मिथ्या देहाभिमान धरूं नकोस, ६२ राजा, याच कर्मानें कर्मबंध तुटतो व पूर्ण समाधान होतें. आगमोक्त भजनाचें हें मुख्य लक्षण आहे. ६३ तेंच कर्मयोगाचेंहि मुख्य लक्षण आहे. हें ऐकून राजाला परम समाधान झालें. परमानंदानें तो शांत झाला. ६४ राजाचे मनोरथ जसे जसे पूर्ण होऊं लागले तशी तशी त्याला कथा गोड लागूं लागली व श्रवणाची इच्छा अतिशय वाढली. ६५ राजा, परमानंदानें शांत होऊन आत्मबोधानें सुखी झाला असतांहि स्वानंदाच्या लालचीनें विनोदानें आणखी प्रश्न विचारील. ६६ आपण जर आतां प्रश्न न करितां

उगें राहतां आपण । उठून जाती मुनिगण । यालागीं प्रश्नावरी प्रश्न । विचित्रविंदान पुसतु ॥ ६७ ॥ स्वानंदें लोधली चित्तवृत्ती । इंद्रियें वेधलीं सुखस्थिती । राजा निवाला निश्चितीं । तरी प्रश्नोक्ती पुसत ॥ ६८ ॥ पुसेल हरीचे अवतार । ते कथा सुंदर मनोहर । निरूपण अतिअरुवार । निजजिव्हार निववील ॥ ६९ ॥ त्या प्रश्नाचें प्रत्युत्तर । कथाकौतुक सनागर । एका जनार्दनाचे किंकर । उपानहधर संतांचे ॥ ८७० ॥ संत सज्जन कृपास्थिती । श्रीजनार्दन वरदमूर्ती । पुढील कथेची उत्पत्ती । सांगेन यथार्थी अर्थुनी ॥ ७१ ॥ श्रीभागवताचे राशीवरी । एकाजनार्दन केला मापारी । तो निजबोधाचे कुडवावारीं । भरील वखारी श्रवणाच्या ॥ ७२ ॥ इति श्रीभागवते महापुराणे एकादशस्कंधे निमिजायंतसंवादे मायाकर्मब्रह्मनिरूपणं नाम तृतीयोऽध्यायः ॥ ३ ॥

इति श्रीमद्भागवते महापुराणे एकादशस्कंधे तृतीयोऽध्यायः ॥ ३ ॥

अध्याय चवथा.

श्रीगणेशायनमः ॥ ओं नमो श्रीगुरु शिवशिवा । नमनें जीवत्व जीवा । नुरविसी तेथें देहभावा । कैसेनि रिघावा होईल ॥ १ ॥ जीवें घेऊनि जीवा । देहत्व मोडूनि देहभावा । याहीवरी करविसी सेवा । हें लाघव देवा नवल तुझें ॥ २ ॥ जीव घेऊनि शंखासुरा । त्याच्या वागविसी कलेवरा । तो तूं रिघोनि मजभीतरा । माझिया शरीरा वागविसी ॥ ३ ॥ शंख मधुर ध्वनीं गाजे । तो वाजवित्याचेनि वाजे । तेवीं म्या जें जें बोलिजे । तें तें बोलणें साजे तुझेनी ॥ ४ ॥ आतां

मुकाट्यानें बसलों तर हे मुनिगण उठून जातील या भीतीनें तो चतुर राजा प्रश्नांवर प्रश्न विचारूं लागला. ६७ राजाची चित्तवृत्ति स्वानंदानें भरून गेली. इंद्रियें सुखानें वेधलीं. राजा पूर्णपणें शांत झाला. तथापि त्यानें प्रश्न विचारिलाच. ६८ तो आतां पुढच्या अध्यायांत हरीचे अवतार विचारील. ती कथा फारच सुंदर आहे आणि निरूपणहि अति रमणीय होणार आहे. तें खरोखर श्रोत्यांच्या चित्ताला विश्रांति देईल. ६९ त्या प्रश्नाचें प्रत्युत्तर म्हणजे एक रमणीय कथाकौतुकच आहे. हा एकनाथ जनार्दनाचा किंकर व संतांचीं पादत्राणें धारण करणारा आहे. ८७० तो आतां संत व सज्जन यांच्या कृपेनें व वरदमूर्ति श्रीजनार्दनाच्या अनुग्रहानें पुढील कथा यथार्थ अर्थानें सांगेल. ७१ श्री भागवताच्या राशीवर एका जनार्दनाला माप घालणारा केला आहे; तो आत्मबोधाच्या कुडवांनीं श्रवणाच्या वखारी भरील. ८७२.

इति श्रीमद्भागवतमहापुराणांतील एकादशस्कंधाचा परमहंससंहितेमधला श्रीधर-एकनाथविरचित टीकांनुसार विष्णुशर्मकृत सान्वयार्थ-भावार्थासह निमिजायंतसंवादांतील मायाकर्मब्रह्मनिरूपण नांवाचा तिसरा अध्याय समाप्त झाला.

श्रीगुरु शिव-पार्वती यांस नमस्कार असो. भगवान् नमनानें संतुष्ट होऊन जीवाचें जीवत्व राहूं देत नाहीं. तेथें देहभावाचा रिघाव कोठून होणार ! १ हे देवा, जीवाचा जीव घेऊन व देहाचें देहत्व नाहींसें करूनहि त्याच्याकडून सेवा करवितोस, हें तुझें केवढें आश्चर्यकारक लाघव आहे ! २ शंखासुराचा जीव घेऊन त्याच्या शरीराला जसा वागवितोस तसाच तूं माझ्यामध्येंहि प्रवेश करून माझ्या शरीरालाहि वागवीत आहेस. ३ शंख मधुर ध्वनीनें गर्जना करितो, पण तो वाजविणाराच्या बळानें वाजतो. त्याचप्रमाणें मी जें जें कांहीं बोलतो तें सर्व तुझ्यामुळेंच